**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता प्रस्तावित फर्निचर खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०२ **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडिक) या विभागाकरीता Boyles Machine with Ventilator खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडिक) या विभागाने दि.१३/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये Boyles Machine with Ventilator ०१ नगाची मागणी केलेली आहे. कारण जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडीक) यांचेकडे सध्या असलेले Boyles Machine without Ventilator हे सन २००० या वर्षात खरेदी केलेले असुन दैनंदिन वापरामुळे खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे. सन २००० या वर्षात दोन नग Boyles Machine without Ventilator रु.४,१९,६५६/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते, सध्या सदर दोन मशिनची घसारा वजा जाता किंमत रु.१५,९९६/- इतकी आहे.

उपरोक्त Boyles Machine with Ventilator ०१ नग खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Excel Corporation, Nashik यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Boyles Machine with Ventilator | 01 | 725000.00 | 725000.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **725000.00** |

दि.२३/०५/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं. ३३ निर्णय क्र. ३२१ अन्वये ०१ नग Boyles Machine with Ventilator विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.७,२५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली असुन जुने मशिन Buyback करण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार Boyles Machine with Ventilator खरेदीकामी चौफेर – मुंबई, सार्वमत – श्रीरामपुर, पुण्यनगरी– नाशिक, पुढारी – पुणे या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०९/०९/२०१४ ते दि. २०/०९/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ३१ उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेते यांना दि.१०/०९/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई-मेल द्वारे कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01. | M/s. Maquet Medical India Pvt Ltd., Mumbai | 23/09/2014 |
| 02. | M/s. Excel Corporation, Nashik | 22/09/2014 |

उपरोक्त प्रमाणे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुन्हा सदरचे खरेदीकामी दि.०६/१०/२०१४ रोजीच्या मंजूर टिप्पणीन्वये दुस-यांदा आपला वार्ताहर-मुंबई, पुढारी – पुणे, दिव्य मराठी - नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन – अहमदाबाद, हितवाद –

नागपूर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 19/02/2015 |
| 2 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 20/02/2015 |

उपरोक्त प्रमाणे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुन्हा सदरचे खरेदीकामी दि.२६/०३/२०१५ रोजीच्या मंजूर टिप्पणीन्वये तिस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.०५/१०/२०१५ ते २३/१०/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/१०/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 26/10/2015 |
| 2 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 23/10/2015 |

उपरोक्त खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन प्राप्त दोन सिलबंद तांत्रिक निविदा दि.२४/१२/२०१५ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे तिस-या वेळेस प्राप्त झालेल्या ०२ कमर्शियल ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Name of Tenderer | Amount in Rs. |
|---|---|---|
| 1 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 1005000/- |
| 2 | M/s. Austin Health Care, Pune | 89500/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडिक) या विभागाकरीता १ नग Boyles Machine with Ventilator Against Buyback of old two date Ohmeda Boyles machine खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील M/s. Austin Health Care, Pune यांचे रु.८९,५००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०३ **श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. ओ.पी.डी. या विभागाकरीता ENT OPD Unit Set खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील ENT ओ.पी.डी या विभागाने दि.१०/०२/२०१४ रोजीचे मागणी पत्रकान्वये ENT OPD Unit Set- ०१ नगाची मागणी केलेली आहे. सध्या त्यांच्याकडे असलेले मशिन हे सन 2008 मध्ये खरेदी केलेले आहे. ENT ओ.पी.डी.रुग्णांची 1 वर्षाची संख्या 28800 इतकी आहे. त्याचा वापर मोठया प्रमाणात आहे. बाजारात सध्या असलेले मशिन Videoendoscope, Otomicroscope, Suction Trolley, Warmer, Instruments Tray, Dr. Chair इत्यादी सुविधा असलेले उपलब्ध आहे. त्यामुळे अचुक निदान करणे सोईचे होईल व पर्यायाने त्याचा रुग्णांना अधिक फायदा होईल. जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१५,८५१/- इतकी आहे. जुने मशिन वॉर्डात तातडीचे सेवेसाठी वापरता येईल. त्यामुळे नविन मशिन खरेदी करणे गरजेचे आहे.

उपरोक्त ENT OPD Unit Set ०१ नग खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Optofine Instruments Pvt. Ltd., Miraj यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S.No. | Item Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | ENT OPD Unit Set | 01 | 5,90,625.00 | 5,90,625.00 |
| | | | **Total In Rs.** | **5,90,625.00** |

उपरोक्त प्रमाणे ENT OPD Unit Set ०१ नग खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ५,९०,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१७/०७/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ६०१ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील ENT ओ.पी.डी या विभागाकरिता ENT OPD Unit Set ०१ नग विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.५,९०,६२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Allwin Lifecare Mumbai | 24/11/2014 |

सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली आहे. परंतु खरेदीकामी कमीत कमी ०३ निविदा आवश्यक असल्यामुळे दि.१०/१२/२०१४ रोजीच्या मंजुर टिपणीन्वये फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता मिळाली असून त्यानुसार फ्री- प्रेस जरनल- मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.११/०५/२०१५ते २५/०५/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२७/०५/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 01/06/2015 |

दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन देखील एकच निविदा प्राप्त झाली व सदर निविदाही मुदतीनंतर प्राप्त झालेली आहे. तसेच खरेदीकामी कमीत कमी ३ निविदांची आवश्यकता असल्यामुळे दि.२२/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा तिस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.१५/१०/२०१५ ते ०२/११/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती,तर दि.०५/११/२०१५ अखेर निविदा स्विकारण्याची मुदत ठेवण्यात आली होती, त्यास अनुसरुन एकच निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 03/11/2015 |

उपरोक्त खरेदीकामी तिस-यांदा जाहिरात देऊन प्राप्त एक सिलबंद तांत्रिक निविदा दि.०८/०१/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे तिस-यांदा निविदा मागवूनही प्राप्त झालेली ०१ कमर्शियल सिलबंद ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Name of Tenderer | Amount in Rs. |
|---|---|---|
| 1 | Austin Health Care | 2062000/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेनुसार, श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. ओ.पी.डी. या विभागाकरीता १ नग ENT OPD Unit Set खरेदीकामी रु.५,९०,६२५/- मात्रचे अपेक्षीत खर्चास प्रशासकीय मान्यता असून M/s. Austin Healthcare, Pune यांचे ई-निविदेमध्ये रु.२०,६२,०००/- मात्र दर मिळालेले आहेत. सदरहु दर हे अपेक्षित व मंजूर खर्चापेक्षा खुपच जास्त असल्यामुळे याकामी नविन खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०४ **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता नवीन झेरॉक्स मशिन खरेदी कामी प्राप्त दरपत्रके उघडणे बाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरिता झेरॉक्स मशिन खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु १,५०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्य.मं. समितीचे दि. ०९.१२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०४० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर मशिन खरेदीचा प्रस्ताव संस्थानचे विहित पध्दतीप्रमाणे खरेदी विभागाकडे वर्ग करण्यांत आला होता. खरेदी विभागामार्फत कोटेशन/निविदा मागवून मशिन खरेदीसबंधी सर्व कार्यवाही पूर्ण करुन मा. व्य.मं.समितीचे सभेत विषय सादर करण्यात आला होता.

मा. व्य.समितीचे दि. १६.०४.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार झेरॉक्स मशिन खरेदीबाबत विभागाच्या मागणीनुसार शासनाकडील उपलब्ध दरपत्रकासह सदरहु प्रस्ताव फेर सादर करण्यात यावा असे ठरले. त्यामुळे खरेदी विभागामार्फत जा.नं.७७/२५ दि.१५.०६.२०१५ रोजी सदरचा प्रस्ताव पुन्हा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे पाठविण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०४.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार शासनाकडील रेट कॉन्ट्रक्टबाबत (R.C.) माहिती घेऊन खालील वर्णनाचे झेरॉक्स मशिन खरेदी करणेकामीचा प्रस्ताव इकडील कार्यालयाकडील दि. २८.०१.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता.

| अ.क्र. | खरेदीचा तपशिल | वर्णन | शासन दरानुसार निश्चित केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | Digital Multifunctional Copier Machines {Size A-3} | Minimum copying/printing speed {cpm} : 35/35 paper size{original/Image}:A3 /A3RAM{MB}:256,Hard Disk:20GB,Byepass:50 Sheets | रु. १,७२,६६०/- + व्हॅट ------------------------ रु. १,८१,२९३/- |

सदरबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.१०५ अन्वये श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करिता ०१ नग नविन झेरॉक्स मशिन विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,८१,२९३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

सध्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे वापरात असलेले झेरॉक्स मशिन बंद पडलेले आहे. पुढील महिन्यात ज्यु.के.जी. ते इ. ९वी पर्यंतच्या सर्व वर्गांच्या वार्षिक परिक्षा असल्याने प्रश्नपत्रिका तसेच परिक्षेसंदर्भातील सर्व कागदपत्रे झेरॉक्स करणे गरजेचे असते. त्यामुळे झेरॉक्स मशिन तातडीने खरेदी करणे गरजेचे असल्याने वेगवेगळया कंपन्यांच्या प्रतिनिधींशी दुरध्वनीव्दारे संपर्क करु, उपरोक्त वर्णनाचे०१ नग झेरॉक्स मशिन खरेदीकामी दरपत्रक पाठविण्याबाबत कळविण्यात आले, त्यानुसार खालील पुरवठाधारकांकडून मुदतीअंती दरपत्रके प्राप्त झालेली आहेत

| अ.नं. | दरपत्रक धारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | ASZ COMPUTERS NASHIK | 24090 / 8.03.2016 |
| ०२ | ACCENT AUTOMATION AUTHORISED BUSINEES ASSOCIATES 11 KAHAR, APT.PARIJAT NAGAR NASHIK. | 24085 /08/03.2016 |
| ०३ | DIGITAL OFFICE SOLUTION NASHIK. | 24088 / 08.03.2016 |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Name of Tenderer | Amount in Rs. |
|---|---|---|
| 1 | ASZ Computers, Nashik | 2,22,600/- |
| 2 | Accent Automation Authorised Businees Associates, Nashik | 2,31,000/- |
| 3 | Digital Office Solution, Nashik | **1,81,230/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ०१ नग नवीन झेरॉक्स मशिन खरेदीकामी Digital Office Solution, Nashik यांचे रु.१,८१,२३०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत व सदरहू निम्नतम दर हे शासनाकडील दर कराराशी सुसंगत असतील तर संबधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

०५ **सन २०१६ मधील श्रीरामनवमी उत्सव निमीत्त साईभक्तांच्या सुविधेकरीता मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या ई निविदा (कमर्शियल बीड ) उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे तर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.१४ एप्रिल, २०१६ ते दि.१६ एप्रिल २०१६ अखेर श्रींचा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत मंगल कार्यालय, साई धर्मशाळा, व पालखी स्वागतासाठी शामियाना मंडप कनात व बिछाईतीसह उभारणे, बॅरेकेटींग, स्टेज, इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी, गोलभान, कसारा बायपास, लतीफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, झगडेफाटा व निमगांव को-हाळे येथे कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछाईत व विदयुत व्यवस्थेसह तात्पुरती उभारणी करणे आवश्यक असल्याने, त्यानुसार याकामी दि.०३/०२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार

प्राप्त झालेल्या ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.१५/०३/२०१६ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. डी. टी. उगले | प्रशासकीय अधिकारी |
| ३ | श्री.यु.पी.गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| ४ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| ५ | श्री. आर.बी. आहेर | उप कार्यकारी अभियंता |
| ६ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ७ | श्री. एस. पी. लंके | लेखाधिकारी |
| ८ | श्री. एम.पी. गव्हाणे | कनिष्ठ अभियंता |
| ९ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | पॅन कार्डची छायांकीत प्रत | सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन | रु.१००/- मात्रचे मुद्रांकावर हमीपत्र. | मंडप उभारणीच्या उलब्ध साहित्याचा तपशिल | |
| १ | न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर | Sarswat Bank–Dt.03/03/2016 D.D. No.000706 Rs.11,000/- Sarswat Bank–Dt.03/03/2016 D.D. No.000705 Rs. 1,000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| २ | न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | State Bank of H.bad Dt.03/03/2016 D.D. No.503397 Rs.11000/- State Bank of H.bad Dt.03/03/2016 D.D. No.503398 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ३ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | State Bank of H.bad Dt.04/03/2016 D.D. No.523383 Rs.11000/- State Bank of H.bad Dt.04/03/2016 D.D. No.523384 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ४ | साईकृपा टेंट हाऊस, बेलापूर, ता. श्रीरामपूर | State Bank of H.bad Dt.01/03/2016 D.D. No.503392 Rs.11000/- State Bank of H.bad Dt.01/03/2016 D.D. No.503393 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ५ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर, ठाणे | State Bank of Bikaner, Jaipur Dt.09/03/2016 | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | D.D. No.988608 Rs.11000/- State Bank of Bikaner, Jaipur Dt.09/03/2016 D.D. No.988607 Rs.1000/- | | | | | |
| ६ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | SBI – Dt.10/03/2016 D.D. No.966943 Rs.11000/- SBI – Dt.10/03/2016 D.D. No.966942 Rs.1000/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |

वरील प्रमाणे अ.नं. १ ते ६ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता, सर्व ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

साईभक्तांच्या सोयीसाठी श्री रामनवमी उत्सव- २०१६ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्त पात्र ६ ठेकेदारांचे कमर्शियल बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित ठेकेदारांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

**श्री रामनवमी उत्सव २०१६ निमित्त दि.१४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ या कालावधीत करावयाची मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, | न्यु जगदंबा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स | साईकृपा टेंन्ट हाऊस | शेटे डेकोरेटर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर प्र.चौ.फुट रु. | | | | | |
| १ | मंदिर परिसर व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणे. १७,२२० चौ. फुट | ४.५० | ४.४० | ५.०० | ६.०० | ५.०० | ६.०० |
| २ | साईनगर मैदानावर स्टेज व्यवस्था करणे. ६०० चौ. फुट | १००/- | ९९/- | १५०/- | ६६/- | १८०/- | ३३३/- |
| ३ | सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था करणे. ३८४ चौ. फुट | ६०/- | ५०/- | १५०/- | ७०/- | ६०/- | २६०/- |
| ४ | बॅरेकेडींग व्यवस्था करणे. १५०० र. फुट | ५०/- | ३९ | ४५/- | ४०/- | ४५/- | १८०/- |

**मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी /शामियाना मंडप, कनात, बिछाईत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, | न्यु जगदंबा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स | साईकृपा टेंन्ट हाऊस | शेटे डेकोरेटर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर प्र.चौ.फुट रु. | | | | | |
| ५ | मुंबई ते सिन्नर मार्गावर ३१६०० चौ. फुट (कालावधी दि.८ ते १२ एप्रिल २०१६ अखेर ०५ दिवस) | ८.५० | १०.०० | ११.०० | २५.०० | १४.०० | ७.९० |
| ६ | सिन्नर ते वावी मार्गावर ७६६५१ चौ. फुट (कालावधी दि.९ ते १३ एप्रिल २०१६ अखेर ०५ दिवस) | ६.७० | ४.९५ | ६.५० | २५.०० | ८.०० | ४.२५ |
| ७ | वावी ते शिर्डी मार्गावर ३०३७० चौ. फुट (कालावधी दि.१० ते १४ एप्रिल २०१६ अखेर ०५ दिवस) | ४.९५ | ६.७५ | ६.७५ | २०.०० | ६.५० | ४.५० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव- २०१६ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देणेत यावा. तसेच उत्सव काळात ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे लॉन्ड्री व प्रयोगशाळेच्या रासायनिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेकामी तज्ञ सल्लागार नेमणूकीकरीता प्राप्त झालेले Request for Proposal उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट–कलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय :-**

१. मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०७/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६५ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथे लॉण्ड्री व प्रयोगशाळेच्या रसायनीक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेसाठी त्यांचे डिझाईन, ड्रॅाईग, निविदा वगैरे तयार करुन घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांची विहीतपध्दतीने नेमणूक करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

२. मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.९२५ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी फक्त दोनच RFP Document वजा प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत व त्या दोन्हीही प्रस्तावांमध्ये फारच तफावत दिसून येत आहे. त्याकरीता याकामी फेर प्रस्ताव मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

**प्रस्ताव:-** मा. त्रीसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार विषयांकीत कामासाठी डिझाईन, ड्रॅाईग, निविदा वगैरे तयार करुन घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांचेकडून प्रस्ताव मागविणेकामी इकडील विभागामार्फत Request for Proposal (RFP) Document तयार करणेत आले आहे. त्याकरीता नामांकीत व तज्ञ सल्लागार यांचेकडून फेर प्रस्ताव मागविणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेसाठी मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव दि.१४/०२/२०१५ रोजी सादर करणेत आला होता. त्यावर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी Consultant नेमणे अतिश्य आवश्यक आहे? यासाठी अन्य पर्याय उपलब्ध नाही काय असे निर्देश दिले होते.

उपरोक्त निर्देशानुसार वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हास्पिटल यांना दि.२४/०३/२०१५ रोजीचे पत्राव्दारे, या प्रकल्पासाठीचे सेवा त्यांचेकडील बायोमेडीकल विभागाकडून करणे शक्य आहे किंवा कसे? याबाबत त्यांचा स्वयंस्पष्ट अभिप्राय इकडील कार्यालयास सादर करणेतबाबत कळविण्यात आले होते. त्यावर वैद्यकिय संचालक यांनी अशा प्रकारचे काम करण्यास तज्ञ ETP Engineer उपलब्ध नाही. त्यामुळे याकामी Consultant नेमणे अधिक उचित राहील असे मत कळविले आहे. त्यानुसार विषयांकीत कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी सल्लागार नेमणेसाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर फेर जाहिरात प्रसिध्द करुन दि.१५/०२/२०१६ अखेर RFP मागविणेत आले आहे. सदरचे मुदतीत खालील इच्छुक संस्थानी RFP सादर केले आहेत.

| Sr. No | Name of Consultant | Inward No. / Date |
|---|---|---|
| 01. | Engineering Solutions, Airoli, Mumbai | 22069 / 06.02.2016 |
| 02. | Klean Environmental Consultant P. Ltd., Mahim, Mumbai | 22414 / 11.02.2016 |
| 03. | (Mr. K. Namasivayam) Sainath Enviro Tech, Tuticorin, (Tamilnadu) | 22590 / 15.02.2016 |
| 04. | En-Struct Consulting Engineers, Pune | 22591 / 15.02.2016 |
| 05. | Panse Consultants, Kothrud, Pune | 22635 / 15.02.2016 |
| 06. | Enviro Analysts & Engineers Pvt. Ltd., Borivali (E), Mumbai | 22636 / 15.02.2016 |
| 07. | Eco System Resource Management Pvt. Ltd., Surat | 22637 / 15.02.2016 |

श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पीटल येथे लॉण्ड्री व प्रयोगशाळेच्या रसायनीक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेकामी तज्ञ सल्लागार नेमणुकीकरीता वरील प्रमाणे प्राप्त झालेले एकुण ०७ Request for Proposal आजचे उपसमिती सभेसमोर समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No | Name of Consultant | Amout in Rs. |
|---|---|---|
| 01. | Engineering Solutions, Airoli, Mumbai | 3,77,000/- |
| 02. | Klean Environmental Consultant P. Ltd., Mahim, Mumbai | 2,50,000/- + Service Tax 14.50% |

| | | |
|---|---|---|
| 03. | Sainath Enviro Tech, Tuticorin, (Tamilnadu) | 4,84,000/- |
| 04. | En-Struct Consulting Engineers, Pune | **2,47,000/- + Service Tax** |
| 05. | Panse Consultants, Kothrud, Pune | 4,00,075/- |
| 06. | Enviro Analysts & Engineers Pvt. Ltd., Borivali (E), Mumbai | 2,91,000/- |
| 07. | Eco System Resource Management Pvt. Ltd., Surat | 2,97,000/- + Service Tax |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे लॉन्ड्री व प्रयोगशाळेच्या रासायनिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेकामी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील En-Struct Consulting Engineers, Pune यांचे रु.२,४७,०००/- + सर्व्हिस टॅक्स मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना सल्लागार म्हणून नेमणूक देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

७ **संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक असणारे संगणक स्टेशनरी खरेदी ई निवीदा (Financial Bid) उघडणेबाबत.**

संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक संगणक स्टेशनरी खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,९०,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख नव्वद हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३० (२३) नुसार मान्यता मिळालेली आहे.

कार्यालयीन स्टेशनरी व संगणक स्टेशनरीसाठी तीन वेळेस ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. तिस-या वेळेसचे निविदा प्रक्रियेत कार्यालयीन स्टेशनरीकामी ई-निविदा उघडून त्याचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. संगणक साहित्यासाठी अधिकृत वितरकांकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि त्याला प्रतिसाद न मिळाल्यामुळे, ही अट शिथील करुन संगणक स्टेशनरी खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.११.०२.२०१६ ते दि.२४.०२.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया चौथ्यांदा राबविणेत आलेली आहे.

तांत्रिक निविदे सोबत जोडलेली कागदपत्रे स्विकारणेची अंतीम तारीख दि.२६.०२.२०१६ अशी ठेवण्यात आलेली होती. तसेच निविदा जाहिरातीमध्ये तांत्रिक निविदा उघडणेची तारीख २९.०२.२०१६ अशी नमूद करणेत आलेली होती. दिनांक २९.०२.२०१६ रोजी Technical Bid खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेले आहे. सदर सभेचे इतिवृत्त सोबत सादर केलेले आहे. त्यास अनुसरुन खालील दोन निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या आहेत.

१. मे.डिजीटल ऑफिस सोल्युशन, नाशिक

२. मे.सुरेंद्र ट्रेडर्स, नाशिक

तरी वरीलप्रमाणे Technical Bid मध्ये पात्र निविदाधारकांचे Financial Bid आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Digital office solutions | | Surendra Traders | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.0 | Computer Stationary | | | | | | |
| 1.01 | TONER POWDER FOR 12A TONER, 100gm Pack | 100.00 | Nos. | 150.00 | 15000.00 | **90.00** | 9000.00 |
| 1.02 | TONER POWDER FOR 36A TONER, 80gm Pack | 50.00 | Nos. | 150.00 | 7500.00 | **90.00** | 4500.00 |
| 1.03 | TONER POWDER FOR 88A TONER, 80gm Pack | 50.00 | Nos. | 150.00 | 7500.00 | **90.00** | 4500.00 |
| 1.04 | KEYBOARD & MOUSE, USB, Make/Brand - LOGITECH | 20.00 | Set | 825.00 | 16500.00 | **800.00** | 16000.00 |
| 1.05 | SMPS, Make/Brand - i-Ball | 20.00 | Nos. | **725.00** | 14500.00 | 750.00 | 15000.00 |
| 1.06 | COMPUTER POWER CABLE, 1.5 METRE, ISI STANDARD | 25.00 | Nos. | 100.00 | 2500.00 | **70.00** | 1750.00 |
| 1.07 | DESKTOP TO PRINTER USB CABLE 2 METRE | 25.00 | Nos. | 200.00 | 5000.00 | **50.00** | 1250.00 |
| 1.08 | DRUM FOR 12A TONER | 25.00 | Nos. | 200.00 | 5000.00 | **125.00** | 3125.00 |
| 1.09 | DRUM FOR 36/88A TONER | 25.00 | Nos. | 200.00 | 5000.00 | **125.00** | 3125.00 |
| 1.1 | CMOS BATTERY | 25.00 | Nos. | 25.00 | 625.00 | **10.00** | 250.00 |
| 1.11 | P IV CPU COOLING FAN | 10.00 | Nos. | 250.00 | 2500.00 | **150.00** | 1500.00 |
| 1.12 | PCR ROLLER FOR 12A TONER | 40.00 | Nos. | 200.00 | 8000.00 | **100.00** | 4000.00 |
| 1.13 | TOOL KIT | 2.00 | Nos. | 500.00 | 1000.00 | **150.00** | 300.00 |
| 1.14 | IP FOR IC CLEANING 1 LITRE BOTTLE | 1.00 | Nos. | 800.00 | 800.00 | **400.00** | 400.00 |
| 1.15 | PROCESSOR COOLING PASTE TUBE | 2.00 | Nos. | 100.00 | 200.00 | **20.00** | 40.00 |
| 1.16 | SMPS TESTER | 1.00 | Nos. | 500.00 | 500.00 | **200.00** | 200.00 |
| 1.17 | MULTIMETRE | 1.00 | Nos. | **350.00** | 350.00 | 700.00 | 700.00 |
| 1.18 | SOLDER GUN | 1.00 | Nos. | 350.00 | 350.00 | **300.00** | 300.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.19 | D-Link - RJ 45 | 1.00 | Box | 700.00 | 700.00 | 10.00 | 10.00 |
| 1.2 | CLAMPING TOOL | 2.00 | Nos. | 1000.00 | 2000.00 | 200.00 | 400.00 |
| 1.21 | BLUE INK TANK FOR DIGITAL FRANKING MACHINE, 175ML, BLUE, 2242 PIGMENT (HP) 2281A | 18.00 | Nos. | 2500.00 | 45000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.22 | XEROX MACHINE TONER, Company/Brand - RICHO, 1230D Black | 20.00 | Nos. | 3350.00 | 67000.00 | 1799.00 | 35980.00 |
| 1.23 | XEROX MACHINE DRUM, Company/Brand - RICHO, B0399510 | 5.00 | Nos. | 4210.00 | 21050.00 | 2899.00 | 14495.00 |
| 1.24 | XEROX MACHINE DEVELOPER Company/Brand - RICHO, Type - 28, B1219640 | 5.00 | Nos. | 3840.00 | 19200.00 | 2999.00 | 14995.00 |
| 1.25 | FAX MACHINE ROLL Make/Brand - MITSU THERMISHI, FAX PAPER 41 CM X 33CM | 250.00 | Nos. | 400.00 | 100000.00 | 75.00 | 18750.00 |
| 1.26 | HP BLACK TONER, Make/Brand - Q2612A | 60.00 | Nos. | 900.00 | 54000.00 | 1999.00 | 119940.00 |
| 1.27 | HP BLACK TONER, Make/Brand - 88A | 15.00 | Nos. | 900.00 | 13500.00 | 1999.00 | 29985.00 |
| 1.28 | HP BLACK TONER, Make/Brand - 36A | 10.00 | Nos. | 900.00 | 9000.00 | 1999.00 | 19990.00 |
| 1.29 | BLACK TONER, Make/Brand - 0166 for Wipro | 3.00 | Nos. | 3000.00 | 9000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.3 | HP COLOUR LASERJET LJ1025 Make/Brand - CE310A | 2.00 | Nos. | 1800.00 | 3600.00 | 1999.00 | 3998.00 |
| 1.31 | HP COLOUR LASERJET LJ1025 Make/Brand - CE311A | 2.00 | Nos. | 1800.00 | 3600.00 | 2499.00 | 4998.00 |
| 1.32 | HP COLOUR LASERJET LJ1025 Make/Brand - CE312A | 2.00 | Nos. | 1800.00 | 3600.00 | 2499.00 | 4998.00 |
| 1.33 | HP COLOUR LASERJET LJ1025 Make/Brand - CE313A | 2.00 | Nos. | 1800.00 | 3600.00 | 2499.00 | 4998.00 |
| 1.34 | 32 GB PEN DRIVE Make/Brand - Sony | 54.00 | Nos. | 800.00 | 43200.00 | 700.00 | 37800.00 |
| 1.35 | BLANK CD WITH COVER Make/Brand-Sony | 600.00 | Nos. | 12.00 | 7200.00 | 10.00 | 6000.00 |
| 1.36 | BLANK DVD WITH COVER Make/Brand- Sony | 320.00 | Nos. | 15.00 | 4800.00 | 15.00 | 4800.00 |
| 1.37 | EXIDE 12W X 7 AH, UPS BATTERY | 25.00 | Nos. | 900.00 | 22500.00 | 999.00 | 24975.00 |
| 1.38 | NET PROTECTOR ANTI VIRUS LATEST VERSION | 60.00 | Nos. | 450.00 | 27000.00 | 350.00 | 21000.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक असणारी संगणक स्टेशनरी खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधारेखीत केलेले निम्नतम दर व सध्याचे बाजारभावातील दर याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाकडून पडताळणी करुन घेण्यात येऊन, त्यानुसार संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या स्टेशनरीसाठी समान दर आलेले आहेत, त्यासाठी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

८ **श्री रामनवमी उत्सव २०१६ कीर्तनकार व कलाकार निश्चीत करणे, बिदागी निश्चित करणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री रामनवमी उत्सव-२०१६ दि. १४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

१) **कीर्तन कार्यक्रम-**

श्री रामनवमी उत्सवाकरीता श्री गोरटे महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांचे मार्फत पाठविलेले कीर्तनकार कीर्तन करीत असतात. याहीवर्षी श्री गोरटे महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी दि.१६/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री रामनवमी उत्सवासाठी संमती कळविलेली असून त्यांचे तर्फे ह.भ.प. श्री विक्रम नांदेडकर हे कीर्तनकार हजेरी देतील असे कळविले आहे.

मागील वर्षी श्री रामनवमी उत्सवाचे ३ दिवसाचे कीर्तनासाठी रु.९००१/- मात्र बिदागी देण्यात आलेली होती. मागील उत्सवा प्रमाणेच कीर्तनकारास रु.९००१/- (रु. नऊ हजार एक) मात्र बिदागी/ मानधन देणेबाबत मान्यता मिळणेस विनंती.

२) **कलाकार कार्यक्रम –**

श्री रामनवमी उत्सव २०१६ मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी इच्छुक असणा-या कलाकारांची नावे खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कलाकारांचे नाव | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प. एकनाथजी महाराज पंडीत, भडगांव बुलढाणा | संगीतमय प्रवचन | ४ ते ५ | विनामुल्य |
| ०२. | पं.ह.भ.प. देवरावजी कुळमेथे महाराज, नाशिक | साई महिमा गुणगान | ४ ते ५ | विनामुल्य |
| ०३ | श्री मुव्वा नुत्य निकेतन, विजयवाडा | कुचीपुडी डान्स | २० ते २२ | विनामुल्य |
| ०४. | दीपा थिएटर, मुंबई | नाटक– महोत्सव माझा व साई लिला | ३० ते ३२ | रु.४५,०००/- |
| ०५ | श्री साई सत्संग, गुवाहाटी | साई प्रेम संस्कृतीक नृत्य | १२ ते १५ | विनामुल्य |
| ०६ | नुर-ए- साई परिवार, लखनऊ | साई भजन | १० ते १२ | विनामुल्य |
| ०७ | श्री पंढरीनाथ रावजी जाधव, नाशिक | अभंग व भजन | ४ ते ५ | विनामुल्य |
| ०८ | श्री राशेस रावल, बडोदा | साई भजन | १० ते १२ | विनामुल्य |
| ०९ | सौ. मधुरा विनय बेळे, नाशिक | भजन / भक्तीगीते | ५ ते ६ | विनामुल्य |
| १० | साई सेवा समिति, उरई , उ. प्र ( वैद्य एल. आर) | साई भजन | ६ ते ७ | विनामुल्य |
| ११ | साई श्रध्दा सबुरी, दिल्ली ( रुबी शर्मा) | अपंग मुलांचे नृत्य | ४ ते ५ | विनामुल्य |
| १२ | संगिता श्रीकिशन, बंगलोर | साई भक्त समर्पण | ७ ते ८ | विनामुल्य |
| १३ | श्री अतुल राखे, बडोदा, गुजरात | साई भजन | ९ ते १० | विनामुल्य |
| १४ | श्री.सुधांशु श्रीवास्तव, महेंद्रगड ( छतीसगड) | साई भजन | १० ते ११ | विनामुल्य |
| १५ | श्री पंकज श्रीवास्तव, दिल्ली | साई भजन | ७ ते ८ | विनामुल्य |
| १६. | अर्चना, दिनेश हैद्राबाद | कुचीपुडी नृत्य | -- | -- |

अ.क्र १ ते ३ व अ.क्र ०५ ते १५ या कलाकारांनी कार्यक्रम विनामुल्य करणेबाबत कळविलेले आहे., अ.क्र १६ यांचा संपर्क नंबर नसल्याने, त्यांना ई-मेल पाठविण्यात आलेला आहे. त्यांचे कोणतीही प्रत्युत्तर आलेले नाही. अ.क्र ४ चे कलाकारांनी मानधनाचा उल्लेख केलेला आहे. तसेच अ.क्र ०२,०७ व १३ या कलाकारांनी पुर्वी उत्सवात कार्यक्रम सादर केलेले आहेत.

सन २०१६ चे रामनवमी उत्सव दि.१४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ अखेर ०३ दिवस साजरा करणेत येणार असल्याने, या ०३ दिवसांसाठी दररोज सायं ७.३० ते रात्रौ. १०.३० वाजेपर्यत कलाकार हजेरी कार्यक्रमासाठी कमीत कमी ०३ कलाकार कार्यक्रम निश्चित करावे लागतील.

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या कलाकांपैकी ०३ कलाकार तसेच प्रतिक्षा यादीवर ०१ कलाकार निश्चित होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सवाकरीता श्री गोरटे महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांचे मार्फत किर्तनकार पाठविले जातात. याहीवर्षी त्यांचे तर्फे ह.भ.प. श्री.विक्रम नांदेडकर यांना श्री रामनवमी उत्सव- २०१६ निमित्ताने किर्तनकार म्हणून ते पाठविणार असून त्यांना तीन दिवसांच्या किर्तनाची रु.९००१/- मात्र बिदागी देण्यात यावी.**

**तसेच प्रत्येक उत्सवामधील संस्थान आयोजित कार्यक्रमासाठी, यापुर्वी कार्यक्रम सादर केलेला नसलेले व विनामुल्य सेवा सादर करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षी प्रस्तावात नमुद केलेल्या कलाकारांच्या तक्त्यातील अ.नं.३,५,६,९,१०,११ या कलाकारांना दिवस व वेळ कळविणेत येऊन, त्यांचे कार्यक्रम सादर करणेत परवानगी देण्यात यावी, किर्तनकार व कलाकारांसह त्यांचे सोबत येणा-या सहकलाकारांची नेहमीप्रमाणे विनामुल्य निवास, भोजन व दर्शनव्यवस्था करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

९ **सन २०१६ मध्ये साज-या होणा-या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडून निर्णय होणे बाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०२/२०१६. रोजीचे सभेतील निर्णय ७८- खालील प्रमाणे पारित करणेत आलेला आहे." सन-२०१६ मधील संस्थान व्यवस्थापना मार्फत साजरे करण्यात येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी (विजयादशमी) या तीन मुख्य उत्सवासाठी पत्रिका व पाकीटे छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१२,००,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच सदरहु, खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशा प्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

मा.व्यवसथापन समितीचे दि.१६/०२/२०१६. रोजीचे सभेतील निर्णयाअन्वये इकडील विभागामार्फत ई-निविदा जाहिरात व किमान पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria) तयार करुन दि.१९/०२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहु ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन टेंडर प्रसिध्द | ०८/०३/२०१६ |
| २ | ऑनलाईन डाक्युमेंट डाऊनलोड सुरवात | ०८/०३/२०१६ |
| ३ | ऑनलाईन डाक्युमेंट डाऊनलोड शेवट | १५/०३/२०१६. |
| ४ | ई- निविदा तांत्रिक बीड उघडण्याची दिनांक | १८/०३/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे विहीत मुदतीत दि.१५.०३.२०१६ अखेर खालील प्रमाणे ०९ निविदाधारकांकडून तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या होते.

| अ.नं. | पार्टीचे नाव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निट प्रिन्टर्स . अहमदनगर | २४३३५ | ११/०३/२०१६ |
| २ | प्रवरा ऑफसेट, लोणी | २४३८३ | १२/०३/२०१६ |
| ३ | प्रिन्ट पल्स प्रा. लि. मुंबई | २४५८५ | १५/०३/२०१६ |
| ४ | राका प्रिन्टर्स, नाशिक | २४६०१ | १५/०३/२०१६ |
| ५ | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | २४६५४ | १६/०३/२०१६ |
| ६ | स्वास्तिक ऑफसेट अ.नगर | २४६५५ | १६/०३/२०१६ |
| ७ | मधुरा प्रिन्ट सोल्युशन्स, नाशिक | २४६६० | १६/०३/२०१६ |
| ८ | सकाळ पेपर्स प्रा.लि, कोल्हापूर | २४६६१ | १६/०३/२०१६ |
| ९. | मनीपाल टेक्नॉलॉजी लिमिटेड, मुंबई | २४७४३ | १६/०३/२०१६ |

सदरचे प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा (Technical Bid) (ऑनलाईन व निविदा व त्या सोबत स्कॅन करुन जोडलेल्या कागदपत्रांच्या व डी.डी. च्या मुळ प्रतीचे प्रत्यक्ष प्राप्त लिफाफे) दि.१८.०३.२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. उपस्थित ०४ निविदाधारक तसेच मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेले आहेत. सदरची ई-निविदा ऑनलाईन उघडली असता, खालील निविदाधारकांनी मुदतीत ऑनलाईन निविदा सादर केलेली होती.

| अ.नं. | ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या निविदाधारकांचे नावे |
|---|---|
| १ | निट प्रिन्टर्स, अहमदनगर |
| २ | प्रवरा ऑफसेट, लोणी |
| ३ | प्रिन्ट पल्स प्रा. लि. मुंबई |
| ४ | राका प्रिन्टर्स, नाशिक |
| ५ | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई |
| ६ | रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद |
| ७ | मधुरा प्रिन्ट सोल्युशन्स, नाशिक |
| ८ | सकाळ पेपर्स प्रा.लि., कोल्हापूर |
| ९. | मनीपाल टेक्नॉलॉजी लिमिटेड, मुंबई |

उपरोक्त सर्व निविदाधारकांचे नावाचे अवलोकन करता अ.क्र.६ मे.रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद यांनी तांत्रिक लिफाफा ऑनलाईन सादर केलेला होता मात्र स्कॅन केलेल्या कागदपत्रे व डी.डी.च्या मुळ प्रतींचा लिफाफा सादर केलेला नव्हता. तसेच मे.स्वस्तिक ऑफसेट, अहमदनगर यांनी स्कॅन केलेल्या कागदपत्रे व डी.डी.च्या मुळ प्रतींचा लिफाफा सादर केलेला होता, मात्र त्यांची निविदा ऑनलाईन प्राप्त झालेली नव्हती.

त्यामुळे वरिष्ठांचे परवानगीने मे.रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद यांना दुरध्वनीद्वारे मुळ कागदपत्रांचा लिफाफा त्वरीत त्याच दिवशी जमा करणेबाबत कळविले, त्यानुसार त्यांनी दि.१८.०३.२०१६ रोजी दुपारी ०३.३० वा. तांत्रिका लिफाफा आवक विभागात जमा केलेला आहे. त्यामुळे त्यांची निविदा ग्राह्य धरण्यात आली. तसेच मे.स्वस्तिक ऑफसेट, अहमदनगर यांची निविदा ऑनलाईन प्राप्त झालेली नसल्यामुळे त्यांचे प्राप्त लिफाफ्याचा विचार करण्यात आलेला नाही.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त ०९ निविदाधारकांचे निविदेचे ऑनलाईन तांत्रिक लिफाफे उघडून त्यातील कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी, यांचेमार्फत करण्यात आली, त्याचे परिशिष्ठ "अ" सोबत जोडलेले आहे. त्यातील तपशिल खालीलप्रमाणे -

१. अ.क्र.२,६,७ व ९ निविदाधारकांनी सेल्स टॅक्स/सेंट्रल सेल्स टॅक्स नोंदणी दाखला जोडलेला नाही. तथापि त्यांनी व्हॅट / टीन नोंदणी दाखले व इतर सर्व कागदपत्रे सादर केलेले आहेत.

२. उर्वरीत सर्व निविदाधारकांनी निविदेमध्ये मागणी केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर केलेले आहेत.

त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१८.०३.२०१६ रोजीच्या मंजुर टिपणीन्वये सर्व निविदाधारकांच्या निविदा पात्र/ग्राह्य ठरलेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे पात्र ०९ निविदाधारकांच्या निविदेतील मुळ लिफाफे (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निमंत्रण पत्रिका दोन्ही बाजून छपाई करणे (फोर कलर विथ फोल्डींग), आर्ट पेपर, ९० जी.एस.एम., पाकिटे छपाई (फोर कलर), मॅपलीथो पेपर ९० जी.एस.एम., पाकीटासाठी गम टेप वापरणे. |
|---|---|---|
| | | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. |
| १ | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | १.७१ |
| २ | रोहन प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | २.४१ |
| ३ | सकाळ पेपर्स प्रा.लि., कोल्हापूर | ३.२२ |
| ४ | मधुरा प्रिन्ट सोल्युशन्स, नाशिक | १.७९ |
| ५ | राका प्रिन्टर्स, नाशिक | २.११ |
| ६ | प्रिन्ट पल्स प्रा. लि. मुंबई | १.७२ |
| ७ | प्रवरा ऑफसेट, लोणी | <u>१.७०</u> |
| ८ | निट प्रिन्टर्स, अहमदनगर | २.२० |
| ९. | मनीपाल टेक्नॉलॉजी लिमिटेड, मुंबई | २.९२ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणा-या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील प्रवरा ऑफसेट, लोणी याचे सर्वसमावेशक रु.१.७० प्रति नग मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेचे अधीन राहून, प्रत्येक उत्सवापुर्वी विहीत कालावधीमध्ये स्वतंत्र कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

१० **संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी प्रिंटर्स खरेदीकामी प्राप्त ई-निविदामधील पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा उघडुन त्यातील निम्मत्तम पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** 1) दि. 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णक क्र.799. 2) दि. 27/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 415.

**प्रस्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799 नुसार Saitech Project उभारणीकामी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्पामध्ये 168 संगणक संच, 18 सर्व्हर, 20 युपीएस संस्थानने खरेदी केलेले आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचेशी करण्यात आलेल्या SOW व करारनाम्यानुसार साईटेक प्रोजेक्ट अंतर्गत कार्यालयीन वापरासाठी संगणके पुरविण्यात येणार असून प्रिंटरसाठी त्यांचेमार्फत बाहेरील कंपनीशी करारनामा करण्यात आलेला आहे. त्यानुसार एकूण 118 प्रिंटर Printech infotech Services Pvt. Ltd., Pune या कंपनीमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे SOW नुसार माहे डिसेंबर 2015 अखेर एकुण 118 प्रिंटर्सपैकी 37 नग प्रिंटर्सचा 05 वर्षाचा आऊटसोर्स कालावधी संपुष्टात येत असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. 27/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 415 नुसार संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी खालील तपशिलातील प्रिंटर्स विहित पध्दतीने ई-निविदा मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,02,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

| अ.न. | साहित्याचे नाव | तपशिल | नग | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | लेझर प्रिंटर | HP 1020+ | 15 | 7,500/- | 1,12,500/- |
| 02 | लेझर प्रिंटर (प्रिंट स्कनकॉपी) | HP-MFP M1005 किंवा तत्सम | 10 | 12,000/- | 1,20,000/- |
| 03 | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर | Epson LQ 300+ | 40 | 11,500/- | 4,60,000/- |
| 04 | 1 KVA UPS | DB, Iball | 10 | 6000/- | 60,000/- |
| 05 | 2612 A टोनर | HP | 50 | 3000/- | 1,50,000/- |
| | | | | **एकुण रक्कम** | **9,02,500/- +टॅक्स** |

त्यानुसार उपरोक्त नमुद केलेले प्रिंटर्स दि. 16/12/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे विहित पध्दतीने संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच जनसंपर्क विभागामार्फत शासकीय दराप्रमाणे वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात दि. 21/01/2016 ते दि. 04/02/2016 या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार विविध कंपन्याचे निविदाधारक /पुरवठाधारकांकडुन मागविण्यात आलेल्या प्राप्त ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न. | कंपनीचे नाव | आवक नंबर दिनांक |
|---|---|---|
| 1 | Milan Stationers and Printers, Mumbai | 29/01/2016 आ.नं. 21510 |
| 2 | Sujata Computers, Pune | 03/02/2016 आ.नं. 21805 |
| 3 | Fountain Stationers, Mumbai | 03/02/2016 आ.नं. 21807 |
| 4 | LT cartidages, Mumbai | 03/02/2016 आ.नं. 21867 |
| 5 | Racca Infotech Pvt Ltd, Nasik | 04/02/2016 आ.नं. 21972 |
| 6 | Printech Technology, Mumbai | 04/02/2016 आ.नं. 21973 |
| 7 | Microtronics, Aurangabad | 05/02/2016 आ.नं. 21978 |
| 8 | R.D. Data Systems, Nasik | 05/02/2016 आ.नं. 21988 |
| 9 | Minitek Systems (I) Pvt Ltd., Nashik | 06/02/2016 आ.नं. 22036 |
| 10 | Surendra Traders, Nashik | 06/02/2016 आ.नं. 22068 |
| 11 | Cybernet IT Pvt Ltd. Pune | 06/02/2016 आ.नं. 22127 |
| 12 | B j Automation, Mumbai | 08/02/2016 आ.नं. 22207 |
| 13 | Compulinks | ऑनलाईन प्राप्त |
| 14 | K.J.M. Group, Mumbai | ऑनलाईन प्राप्त |

उपरोक्त प्राप्त पुरवठाधारकांच्या तांत्रिक ई-निविदा दि.06/02/2016 रोजीचे परिपत्रकान्वये दि. 08/02/2016 रोजी उघडण्यात आले आहेत. उघडण्यात आलेल्या तांत्रिक ई-निविदेमधील पुरवठाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Vendor Name | Description | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Shop Act Licence | VAT Registration Certificate | IT returns of Last two years | Authorised Dearership | Audited Balance Sheet | Tender Fee DD Rs 500 | EMD DD Rs 9025/- of Excemption Certificate | Status |
| Milan Stationers and Printers, Mumbai | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Sujata Computers, Pune | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Fountain Stationers, Mumbai | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| LT cartidages, Mumbai | Yes | Yes | Yes | Yes | Yes | No | Yes | Rejected |
| Racca Infotech Pvt Ltd, Nasik | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Printech Infotech Services Pvt. Ltd, | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Microtronics, Aurangabad | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| R.D. Data Systems, Nasik | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Minitek Systems (I) Pvt Ltd., Nashik | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Surendra Traders, Nashik | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| Cybernet IT Pvt Ltd. Pune | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Accepted |
| B j Automation, Mumbai | Yes | Yes | Yes | Yes | Yes | No | Yes | Rejected |
| Compulinks | Yes | Yes | Yes | Yes | Yes | No | Yes | Rejected |
| K.J.M. Group, Mumbai | Yes | Yes | Yes | Yes | Yes | No | Yes | Rejected |

सदरच्या तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु सो., यांनी तपासल्या असुन उपरोक्त पात्र निविदाधारक/पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेत उघडुन त्यातील न्युनत्तम निविदाधारक / पुरवठाधारकास कार्यादेश देता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे विषयांकीत प्रकरणाबाबत ई-निविदा प्रक्रियेव्दारे कार्यवाही करण्यात येऊन प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उपस्थितासमोर उघडण्यात आल्या आहेत. सदरच्या प्राप्त तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु सो., यांनी तपासल्या असुन उपरोक्त पात्र निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा.व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युन्नतम निविदाधारक/ पुरवठाधारकास कार्यादेश येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानणी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

उपरोक्त प्रमाणे पात्र १० निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Name of Tenderer | HP Laser Jet Printer Model 1020+ 15 nos. | HP Laser Jet Printer MFP-M1005 10 nos. | Epson DMP LQ- 310 40 nos. | 1 KVA UPS Emerson, Numeric, Power-safe 10 nos. | HP original 2612 A Tonner (for HP 1020+ and M 1005) 50 nos. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate per nos. in Rs | | | | |
| 1 | Fountain Stationers | 2470/- | 2468/- | 179/- | --- | 2468/- |
| 2 | Minitek Systems India Pvt. Ltd. | 7467/- | 12154/- | 9625/- | 5353/- | 4428/- |
| 3 | Milan Stationers and Printers | 7997/- | 13585/- | 10994/- | 19990/- | 2510/- |
| 4 | Surendra Traders | 6999/- | 11499/- | 10999/- | 19999/- | 1999/- |
| 5 | Cybernet IT Pvt. Ltd. | 7550/- | 12145/- | 10300/- | 4100/- | 4150/- |
| 6 | Racca Infotech Pvt. Ltd. | 7325/- | 12350/- | 9800/- | 4100/- | 3870/- |
| 7 | R.D. Data Systems | 7600/- | 12500/- | 9695/- | 4350/- | 3500/- |
| 8 | Microtronics | --- | --- | --- | 5300/- | 3525/- |
| 9 | Printech Infotech Services Pvt. Ltd. | 7830/- | 13230/- | 10692/- | 4536/- | 3456/- |
| 10 | Sujata Computers Pvt. Ltd. | 8120/- | 13216/- | 10472/- | 4189/- | 4088/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Fountain stationers, Mumbai यांनी दिनांक २१.०३.२०१६ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे निविदा प्रक्रियेतून माघार घेत असल्याचे कळविलेले आहे. त्यामूळे त्यांची निविदा बाद ठरविण्यात यावी. उर्वरित पात्र पुरवठाधारकांचे कमर्शिअल ई-निविदा मधील तूलनात्मक तक्त्यातील दराचे अवलोकन करता आपण मागणी केल्याप्रमाणे अ.नं. ०१,०२ व ०५ मधील साहित्यासाठी M/s Surendra Traders, Nashik व अ.नं.3 साठी M/s Minitek Systems (I) Pvt.Ltd. Nashik यांचे दोघांचे दर न्युनतम आहेत तसेच अ.नं.4 साठी Cybernet IT Pvt. Ltd., Pune व Racca Infotech Pvt. Ltd., Nashik यांचे दोघांचे दर न्युनतम व समान असून त्यांना १० युपीएस पैकी प्रत्येकी ०५ नग युपीएस दोन्ही पुरवठाधारकांकडून खरेदी करता येतील. त्यानुसार न्युनतम निविदाधारकांच्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे-**

| अ.नं | साहित्याचे नांव | तपशिल | नग | निम्नतम दर | निम्नतम पुरवठाधारक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | लेझर प्रिंटर | HP 1020 + | १५ | 6,999/- | Surendra Traders, Nashik |
| ०२ | लेझर प्रिंट (प्रिंट स्कॅन कॉपी) | HP-MFP M1005 किंवा तत्सम | १० | 11,499/- | Surendra Traders, Nashik |
| ०३ | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर | Epson LQ 300 + | ४० | 9,625/- | Minitek Systems India Pvt. Ltd.Nashik |
| ०४ | 1KVA Ups | DB Iball , Power Safe | १० | 4,100/- | Cybernet IT Pvt. Ltd.Pune Racca Infotech Pvt. Ltd.Nashik |
| ०५ | 2612 A टोनर | HP | ५० | 1,999/- | Surendra Traders, Nashik |



**उपरोक्त तक्त्यातील निम्नतम दर मान्य करण्यात येऊन संबधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

११ **श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेस मंजूरी मिळणे बाबत.**

श्रींना अर्पण करण्यात आलेले नारळ फळांची विक्री करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देवून निवीदा मागवुन उच्चत्तम दराने नारळ फळांची विक्री करणेसाठी दि.02/02/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.66 अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेबाबतची जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.21/02/2016 रोजी वृत्तपत्रामधुन शासकीय दराने प्रसिध्द करण्यात आलेली होती. कोरे निवीदा अर्ज विक्री दि.26/02/2016 रोजी संपलेली असुन एकुण 03 निविदांची विक्री झाल्यामुळे दर कमी येण्याची शक्यता असल्याने दि.27/02/2016 रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये, पुन्हा सदर निवीदांची विक्रीची मुदत दि.05/03/2016 पर्यंत वाढविण्यात आलेली होती. या कालावधीत आणखी 1 निवीदेची विक्री झालेली आहे. तसेच सिलबंद निवीदा सादर करावयाची मुदत दि.07/03/2016 अखेर संपलेली असुन अद्याप पर्यंत एकुण 04 निवीदा प्राप्त झालेल्या आहे.

प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | पार्टीचे नाव | आवक नंबर - दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | अकबर संदेखा पठाण, कोपरगाव | 23404- 27/02/2016 | बंद लिफाफा |
| 02 | इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगाव | 23421 - 27/02/2016 | बंद लिफाफा |
| 03 | सतीष चंद्रकांत निकम, चांदवड | 23422 - 27/02/2016 | बंद लिफाफा |
| 04 | राजेंद्र जगन्नाथ चौधरी, पोहेगाव | 23932 - 07/03/2016 | बंद लिफाफा |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या 04 निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र | पार्टीचे नाव | निविदेमधील मूळ दर प्रती नग रु. | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | अकबर संदेखा पठाण, कोपरगाव | २.०० | अनामत रक्कम भरलेली नसल्यामुळे अपात्र |
| 02 | इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगाव | २.७५ | पात्र |
| 03 | सतीष चंद्रकांत निकम, चांदवड | २.१० | अनामत रक्कम भरलेली नसल्यामुळे अपात्र |
| 04 | राजेंद्र जगन्नाथ चौधरी, पोहेगाव | ३.५१ | पात्र |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेसाठी मागविण्यात आलेल्या निविदांपैकी फक्त दोनच निविदाधारक पात्र असल्यामुळे सदरहूकामी दुबार निविदांची मागणी करणेत यावी व साठवण झालेली नारळ फळे खराब होऊ नये म्हणून नारळ फळातील खोबरे काढून प्रसादालयात वापरण्यासाठी देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं. ०५** **जमाखर्च तक्ता माहे एप्रील, मे, जुन, जुलै- २०१५.**

माहे एप्रील, मे, जुन, जुलै- २०१५ मधील अनुक्रमे जमा रु.४०,०६,८४,२३७/-, रु.४१,३९,९८,३५६/-, रु. ४१,८५,९७,६३५/-, रु.३६,५६,१९,३१०/- आणि खर्च रु.३,८५,५४,३५३/-, रु.४५,६५,४८,०८४/-, रु.१४,५५,३७,६१४/-, रु.१८,४९,९७,३२३/- चा तक्ता सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आला होता.

**निर्णय क्र.२०६** **नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं. ०६** **श्री साईबाबा दर्शनासाठी येणा-या सर्व पालखी भक्तांसाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा दर्शनासाठी येणाऱ्या सर्व पालखी भक्तांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था करणेबाबत श्री भरत मुरलीधर सरवदे, मुंबई यांनी दि.२१.०९.२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. त्यांना जा.नं.एसएसएस/वशि-संरक्षण/४२९१/२०१५ दि.३१.१०.२०१५ रोजीचे पत्रामध्ये "आपण केलेली सुचना ही योग्य असुन संस्थानचे नव्याने तयार करण्यात येणारे दर्शन रांगेमध्ये पदयात्री साईभक्तांसाठी स्वतंत्र व्यवस्था करणेचे नियोजीत आहे. तुर्त सध्या श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांचे गर्दीचा विचार करता सुरक्षेच्या कारणास्तव दर्शनरांग अपुरी असल्याने पालखी पदयात्रेतील साईभक्तांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था करणे शक्य होत नाही. आपण केलेल्या सुचनेप्रमाणे नविन दर्शनरांगेत स्वतंत्र व्यवस्था करणेत येईल, असे कळविलेले होते." श्री भरत मुरलीधर सरवदे, साई चरण पदयात्री मंडळ, सांताक्रुझ, खातेवाडी, मुंबई यांना

दिलेले दि.३१.१०.२०१५ रोजीच्या पुर्वीच्या पत्राचा ओम गुरुसाई पदयात्री मंडळाचे अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार यांनी त्यांचे एकत्रित पत्रात संदर्भ दिलेला आहे.

त्याप्रमाणे ओम गुरुसाई पदयात्री मंडळ, मुंबईचे अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार यांचे एकत्रित पालखी पदयात्री साईभक्तांसाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवस्था संस्थानकडून झालेली नाही, जर काही वेळ अजुन लागणार असेल तर कृपया आपण श्री साईबाबा दर्शनासाठी येणाऱ्या पालखी पदयात्री भक्तांसाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवस्था व्ही.आय.पी. रांगेतुन तरी करावी अशी अपेक्षा होती. पदयात्री भक्तांसाठी स्वतंत्र व्यवस्था हा आमचा आग्रह आहे आणि तो योग्य सुध्दा आहे. सत्यासाठी सत्याग्रह हा आमचा अधिकार सुध्दा आहे. खेदपुर्वक सांगावे लागते आहे की, पदयात्री भक्तांसाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवसथा अथवा किमान व्ही.आय.पी. रांगेतुन दर्शन स्वतंत्र येत्या वर्षाच्या पहिल्या तारखेपासुन सुरु न झाल्यास आमच्या पदयात्री मंडळाकडून मंदिर व्यवस्थापनाच्या विरोधात आंदोलनाची सुरुवात करु आणि शिर्डीत दाखल होणाऱ्या प्रत्येक मंडळापर्यंत हे आंदोलन पोहचवू. मला पुर्ण विश्वास आहे की, आपण आमच्या सारख्या साधारण पदयात्री भाविकांची व्यथा आणि भावना जानाल ही विनम्र विनंती. धन्यवाद कृपया लवकरात लवकर उत्तर देण्याची कृपा करावी, असे नमुद करुन पत्र वजा निवेदन दिलेले आहे.

त्यानुसार असे की, देशभरात होत असलेल्या अतिरेक्यांच्या कारवाईबाबत गंभीरतेने विचार केला असता श्री साईबाबा समाधी मंदीर व त्या परिसराची तसेच भाविकांची सुरक्षितता अत्यंत महत्वाची बाब असुन वेळोवेळी श्री साईबाबा समाधी मंदिराबाबतीत गोपनीय माहिति प्रमाणे श्री साईबाबा समाधी मंदीरास अतिरेक्यांपासुन धोका होऊ शकतो. याबाबतच्या सुचना वेळोवेळी पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्या होत्या. त्याप्रमाणे पालखी पदयात्री साईभक्तांना संस्थानचे १६ गुंठे जागेत असलेल्या प्रवेशद्वारातुन सोडल्यास खालील प्रमाणे अडचणी व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत होता.

पालखी पदयात्रीची संख्या ही हजारोंच्या पटीने असते त्यामुळे गेटमधुन प्रवेश करणाऱ्या सर्व साईभक्तांची, पदयात्रींची चेकींग करण्यास अडचणी निर्माण होतात.

जनरल दर्शन रांगेतुन जाणाऱ्या साईभक्तांचे अगोदर पालखी पदयात्रींना सोडल्यास दर्शनहॉलमध्ये असलेल्या दर्शनार्थी साईभक्तांच्या भावना दुखविल्या जातात व ते तक्रारी करतात.

पालखी पदयात्री मार्गाचे ठिकाणी हजारोंचे संख्येने पदयात्री येतात त्यांना कंट्रोल करण्यास पुरेशी जागा उपलब्ध नाही. जागेअभावी सदर ठिकाणी एकाच वेळी गर्दी निर्माण होते व पाकीटमारी व चेंगराचेंगरी सारखे प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच पालखी पदयात्रींचे समवेत इतर साईभक्त देखील सदर गेटमधून दर्शनासाठी जाण्याचा आग्रह धरुन सुरक्षा रक्षकांबरोबर वाद घालतात.

पालखी धारकांना पालखी गेटमधून आत सोडल्यास ते एकाच वेळी आत जाण्याचा प्रयत्न करतात व जोर-जोरात आरडा ओरड अथवा घोषणा करतात. त्यामुळे दर्शन हॉलमधील इतर साईभक्तांना त्याचा त्रास होतो.

गर्दीचे काळात दर्शन झालेनंतर भाविकांना दक्षिण गेटने बाहेर काढावे लागतात कारण उत्तर गेटने अपंग व्यक्ती, वृध्द, गावकरी यांना सोडण्यात येते. त्यामुळे १६ गुंठे जागेत एकाच ठिकाणी गर्दी झाल्याने गर्दी कंट्रोल करण्यास अडचणी निर्माण होतात.

एकंदरीत उपरोक्त अडचणी व होणारे संभाव्य धोके तसेच मंदिर, मंदिर परिसर, साईभक्तांची सुरक्षितता लक्षात घेता, सन २०१३ मध्ये झालेल्या सुरक्षा ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीमध्ये मंदिराचे महाद्वारांवरील चेकींग कडक करणे त्यानुसार पालखी पदयात्री गेटवर चेकींग करणेसाठी व्यवस्था नसलेने पालखी पदयात्री गेट बंद करुन पालखी पदयात्रेत येणारे साईभक्तांना गेट नं.०२ ने चेकींग करुन तसेच त्यांचे सोबत असलेल्या बॅग दर्शन रांगेतील बॅगेज स्कॅनरमधुन चेक करुन पदयात्रींना मंदिरात सोडण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे सध्या जागेअभावी व सुरक्षितेच्या कारणास्तव पालखी पदयात्रींचा दर्शनाचा मार्ग हा मुख्य दर्शनरांगेतुन (गेट नं.०२) येथून करण्यात आलेला आहे. तथापी सदर पालखी पदयात्रींची पालखी १६ गुंठे परिसरात ठेवून पालखीतील पादुका, श्रींचा छोटा फोटो, पोथीसह पालखीतील ठरावीक ०४ ते ०५ पदयात्रींना थेट समाधी मंदिराचे उत्तर गेट अथवा शनिगेटने दर्शनासाठी सोडण्यात येत आहे.

तथापी ओम गुरुसाई पदयात्री मंडळाने त्यांचे संदर्भिय पत्रातुन पदयात्री भक्तांसाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवस्था अथवा किमान व्ही.आय.पी. रांगेतुन दर्शन व्यवस्था येत्या वर्षाच्या पहिल्या तारखेपासून सुरु न झाल्यास आमच्या पदयात्री मंडळाकडून मंदिर व्यवस्थापनाच्या विरोधात आंदोलनाची सुरुवात करु आणि शिर्डीत दाखल होणाऱ्या प्रत्येक मंडळापर्यंत हे आंदोलन ही पोहचू असे पत्र वजा निवेदन देऊन याबाबत लवकरात लवकर उत्तर देण्याची कृपा करावी असे नमुद केलेले असल्यामुळे आंदोलनातुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरीता सर्व पालखी पदयात्रीसाठी स्वतंत्र दर्शन व्यवस्था करणे अथवा १६ गुंठे परिसरातून पुर्वीचे पालखी पदयात्री गेटमधुन दर्शन व्यवस्था करावी किंवा सध्या आहे तीच पध्दत यापुढेही सुरु ठेवावी याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा दर्शनासाठी येणा-या सर्व पालखी भक्तांसाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवस्था करणेसाठी प्रस्तावित करणेत आलेल्या १६ गुंठे या जागेमध्ये गर्दीचे कालावधीमध्ये सर्वसामान्य भक्तांसाठी दर्शन रांगेची व्यवस्था करण्यात येत असते. त्यामुळे या ठिकाणी प्रचंड प्रमाणात गर्दी होत असते. सबब पालखी घेऊन येणा-या भक्तांसाठी सध्या आहे त्याच प्रमाणे दर्शनासाठी व्यवस्था करणेत यावी, त्यामध्ये बदल करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं. ०७** **संस्थान कर्मचा-यांना जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०२.०२.२०१६ रोजीच्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर मा.अध्यक्ष महोदय यांनी सदर प्रस्तावावर खालील सुचना केलेल्या आहेत.

०१) सदर प्रस्तावातील वैद्यकिय बीलाची पुन्हा तपासणी करावी.
०२) सदर वैद्यकिय बीले हे Cross checking करुन उपचार घेतलेल्या ठिकाणी फोन करुन त्याची सत्यता बघावी.
०३) श्री साईनाथ व श्री साईबाबा औषध भांडारात औषधे उपलब्ध होती किंवा नाही हे तपासून उपचार घेतलेल्या बीलांची तपासणी करावी.

वरील बाबींची फेर तपासणी केली असता, संबंधीतांनी उपचार घेतलेल्या ठिकाणी फोन करुन विचारले असता कोणत्याही त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. तसेच वैद्यकिय खर्चापोटी सत्यता तपासून घेतलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** सुचना केलेल्या बाबींची फेर तपासणी केली असता, तसेच संबंधीतांनी उपचार घेतलेल्या ठिकाणी फोन करुन विचारले असता कोणत्याही त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. तसेच वैद्यकिय खर्चापोटी सत्यता तपासून घेतलेली आहे. त्यामुळे जादा वैद्यकिय बीले अदा करण्यास करकत नाही.

तरी वरील प्रस्ताव फेर सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**(अ)** खालील संस्थान कर्मचा-यांची रु.१०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाची बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ) संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत.** | | | | | | | |
| १ | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग – साईबाबा हॉस्पि.हुद्दा – परिचारीका | आई | Diabeties, Blood Pressure | डॉ. देसाई | श्री साईबाबा हॉस्पिटल | १००९९/- | १००९९/- | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | काकड मोतीराम लक्ष्मण<br>विभाग – चौकशी<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Diabeties, Blood Pressure | डॉ.देसाई | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८७६२/- | ८६४५/- | |
| ३ | पोतदार पुनम लक्ष्मीकांत<br>विभाग – साईबाबा हॉस्पि.हुद्दा – परिचारीका | मुलाकरीता | Viral Hepatitis | डॉ.गोरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३११५/- | ३११५/- | |
| ४ | कोळे पोपट सखाराम<br>विभाग- आरोग्य<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Fracture | डॉ.खुराणा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १२०००/- | १२०००/- | |
| | | | | | **एकूण** | **३३९७६/-** | **३३८५९/-** | |
| | **ब) खालील कर्मचा-यांना संस्थानचे मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केलेले होते.** | | | | | | | |
| ५ | बंदावणे सुभाष मल्हारी<br>विभाग – ध्वनीक्षेपण<br>हुद्दा – पर्यवेक्षक | मुलगा | Renal Failue | डॉ.देसाई | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३९३०१/- | ३६१६१/- | अ १०ते ०५.नं. करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले आहे. |
| ६ | बंदावणे सुभाष मल्हारी<br>विभाग – ध्वनीक्षेपण<br>हुद्दा – पर्यवेक्षक | मुलगा | Renal Failue | डॉ.भागवत | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | १२८७६/- | ११३९६/- | |
| ७ | तुपे अलका दिलीप<br>विभाग – आरोग्य<br>हुद्दा – मदतनीस | पती | Ca_ | डॉ. इंगळे | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई | १०५७५/- | ९०७५/- | |
| ८ | मोहिते शकुंतला शंकर<br>विभाग – श्री साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा – परिचारीका | आई | Ca_ | डॉ. देवरे | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई | ६७०६४/- | ६७०६४/- | |
| ९ | गायकवाड विठ्ठल यादव<br>विभाग – भांडार विभाग<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | ARF on CRF UTI | डॉ. देसाई | सहयाद्री हॉस्पिटल | ७८९३१/- | ७१५३१/- | |
| १० | चौधरी वसंत शिवाजी<br>विभाग- मेकॅनिकल<br>हुद्दा – वेल्डर | मुलगा | Crushed Injrury Hand | डॉ. जपे | सहयाद्री हॉस्पिटल | ८७१८७/- | ७९३८७/- | |
| | | | | | **एकूण** | **२९५९३४/-** | **२७४६१४/-** | |
| **क) संस्थान मान्य यादीत रेफर केले होते, परंतू उपचार न झाल्यामुळे निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.** | | | | | | | | |
| ११ | भोंडगे भाऊसाहेब केशव<br>विभाग – आरोग्य<br>हुद्दा – मदतनीस | पत्नी | Ca_ | डॉ. रामनाईक | आनंद ऋषिजी हॉस्पीटल व गरुड हॉस्पि., अ.नगर | २५२७०/- | १८९६८/- | -//- |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | साळवी योगेश त्रिबंक विभाग – लेखाशाखा हुद्दा – मदतनीस | स्वतः | Ca_ | डॉ.किरण खांदे | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई व मानवता क्युरी सेंटर, नाशिक | ११५१२८/- | ८१८८९/- | -//- |
| १३ | डॉ.महेंद्र नेमनाथ केदराज, विभाग – साईनाथ रुग्णालय हुद्दा – आरएमओ | स्वतः | Tuburalosie | डॉ. रामनाईक | Fortis Hospi. New Mumbai | ६६८५६/- | ५३४८५/- | संस्थानच्या रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे ८०% रक्कम देता येईल असे मत आहे. |
| | | | | | एकूण | २०७३५४/- | १५४३४२/- | |
| | | | | | एकूण अ+ ब+क | ५३७१६४/- | ४६२८१५/- | |

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान-</u>** सदर बिलांची संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केलेली असून देय होणारी एकूण रक्कम रु.४,६२,८१५/- इतकी आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-</u>** नियमावलीप्रमाणे छाननी केली असून मा.समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

---

**(ब)** खालील संस्थान कर्मचा-यांची रु.१०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाची बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नांव | रुग्णालयाचे नांव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **<u>अ) संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत.</u>** | | | | | | | |
| १ | वर्पे सविता चांगदेव विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | आई | Lab Test & Diabetes | डॉ.देसाई | श्री साईबाबा हॉस्पीटल | ४२६४/- | ३७२७/- | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | लोखंडे दिपक सुर्यकांत विभाग- लेखाशाखा हुद्दा- लिपीक | आई | Diabetes & Blood Pressure | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | ८७६९/- | ७९४८/- | |
| ३ | सुरवसे संतोष बब्रुवन विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- डॉक्टर | स्वतः | Diabetes & Blood Pressure | डॉ.मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पीटल | २८०७०/- | २८०७०/- | |
| ४ | बकरे मनोज सतिष विभाग-कनिष्ठ महाविद्यालय हुद्दा- मदतनीस | आई | Arthritis | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | १२९६३/- | १२९६३/- | |
| ५ | गाडेकर शोभा गेणु विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- समाज सेविका | सासरे | Lab Test & Diabetes | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | १३८६०/- | १३०३०/- | |
| ६ | जाधव अरुण गणपत विभाग- विद्युत हुद्दा- तारतंत्री | आई | Hepatitis | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | ५१५८०/- | ४९३८०/- | |
| ७ | पठाण नसरुल्ला नुरखाँ विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- लिपीक | आई व वडील | Blood Pressure | डॉ.जाधववर | साईबाबा हॉस्पीटल, | ७८३९/- | ७८३९/- | |
| | | | | | एकूण रु. | १२७३४५/- | १२२९५७/- | |
| **ब) खालील कर्मचा-यांना संस्थानचे मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केलेले होते.** | | | | | | | | |
| ८ | जोंधळे विलास राजाबापू विभाग- साईबाबा हॉस्पि हुद्दा- परिचारीका | वडील | RTA Foot Crush Injuries | डॉ.जपे | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | ८५४७७/- | ८०११७/- | |
| ९ | शिंदे वैभव सुभाष विभाग-साईबाबा हॉस्पि हुद्दा- आर.एम.ओ. | मुला करीता | Penosrotal Hypospadias | डॉ.गोरे | केईएम हॉस्पिटल, पुणे | ९५७७९/- | ७०६९९/- | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | गाढवे जितेंद्र साहेबराव विभाग-साईनाथ हॉस्पिटल हुद्दा- फार्मासिस्ट | स्वतः | B/L Panpolyposis | डॉ.शोभना कोल्हे | केईएम हॉस्पिटल, पुणे | ७०४३१/- | ६४९७१/- | अ.नं.०६ ते २० करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले होते. |
| ११ | डांगे सुनिल बाबासाहेब विभाग- प्रसादालय हुद्दा- कुपन विक्रेता | स्वतः | Vocalcord Polyp | डॉ.अमोल जोशी | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४५९७१/- | ४४२११/- | |
| १२ | घनघाव बाळू निकम विभाग- आरोग्य विभाग हुद्दा- वर्ग-०४ | मुलगा | Viral Fever | डॉ.जाधववर | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | १७८९९/- | १६३३९/- | |
| १३ | पुरे रामभाऊ नारायण विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारक | वडील | COPD Exacerbation | डॉ.जाधववर | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | ३३०९२/- | २५३३२/- | |
| १४ | कुमावत रमेश रामभाऊ विभाग- प्रसादालय, हुद्दा- मदतनीस | पत्नी | For Perfortion of Intestine | डॉ.गोरे | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | १०८५१/- | १०५८९/- | |
| १५ | बकरे दिलीप गंगाधर विभाग- सा.प्र.निवास हुद्दा- अधिक्षक, | स्वतः | CVA | डॉ.वर्मा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ७४२४/- | ७४२४/- | |
| १६ | कडू स्वाती इंद्रभान विभाग- ज्यु कॉलेज हुद्दा- स.शिक्षिका | पती | Hemolytic Anamia Jaundice | डॉ.गोरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३३३६०/- | ३३३६०/- | |
| १७ | जाधव सुनिल पोपटराव विभाग- मिटींग हुद्दा- लिपीक | आई | DCR Right Dacryostiti with Hypertionsion | डॉ.अमोल जोशी | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ६१००९/- | ५७४८९/- | |
| १८ | थेटे बाबासाहेब काशिनाथ विभाग- व्दारावती भक्तनिवासस्थान हुद्दा- मदतनीस | स्वतः | Cancer | डॉ.गोरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १४११५३/- | १३०२३९/- | |
| १९ | बंदावणे सुभाष मल्हारी विभाग- ध्वनीक्षेपण हुद्दा- टेक्निशियन | मुला करीता | Renal Failure | डॉ.देसाई | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ११३५७३/- | ११००५३/- | |
| २० | मोहिते शकुंतला शंकर विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- परिचारीका | आई | Cancer | डॉ.देवरे | टाटा मेमोरियल, मुंबई | २८७३३८/- | २८३३८/- | |
| | | | | | एकुण रु- | ७४४७५७/- | ६७९१६१/- | |
| **<u>क) संस्थानचे मान्य यादीत पाठविले परंतु उपचारासाठी विलंब असल्याने हयांना निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार करणेस सांगितले.</u>** | | | | | | | | |
| २१ | साळवी योगेश त्र्यबंक विभाग- लेखाशाखा हुद्दा- मदतनीस | स्वतः | Cancer | डॉ.खांदे | टाटा मेमोरियल, मुंबई व क्युरी मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक | ६७७१७/- | ५२७१०- | ८०% रक्कम देता येईल असे मत आहे. |
| | | | | | एकुण रु- | ६७७१७/- | ५२७१०/- | |
| | **<u>ड) संस्थानच्या मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले-</u>** | | | | | | | |
| २२ | महाजन मधुकर जयराम विभाग- मुंबई कार्यालय हुद्दा- व.लिपीक | स्वतः व पत्नी | Lab Test & Blood Pressure | डॉ.दिलीप पाटील | आनंद हॉस्पिटल | ५९६८/- | ४७७४/- | (मुंबई कार्यालय) |
| २३ | गायके शंकर रामदास विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- लिपीक | पत्नी | Dengue | डॉ.जुनागडे | लोटस हॉस्पिटल, नाशिक | २०६६८/- | १३७०२/- | रुग्णबाहेरगांवी असतांनी आजारी पडले त्यामुळे निकडीच्या प्रसंगी उपचार केले. त्यामुळे ८०% रक्कम देता येईल, असे मत आहे. |
| | | | | | एकुण रु- | २६६३६/- | १८४७६/- | |
| | | | | एकुण रक्कम अ+ ब+ क+ ड+= | | ९६६४५५/- | ८७३३०४/- | |

सदर बीलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु.८७३३०४/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्टमत-** नियमावली प्रमाणे छाननी केली असून, देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही असे मत आहे.

---

(क) खालील संस्थान कर्मचा-यांची रु.१०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाची बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नांव | रुग्णालयाचे नांव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये उपचार घेतलेले** | | | | | | | | |
| १ | लोखंडे दिपक सुर्यकांत विभाग- लेखाशाखा हुद्दा- लिपीक | आई | Diabetes & Blood Pressure | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पीटल | ४९४२/- | ४९४२/- | अ.नं.०१ ते १७ करीता संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | बकरे मनोज सतिष विभाग-कनिष्ठ महाविद्यालय हुद्दा- मदतनीस | आई व वडील | Lab Test Diabetes | डॉ.देसाई व डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पीटल | १९३१७/- | १६८३३/- | |
| ३ | गिरमे प्रशांत बबनराव विभाग- प्रसादालय हुद्दा- मदतनीस | आई | Dog Bite | डॉ.गोरे | साईबाबा हॉस्पीटल | १८०००/- | १८०००/- | |
| ४. | वर्पे सविता चांगदेव विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | आई | Diabetes | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | ६८७६/- | ५७३२/- | |
| ५ | डॉ.मेहेरे मंगेश नंदकुमार विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- आर.एम.ओ. | आई | Arthritis | डॉ.इंगळे | साईबाबा हॉस्पीटल | २६७०/- | २६७०/- | |
| ६ | काकड मोतीराम लक्ष्मण विभाग- चौकशी हुद्दा- मदतनीस | स्वतः | Diabetes & Epilepsy | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | ६६०१/- | ६६०१/- | |
| ७ | नागरे प्रभाकर विश्वनाथ विभाग- इ.मि.स्कुल हुद्दा- शिक्षक | वडील | Diabetes | डॉ.देसाई | साईबाबा हॉस्पीटल | ८९७६/- | ८०१६/- | |
| ८ | दुनबळे मिलींद यशवंत विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- मदतनीस | आई | Hypertionsion Heart Attack | डॉ.मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पीटल | २९७५०/- | २९७५०/- | |
| ९. | सुरवसे संतोष बब्रुवन विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- डॉक्टर | स्वतः | Blood Pressure | डॉ.मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पीटल | ५३४२/- | ५३४२/- | |
| १० | जाधव ज्योतिलाल भिका, विभाग- भक्तनिवास हुद्दा-स.भांडारपाल | स्वतः | Blood Pressure | डॉ.पोरवाल | साईनाथ हॉस्पीटल | १०२३/- | १०२३/- | |
| ११ | त्रिभुवन प्रदिप विश्वनाथ, विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- मदतनीस | स्वतः | Diabetes | डॉ.कांबळे व डॉ.पोरवाल | साईनाथ हॉस्पीटल | २४३८/- | २४३८/- | |
| १२ | मुठाळ सुचिता राजीव विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | सासु व सासरे | Diabetes | डॉ.इंगळे | साईबाबा हॉस्पीटल | ३८२२/- | ३८२२/- | |
| १३ | थोरात संगिता संजय विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | पती सासु व मुली | Diabetes | डॉ.इंगळे | साईबाबा हॉस्पीटल | २१९९/- | १९८९/- | |
| १४ | वडेर उज्वला मलप्पा विभाग- साईबाबा | स्वतः | Lab Test | डॉ.अग्रवाल | साईनाथ हॉस्पीटल | ७५६२/- | ६४४०/- | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | | | | | | | |
| १५ | जाधव नवनाथ साहेबराव, विभाग- बांधकाम विभाग हुद्दा- मदतनीस | आई | Epilepsy | डॉ.म्हात्रे | साईबाबा हॉस्पीटल, | २९४०/- | २७३८/- | |
| १६ | खान रुकसाना साजिद विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारीका | स्वतः | Blood Pressure | डॉ.मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पीटल | १९०२३/- | १९०२३/- | |
| १७ | उगले दिलीप त्र्यबंक विभाग-सामान्य प्रशासन हुद्दा- प्रशासकीय अधिकारी | पत्नी | Thyroid Treatment | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पीटल | २३०३/- | २३०३/- | |
| | | | | | एकुण रक्कम रु. | १४३७८४/- | १३७६६३/- | |
| **ब. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय मध्ये उपचार होत नसल्यामुळे संस्थानच्या मान्य यादीत रेफर केले होते.** | | | | | | | | |
| १८ | तुपे अलका दिलीप विभाग- आरोग्य विभाग हुद्दा- वर्ग-०४ | पती | Cancer | डॉ.इंगळे | टाटा मेमोरियल, मुंबई व | ६२९०/- | ६२४०/- | |
| १९ | डॉ.अंत्रे रविंद्र गणपत विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा-सी.एम.ओ. | पत्नी | Gastroesrtirit s St. | डॉ.राम नाईक | बॉम्बे हॉस्पिटल | १४६००/- | १४१८०/- | |
| २० | गुंजाळ श्रीकांत संपत विभाग- पाणीपुरवठा हुद्दा-फिल्टर ऑपरेटर | मुला करीता | BM Biopsy Heaemato logic Workup | डॉ.रचना साबळे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १५६४७८/- | १३५२७८/- | |
| २१ | लंके साहेबराव पांडूरंग विभाग- लेखाशाखा हुद्दा- लेखाधिकारी | आई | Cancer | डॉ.मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १११८६१/- | १०१३०१/- | |
| २२ | गायकवाड अजिंक्यदेव रामचंद्र विभाग- कन्याशाळा हुद्दा- स.शिक्षक | वडीला | CVA | डॉ.देसाई | सेठ नंदलाल धुत हॉस्पिटल औरंगाबाद | १८९२१/- | १२८७५/- | अ.नं.१८ ते २७ करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीत हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले आहे. |
| २३ | पठाण नसरुल्ला नुरखॉ विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- लिपीक | वडील व पत्नी | IBD | डॉ.जाधववर | साईबाबा हॉस्पी व रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४१२०/- | ४१२०/- | |
| २४ | उमाप नानसाहेब साहेबराव विभाग- संरक्षण हुद्दा-पहारेकरी | वडील | Cerebro Vascular Accident | डॉ.देसाई | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | ७३२९८/- | ६०८१८/- | |
| २५ | तान्हाजी साळबा आरणे विभाग- मंदिर विभाग हुद्दा- मदतनीस | स्वतः | Crushed Hand, Plastic & Reconstru ction Surgery | डॉ.प्रितम जपे | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | ५१६३८/- | ४६०५९/- | |
| २६ | बंदावणे सुभाष मल्हारी विभाग- ध्वनीक्षेपण हुद्दा- टेक्निशियन | मुला करीता | Renal Failure | डॉ.देसाई | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ११०६७१/- | १०३७७१/- | |
| २७ | थेटे बाबासाहेब काशिनाथ विभाग- व्दारावती भक्तनिवासस्थान हुद्दा- मदतनीस | स्वतः | Cancer | डॉ.गोरे | प्रवरा हॉस्पिटल, लोणी व रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ६३९८८/- | ६१९५४/- | |
| | | | | | एकुण रु- | ६११८६५/- | ५४६५९६/- | |
| | | | | एकुण रक्कम अ+ब = | | ७५५६४९/- | ६८४२५८/- | |

सदर बीलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु.६,८४,२५८/- इतकी आहे.

<u>**विभागाचा अभिप्राय/ स्पष्टमत-**</u> नियमावली प्रमाणे छाननी केली असून, देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही असे मत आहे.

**निर्णय क्र.२०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित संस्थान कर्मचा-यांनी/ त्यांचेवरील अवलंबीतांनी ज्या-ज्या ठिकाणी वैद्यकिय सेवा/ औषधोपचार घेतलेला आहे, त्या सर्व रुग्णालयास वैद्यकिय संचालक यांनी कर्मचा-यांच्या बीलांसंबंधात विचारणा करुन पडताळणी केलेली असल्यामुळे उपरोक्त अ, ब, क प्रस्तावातील तक्त्यामध्ये संस्थान कर्मचा-यांना देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ०८** **संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचारी आणि त्यांचे अवलंबीत कुटुंबीय व शिर्डी ग्रामस्थांसाठी काही बेड आरक्षीत करुन प्राधान्यक्रम देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण २३६ बेड असुन श्री साईनाथ रुग्णालयात ३०० बेड्स आहेत. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीओलॉजी, कार्डीयाक सर्जरी, न्युरो सर्जरी,युरोलॉजी इत्यादी सुपरस्पेशालिटी विभाग कार्यान्वित आहेत व श्री साईनाथ रुग्णालयात ईएनटी, जनरल सर्जरी, नेत्ररोग, स्त्रीरोग विभाग, इत्यादी जनरल स्पेशलिटी विभाग कार्यान्वीत आहेत.

श्री साईबाबा संस्थानमधील कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबित कुटुबिय यांचेसाठी संस्थानचे दोन्ही रुग्णालयात मोफत उपचार केले जातात . तसेच कंत्राटी कर्मचा-यांसाठी दर वर्षी मर्यादीत रक्कमेपर्यंत मोफत उपचार केले जातात. कर्मचारी व शिर्डी ग्रामस्थ वेळोवेळी त्यांचेसाठी संस्थान रुग्णालयात काही बेड आरक्षीत ठेवणेबाबत इकडील विभागास तसेच लोक प्रतिनीधीकडे मागणी करत असतात.

श्री साईबाबा संस्थान रुग्णालयात खालील नमुद वार्ड/विभागात कायम व कंत्राटी कर्मचा-यासाठी तसेच शिर्डी ग्रामस्थांसाठी खालील प्रमाण बेड आरक्षीत करता येईल.

(कायम व कंत्राटी कर्मचारी यांचेसाठी आरक्षीत बेड)

| श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | | श्री साईनाथ् हॉस्पिटल,शिर्डी | |
|---|---|---|---|
| मेल सर्जरी वार्ड | ०२ बेड | मेल जनरल वार्ड | ०३ बेड |
| फिमेल वार्ड | ०१ बेड | फिमेल जनरल वार्ड | ०२ बेड |
| मेडिसीन वार्ड | ०३ बेड | सर्जिकल वार्ड | ०२ बेड |
| | | आयसीयु | ०१ बेड |
| एकुण | ०६ बेडस | एकुण | ०८ बेडस |

(शिर्डी ग्रामस्थासाठी आरक्षीत बेड)

| श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | | श्री साईनाथ् हॉस्पिटल,शिर्डी | |
|---|---|---|---|
| आयसीयुजीआयसीयु/ | ०१ बेड | आयसीयु | ०१ बेड |
| मेल जनरल वार्ड | ०१ बेड | जनरल वार्ड | ०२ बेड |
| फिमेल जनरल वार्ड | ०१ बेड | | |
| एकुण | ०३ बेडस | एकुण | ०३बेडस |

तरी कर्मचारी व शिर्डी ग्रामस्थ यांची वारंवार होणारी मागणी लक्षात घेता वरीलप्रमाणे बेडस आरक्षीत ठेवणेकामी सदरचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णांची सेवा करणे हे रुग्णालयाचे पहिले उद्दिष्ट असल्यामुळे संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचारी आणि त्यांचेवर अवलंबीत कुटुंबीय व शिर्डी ग्रामस्थांसाठी काही बेड आरक्षीत करणे उचित होणार नाही. सबब संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचारी आणि त्यांचे अवलंबीत कुटुंबीय व शिर्डी ग्रामस्थांना आजाराचे स्वरुप पाहून वैद्यकिय संचालक यांनी बेड उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य द्यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ०९** **डॉ.अमोल भगवंत सरदार,आर.एम.ओ. यांचे नाव संस्थानचे हजेरीपटावर कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.नं.एसएसएस/वशी-१/१७६७/२००९ दि.०९/०२/२००९ अन्वये अमोल भगवंत सरदार यांची आरएमओ या पदावर नेमणूक करणेत आली होती त्यानुसार दि.०९/०२/२००९ रोजी कामावर हजर झाले होते. दि.०४/०२/२०१५ रोजीचे अर्जान्वये त्यांनी सन २०१५ ते २०१७ अशी दोन वर्षाची शैक्षणिक रजेची मागणी केली होत

तदनंतर एच.आर.विभाग रुग्णालयं यांनी दि.७/२/२०१५ रोजी टिपणी सादर करुन अध्ययन रजेचे नियमावलीनुसार डॉ. राजश्री शिनगारे यांना उच्च शिक्षणासाठी असाधारण रजेवर सोडण्यात आल्याने डॉ.सरदार यांना उच्च शिक्षणासाठी असाधारण रजेवर सोडता येणार नाही व तसे डॉ.सरदार यांना कळविणेबाबत मान्यता घेण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार जा.नं.एसएसएस/एसएसबीएचा/एचआर/६५०/२०१५ दि.०८/०६/२०१५ नुसार डॉ. अमोल भगवंत सरदार यांना उच्च शिक्षणासाठी असाधारण रजेवर सोडता येणार नसलेबाबत कळविले होते. त्यांनतर वेळोवेळी फोनवरही कामावर हजर होणेबाबत कळविले होते. मात्र ते कामावर हजर झालेले नसुन आजपर्यंत विनापरवानगी कामावर गैरहजर आहेत. यावरुन त्यांना संस्थान रुग्णालयात सेवा देणेबाबत कुठल्याही प्रकारची इच्छा नाही असे दिसुन येते.

तरी डॉ.अमोल भगवंत सरदार, आरएमओ, श्री साईनाथ हॉस्पिटल यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावरुन डॉ.अमोल भगवंत सरदार, आर.एम.ओ. यांना लेखी नोटीस दिल्याचे दिसून येत नाही. सबब डॉ.अमोल भगवंत सरदार, आर.एम.ओ. यांना कामावर हजर न झाल्यास कामावरुन कमी केले जाईल, अशा आशयाची नोटीस स्पीड पोस्ट, ई-मेल द्वारे पाठविण्यात येऊन, त्यांच्या खुलाशासह प्रस्ताव समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. १० **डॉ.आर.प्रभाकरराव, प्र.वैद्यकीय संचालक यांचेबाबत.**

प्रस्ताव- श्री संजय भास्करराव काळे यांनी दि. ०६/०९/२०१५ रोजीचे पत्राने मा. अध्यक्ष साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा जिल्हा न्यायाधीश तसेच सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना डॉ.प्रभाकरराव, प्र.वैद्यकीय संचालक यांचे बेकायदा नियुक्ती आणि पदाचा गैरवापर चौकशी, कारवाई इत्यादी बाबत कळविले आहे.

यावर मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी कार्यकारी अधिकारी यांनी तपासावे असे निर्देश दिले आहेत. यास अनुसरुन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी Dy EO तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करावा तसेच मा उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी HR कृपया तपासुन सादर करावे असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच दि.२२/०९/२०१५ चे पत्रान्वये मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांनी श्री. काळे यांचे उपरोक्त तक्रार अर्जाबाबत सखोल चौकशी करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांना कळविले आहे.

श्री. संजय काळे यांनी डॉ.राव यांचेबाबत दिलेल्या तक्रार अर्जाबाबत डॉ.राव यांना जा.क्र.एसएसएस/ वशी७ए/ २३४०/ २०१५ दि.१६/०९/२०१५ चे अन्वये खुलासा करणेस सांगीतले होते. असे दिसुन येते त्यास अनुसरुन डॉ.राव यांनी दि.२०/०९/२०१५ चे पत्रान्वये त्यांचा खुलासा सादर केला आहे.

उपरोक्त परिच्छेद नं.२ मध्ये निर्देश दिलेप्रमाणे श्री.संजय काळे यांनी दिलेल्या तक्रारअर्जाबाबत एच आर विभागाकडून मा.उप वैद्यकीय संचालक, मा.वैद्यकीय प्रशासक व वित्त व्यवस्थापक यांनी संबधीत मुद्दयाबाबत त्यांचा अभिप्राय देण्यास कळविले होते त्याप्रमाणे त्यांनी त्यांचे अहवाल सादर केलेले आहेत.

श्री.संजय काळे यांनी दिलेल्या तक्रारीचे मुद्दे त्यावर डॉ.राव, प्र.वैद्यकीय संचालक यांनी सादर केलेला खुलासा तसेच उपवैद्यकीय संचालक, प्र.वैद्यकीय प्रशासक व वित्त व्यवस्थापक यांनी दिलेले अभिप्राय व वस्तुस्थिती या सर्व बाबींचा मुद्देनिहाय अहवाल सोबत सादर केला आहे.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.आर.प्रभाकरराव, प्र.वैद्यकीय संचालक यांनी राजीनामा दिलेला असल्यामुळे संध्या संस्थान सेवेत नाहीत. परंतु तरीही श्री.संजय काळे, कोपरगाव यांचे पत्रातील मुद्दयांनुसार कार्यकारी अधिकारी यांनी सर्व कागदपत्रे तपासून वस्तुनिष्ठ अहवाल सभेपुढे सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. ११ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागातील चार्ज देवाणघेवाण बाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२)

<u>**प्रास्ताविक:-**</u> श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मध्यवर्ती औषध भांडार विभाग असून सदर भांडार विभागात मागील वर्षी ४५ कोटींची औषधे खरेदीकामीचे पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. त्यानंतर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी मध्यवर्ती भांडार विभागात काम करणारेप्रभारी मटेरियल मॅनेजर, स्टोअर मॅनेजर व फार्मासिस्ट हयांना निलंबीत केले होते. त्यानंतर सौ.चंदा मोहन वाघ हयांचीप्रभारी मटेरीयल मॅनेजर म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानंतर भांडार विभागातील चार्ज हा सौ.चंदा वाघ यांचे ताब्यात देण्यात आला होता.

प्रशासन शाखेकडील दि.०२/०९/२०१५ रोजीचे आदेशान्वये सौ.चंदा वाघ हयांची बदली श्री साईनाथ रुणालयात करण्यात आली. त्यांचे जागेवर श्री.कुणाल बबनराव आभाळे (परचेस मॅनेजर) यांची नेमणुक करण्यात आली. प्रशासन शाखेकडील आदेशान्वये सौ.चंदा वाघ हया पुर्वी ज्याठिकाणी काम करत होत्या तेथील सर्व कामाचा व स्टॉकचा कार्यभार श्री.कुणाल आभाळे यांचेकडे सुपुर्त करण्यात यावा. परंतु सौ. चंदा वाघ हयांनी कुठल्याही प्रकारचा चार्ज आजपर्यंत दिलेला नाही. चार्ज न मिळाल्यामुळे श्री.कुणाल आभाळे हयांनी प्रशासनास दि.१२/०९/२०१५ व दि.२३/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये त्याबाबत लेखी कळविले होते. तसेच मा.मुख्य लेखाधिकारी साहेब यांनी देखील त्यांना सुचना केल्या होत्या, परंतु सौ.चंदा वाघ हयांनी प्रशासनाच्या कुठल्याही आदेशास दाद न देता stock मोजून दिलेला नाही.

त्यानंतर दि. २४/१२/२०१५ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व वॉर्ड/ ओ.टी.यांना कळविण्यात आले होते की, आपल्या वॉर्ड/ विभागाकरीता लागणारे औषधे /सर्जिकल साहित्याची दि.३१/१२/२०१५ पर्यत मागणी करण्यात यावी, कारण दि.०४/०१/२०१६ ते दि.०८/०१/२०१६ पर्यंत स्टॉक मोजण्याचे काम चालु राहील.

सदर औषध साठा मोजणीचे वेळेस दि.०६/०१/२०१६ रोजी मा.मुख्य लेखाधिकारी साहेब यांनी राऊंड घेतला असता, त्यांनी असे आदेश दिले की, तुम्ही सर्व Physical Stock ची मोजणी करुन घ्यावी. त्यानंतर मी काही ठरावीक आयटमचा Physical Stock मोजून घेईल. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी योजनेअंतर्गत रुग्ण ॲडमीट

असतात त्यामुळे त्यांना सर्व औषधे ही मुख्य औषध भांडारातुन देण्यात येत असल्यामुळे जास्त दिवस इंडेन्ट बंद ठेवता येत नाही. त्यामुळे Physical Stock मोजून घेण्यात आलेला आहे. त्यानुसार श्री.कुणाल आभाळे, परचेस मॅनेजर यांनी भांडारातील सर्व फार्मासिस्ट हयांचे ५-५ चे ग्रुप करुन संपुर्ण Stock ची मोजणी केली आहे व प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या साठयाच्या यादीवर सर्व फार्मासिस्ट यांनी साठा मोजल्याच्या स्वाक्ष-या देखील केलेल्या आहेत. मोजणी केलेल्या Stock मध्ये रु.२,२५,३४६/- इतक्या रकमेचा Stock कमी झालेला दिसून येत आहे, तर रु.३७,४७३/-इतक्या रकमेचा अतिरीक्त Stock दिसत आहे. सदर औषधे/ सर्जिकल साहित्याचे Physical Stock मोजणीची यादी सोबत जोडलेली आहे.

सदर Stock मधील काही प्रमाणातील मटेरीयल हे रुममध्ये सिलबंद करण्यात आलेले आहे. सद सिलबंद रुममधील मटेरीयलची सध्याचे परचेस मॅनेजर व इतर कर्मचारी हयांचेकडे कुठल्याही प्रकारे नोंद केलेली नसून पुरवठाधारकांच्या सांगण्यावरुन त्यातील काही मटेरीयल हे मुदतबाहय (expire) झालेले आहे, तर काही मटेरीयलची मुदतबाहयता ही जवळ आलेली आहे. तसेच पुरवठाधारकांना त्याचे बिलदेखील अदा करण्यात आलेले नाही. सिलबंद रुममधील मटेरीयलबाबत पुरवठाधारकांकडून पत्र देखील येत आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत- औषधे/ सर्जिकल साहित्याचे Physical Stock मोजणीमध्ये रु.२,२५,३४६/- इतक्या रकमेचा Stock कमी झालेला दिसून येत आहे. तर रु.३७,४७३/- इतक्या रकमेचा अतिरीक्त Stock दिसत आहे. तसेच सदर Stock मधील काही प्रमाणातील मटेरीयल हे रुममध्ये सिलबंद करण्यात आलेले आहे. सदर मटेरीयलची कुठल्याही प्रकारे नोंद केलेली नसून त्यातील काही मटेरीयल हे मुदतबाहय (expire)झालेले आहे, तर काही मटेरीयलची मुदतबाहयता ही जवळ आलेली आहे. तसेच पुरवठाधारकांना त्याचे बिलदेखील अदा करण्यात आलेले नाही. सिलबंद रुममधील मटेरीयलबाबत पुरवठाधारकांकडून पत्र देखील येत आहे. त्यामुळे मुदतबाहय (expire) झालेले किंवा ज्या मटेरीयलची मुदतबाहयता ही जवळ आलेली आहे. अशी औषधे पुरवठाधारकांस परत करता येतील.

उपरोक्त प्रमाणे औषधे/ सर्जिकल साहित्याचे Physical Stock मोजणीमध्ये रु.२,२५,३४६/- इतक्या रक्कमेचा Stock कमी झालेला दिसून येत आहे, तर रु.३७,४७३/- इतक्या रक्कमेचा अतिरीक्त Stock दिसत आहे. तरी सदर प्रस्ताव नोंद घेणेकामी निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे औषधे/ सर्जिकल साहित्याचे Physical Stock मोजणीमध्ये रु.२,२५,३४६/- इतक्या रकमेचा Stock कमी झालेला दिसून येत आहे, तर रु.३७,४७३/- इतक्या रक्कमेचा अतिरिक्त Stock दिसून येत आहे. याबाबत तत्कालीन प्र.स्टोअर मॅनेजर सौ.चंदा मोहन वाघ यांना जा.नं.एसएसएस/ वशी-०७ए/ १५/ २०१६, दि.०१ एप्रील २०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन, लेखी खुलासा मागविण्यात आलेला आहे, सदरचा लेखी खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत प्र.वैद्यकिय संचालक यांनी चौकशी करुन जबाबदरी निश्चित करावी व आपले स्पष्ट अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. १२ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील औषधे भांडार विभागातील सिलंबद केलेल्या औषधांबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दरवर्षी वार्षिक ई – निविदा काढून औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येत असते. त्यानुसार, सन २०१४ मध्ये वार्षिक खरेदीही करण्यात आली होती परंतु, त्यामध्ये बरेच औषधे व सर्जिकल साहित्य हे आपले मागणीप्रमाणे नसून, त्यामध्ये Packing, Brand Name, Company, Streanth या मध्ये तफावत आढळून आलेली आहे. सदर मटेरियल हे तत्कालीन प्र. मटेरियल मॅनेजर, श्री. मच्छिंद्र थोरात यांनी ताब्यात घेतले होते. सदर औषधे व सर्जिकल साहित्य हे बदलून आलेले आहे. सदरचे मटेरियल मा. कार्यकारी अधिकारी अथवा मा. वैद्यकीय संचालक यांची कुठलीही पूर्वपरवानगी घेतलेली नसतांना त्यांनी सदर मटेरियल हे ताब्यात घेऊन वापरण्यात सांगितले होते.

वार्षिक पुरवठा आदेश व प्रत्यक्षात प्राप्त झालेले मटेरियल यामध्ये फरक असल्यास त्याच्या दरात सुध्दा फरक असू शकतो. परंतु, प्र. मटेरियल मॅनेजर यांनी त्याबाबत कधीच पुरवठाधारकाचा किंवा वापरणा-या डॉक्टरांचा खुलासा मागविला नाही.

तद् नंतर तत्कालीन कार्यकारी अधिकारी, श्री राजेंद्र जाधव यांच्याकडे जेंव्हा स्पिरिट आणण्यासाठी वाहन विभागाचा फॉर्म पाठविण्यात आला असता, त्याच्या असे लक्षात आले की, सदर पुरवठाधारकांला शिर्डी पोहच करण्याचे पुरवठा आदेशात असतांना आपण स्पिरिट आणण्यासाठी संस्थान वाहन गेल्या ५ वर्षापासून पाठवित होतो. त्यामुळे तात्काळ प्र. मटेरियल मॅनेजर यांची बदली करुन मुख्य औषध भांडार विभागातील औषधे व सर्जिकल साहित्याची पाहणी केली असता त्यांना फार मोठ्या प्रमाणात मटेरियलमध्ये तफावत आढळून आली.

त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या तक्त्यात सादर केला असून त्यामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. ती खालील प्रमाणे

अ) <u>मागणी पेक्षा जास्त पुरवठा झालेबाबत</u>- यामध्ये Nebuliser with Aerosol mask adult, Inj. Lizolid 300ml T. Lonol 25mg, T. Rofex 250mg, T. Flucess 150mg, Introducer Needle, T. Angiocar 20mg, T. Wuarf 2mg त्यावेळेस स्टोअर विभागात साठा असून सुध्दा सदर मटेरियल पार्टीकडून जास्त आल्याचे दिसते व उर्वरित मटेरियल हे भांडार विभागात शिल्लक नसल्याने मागविल्याचे दिसते.

ब) **<u>मागणी प्रमाणे पुरवठा न झालेबाबत</u>-** यामध्ये Inj. Appavisc, ETO Paper, Disp Cap, face Mask, Inj. Pitocin, Inj. ETopyline + Theophyline, T. Diclo + para, Sodium Phosphate, Enema, Benzoin Tincture, Denatured Spirit, Inj. Diclofenac यांचा पुरवठा आपल्या आदेशात दर्शविलेल्या Brand Name, Company Name, Size, Strength, Packing प्रमाणे झालेला नाही असे दिसते.

क) **<u>MRP पेक्षा जास्त पुरवठा झालेबाबत</u>-** यामध्ये काही मटेरियलबाबत MRP पेक्षा जास्त दराने पुरवठा केल्याचे दिसते. पुरवठा आदेशातील दर हे त्या मटेरियलच्या MRP पेक्षा जास्त स्वीकारण्यात आलेले आहे.

ड) **<u>मागणी नसतांना पुरवठा झालेबाबत</u>-** यामध्ये सदरचे मटेरियल हे मागणी न करताच पुरवठा धारकांनी पाठविले आहे.

इ) **<u>Emergency Purchase</u>** - यामध्ये प्राप्त मटेरियल हे तातडीने खरेदी केल्याचे दिसते परंतु, सदर औषधे व सर्जिकलचा पुरवठा आदेश सुध्दा देण्यात आला होता. पुरवठा आदेश असून, सुध्दा जे मटेरियल तातडीने खरेदी केलेले असतात. त्याचा फरकाची रक्कम पुरवठा आदेशातील पुरवठा धारकाकडून वसूल करावी लागते. परंतु, प्रत्यक्षात वसूल केलेली नाही असे दिसून येते.

तक्ता नं.२ मध्ये औषधांची यादी तसेच प्रत्यक्षात प्राप्त झालेली औषधे व पुरवठा आदेशातील मालाचे वर्णन यात असलेली तफावत दर्शविलेली आहे.

या सर्वांमध्ये खालीलप्रमाणे त्रूटीं आढळून आलेल्या आहेत.

१) Inj. Declofenac बाबत कंपनीच बदलून मटेरियल पाठविण्यात आले आहे व ते त्यावेळेचे मटेरियल मॅनेजर यांनी स्वीकारुन त्याचे बील अदा करण्यात आलेले आहे याबाबत पुरवठाधारकांकडून कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण पत्र मागविण्यात आल्याचे दिसत नाही व वरिष्ठ अधिका-यांची परवानगी घेतल्याचे दिसत नाही.

२) Denatured Spirit कामी पुरवठा आदेशात ७५० मिलीचा पुरवठा करण्यास सांगितले होते परंतु, प्रत्यक्षात ६५० मिलीचा पुरवठा आदेश करण्यात येत असून त्याप्रमाणे ते स्वीकारण्यात आलेले आहे तसेच सदर मटेरियल हे पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार पुरवठा धारकांचे शिर्डी पोहच करणेबाबत दर्शविलेले होते परंतु, त्याकामी संस्थानचे वाहन दर महिन्याला थेट श्रीरामपूर येथे जाऊन मटेरियल आणले जात होते. सदर बाब ही जवळ – जवळ मागील ५ वर्षापासून अशाच प्रकारे Spirit आणणेकामी तसेच ७५० मिली ऐवजी ६५० मिली बॉटल स्वीकारण्यात येत होती.

बरेच औषधे व सर्जिकल साहित्याचा भांडार विभागात साठा असतांनी सुध्दा जास्तीचा साठा मागविण्यात आल्याचे दिसते त्यामुळे औषध भांडार विभागात दैनंदिन साठा ठेवण्यास जागा अपुरी पडल्याचे दिसते ब-याच औषधांच्या Near Expiry, Non Moving item बाबत व्यवस्थीत पडताळणी न केल्याने मटेरियल औषध भांडार विभागामध्ये तसेच पडल्याचे दिसते. सोबत जोडलेल्या यादीमधील औषधे / सर्जिकल साहित्य सिलबंद करुन रुममध्ये पॅक करुन ठेवले आहे. त्यामधील काही औषधे / सर्जिकल साहित्य हे Expiry झाले आहे, तसेच काही Near Expiry औषधे सिलबंद आहे. Expiry झालेल्या मटेरियलबाबत पुरवठाधारकांकडून पत्र देखील येत आहे. तसेच Spirit चे पुरवठाधारकांचे बील अदा करणे बाकी असल्यामुळे सदर पुरवठाधारकांचे वेळोवेळी फोन देखील येत आहे. सदर मटेरियल हे मागील प्र. स्टोअर मॅनेजर, सौ. चंदा वाघ यांनी

सिलबंद करुन ठेवलेले असून त्या रुमची चावी देखील त्यांच्या ताब्यात असल्यामुळे सदर मटेरियलची Expiry कधीची आहे ते लक्षात येत नाही. त्यानंतर सौ. चंदा वाघ यांची श्री साईनाथ रुग्णालयात बदली झाली आहे. त्यांना प्रशासनाने निर्देश दिले होती की, तुम्ही जे काम करत होते. त्याचा संपूर्ण चार्ज हा परचेस मॅनेजर, श्री. कुणाल आभाळे यांना द्यावा. परंतु, आज पर्यंत त्यांनी कुठल्याही प्रकारची चार्ज दिलेला नाही. त्यानंतर मा. मुख्यलेखाधिकारी साहेबांना यांनी त्यांना सदर चार्ज देण्यात यावा असे सांगून देखील त्यांनी आजपर्यंत चार्ज देण्यास आल्या नाहीत. त्याबाबत मी प्रशासनाला लेखी कळविले आहे.

<u>विभागाचा अभिप्राय:-</u> काही औषधे/ सर्जिकल साहित्य हे Expiry झाले आहे, तसेच काही Near Expiry औषधे सिलबंद आहे. Expiry झालेल्या मटेरियलबाबत पुरवठाधारकांकडून पत्र देखील येत आहे. तसेच Spirit चे पुरवठाधारकांचे बील अदा करणे बाकी असल्यामुळे सदर पुरवठाधारकांचे वेळोवेळी फोन देखील येत आहे. सदर मटेरियल हे सिलबंद असल्यामुळे सदर मटेरियलची Expiry कधीची आहे ते लक्षात येत नाही. त्यामुळे सदर मटेरियलची नोंद घेऊन, पार्टीस परत करणे योग्य राहिल असे नम्र मत आहे.

तेंव्हा वरीलप्रमाणे सिलबंद मटेरियलचा सविस्तर तपशिल सोबत सादर केलेला आहे.

तरी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.२१३ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सिलबंद केलेल्या औषध साठ्याचे सील तोडून पंचनामा करणेत आलेला आहे व Expiry date नुसार सदर औषधांची यादी बनविणेत आलेली असलेबाबत कार्यकारी अधिकारी यांनी सभेस माहिती दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, औषधे भांडार विभागामधील पंचनामा केलेल्या औषधामधील जी औषधे/ सर्जिकल साहित्य हॉस्पिटलकरीता वापरता येणे शक्य आहे, अशी औषधे/सर्जिकल साहित्य हॉस्पिटलसाठी वापरण्यात यावी व इतर मुदतबाह्य झालेली औषधे/सर्जिकल साहित्य जे पुरवठाधारक परत घेण्यास तयार आहेत, त्यांना परत करणेत येऊन, पुरवठाधारकांकडून क्रेडीट नोट घेण्यात यावी तसेच जी औषधे/ सर्जिकल साहित्य मुदतबाह्य झालेली आहेत व पुरवठाधारक ती परत घेणार नाहीत त्यामूळे संस्थानचे**

**आर्थिक नुकसान होणार असल्याने ही औषधे /सर्जिकल साहित्य कोणाच्या निष्काळजीपणामूळे/ हलगर्जीपणामुळे मुदतबाह्य झालेली आहे, याबाबत प्र.वैद्यकिय संचालक यांनी चौकशी करुन त्याची जबाबदारी निश्चित करावी.**

**तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सिलंबद केलेली औषधे कोणाच्या अधिकारात सिलबंद करण्यात आली याबाबत संबधीतास लेखी पत्र देण्यात येऊन, विचारणा करण्यात यावी.**

**यासह सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. १३** **आंतररुग्ण विभागातील रुग्णांसाठी वापरण्यात येणा-या औषधे/सर्जीकल साहित्याचे दर निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण**

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय अशी दोन रुग्णालये चालविली जात आहेत. या दोन्ही रुग्णालयांमध्ये वेगवेगळया वार्ड/ विभागामध्ये रुग्ण अंतर्रुग्ण म्हणून विविध उपचार घेत असतात. दोन्हीकडील रुग्णालयात अंतर्रुग्ण म्हणून विविध उपचार घेत असतांना रुग्णांना उपचारा दरम्यान संस्थानचे औषध भांडार विभागाकडे उपलब्ध असलेली काही औषधे (इन्जेक्शन्स, गोळया, सलाईन्स व इतर अनुषंगीक साहीत्य) वापरण्यात येत असतात. त्याकरीता संस्थानचे मध्यवर्ती औषध भांडार विभागामार्फत दरवर्षी ई निविदा पध्दतीने रुग्णालयास आवश्यक असणारी औषधे विहीत पध्दतीने खरेदी केली जातात. रुग्णास उपचार चालु असतांना हॉस्पिटलकडे उपलब्ध असलेली औषधे वापरली जातात आणि डिस्चार्ज झाल्यानंतर उपचारा दरम्यान हॉस्पिटलकडील वापरण्यात आलेल्या औषधांचे चार्जेस रूग्णांच्या बीलामध्ये आकारण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येत असते.

त्या अनुषंगाने, सध्या रुग्णांकडून घेण्यात येत असलेले औषधांचे दर हे दि.२०/०७/२०१० रोजीच्या आदेशान्वये ठरल्याप्रमाणे आजपावेतो आकारण्यात येत आहेत, म्हणजेच सदर दरांमध्ये साधारणत: मागील ५ ते ६ वर्षांपासून कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. दरम्यानचे काळात औषधांच्या (इन्जेक्शन्स, गोळया, सलाईन्स व इतर अनुषंगीक साहीत्य) किंमतीमध्ये ब-याच मोठ्या प्रमाणात चढउतार झालेले आहेत व अद्यापही बाजारपेठेमध्ये औषधांच्या किंमती नेहमीच कमी जास्त होत आहेत/असतात. त्याप्रमाणे दरवर्षी रुग्णांच्या बीलामध्ये आकारण्यात येत असलेल्या दरांमध्येही बदल होणे आवश्यक होते. परंतु अद्यापर्यंत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

**मागणी – नाही**

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** सध्या हॉस्पिटलमार्फत रुग्णांसाठी ठरविण्यात आलेल्या औषधांचे दर हे सन 2010 पासुनचे असून त्यातील बहुतांशी औषधांच्या किमतींमध्ये वाढ झालेली आहे. परंतु, हॉस्पिटलचे दर मात्र अद्यापही तेच आहेत. त्यामुळे रुग्णांच्या बीलामध्ये लावण्यात येत असलेल्या औषधांचे दर MRP ऐवजी संस्थानने खरेदी केलेल्या औषधांची खरेदी किंमत + 20 टक्के हाताळणी चार्जेस (Purchase price + 20% Handling Charges) येणेप्रमाणे रुग्णांच्या बीलामध्ये लावण्यात यावेत, असे मत आहे.

तसेच यापूढे देखील ज्यावेळी संस्थानमार्फत रुग्णालयाकरीता औषधे खरेदी करण्यात येतील, त्या त्या वेळी औषध भांडार विभागाने खरेदी करण्यात आलेल्या औषधांच्या दर पत्रकाची एक प्रत वित्त विभागाकडील बिलिंग कक्षाकडे पाठविण्यात यावी व प्राप्त झालेल्या मंजूर दरपत्रकानुसार ERP विभागाने सॉफटवेअरमध्ये त्याप्रमाणे आवश्यक बदल करुन रुग्णांकडून बील आकारणी केल्यास रुग्णांचे व रुग्णालयाचे अर्थिक नुकसानाचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

तरी सध्यस्थितीत रुग्णांच्या बिलामध्ये आकारण्यात येत असलेल्या औषधांच्या किमतींऐवजी नव्याने खरेदी करण्यात आलेल्या औषधांच्या खरेदी किंमत अधिक 20 टक्के हाताळणी चार्जेस याप्रमाणे बील आकारणी करणेस स्थायी मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गोर-गरिब रुग्णांच्या सेवेसाठी साईबाबा संस्थान ना नफा ना तोटा या तत्वावर दोन्ही रुग्णालय चालवित असल्यामुळे येथे उपचार घेणा-या रुग्णांना खरेदी किंमत + फक्त ५ टक्के हाताळणी चार्जेस या दराने औषधे उपलब्ध करुन देण्यात यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. १४** **कॅथलॅब मशिन (Axiom Artis dfc) चे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 8473/2005, दि.11/08/2005 अन्वये मे. सिमेंस ली. मुंबई यांचेकडून AXIOM ARTIS dfc Cathlab System एकुण रू.2,95,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आली आहे. सदर मशिन श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये दि. 18/02/06 रोजी कार्यान्वीत करण्यात आलेले असुन कंपनीने मशीन करीता दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 17/02/2009 रोजी संपला आहे. मशीन करीता कंपनीस दिलेल्या वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे-

दि.11/08/05 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.12 अन्वये Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the fourth year is Rs.27,22,500/-. For subsequent years the escalation of 10% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes X-ray general I.I. Tube & Detector system, all spare parts and labour will be given free of cost. Payment for CMC to be done at beginning of each year after the demand of company.

वरील अटीनुसार आजपावेतो मे.सिमेंस लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशीन दूरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ.वर्षाहिाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Period** | **CAMC Amount Incl. of all Taxes in Rs.** | **Approx. Cost of Spare Parts in Rs.** (replaced by Company in CAMC) | **Total No. of Patients Done** |
|---|---|---|---|---|
| 1 | 17/02/09 to 16/02/10 | 30,59,001/- | 15,00,000+VAT | 4,775 |
| 2 | 17/02/10 to 16/02/11 | 32,99,920/- | 28,00,000+VAT | 5,293 |
| 3 | 17/02/11 to 16/02/12 | 36,29,912/- | 48,00,000+VAT | 7,193 |
| 4 | 17/02/12 to 16/02/13 | 40,56,616/- | 60,50,000+VAT | 8,910 |
| 5 | 17/02/13 to 16/02/14 | 44,48,682/- | 1,22,40,880 (Incl. of all taxes) | 9,008 |
| 6 | 17/02/14 to 16/02/15 | 46,97,933/- | USD1,08,733 (Approx Rs. 70,64,027+ VAT | 7,239 |
| 7 | 17/02/15to 16/02/16 | 49,04,265/- | Approx Rs. 3,50,000 + VAT | 4064 |
| | **Total** | **2,80,96,329/-** | **3,48,04,907/-** | **46482** |

कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीचे इंजिनिअर वर्षातून 4 नियमित व अमर्यादीत तातडीच्या भेटी (Breakdown Visit) देउन दुरुस्ती व देखभाल करीत आहेत. तसेच सदर कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स - रे टयुबसहीत) कंपनीने स्वखर्चाने बदलले आहे.

मे.सिमेंस ली. मुंबई यांनी पत्र क्र. West/H IM/AXA/Jan दि. 6/92886, Dt. 14/01/2016 (रूग्णालये प्राप्त दि.21/01/2016) अन्वये पुढील तीन वर्षाकरीता म्हणजे दि. 17/02/2016 ते दि. 16/02/2017 या कालावधीसाठी Cath Lab मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता खालीलप्रमाणे करारनामा पाठविला आहे.

| **Sr. No.** | **Period Form** | **Period to** | **Amount (RS)** | **VAT +Service Tax + Swachh Bharat Cess** | **% Increase** | **Total Contract Price (RS)** |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 17 Feb-2016 | 16-Feb-2017 | 45,50,617/- | 5,98,861/- | 5.0% | 51,49,478/- |

कंपनीने दि.17/02/2016 ते दि. 16/02/2017 या कालावधीसाठी मागील वर्षीच्या रक्कमेत 5.0% वाढ करून एकुण रु. 51,49,478/- (अक्षरी रु. एक्कावन्न लाख एकोणपन्नास हजार चारशे अठयाहत्तर मात्र) इतक्या रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

तसेच कंपनीने मागिल वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण 24 वेळा भेटी देउन मागील एक वर्षात अंदाजे रु. 3,50,000/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत. कॅथलॅब मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे 12 रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर दरवर्षी अंदाजे 4,064 पेशंटचे अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बी.एम.व्ही व इतर प्रोसिजर्स झालेल्या आहेत.

तसेच कंपनीचे ई- मेल दि. 21/01/2015 व दि. 24/03/2015 अन्वये कॅथलॅब मशिनचे Axiom Sensis व UPS चे या दोन्ही ॲक्सेसरिज/ पार्ट उपलब्ध होणे बंद झाल्यामुळे या पार्टची कंपनीने सर्व्हीस देणे बंद केले आहे.

दि. 28/11/2015 रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या आयत्या वेळेचा विषय क्र. 01 व निर्णय क्र. 584 अन्वये मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.

**1)** पी. आय.एल.18/2011 सिव्हील ॲप्लीकेशन नं 9219/2014 वर मा. औरंगाबाद खंडपिठाने दि. 26/01/2014 रोजी पुरवठाधारक कंपन्यांबरोबर त्याच अटी/ शर्तीवर AMC/CMC करारचे नुतनिकरण करावयाचे असल्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही, याबाबत खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**d)** In case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant / sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions.

यापुढे कोणत्याही मशिनरी/ साहित्याची AMC/CMC करतेवेळी मा. उच्च न्यायालयाच्या वरील आदेशप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यवाही करणेत यावी त्याअनुशंगाने AMC/CMC बाबत पूर्वी झालेले निर्णय रद्द करणेसाठी समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावेत.

सदर मशिनची दि.31/03/2015 ची घसारा वजा किंमत रू. 19,55,008/- इतकी आहे. सध्या मशिनचे CMC ची किंमत घसारा वजा जाता किमतीच्या दुप्पटीपेक्षा अधिक आहे. तसेच सध्या मशिनचे ब्रेकडाउन्सची संख्या देखील वाढली आहे. आणि मे सिमेंस लि. मुंबई यांनी देखील त्यांचे दि.06/02/2015 चे ई- मेल अन्वये सदर मशिनला सन 2019 पर्यंतच स्पेअरपार्टसह सर्व्हीस देणे शक्य असल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदरचे मशिन बायबॅक करून नवीन मशिन खरेदी करणे अधिक योग्य ठरेल असे नम्र मत आहे.

परंतु सदर मशिन बायबॅक करून नवीन मशिन खरेदी करणेकामी-

1) कॅथलॅब मशिनची घसारा वजा किंमत ही रू. 50,000/- पेक्षा जास्त असल्याने मशिन बायबॅक करणे करीता महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणेस अंदाजे सहा ते आठ महिन्यांचा कालावधी

2) याच प्रकारचे नवीन मशिनची किंमत रू. 10,00,000/- पेक्षा अधिक असल्यामुळे खरेदी करणेस मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेस तसेच मान्यता मिळाल्यानंतर विहीत पध्दतीने ई- निविदा प्रक्रिये द्वारे खरेदीस अंदाजे सहा महिन्यांचा कालावधी

असा एकुण एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लागु शकतो तो पर्यतच्या काळात उपलब्ध मशिन व्यवस्थित कार्यान्वीत राहणे कामी कंपनीकडे सध्याचे मशिनचे CMC करणे गरजेचे आहे. व नवीन मशिन खरेदी प्रस्ताव श्री साईबाबा हॉस्पीटलच्या खरेदी विभागाकडुन सादर करणेत आहे.

तसेच सदर मशिनचे स्पेअर पार्ट हे मोनोपॉली या प्रकारचे असल्यामूळे इतर कंपन्यांकडे उपलब्ध होत नाहीत. तरी देखील मे. जी.ई.मेडीकल सिस्टिम, मे. फिलीप्स इंडिया लि., मे. तोशीबा मेडीकल सिस्टिम, यांना आणि फ्री लान्स सर्व्हीस देणारे मे. टेलिमेड सिस्टिम, लातुर यांना दि. 08/02/2016 च्या ई-मेल द्वारे CMC करीता विचारणा करण्यात आली आहे. त्यापैकी मे. जी.ई.मेडीकल सिस्टिम, मे. फिलीप्स इंडिया लि. आणि मे. टेलिमेड सिस्टिम, लातुर यांनी ई-मेल द्वारे सदर मशिनचे CMC करू शकत नसल्याचे कळविले आहे. उर्वरीत कंपन्यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे कॅथलॅब मशिनचे CMC करणे करीता निविदा मागविता येत नाही.

तसेच दि. 11/02/2016 रोजी कंपनी प्रतिनिधी श्री. पटेल (चिफ सर्व्हीस मॅनेजर) यांनी मा. वैद्यकिय संचालक सो. यांचेसोबत प्रत्यक्ष झालेल्या चर्चेत सांगितले की, प्रति महीना सापेक्ष दराने CMC कार्यादेश स्विकारल्यास, एक्स रे ट्युब हेडसारख्या पार्टसची किंमत रु. 40,00,000/- इतकी असल्यामुळे कंपनी CMC कालावधीत बदलणेस परवानगी देत नाही. त्यामुळे त्यांनी प्रति महीना सापेक्ष दराने CMC कार्यादेश स्विकारण्यास असमर्थता दर्शविली आहे. तरी कॅथलॅब मशिनचे CMC प्रति महीना सापेक्ष दराने करता येणार नाही असे नम्र मत आहे.

सदर CMC चा खर्च नियमीत दुरूस्ती व देखभालीचा खर्च असल्यामूळे त्यास शासनाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही तसेच सदर खर्च रू. दहा लाखापेक्षा अधिक असला तरी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 28/11/2015, निर्णय क्र. 584 नुसार मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

तरी कॅथलॅब मशिनचे दि. 17/02/2016 ते दि. 16/02/2017 या कालावधीकरीता CMC करणेसाठी येणाऱ्या एकुण रू. 51,49,478/- च्या खर्चास व मे.सिमेन्स.लि. मुंबई यांना कार्यादेश देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१५** **आजचे सभेत मे.सिमेन्स लि. मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.शब्बार पटेल हे उपस्थित होते. सभेने त्यांचेबरोबर CAMC दरामध्ये सुट देणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी CAMC च्या वार्षिक दरामध्ये रु.१,४९,४७८/- मात्र सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅथलॅब मशिन (Axiom Artis dfc) चे दि.१७.०२.२०१६ ते दि.१६.०२.२०१७ या कालावधीसाठी मे.सिमेन्स लि. मुंबई यांचेकडून एकत्रित रु.५०,००,०००/- मात्र या दरामध्ये वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रस्तावित कॅथलॅब मशिन जुने झालेले असल्यामुळे त्याच्या दुरुस्ती देखभालीसाठी जास्त प्रमाणात खर्च होत आहे. याकरीता नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेबाबत प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. १५** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे 1st Floor व 2nd Floor विभागातील विविध मशिन्सचे सन २०१६-१७ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण 52 कंपन्यांचे एकुण रु. 37,05,48,969.38/- इतक्या रकमेचे अंदाजे 859 मेडीकल इक्विपमेंटस व मशिनरी, उपकरणे, इक्वीपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी 303 मशिन्सचे संबंधीत 30 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च 2016 अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र.33 निर्णय क्र.386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या

मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

दि. 28/11/2015 रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या आयत्या वेळेचा विषय क्र. 01 व निर्णय क्र. 584 अन्वये मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.

1) पी. आय.एल.18/2011 सिव्हील ॲप्लीकेशन नं. 9219/2014 वर मा. औरंगाबाद खंडपिठाने दि. 26/01/2014 रोजी पुरवठाधारक कंपन्यांबरोबर त्याच अटी/ शर्तीवर AMC/CMC कराराचे नुतनीकरण करावयाचे असल्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही, याबाबत खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

d) In case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant / sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions.

यापुढे कोणत्याही मशिनरी/साहित्याची AMC/CMC करतेवेळी मा. उच्च न्यायालयाच्या वरील आदेशप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यवाही करणेत यावी त्यानुशंगाने AMC/CMC बाबत पूर्वी झालेले निर्णय रद्द करणेसाठी समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावेत. त्यामुळे मा. त्रिसदस्यीय समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

तसेच उपरोक्त मशिनचे स्पेअर पार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. त्यामुळे निविदा मागवुन सदर AMC/CMC करता येत नाही.

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. 1 ते 28 अन्वये ICCU, GICU, CRU 1, CRU 2, CRU 3, CRU 4, CVTS OT 1, CVTS OT 2, TSR,MGW,FGW, DIALYSIS विभागातील एकुण 12 कंपन्यांच्या 261 नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. दरवर्षी प्रमाणे काही कंपन्यांनी मागील वर्षीप्रमाणेच दर दिलेले असुन काही कंपन्यांनी दरामध्ये 5% दरवाढ केलेली आहे. तसेच ज्या मशिन्सची वॉरंटी संपत आहे, त्यांचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर पुरवठा आदेशातील अटी, शर्थीनुसार घेण्यात आलेले आहेत.

सदर AMC/CMC चा खर्च हा नियमीत दुरूस्ती व देखभालीचा खर्च असल्यामूळे त्यास शासनाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही. तसेच मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 28/11/2015, निर्णय क्र. 584 नुसार मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU,GICU,CRU 1,CRU 2,CRU 3,CRU 4,CVTS OT 1, CVTS OT 2, TSR, MGW, FGW, DIALYSIS विभागातील एकुण 261 नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू.73,14,283 इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील** ICCU,GICU,CRU 1,CRU 2,CRU 3,CRU 4, CVTS OT 1, CVTS OT 2, TSR, MGW, FGW, DIALYSIS **विभागातील एकुण** 261 **नग मशीन्सचे उत्पादक कंपन्यांबरोबर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे रू.७३,१४,२८३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. १६** **श्री.सुजित दत्तात्रय जाधव, मु.पो.समनापुर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुजित दत्तात्रय जाधव मु. पो. समनापुर ता. संगमनेर जि. अहमदनगर यांनी त्यांचे वैदयकिय उपचारासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला असुन सदरचा अर्ज दि.१५/१२/२०१५ रोजी ईकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे.

श्री.जाधव हे कॅन्सर विकाराने आजारी असुन ते प्रवरा रुरल हॉस्पीटल ॲन्ड मेडीकल कॉलेज, लोणी. ता. राहाता जि. अहमदनगर या रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांना त्यांचे कॅन्सर आजाराचे उपचारासाठी रु. ४०,०००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र संबधीत रुग्णालयाने दिलेले आहे. त्याच बरोबर त्यांनी त्यांचा स्व:ताचा अनुदान मागणी अर्ज तसेच रुग्णाचे उपचाराचा कालावधी सह रुग्णालय प्रमाणपत्र व त्यात रुग्ण राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभार्थी आहे किंवा नाही याबाबतचे चालु तारखेचे रुग्णालय प्रमाण पत्र दिलेले नाही. याबाबत संबंधीत रुगणास जा.नं. एसएसएस/एसएसएच अनुदान/२५७३/२०१५ दि.२२/१२/२०१५ रोजीचे पत्राने संबंधीतास अपुर्ण पेपर पुर्ततेबाबत कळविण्यात आलेले आहे.

संस्थानचे वैदयकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री.जाधव यांनी अनुदान मंजुरी बाबत अवश्यक असणा-या अपुर्ण पेपरची पुर्तता केल्यानंतर त्यांना त्यांचे वैदयकिय उपचाराकरीता संस्थान नियमावलीनुसार खर्चाच्या एकुण १५ % रक्कम म्हणजेच रु. ६,०००/- वैदयकिय आर्थिक अनुदान मंजुर करता येईल.

श्री.जाधव यांना अनुदान देणेकामी मा.नामदार श्री.राधाकृष्ण विखे पाटील साहेब. यांनी शिफारस पत्र दिलेले असुन ट्रस्टमार्फत नियमानुसार जास्तीत जास्त आर्थिक मदत मंजुर करणेकामी सदरचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे बाबत मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी. दि.१४/१२/२०१५ रोजी शिफारस पत्रात नमुद केलेले आहे.

तरी श्री. सुजित दत्तात्रय जाधव. मु. पो. समनापुर ता. संगमनेर जि. अहमदनगर यांचे वैदयकिय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री.सुजित दत्तात्रय जाधव, समनापुर, ता.संगमनेर यांना एकूण खर्चाच्या १५% रक्कम रु.६,०००/- मात्र वैदयकिय आर्थिक अनुदान मंजूर करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षक)

---

**विषय नं. १७ संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या एका पात्र नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत सेवेत घेणेबाबत.**

प्रस्ताव- **(अ)** संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटूंबावर ओढवणा-या आपत्तीत कुटूंबियाना त्वरीत सहाय्य व्हावे ह्या उद्देशाने वेळोवेळी निर्गमीत होणा-या शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अधिन राहून मानवतेच्या दृष्टीकोणातून दिवंगत कर्मचा-यांच्या एका पात्र नातेवाईकास वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार अनुकंपा तत्वावर दि. १७/११/२००९ अखेर संस्थान सेवेत स्थायी पदावर सामावून घेण्यात आलेले आहे.

दि.०७/०८/२००९ रोजी मा.शासनाने श्री साईबाबा संस्थानचे विविध पदांचे आकृतीबंधास मंजुरी दिलेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर वर्ग ०४ संवर्गाची भरलेली पदे अतिरिक्त होती. मंजुर आकृतीबंधामध्ये समितीला आकृतीबंधा बाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही, अशी तरतूद असल्याने त्यावेळी अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळण्यासाठी अर्ज केलेल्या उमेदवरांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ च्या सभेतील निर्णय क्र.७६५(१) नुसार १३ दिवंगत कर्मचा-यांच्या वारसांना व त्यानंतर वेळोवळी मा.त्रिसदस्य समितीचे मान्यतेने ११ दिवंगत कर्मचा-यांच्या अशा एकूण २४ वारसांना मानवतेच्या दृष्टीकोनातून तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. याबाबतची सविस्तर माहिती सोबतचे परिशिष्ट 'अ' अन्वये सोबत जोडलेली आहे.

**(ब)** त्यानंतर संस्थान सेवेत असतांना मयत (निधन) झालेल्या सोबतचे परिशिष्ट 'ब' मधील अं.क्र २५ ते २७ दिवंगत कर्मचा-यांच्या वारसांनी अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेकामी अर्ज केलेले होते. संबधीतांचे प्रस्तावाबाबत मा.त्रिसदस्य समितीचे वेळोवेळी झालेल्या सभेत पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे. "..सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ०४ ची पदे रिक्त नाहीत व ज्या वेळेस वर्ग-०४ ची पदे रिक्त होतील, त्यावेळस त्यांना वर्ग-०४ या पदावर अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत विचार होईल." त्यानुसार संबधीतांना यापूर्वी तूर्त कंत्राटी पध्दतीने सेवेत घेणेत आलेल्या उमेदवारांप्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टरमार्फत संस्थान सेवेत घेणत आलेले नाही.

**(क)** त्यानंतर संस्थान सेवेत असतांना मयत (निधन ) झालेल्या कर्मचा-यांच्या जागी अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेकामी अर्ज केलेल्या परिशिष्ट क मधील अं.क्र.२९ श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे व अं.क्र.३० श्री.किरण प्रकाश कोते यांचे अर्जाबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेतील अनुक्रमे निर्णय क्र.६९४ व ६९५ मध्ये,

"मा.उच्च न्यायालयाचे मनाई हुकूमामुळे व संस्थान आस्थापनेवर सध्या वर्ग ०४ पदे रिक्त नसल्यामुळे अनुकंपा भरती होऊ शकत नाही, असे अर्जदारास कळविणेत यावे. मा. उच्च न्यायालयाची परवानगी मिळाली आणि जागा रिक्त असेल त्योवळी अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याच्या सर्व नियमांचा विचार करुन योग्य निर्णय घेतला जाईल.

अशा प्रकारे अनुकंपा तत्वावर नोकरीची मागणी करणा-या अर्जदाराची शिफारस त्यास कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेबाबत ठेकेदाराकडे करु नये. मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळेपावेतो अशी अनुकंपा भरती केली जाणार नाही, तेव्हा असे प्रस्ताव तोपर्यंत समितीसमोर आणू नयेत व संबंधीतास तसे कळविण्यात यावे." असे नमूद केलेले आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, श्रीमती रुपाली मराठे व श्री किरण कोते यांचे नंतर अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी प्राप्त झालेले अर्ज मा. त्रिसदस्य समितीचे सभेसमोर कार्यवाहीसाठी सादर करणेत आलेले नाहीत.

**(ड)** आता, मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी शिर्डी शहर आणि परिसरातील स्थानिक ग्रामस्थ/ कर्मचा-यांच्या प्रलंबीत प्रश्न व इतर अनुषंगिक बाबींसाठी दि.२१/०१/२०१६ रोजी बैठक आयेजित केलेली होती. या बैठकीस संस्थान व्यवस्थापनामार्फत मा.कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी महोदय तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये, संस्थानमधील मयत कर्मचा-यांच्या वारसांना/ कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर कामावर घेवून कायम करणेबाबतच्या मुद्याबाबत बाबत ढोबळ मानाने चर्चा होऊन, सध्या वर्ग ०४ संवर्गाचे पदे रिक्त नाहीत. सदरची अतिरिक्त पदे मे-२०१६ नंतर समायोजित होऊन त्यानंतर रिक्त होणा-या जागांवर अनुकंपा उमेदवारांना जेष्ठतेनुसर टप्या-टप्याने नेमणूका देणे प्रस्तावीत आहे. तथापी, सदर प्रक्रियेस बराच कालावधी लागणार असल्याने सध्या ज्या कर्मचा-याच्या वारसांना तूर्त कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले नाही. अशा वारसांना मानवतेच्या दृष्टीकोनातून तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेण्यात यावे असे मा.विरोधी पक्षनेते यांनी सुचविले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावर नमूद केलेप्रमाणे, सोबतच्या परिशिष्ट 'ब' व 'क' मधील अं.क्र २५ ते ३८ एकूण १४ उमेदवारांपैकी अं.क्र.३०,३६ व ३७ या क्रमाकांच्या मयत कर्मचा-यांचे वारसाबाबत अलहिदा निर्णय घेणे अपेक्षित असल्याने उर्वरित ११ कर्मचा-यांच्या वारसांना तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने सेवेत घेणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त मयत संस्थान कर्मचा-याचे वारसास कंत्राटी पध्दतीने कामावर घेणे अथवा न घेणे हा विषय संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदाराच्या अखत्यारीत असल्यामूळे समितीने त्याबाबत निर्णय घेणेचा प्रश्नच उद्भवत नाही, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं. १८** **अनुकंपा कारणास्तव श्री.राहुल अशोक गोडगे यांना लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०९ नुसार पुनःश्च फेरप्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटुंबातील एका पात्र नातेवाईकास शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अधिन राहून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दि.१७/११/२००९ रोजी अखेर संस्थान सेवेत स्थायी पदावर सामावून घेण्यात आलेले आहे.

दि.०७/०८/२००९ रोजी मा.शासनाने श्री साईबाबा संस्थानचे विविध पदांचे आकृतीबंधास मंजुरी दिलेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर वर्ग ०४ संवर्गाची भरलेली पदे अतिरिक्त होती. मंजुर आकृतीबंधामध्ये 'समितीला आकृतीबंधा बाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही' अशी तरतूद असल्याने अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या उमेदवरांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ च्या सभेतील निर्णय क्र.७६५ (१) नुसार तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.

**(ब)** मंजुर आकृतीबधानुसार सप्टेंबर २०१४ अखेर वर्ग संवर्गाची अतिरिक्त पदसंख्या ३५ होती व वर्ग ०३ संवर्गातील विविध पदे रिक्त होती. शासन निर्णय क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, मंत्रालय, मुंबई दि.२८ मार्च, २००१ मध्ये, "अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवंगत किंवा अकाली निवृत्त केवळ गट 'क' व 'ड' मधील कर्मचा-यांच्या कुटुंबियांना गट 'क' व 'ड' मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय राहील." तसेच शासन निर्णय, क्रमांक, अकंपा-१००४/प्र.क्र-५१/२००४/०८, मंत्रालय मुंबई दि.२२ ऑगस्ट २००५ मध्ये, "गट 'क' व 'ड' मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट 'क' व 'ड' च्या रिक्त पदांवर विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना या यादीतील क्रमानुसार नियुक्ती करु शकतील." अशी तरतूद असल्याने त्यावेळी अनुकंपा कारणास्तव कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या २८ कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना वर्ग ०३ व वर्ग ०४ चे पदावर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेसमोर सादर करणेत येऊन त्यावरील निर्णयानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये विधी विभागामार्फत दिवाणी अर्ज क्र.५०६६ दाखल करणेत आलेला होता त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि.०६/०५/२०१५ रोजी खालील प्रमाणे निणर्य दिलेला आहे.

"The Committee may implement Resolution no.17 to appoint the 28 employees on compassionate basis as prayed, after considering their eligibility, so also availability of sanctioned posts, as per the government resolutions and the policy in vogue."

याचाच अर्थ, व्यवस्थापन समितीचे विषय क्र.१७ (निर्णय क्र.८२५) नुसार मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास, मानवतेच्या दृष्टीकोणातून २८ कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रता, सध्या रिक्त असलेल्या जागा / पदे यांची पडताळणी करुन, याबाबतचे शासन निर्णय व प्रचलित पध्दतीनुसार नेमणूका करणेस परवानगी देणेत आलेली आहे.

**(क)** दि.२८ मार्च, २००१ व दि.२२ ऑगस्ट, २००५ रोजीचे शासन निर्णयातील तरतूद व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यतेनुसार, जुन २०१५ चे आकडेवारीनुसार संस्थान आस्थापेनवर वर्ग ०४ संवर्गाची पदे रिक्त नव्हती केवळ वर्ग ०३ संवर्गाची काही पदे रिक्त असल्याने, अनुकंपा कारणास्तव कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या उमेदवार श्रीमती रेणुका श्रीनिवास नाईक यांना त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२५५/२०१५ दि.०१ जुन, २०१५ रोजीचे आदेशाने लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेत आलेली आहे.

मंजुर आकृतीबंधातील तरतुदीनुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४ दि.२७/१२/२०१४ रोजी पुर्वप्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात लिपीक-टंकलेखक पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

| अं.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | सध्याची रिक्त पदसंख्या | Qualification पात्रता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | By Nomination | By Promotion |
| 01 | Clerk-Typist लिपीक-टंकलेखक | 3050-4590 Pay Band 5200-20200 Grade Pay 1900 | 109 | 1. Age not more than 33 years.<br>2. Graduate from any Government recognized University;<br>3. MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course | 1. Graduate from any Government recognized University;<br>2. MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3. Government |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 4. Government Commercial certificate of Typing-English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed. | Commercial certificate of Typing-English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed. 4. Experience of 5 years as a Coupon Seller OR Class-IV Employees in sansthan. |

सेवाप्रवेश नियमातील उपरोक्त तरतुदीनुसार अनुकंपा कारणास्तव सध्या कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले उमदवार श्री.राहुल अशोक गोडगे यांनी लिपीक-टंकलेखक पदाची शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली असून, त्यांनी दि.३०/१०/२०१५ रोजीचे विनंतीअर्जाने संबधीत पदावर नेमणूक मिळणेची विनंती केलेली आहे. श्री.राहुल गोडगे यांचा वैयक्तीक माहिती / तपशिल खालील प्रमाणे.

| अं. क्र | उमेदवाराचे नाव | जन्मतारीख | **Qualification** | दिवगंत कर्मचा-याचे नाव व पदनाम | दिवंगत कर्मचा-याशी नाते |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.राहुल अशोक गोडगे | २९/०१/१९८९ | 1) B.A (Y.C.M.O.U).<br>2) MS-CIT.<br>3) Typing-English 40, 30 w.p.m and Marathi 30 w.p.m.<br>4) Tally. | कै.अशोक ह.गोडगे (मदतनिस) | मुलगा |

श्री.गोडगे यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून कला शाखेची पदवी धारण केलेली असून, महाराष्ट्र शासनाचे दि.१२ डिसेंबर, २००६ रोजीचे शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडून प्रदान केलेल्या पदवी / पदवीकांना राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी मान्तया दिलेली आहे. आज रोजी संस्थान आस्थापनेवर लिपीक-टंकलेखक पदनामाची १०९ पदे रिक्त आहेत. दि.२८ मार्च २००१ व दि.२२ ऑगस्ट २००५ रोजीचे शासन निर्णयातील तरतूद व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेनुसार अनुकंपा कारणास्तव उपरोक्त उमेदवरास त्यानी धारण केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार लिपीक-टंकलेखक पदावर व त्या पदाचे वेतनश्रेणीवर एक वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीचे अटीवर नेमणूक देता येईल.

**(ड)** तथापी, संस्थानमध्ये वर्ग ०४ पदावर व कुपनविक्रेता पदावर कार्यरत असलेले श्री प्रताप कोते व इतर २९ कर्मचा-यांनी दि.२३/१०/२०१५ रोजी पदोन्नती मिळणेसाठी अर्ज केलेला असून, त्यामध्ये पुढील मागणी केलेली आहे. थोडक्यात– संस्थान आस्थापनेवर लिपीक-टंकलेखक, कुपन विक्रेता, मुकादम, माळी, प्लंबर, वायरमन, सुतार, गवंडी, कृषी सहाय्यक पदे रिक्त आहेत. सदर पदांची शैक्षणिक पात्रता पूर्ण असणा-या कर्मचा-यांची संस्थान प्रशासनाने यापुर्वी परिक्षा घेवून उत्तीर्ण कर्मचा-यांना पदोन्नती दिलेली आहे. परंतु अनुकंपा कारणास्तव श्रीमती रेणुका नाईक, यांची परिक्षा न घेता थेट लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक केलेली आहे. त्यामुळे सेवेत असणा-या वर्ग ०४ कर्मचा-यांवर अन्याय झालेला आहे. संस्थानमधील सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना पदोन्नाती दिलेनंतर रिक्त होणा-या पदांवर अनुकंपा तत्वावरील कर्मचा-यांना प्रथम वर्ग ०४ चे पदावर घेणे आवश्यक आहे. त्यांना थेट वर्ग ०३ पदावर पदस्थापना दिलेमुळे वर्ग ०४ कर्मचा-यांवर अन्याय होणार आहे. तसे झालेस वर्ग ०४ कर्मचा-यांना नाईलाजास्तव न्यायालयात दाद मागावी लागेल. आम्ही लिपीक-टंकलेखक तसेच कुपन विक्रेता पदाची शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली असून आम्हाला सदर पदांवर पदोन्नती द्यावी, हि विनंती.

**(इ)** वास्तविक पहाता, परिच्छेद 'अ' 'ब' व 'क' मध्ये नमुद केलेली वस्तु:स्थीती हि अनुकंपा तत्वावरील कर्मचा-यांना सेवेत सामावून घेणेबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत आहे व परिच्छेद ड मध्ये नमूद केलेल्या कर्मचा-यांनी पदोन्नती मिळावी म्हणून अर्ज दिलेला आहे. कर्मचा-यांना पदोन्नती ज्या त्या प्राधिकरणाने ठरवून दिलेले निकष उदा.बिंदुनामावली, आरक्षण, पदनिहाय संवर्ग व शैक्षणिक पात्रता इ. तपासून देण्यात येत, परंतु अनुकंपा नेमणुका शासनाचे ध्येय धोरणानुसार विहीत अटी-शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना देणे बंधनकारक असते. याबाबत शासन निर्णय क्र.अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, मंत्रालय, मुंबई दि.२६ ऑक्टोबर, १९९४ रोजीचे शासन निर्णयामध्ये, अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत पारित केलेल्या नियमावलीमध्ये अ.क्र.०४ अ) अनुकंपा तत्वावर संबधीत नातलगाची शैक्षणिक पात्रता व वय यानुसार राज्य शासनांतर्गत कोणत्याही गट 'क' व 'ड' श्रेणीच्या सरळसेवा प्रवेशाने भरल्या जाणा-या पदावर नियुक्ती करता येईल. ह्या नियमानुसार नियुक्ती मिळण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेत बसण्याची आवश्यकता नाही. म्हणजेच अनुकंपा कारणास्तव गट 'क' व 'ड' च्या पदावर नेमणूक देणेसाठी संबधीत उमेदवाराची विभागीय / विभागांतर्गत घेण्यात येणा-या परिक्षा घेण्याची आवश्यकता नाही, असे मत आहे.

यापुर्वी वेळोवेळी अनुकंपा कारणास्तव विहीत अटी-शर्ती पुर्ण करणा-या उमेदवारांची मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वर्ग ०३ व वर्ग ०४ चे पदांवर थेट नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसारच अनुकंपा कारणास्तव श्री.राहुल अशोक गोडगे यांची वर्ग ०३ – लिपीक-टंकलेखक पदावर थेट नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.०९ अन्वये,

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या दिवाणी अर्जावरील निर्णयास अनुसरुन पात्र उमेदवारास अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ चे पदावर नेमणूक देणेकामी शासन निर्णय व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशासह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

**सध्यस्थिती –**

**(ई)** मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०९ नुसार सदरचा प्रस्ताव फेरसादर करणेत यावा असे ठरले आहे. **त्यासअनुसरुन,**

1. उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमूद केलेप्रमाण, सप्टेंबर २०१४ मध्ये त्यावेळी अनुकंपा कारणास्तव कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या २८ कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना वर्ग ०३ व वर्ग ०४ चे पदावर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता, त्यावरील निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दिवाणी अर्ज क्र.५०६६ दाखल करणेत येऊन, त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि. ०६/०५/२०१५ रोजी खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"The Committee may implement Resolution no.17 to appoint the 28 employees on compassionate basis as prayed, after considering their eligibility, so also availability of sanctioned posts, as per the government resolutions and the policy in vogue."

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त निर्णयानुसार सध्या वर्ग ०४ संवर्गाची पदे रिक्त नसल्यामुळे तूर्त अनुकंपा कारणास्तव वर्ग ०४ संवर्गाची भरती होऊ शकत नाही. परंतु आज रोजी वर्ग-०३ लिपीक-टंकलेखक पदाची १०९ पदे रिक्त असल्यामुळे लिपीक-टंकलेखक पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण करणा-या उमेदवाराची अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक करता येईल.

2. तसेच लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेबाबत शासन निर्णय क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, मंत्रालय, मुंबई दि.२८ मार्च, २००१ मध्ये, *"अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवंगत किंवा अकाली निवृत्त केवळ गट 'क' व 'ड' मधील कर्मचा-यांच्या कुटुंबियांना गट 'क' व 'ड' मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय राहील."* तसेच शासन निर्णय, क्रमांक, अकंपा-१००४/प्र.क्र-५१/२००४/०८, मंत्रालय मुंबई दि.२२ ऑगस्ट २००५ मध्ये, *"गट 'क' व 'ड' मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट 'क' व 'ड' च्या रिक्त पदांवर विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना या यादीतील क्रमानुसार नियुक्ती करु शकतील."* अशी तरतूद आहे. सोबत मा.उच्च न्यायालयाचे आदेशाची व मा.शासनाचे दि.२८.०३.२००१ व दि.२२.०८.२००५ रोजीचे शासन निर्णयाची छायांकित प्रत अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.

त्यानुसार श्री.राहुल अशोक गोडगे यांनी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमानुसार लिपीक-टंकलेखक पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेली असून, त्यानुसार श्री गोडगे यांची अनुकंपा कारणास्तव लिपीक-टंकलेखक पदावर त्या पदाचे वेतनश्रेणीवर एक वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीचे अटीवर नेमणूक करणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत संस्थान कायदेशिर सल्लागाराचे मार्गदर्शन घेण्यात यावे तसेच सर्व शासन निर्णय तपासून निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं. १९** **अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ संवर्ग लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक मिळणेबाबत श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांचा दि.२३/०१/२०१६ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **(अ)** कै.सोमनाथ भगवान मराठे, वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग यांचे संस्थान सेवत असतांना दि. ३० मे, २०१४ रोजी दुःखद निधन झालेले आहे. दिवंगत मराठे यांचे निधनानंतर त्यांच्या जागी अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे (पत्नी) यांनी दि.२४/०७/२०१४ रोजी अर्ज सादर केलेला आहे.

श्रीमती मराठे यांचे त्यावेळचे शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांची अनुकंपा कारणास्तव वर्ग ०४ चे पदावर तूर्त कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबतचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता त्यावर निर्णय क्र.६९४ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला होता.

"मा.उच्च न्यायालयाचे मनाई हुकूमामुळे व संस्थान आस्थापनेवर सध्या वर्ग -०४ ची पदे रिक्त नसल्यामुळे अनुकंपा भरती होवू शकत नाही, अर्जदारास कळविणेत यावे. मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळाली आणि जागा रिक्त असेल त्यावेळी अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याच्या सर्व नियमांचा विचार करुन योग्य निर्णय घेतला जाईल.

अशा प्रकारे अनुकंपा तत्वावर नोकरीची मागणी करणा-या अर्जदाराची शिफारस त्यास कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेबाबत ठेकेदाराकडे करु नये. मा. उच्च न्यायालयाची परवानगी मिळेपावेतो अशी अनुकंपा भरती केली जाणार नाही, तेव्हा असे प्रस्ताव तोपर्यंत समितीसमोर अणू नयेतव संबंधीतास तसे कळविण्यात यावे."

**(ब)** मा.त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार श्रीमती मराठे यांना तूर्त कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेले नाही. त्यानंतर, दि.२३/०१/२०१६ रोजीचे अर्जाने अनुकंपा कारणास्तव वर्ग ०३ संवर्गात लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे.

अनुकंपा कारणास्तव लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेबाबत शासन निर्णय क्रं, अकंपा- १०००/ प्र.क्र.२०/ २०००/आठ, मंत्रालय, मुंबई दि.२८ मार्च, २००१ मध्ये , "अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवगंत किंवा अकाली निवृत्त केवळ गट 'क' व 'ड' मधील कर्मचा-यांच्या कुटुंबियांना गट क व ड मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय राहिल." तसेच शासन निर्णय, क्रमांक, अकंपा-१००४/प्र.क्र-५१/२००४/०८, मंत्रालय मुंबई दि.२२ ऑगस्ट २००५ मध्ये, "गट 'क' व 'ड' मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट 'क' आणि 'ड' च्या रिक्त पदांवर विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना या यादीतील क्रमानुसार नियुक्ती करु शकतील." अशी तरतूद आहे.

**(क)** मंजुर आकृतीबंधातील तरतुदीनुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४ दि.२७/१२/२०१४ रोजी पुर्वप्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात लिपीक-टंकलेखक पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

| **अं.क्र** | **पदनाम** | **वेतनश्रेणी** | **सध्याची रिक्त पदसंख्या** | **Qualification पात्रता** | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | By Nomination | By Promotion |
| 01 | Clerk-Typist **लिपीक-टंकलेखक** | 3050-4590 Pay Band 5200-20200 Grade Pay 1900 | 109 | 1) Age not more than 33 years.<br>2) Graduate from any Government recognized University;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>4) Government Commercial certificate of Typing-English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed. | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Government Commercial certificate of Typing-English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed.<br>4) Experience of 5 years as a Coupon Seller OR Class-IV Employees in sansthan. |

सेवाप्रवेश नियमातील उपरोक्त तरतुदीनुसार श्रीमती मराठे यांनी लिपीक-टंकलेखक पदाची आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली असून, त्यांचे वैयक्तिक माहिती व शैक्षणिक अर्हतेचा तपशिल खालील प्रमाणे.

| **अं.क्र** | **दिवंगत कर्मचा-यांचे नाव व पदनाम** | **उमेदवारांचे नाव (वारसदाराचे नाव)** | **दिवंगत कर्मचा-याशी नाते** | **जन्मतारीख** | **Qualification** |
|---|---|---|---|---|---|
| 01 | कै.सोमनाथ भगवान मराठे (मदतनिस) | श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे | पत्नी | २६/०५/१९८३ (आज रोजीचे वय ३२ वर्षे ०९ महिने) | 1) B.A (Pune, University)<br>2) MS-CIT.<br>3) Typing-English 40, 30 w.pm. and Marathi 30 w.p.m.<br>4) Montessori Teacher's Course |

**(ड)** मध्यंतरीचे काळात, मा.त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार अनुकंपा कारणास्तव कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलल्या २८ कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना वर्ग ०३ व वर्ग ०४ चे पदावर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दिवाणी अर्ज क्र.५०६६ दाखल करणेत आलेला होता त्यावर मा.उच्च न्यायालयाचे दि.०६/०५/२०१५रोजी खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"The Committee may implement Resolution no.17 to appoint the 28 employees on compassionate basis as prayed, after considering their eligibility, so also availability of sanctioned posts, as per the government resolutions and the policy in vogue."

याचाच अर्थ, व्यवस्थापन समितीचे विषय क्र.१७ (निर्णय क्र.८२५) नुसार मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास, मानवतेच्या दृष्टीकोणातून २८ कर्मचा-यांच्या शैक्षणिक पात्रता, सध्या रिक्त असलेल्या जागा / पदे यांची पडताळणी करुन, याबाबतचे शासन निर्णय व प्रचलित पध्दतीनुसार नेमणूक करणेस परवानगी देणेत आलेली आहे.

**(ई)** मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे उपरोक्त मान्यतेनुसार व मा.शासनाचे दि.२८ मार्च, २००१ व दि.२२ ऑगस्ट,२००५ रोजीचे शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुकंपा कारणास्तव श्रीमती रेणुका श्रीनिवास नाईक यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२५५/२०१५दि.०१ जून, २०१५रोजीचे आदेशाने लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक

देणेत आलेली आहे. तसेच श्री.राहुल अशोक गोडगे यांना अनुकंपा कारणास्तव लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला आहे.

मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या दिवाणी अर्जातील २८ कर्मचा-यांच्या नावामध्ये श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांचे नावाचा समावेश नव्हता. त्यामुळे मा.शासनाचे २८ मार्च, २००१ व दि.२२ ऑगस्ट, २००५ रोजीचे शासन निर्णयातीलतरतुदीनुसार श्रीमती मराठे यांना त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग ०३ लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेकामी प्रथम मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेने कार्यवाही करणे उचित होईल,असे मत आहे.

तरी अनुकंपा कारणास्तव श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांना शैक्षणिक पात्रतेनुसार लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायायलयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या दिवानी अर्जातील २८ कर्मचा-यांचे नावामध्ये श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे यांचे नावाचा समावेश नसल्याने त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार लिपिक-टंकलेखक पदावर नेमणूक देता येणे शक्य नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं. २०** **निमंत्रण पत्रिकेवर श्री साईबाबांचे फोटो चित्रित (छपाई) न करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री कृष्णा पांडुरंग मिरजगांवकर फातोडी- गोवा यांनी दि.०७/०१/२०१६ रोजीचे कळविलेले आहे की,

"शिरडीच्या उत्सवाचे आमंत्रण मला नेहमी प्रमाणे येत आहे. पुर्वी हे आमंत्रण पांढ-या कव्हर व्दारे व नंतर उदी प्रसाद येत असे. त्या कव्हरवर With Blessing of Shirdi Sai Baba असे मोठया अक्षरात असे.

मी गोव्यात १९७५ सालापासून आहे, येथे क्रिस्ती बांधव खूप आहेत. माझ्या अनुभवात खालील प्रसंग आले. वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया प्रसंगी मदरमेरी व क्रिस्तांचा फोटो खिशांत बसेल या मापाचे जमीनीत धूळीत पडलेले आढळले किस्ती बाई व क्रिस्ती बांधव अनुक्रमे त्या वर चुकून पाय पडण्या अगोदर त्याला उचलून प्रेमाने व आदराने उचलून रुमालाने पुसून त्यास कपाळी लावले आणि त्यांचे चुंबन (लहान बाळांचे कसे प्रमाणे घेतात) घेऊन बाईने तिच्या ब्लाऊज मध्ये व बांधवाने त्याच्या पर्स मध्ये ठेवले. त्यांना इतुका अनादर सुध्दा सहन होत नाही या वरुन आम्ही सुध्दा बोध घ्यावा.

नविन आमंत्रणाच्या कव्हरवर आणि आमंत्रण पत्रिकेवर मंदिराच्या शिखरा शेजारी श्री बाबांच चित्र-चेहरा चित्रीत आहे. तो कातरुन जवळ ठेवला आहे. तो कच-यात जाऊन अवमान होऊ नये वाटते. ते चित्र फाडून टाकण्याची इच्छा होत नाही.

आपणास नम्र विनंती की कव्हर आणि आमंत्रण पत्रिकेवर श्री बाबांचा फोटो चित्रित करु नये. मंदीरशिखराचा फोटो छापावा. पुर्वी प्रमाणे With Blessing of Shirdi Saibaba हे वाक्य कव्हर व आमंत्रण पत्रिकेवर छापावे हे कच-यात गेले तर इतके वाईट वाटणार व फाडले तरी हे वाक्य कापून पुस्तकांवर, वहीवर, डायरीवर,चेकबुकवर व पासबुकवर चिटकवले जाऊ शकते व चिटवले आहे.

कृपया हा प्रस्ताव चेअरमन साहेब व मेंबरा पुढे ठेवावा व बाबांचे चित्र चित्रित करणे थांबवावे ही नम्र विनंती." येणे प्रमाणे अर्ज आहे.

संस्थान मार्फत श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी (विजयादशमी) हे मुख्य उत्सव साजरे केले जातात. या उत्सवा निमित्ताने संस्थान भक्तमंडळ सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठविण्यात येतात. या पत्रिकेवर श्रींचे फोटो छपाई करण्यात येतात. सन २००९ चे पुर्वी निमंत्रण पत्रिकेवर श्री साईबाबांचे फोटोंची छपाई करण्यात येत नव्हती. सोबत, २००९ चे पुर्वीच्या काही आमंत्रण पत्रिका अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत.

श्री.कृष्णा पांडुरंग मिरजगांवकर यांचे व्यतरिक्त कोणत्याही साईभक्तांची तक्रार याबाबत इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

श्री कृष्णा मिरजगांवकर यांनी निमंत्रण पत्रिकेवर श्री साईबाबांचे चित्र (फोटो) छपाई न करण्याची मागणी उचीत वाटते. निमंत्रण पत्रिकेवर छपाई केलेले फोटो पायंदळी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन-२०१६ मधील निमंत्रण पत्रिकेवर श्रीसाईबाबांचे फोटो न छापता पुर्वीप्रमाणे फक्त श्री साईबाबांच्या समाधी मंदीराच्या कळसाचा फोटो (With Blessings of Shri Saibaba) छपाई करण्यात येत होते.

आता वर परिच्छेदात नमुद केलेनुसार, अर्जदार साईभक्ताने सुचित केलेप्रमाणे, संस्थान मार्फत साजरे करणेत येणा-या उत्सवांचे निमंत्रण पत्रिकेवर श्रींचे फोटो ऐवजी श्री साईबाबांचे समाधी मंदिराचे कळसाचा फोटो छपाई करणेत यावा किंवा कसे याबाबत यथायोग्य निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री कृष्णा मिरजगांवकर यांनी निमंत्रण पत्रिकेवर श्री साईबाबांचे चित्र (फोटो) छपाई न करणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी -५)

---

**विषय नं. २१** **मे.मॉर्डन व्ही.आर. सिक्युरीटी फोर्स लि. व मे.जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे लेबर सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर यांचे गैरशिस्त वर्तन व कंत्राट रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५६ अन्वये निविदा मंजूर होऊन, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१०४२७/२०१४ इन पी.आय.एल.

क्र.१८/ २०११ व दि.२२-१२-२०१४ रोजीचे आदेशान्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-०१-२०१५ रोजचे सभेतील निर्णय क्र.२७ नुसार दि.०१-०३-२०१५ ते दि.२८-०२-२०१५ अखेर तीन वर्षे या कालावधीत मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स लि.पुणे व मे. जय भवानी एन्टरप्रायजेस, पुणे यांना कंत्राट दिलेले असुन,श्री साईबाबा रुग्णालय, व्दारावती,भक्तनिवास ,मंदीर प्रवेशव्दार, दर्शनरांग, पिंपळवाडीरोड, व इतर ठिकाणी सुरक्षा पुरविणेकामी मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स लि.पुणे व मंदिर परिसर व शैक्षणिक संकुल,वाहन विभाग,श्री साईबाबा भक्तनिवासस्थान,श्री साईधर्मशाळा, साईआश्रम-०१ इ.ठिकाणी मे.जय भवानी एन्टरप्रायजेस यांना सुरक्षा गार्ड पुरविणेबाबत कार्यादेश नमुद केलेले आहे. सदर दोन्ही एजन्सीमार्फत देखरेखीकामी सुरक्षा अधिका-यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भीय क्र.१ अन्वये संरक्षण विभागाचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर पत्रात दि.०८-१०-२०१५ रोजी दुपारी ०२.५० चे दरम्यान ए.टी.एस.नाशिक पथकाच्या महिला अधिकारी पी.एस.आय. सौ.बी.जी.मोढळे व त्यांचे एक सहकारी यांनी हातामध्ये एक पिवळया रंगाचे पिशवीमध्ये बॉक्समध्ये तयार केलेली बॉम्ब सदृष्य वस्तु घेऊन गेट नं.०३ ने मंदिर परिसरामध्ये प्रवेश केलेला आहे. गेट नं.०३ वर चेकिंगकामी माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा रक्षक श्री.जीवन नव्हाळे व महिला सुरक्षा रक्षक सौ. सरला जाधव यांची डयुटी नेमलेली होती. ए.टी.एस.चे अधिकारी यांनी गेट नं.०३ ने प्रवेश करतेवेळी कर्तव्यावर हजर असलेले सुरक्षा रक्षक श्री.जीवन नव्हाळे व सौ.सरला जाधव यांनी त्यांची कुठल्याही प्रकारे चेकींग केलेली नाही. फक्त मोबाईल आहे का असे विचारले व हातातील पिशवी चेक न करता, मंदिर परिसरामध्ये प्रवेश दिलेला आहे. पी.एस.आय. सौ.बी.जी.मोढळे व त्यांचे एक सहकारी यांनी मंदिर परिसरामध्ये प्रवेश केल्यानंतर गेट नं.०४ कडे पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा यांचे कार्यालयात जावुन घटणेची माहिति दिली व गेट नं.०२ चे आतील बाजूस असलेल्या संरक्षण कार्यालयात येऊन, श्री.संजय पाटणी, सुरक्षा निरिक्षक यांना बोलावून घेऊन् सदर घटणेची माहिती दिलीबाबत नमुद केलेले आहे. तसेच यापूर्वीही दि.२२-०८-२०१५ रोजी नाशिक येथील एटीएस अधिकारी पी.एस.आय.श्री.गायकवाड, पोलीस निरिक्षक श्री.जोहरे यांनी सिव्हील ड्रेसमध्ये गेट नं.०३ येथून कापडी पिशवीतून डयुप्लीकेट बॉम्ब घेऊन् मंदिर परिसरात प्रवेश केलेला होता बाबत नमुद केले असुन, मागणीप्रमाणे सुरक्षा कर्मचारी/गनमॅन पुरविले जात नसल्याने कामामध्ये सुधारणा होत नसल्यामुळे साईभक्तांचे व साई मंदिराचे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला असुन, सदर एजन्सीचे मंदिर महाद्वारावरील चेकींगकामी दिलेले कंत्राट रद्द करून दुसरे एजन्सीची नेमणुक करणेबाबत इकडील कार्यालयास कळविलेले होते.

त्यानुसार सदर सुरक्षा एजन्सीचे यांचे कर्मचारी गैरशिस्त वर्तन व इतर बाबत दि.१६-११-२०१५ रोजी त्यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समोर टिपणी सादर करण्यात आलेली होती. त्यावर मा.का.अ.सो.यांनी संबंधीत एजन्सीचे कामकाज समाधानकारक नसल्याचे दिसून येते. व्यवस्थापन समितीसमोर एजन्सीचा ठेका रद्द करणेबाबत अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले असल्याने, त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३००१/२०१५ दि.०७-११-२०१५ अन्वये संरक्षण विभागाने संदर्भीय पत्रात नमुद केलेली बाब ही अत्यंत गंभीर स्वरूपाची असुन, आपले एजन्सीचे सुरक्षा अधिकारी व निरिक्षक यांचे सुरक्षा यंत्रणेवर नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे साईभक्तांचे तसेच संस्थान मालमत्तेचे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. आपणाला नेमुण दिलेल्या परिसरामध्ये वेळोवेळी राऊंड घेऊन सुरक्षा यंत्रणेची पाहणी करणे व दिलेल्या आदेशाची पाहणी करणे. पॉईटवर व्यवस्थीत चेकींग करणे कंत्राटी कामगारावर

देखरेख व नियंत्रण ठेवणेबाबत त्वरीत कारवाई करणे अन्यथा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केले बाबत तुमचेवर दंडात्मक कारवाई करुन तुमचे एजन्सीचे कंत्राट रद्द करण्यात येईल बाबत मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स लि.पुणे यांना अंतिम नोटीस देणेत आलेली होती. तरी सुरक्षा व्यवस्थेत कुठल्याहीप्रकारे सुधारणा होत नसल्याचे दिसून येत आहे. कार्यादेशातील अटी/शर्ती क्र.१७ नुसार ज्या परिसर विभागाची संरक्षणाची जबाबदारी आपले सुरक्षा रक्षकांवर सोपविलेली असेल त्या विभागात/परिसरात चो-या, मारामारी अथवा कोणत्याही प्रकारचे अनुचित प्रकार/बेशिस्तवर्तन झाल्यास होणा-या नुकसान भरपाईसाठी अगर इतर कायदेशीर बाबीसाठी आपण जबाबदार राहाल, तसेच सदर घटणेच्या दिवसी डयुटीवर असलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यावर कामामध्ये हलगर्जीपणा केलेबाबत त्वरीत कारवाई करुन आपले सुरक्षा अधिकारी व निरीक्षक यांना आपल्याला दिलेल्या आदेशाप्राणे पॉईटवर व्यवस्थीत चेकींग करणे, कंत्राटी कामगारांवर देखरेख व नियंत्रण ठेवणेकामी त्वरीत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास दोन दिवसाचे आत सादर करावा. सदर आदेशाची कार्यवाही त्वरीत करणेत यावी अन्यथा तुम्ही करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग केलेबाबत तुमचेवर दंडात्मक व इतर कारवाई करणेत येईल., तसेच तुमचे एजन्सीचे कंत्राट रद्द करणेबाबत कारवाई करणेत येईल याची नोंद घेणेबाबत मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स लि.पुणे यांना कळविणेत आले होते.

तसेच सदर दोन्ही एजन्सीचे कंत्राटी सुरक्षा रक्षक यांचे गैरशिस्त वर्तन व कर्मचारी उपलब्धते बाबत इकडील पत्र ०१) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२४४०/२०१५ दि.०९-१०-२०१५, ०२) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३२७६/ २०१५ दि.०२-१२-२०१५, ०३) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५२३८/२०१५ दि.२१-१२-२०१५, ०४) जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/३९०१/२०१६ दि.१४-०१-२०१६, ०५) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२१९८/२०१५ दि.३०-१०-२०१५ अन्वये ही कामात सुधारणा न झाल्यास कंत्राट रद्द करणेत येईलबाबत कळविणेत आलेले होते.

तसेच मे. जय भवानी एन्टरप्रायजेस, पुणे यांनी कार्यादेशातील अट व शर्त क्र.२३ नुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० चे नियम नं.२५ (०१) नुसार लेबर लायसेन्स तसेच महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी लायसेन्स प्रत १५ दिवसांचे आंत सादर करणेत आवश्यक होते. परंतू अद्यापपावेतो त्यांनी सिक्युरिटी एजन्सी लायसेन्स प्रत कामगार विभागास सादर केलेली नाही.याबाबत त्यांचे दरमहिन्याचे पगार बिलातून दंड वसुल

करणेत येत असुन, याबाबत त्यांना ०१) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०८६/२०१५ दि.१२-०६-२०१५,०२) जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/१२७४/२०१५ दि.०४-०७-२०१५,०३) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२४९२/२०१५ दि.०१-१०-२०१५,०४) जा.नं. एसएसएस/वशी-७ए/२९७१/२०१५ दि.०५-११-२०१५, ०५) जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२४९/२०१५ दि.२८-११-२०१५, अन्वये नोटीसीद्वारे कळविणेत आलेले आहे. तसेच त्यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयातील त्यांचे कंत्राटी कामगारांना गणवेषही दिलेले नाहीत. गणवेषाबाबत त्यांना इकडील पत्र क्र. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३०१७/२०१५ दि.०९-११-२०१५ व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२४८५/२०१५ दि.१७-११-२०१५, नुसार दोन वेळा लेखी पत्रान्वये कळविणेत आलेले आहे. परंतु अद्यापपावेतो काही कंत्राटी कर्मचा-यांना एजन्सीचे गणवेष दिलेले नाहीत तसेच सदर दोन्ही एजन्सी यांनी ऑर्डर मिळालेपासून एक महिन्यांचे आंत कंत्राटी कर्मचारी पॉलीसी उतरविणे आवश्यक होते परंतू त्यांनी विमा पॉलीसी ही डिसेंबर महिन्यात घेतली आहे. तसेच सदर दोन्ही एजन्सी दररोज ठरवून दिलेल्या मंजूरीप्रमाणे कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवित नसल्याने संरक्षण विभागास अडचणी येतात.

**माहे जूलै-२०१५ ते डिसेंबर-२०१५** अखेर मे.जय भवानी एन्टरप्रायजेस व मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी यांचे खालीलप्रमाणे सिक्युरिटी पॉईंट खाली गेलेले आहेत.

| **मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी** | | | | **मे.जय भवानी एन्टरप्रायजेस** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कालावधी | मंजूर पॉईंट | पुरविलेले पॉईंट | **खाली गेलेले पॉईंट** | कालावधी | मंजूर पॉईंट | पुरविलेले पॉईंट | **खाली गेलेले पॉईंट** |
| जूलै-२०१५ | ११९३५ | ८४४२ | **३४९३** | जूलै-२०१५ | ११३४६ | १०२०६ | **११४०** |
| ऑगष्ट-१५ | १२०९० | ८५२६ | **३५६४** | ऑगष्ट-१५ | ११४३९ | १०३७१ | **१०६८** |
| सप्टेंबर-१५ | ११७०० | ८७१३ | **२९८७** | सप्टेंबर-१५ | ११०७० | १०१२५ | **९४५** |
| ऑक्टोबर-१५ | १२०२८ | ८९६७ | **३०६१** | ऑक्टोबर-१५ | ११४३९ | ९८७७ | **१५६२** |
| नोव्हेंबर-१५ | ११५२० | ८३३५ | **३५८८** | नोव्हेंबर-१५ | ११०१० | ९५४२ | **१३६८** |
| डिसेंबर-१५ | ११९०४ | ८९१४ | **२९९०** | डिसेंबर-१५ | ११३७० | १०२४७ | **११३०** |

परंतु अदयाप पावेतो त्यांचेमध्ये कोणतीही सुधारणा झालेली नसले बाबत वरील घटनेवरुन दिसून येते.सदर एजन्सीचे मालक हे फक्त् निविदा ओपनिंग व चर्चा वाटाघाटीकामी उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी अद्यापपावेतो इकडील कार्यालयास कुठलाही संपर्क साधलेला नाही. तसेच अनेकवेळा त्यांना कर्मचारी उपलब्धतेबाबत व इतर गैरशिस्त वर्तनाबाबत दुरध्वनी

केला असता, ते फोन सुध्दा रिसिव्ह करत नाहीत. तसेच सदर एजन्सी उत्सवाचे व इतर काळात संरक्षण विभागाचे ,इतर विभागांचे मागणी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी पुरवित नाहीत. कामगार विभागास सुध्दा वेळेवर रेकॉर्ड उपलब्ध करुन देत नाहीत. तरी मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स लि.पुणे व मे.जय भवानी एंटरप्रायजेस,पुणे यांचे नांव काळया यादीत समाविष्ठ करुन त्यांचे कंत्राट रद्द करावे किंवा कसे बाबत दि.१६-११-२०१५ रोजीचे टिपणी अन्वये प्रकरण पुढील योग्य त्या आदेशास्तव सादर करण्यात आलेले होते. त्यावर मा.का.अ.सो यांनी संबंधित एजन्सीचे कामकाज समाधानकारक नसल्याचे दिसून येते. व्यवस्थापन समिती समोर एजन्सीचा ठेका रद्द करणेबाबत अहवाल सादर करावा बाबत सूचित केले आहे.

तरी मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स लि.पुणे व मे.जय भवानी एंटरप्रायजेस,पुणे लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर यांना देण्यात आलेले अकुशल,कुशल कंत्राटी कर्मचारी व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेचे कॉन्ट्रक्ट/ करारनामा रद्द करणेस तसेच मा.व्यवस्थापन समिती सभेतील दि.३०.०१.२०१५ निर्णय क्र.२७ मध्ये त्यावेळी निम्नतम सर्व्हीस चार्जेस दर असलेल्या लोएस्ट-२ चे कंत्राटदार, निविदाधारक यांना वर्क ऑर्डर देणेस मान्यता असावी.अथवा याकामी पुनश्च वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन, नव्याने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मॉर्डन व्ही.आर. सिक्युरीटी फोर्स लि. व मे.जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे लेबर सिक्युरीटी कॉन्ट्रॅक्टर यांना मा.कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष बोलावून त्यांचेबरोबर चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं. २२** **श्री.बाळू विष्णु बनसोडे, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.बाळु विष्णु बनसोडे हे दि.०४-१२-२००६ पासून संस्थान सेवत मदतनीस म्हणुन कामास आहे. श्री.बनसोडे हे श्री साई प्रसादालय विभागात मदतनीस म्हणुन कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.०१-०७-२०१५ ते दि.०३-०९-२०१५, दि.१०-०९-२०१५ ते दि.३०-०९-२०१५ अखेर ८५ दिवस या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

**ए) गैरवर्तनाचे स्वरूप-** श्री.बाळु विष्णु बनसोडे, मदतनीस हे साईप्रसादालय विभागात कार्यरत असतांना दि.०१-०७-२०१५ ते दि.०३-०९-२०१५, दि.१०-०९-२०१५ ते दि.३०-०९-२०१५ अखेर ८५ दिवस या कालावधीत पूर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली.श्री.बनसोडे यांना विनापरवानगी व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.अधिक्षक, साई

प्रसादालय विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री.बनसोडे यांचे सदरचे कृत्ये हे बेकायदेशीर असुन, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणुन उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.बनसोडे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी७ए/१७६२/ २०१५ दि.१२-०८-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी७ए/३२३६/२०१५ दि.०७-०९-२०१५, जा.नं.एसएसएस/ वशी७ए/३८५३ /२०१५ दि.१०-१०-२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढुन, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. त्यास अनुसरून श्री.बनसोडे यांनी दि.०८-०९-२०१५ व दि.१५-१०-२०१५ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला असुन सदरचा लेखी खुलासा असमाधानकारक आहे.

अशाप्रकारे श्री.बाळु विष्णु बनसोडे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांची उपरोक्तप्रमाणे नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर रहाणे किंवा रजेशिवाय सलग दहापेक्षा जास्त दिवस गैरहजर रहाणे., ही कृत्ये प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे खालीलप्रमाणे कर्तव्य या तरतुदीचे उल्लंघन करणारे आहे.

१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीचे-

i) संपूर्ण प्रामाणिकपणा कायम राखेल

ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल, आणि

iii) संस्थानाच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्ये करणार नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणुक) विनियम, २०१३ कलम ३ (१) मधील तरतुदीप्रमाणे सदरचे कृत्ये हे गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते. सदरचे गैरशिस्त वर्तन श्री.बनसोडे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवण्यात आलेले आहे.

**बी) खाते चौकशी निष्कर्ष अहवाल-** श्री.बनसोडे यांना जा.नं.एसएसएस/वशी७ए/३०४३/२०१५ दि.११-११-२०१५ अन्वये अभिकथनपत्र देवुन, त्यांचेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणुक) विनियम, २०१३ कलम ३ (१) मधील तरतुदीप्रमाणे आरोप ठेवणेत आलेले आहे.

श्री.बाळु विष्णु बनसोडे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे विरूध्द दि.११-११-२०१५ रोजी ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून, त्यांचा दि.१८-१२-२०१५ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे.

कसुरदार श्री.बनसोडे यांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज नैसर्गिक न्यायतत्वानुसार पूर्ण केलेले आहे.

सदर दि.१८-१२-२०१५ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालात खालीलप्रमाणे **"आदेश"** करणेत आलेला आहे.

**आदेश-**

१) श्री.बाळु विष्णु बनसोडे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग हे दोषी आहेत, २) श्री.बाळु विष्णु बनसोडे, यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणुक) विनियम, २०१३ कलम ३ (१) चा भंग केला आहे. त्यांनी सदर तरतुदीचे उल्लंघन करून गैरशिस्त वर्तन केल्याचे सिध्द झाले आहे.

**सी) पूर्व सेवा इतिहास-** श्री.बाळु विष्णु बनसोडे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.बनसोडे हे दि.२८-१२-२०१२ ते दि.३१-१२-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२९-०१-२०१२ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **एक दिवस तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

२) श्री.बनसोडे हे दि.२३-०१-२०१३ ते दि.२५-०१-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२८-०२-२०१३ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

३) श्री.बनसोडे हे दि.२७-११-२०१३,२८-११-२०१३ दि.३०-११-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१०-०२-२०१४ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

४) श्री.बनसोडे हे दि.१०-०९-२०१४, दि.२४-०९-२०१४ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१२-११-२०१४ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

५) श्री.बनसोडे हे दि.०१-१०-२०१४, दि.१६-१०-२०१४ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१६-१२-२०१४ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

६) श्री.बनसोडे हे दि.२५-०२-२०१४ ते दि.२८-०२-२०१४ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०२-०५-२०१५ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आले.

७) श्री.बनसोडे हे दि.११-०३-२०१५ ते दि.१८-०३-२०१५ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-०५-२०१५ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आले.

८) श्री.बनसोडे हे दि.१९-०३-२०१५ ते दि.२४-०३-२०१५ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०८-०९-२०१५ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आले.

९) श्री.बनसोडे हे दि.१९-०३-२०१५ ते दि.२४-०३-२०१५ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०८-०९-२०१५ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आले.

१०) श्री.बनसोडे हे दि.०१-१०-२०१५ ते दि.३१-१०-२०१५ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०८-१०-२०११ रोजीचे आदेशान्वये सदर कालावधीची अनाधिकृत गैरहजेरी धरणेत येवुन, शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आले.

अशाप्रकारे श्री.बनसोडे यांना यापूर्वी गैरश्स्ति वर्तनाबाबत ०४ वेळा सक्त ताकीद, ०५ वेळा ठपका, ०१ वेळा एक दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत अशी १० वेळा शिक्षा होऊन देखील त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

**डी) शिक्षेबाबत तरतुद-** श्री.बनसोडे यांचे विरूध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत.

आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसुल करणे,

(४) वेतनवाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्पात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानच्या कर्मचा-याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधीत पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतनश्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्पात घट करणे, सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचा-याच्या समयश्रेणीतील वेतनश्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो. तेथून त्याच्या स्थानात घट होईल. तसेच संस्थानाच्या कर्मचा-याची समाश्रेणीतील वेतनश्रेणी, पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवा जेष्ठतेतुन घट झाली. त्या स्थानात किंवा सेवाजेष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होईल यासंबधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्याची प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचा-याने कोणत्याही व्यक्तीकडून आर्थिक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतुद आहे.

सबब, श्री.बाळु विष्णु बनसोडे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खाते चौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने , तसेच त्यांचे मागील सेवेतील पूर्व इतिहास विचारात घेता, व आरोप पत्रातील आरोपांचे गांभीर्य विचारात घेता, श्री.बनसोडे यांना संस्थान सेवेतून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणे ही शिक्षा देणेस ते पात्र आहे. तथापि, मानवतेच्या दृष्टीकोनातून सहानुभूतीपूर्वक विचार करून, श्री.बनसोडे यांना त्यांचे सेवत व वर्तनात सुधारणा करणेची अंतिम संधी देणेचे दृष्टीने त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या शिक्षेपैकी **"(४)"** प्रमाणे त्यांची सन २०१६ या वर्षाची वार्षिक वेतनवाढ रोखुन धरणेत यावी अशी शिक्षा देता येईल असे मत आहे.

तथापि, त्यांना "(८)" प्रमाणे नोटीशी शिवाय सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे (डिसमिस) करणेबाबत शिक्षा दयावायाची झाल्यास त्यांना प्रथम अंतिम कारणे दाखवा नोटीस देवुन, त्यांचा लेखी खुलासा मागवावा लागेल व त्यासोबत श्री.बनसोडे यांना दि.१८-१२-२०१५ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाची प्रत पाठवावी लागेल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बाळू विष्णु बनसोडे, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना खातेचौकशी निष्कर्ष अहवालचे प्रतिसह अंतिम कारणे दाखवा नोटीस देवुन, त्यांचा लेखी खुलासा मागविण्यात यावा व त्यानंतर अंतीम निर्णयार्थ प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं. २३** **श्री.ज्ञानेश्वर केरु दळवी, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग हे दि.०४-१२-२००६ पासून संस्थान सेवत मदतनीस म्हणुन काम करीत आहे. श्री.दळवी हे श्री साई प्रसादालय विभागात मदतनीस म्हणुन कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.०१-१२-२०१३ ते दि.२८-०२-२०१४, दि.१९-०७-२०१४ ते दि.२९-०७-२०१४ अखेर १०१ दिवस या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, श्री साईप्रसादालय विभाग हे दि.०१-१२-२०१३ ते दि.२८-०२-२०१४, दि.१९-०७-२०१४ ते दि.२९-०७-२०१४ अखेर १०१ दिवस या कालावधीत पूर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली.श्री.दळवी यांना विनापरवानगी व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.अधिक्षक, साई प्रसादालय विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री.दळवी यांचे सदरचे कृत्ये हे बेकायदेशीर असुन, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणुन उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.दळवी यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी७ए/३३५६/२०१४ दि.०८-०१-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी७ए/३७८६/२०१४ दि.१५-०२-२०१४, जा.नं.एसएसएस/ वशी७ए/५५७४ / २०१४ दि.०५-०३-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी७ए/२०२२/२०१४ दि.०९-०८-२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढुन, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.दळवी यांना सदर कारणे दाखवा नोटीसा अनुक्रमे दि.२८-०१-२०१४, दि.११-०६-२०१४, दि.१५-०३-२०१४ व दि.११-०८-२०१४ रोजी प्राप्त होवुन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत. यावरून सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते.

म्हणून श्री.दळवी यांना जा.नं.एसएसएस/ वशी७ए/२३८७/२०१४ दि.०१-०९-२०१४ अन्वये आरोपपत्र देवुन, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेन्ट (स्टॅन्डींग ऑर्डर्स), अॅक्ट, १९४६ वे कलम क्र.२४ (एफ), २४ (एल) प्रमाणे नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग दहापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे., आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे हे दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेन्ट (स्टॅन्डींग ऑर्डर्स), अॅक्ट, १९४६ वे कलम क्र.२४ (एफ), २४ (एल) अन्वये गंभीर गैरशिस्त् वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री.दळवी यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते.

श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे विरूध्द दि.०१-०९-२०१४ रोजी ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खातेचौकशी अॅडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खातेचौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून त्यांचा दि.१९-१२-२०१५ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**<u>आदेश-</u>**

श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आहेत, श्री. दळवी यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेन्ट (स्टॅन्डींग ऑर्डर्स), अॅक्ट, १९४६ खालील स्थायी आदेश कलम २४ (एफ) नुसार गैरशिस्त वर्तन केले आहे.

श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.दळवी हे दि.०४-०२-२००९ ते दि.०९-०२-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१०-०३-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

२) श्री.दळवी हे दि.१०-०२-२००९ ते दि.१४-०२-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०६-०४-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

३) श्री.दळवी हे दि.२१-०५-२००९ ते दि.२४-०५-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२९-०७-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **चार दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

४) श्री.दळवी हे दि.१९-०९-२००९ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१३-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

५) श्री.दळवी हे दि.१०-०६-२००९ ते दि.२१-०६-२००९ तसेच दि.१६-०७-२००९ ते दि.२८-०७-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२१-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

६) श्री.दळवी हे दि.०३-१२-२००९ ते दि.१०-१२-२००९ ते दि.२०-१२-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.३०-०१-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

७) श्री.दळवी हे दि.१६-०९-२०१० ते दि.२३-०९-२०१० या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१०-११-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

८) श्री.दळवी हे दि.२७-०६-२०१० ते दि.०६-०७-२०१० व दि.१०-०७-२०१० ते दि.१६-०७-२०१० या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२४-११-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

९) श्री.दळवी हे दि.०८-०१-२०११ ते दि.१५-०१-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१२-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१०) श्री.दळवी हे दि.२२-०२-२०११ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१२-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

११) श्री.दळवी हे दि.२२-०१-२०११ ते दि.२८-०१-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१२) श्री.दळवी हे दि.३१-०३-२०११ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-०७-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१३) श्री.दळवी हे दि.२१-०६-२०११ ते दि.२२-०६-२०११ व दि.२५-०६-२०११ ते दि.२९-०६-२०११, दि.३०-०६-२०११ ते दि.१०-०७-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१२-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१४) श्री.दळवी हे दि.३०-०६-२०११, दि.११-०७-२०११ ते दि.१७-०७-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१४-०९-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

१५) श्री.दळवी हे दि.०८-०६-२०११ ते दि.२०-०६-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२५-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१६) श्री.दळवी हे दि.२९-१०-२०११ ते दि.३०-१०-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२४-१२-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१७) श्री.दळवी हे दि.१०-०६-२०१२,दि.१२-०६-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.३०-०७-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१८) श्री.दळवी हे दि.१८-०८-२०१२ ते दि.२४-०८-२०१२, दि.२६-०८-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०२-१०-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१९) श्री.दळवी हे दि.१४-०९-२०१२ ते दि.२६-०९-२०१२, दि.२८-०९-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-११-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** देणेत आली.

२०) श्री.दळवी हे दि.१३-१०-२०१२ ते दि.२१-१०-२०१२, दि.०८-११-२०१२ ते दि.२०-११-२०१२, दि.२४-११-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१२-०२-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** देणेत आली.

२१) श्री.दळवी हे दि.०१-०३-२०१३ ते दि.२३-०३-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०८-०५-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** देणेत आली.

२२) श्री.दळवी हे दि.०१-०१-२०१३ ते दि.१५-०२-२०१३, दि.२०-०२-२०१३ ते दि.२३-०२-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२२-०३-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** देणेत आली.

२३) श्री.दळवी हे दि.१८-०७-२०१३, दि.१९-०७-२०१३ ते दि.२१-०७-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२८-०९-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

२४) श्री.दळवी हे दि.०१-०८-२०१३ ते दि.२३-०९-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०७-११-२०१३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** देणेत आली.

२५) श्री.दळवी हे दि.२५-१०-२०१३ ते दि.३१-१०-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०७-०१-२०१४ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

२६) श्री.दळवी हे दि.०१-११-२०१३ ते दि.०८-११-२०१३, दि.११-११-२०१३ ते दि.३०-११-२०१३ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०७-०३-२०१४ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **दोन दिवस संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत** देणेत आली.

२७) श्री.दळवी हे दि.०१-०३-२०१४ ते दि.०८-०३-२०१४ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-०४-२०१४ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

२८) श्री.दळवी हे दि.१२-०५-२०१४ ते दि.१६-०५-२०१४, दि.२४-०५-२०१४ ते दि.२५-०५-२०१४, दि.२८-०५-२०१४ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२४-०७-२०१४ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

२९) श्री.दळवी हे दि.०१-०४-२०१५ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१८-०५-२०१५ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आला.

३०) श्री.दळवी हे दि.०९-०४-२०१५ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०९-०९-२०१५ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ठपका** ठेवणेत आला.

अशाप्रकारे श्री.दळवी यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत १९ वेळा सक्त ताकीद, ताकिद -०१ वेळा, संस्थान सेवेतून चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत-०२ वेळा, संस्थान सेवेतून दोन दिवस तात्पुरते सेवा निलंबीत -०६ वेळा, ठपका-०२ वेळा अशी ३० वेळा शिक्षा होऊन देखील त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

श्री.दळवी यांचे विरूध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत.

आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅन्डींग ऑर्डर्स) रूल्स १९५९ चे कलम २५ (१) अन्वये खालील शिक्षा करणेची तरतुद आहे.

**अ)** ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

**ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ हयाच्या तरतुदीच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा (एकुण वेतनाचे ३% इतका दंड)

**क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

**ड)** नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमिस) करावे.

सबब, श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खाते चौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने , त्यांना आरोपप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत वरील **अ, ब, क, ड** या चार शिक्षेपैकी एक शिक्षा देता येईल.

तसेच श्री.दळवी यांना **"ड"** प्रमाणे शिक्षा करावयाची झाल्यास त्यांना प्रथम संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमिस) का करणेत येऊ नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस देवुन, त्यासोबत दि.१९-१२-२०१५ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल श्री.दळवी यांना पाठवावा लागेल. त्याकामी श्री.दळवी यांचे विरूध्द संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायाल, अहमदनगर व मा.दिवाणी न्यायालय सिनिअर डिव्हीजन, कोपरगांव व ज्युनिअर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

सबब, श्री.ज्ञानेश्वर केरू दळवी, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खाते चौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने तसेच श्री.दळवी यांना यापूर्वी अनेकवेळा ताकिद, सक्त ताकीद, ठपका व संस्थान सेवेतून चारदिवस ,दोन दिवस तात्पुरते सेवा निलंबीत केलेले आहे अशा एकुण त्यांना ३० वेळा शिक्षा करणेत आलेल्या आहे. त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेपैकी " ड " प्रमाणे नोटीशी शिवाय बडतर्फ **(डिसमिस)** करणे बाबत निर्णय होणेस विनंती..

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.२२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ज्ञानेश्वर केरु दळवी, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना खातेचौकशी निष्कर्ष अहवालचे प्रतिसह अंतिम कारणे दाखवा नोटीस देवुन, त्यांचा लेखी खुलासा मागविण्यात यावा व त्यानंतर अंतीम निर्णयार्थ प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

विषय नं. २४ **श्री.दिलीप रघुनाथ झिरपे मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचे दि.१५/१२/२०१५ रोजीचे लेखी खुलाशाबाबत.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ मधील गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स भाडेतत्वावर घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेविषयी दि.०९-०४-२०१५ रोजीचे मे.साराप्लास्ट प्रा.लि.पुणे यांचे पत्र/तक्रारीबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे दि.२७-०७-२०१५ रोजी विषय क्र.१० चा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावावरून असे दिसून येते की, वायएलडीए प्रा.लि.पुणे यांचे निविदेतील अटी/शर्तींनुसार निविदेच्या तारखेस Certificate of registration नव्हते, की जी मुळ अट आहे. तसेच स्वतःचे अनुभवाचा दाखला दिलेला नाही व दिलेल्या दाखल्याबाबत समितीचे समाधान होत नाही. याबाबतची छानना तांत्रीक निविदा प्रक्रियेचे वेळेस होणे आवश्यक होते. परंतू संबंधीतांनी या गोष्टी निदर्शनास आणुन दिल्या नाहीत. याकरीता तांत्रीक बाबीची सदोष छाननी केलेबद्दल छाननी करणारे अधिकारी व इतर कर्मचारी यांचेकडून खुलासा मागविणेत यावा असा निर्णय क्र. २२१ झालेला आहे.

म्हणुन सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.झिरपे यांना जा.नं.एसएसएस/वशी-/३१४९/२०१५ दि.१९-११-२०१५ अन्वये पत्र काढुन, त्याचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरून श्री.झिरपे यांनी त्याचा दि.२५-११-२०१५ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला असुन, त्यात त्यांनी, " सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ मधील बांधकाम निविदेच्या तांत्रीक कागदपत्रांची छाननी सदोष असलेबाबत खुलासा करणेविषयी आपले संदर्भीय पत्र क्र.जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३१४९/२०१५ दि.१९-११-२०१५ नुसार मला कळविले आहे. तेव्हा सदरील कामकाज संबधीची कागदपत्रे बांधकाम विभागाकडे आहेत. बांधकाम विभाग व लेखा विभाग ही दोन वेगवेगळी विभाग असल्याने मला खालीलप्रमाणे कागदपत्रे मिळणेविषयी संबंधीत विभागाला आदेश होणेस विनंती आहे.

१. निविदा उघडणे वेळीस हजर असलेल्या अधिका-याची हजेरी पत्रक प्रत
२. निविदेच्या अटी व शर्तींच्या प्रती
३. तांत्रीक लिफाफ्यामध्ये अनिवार्य असलेल्या कागदपत्राच्या अटीची प्रत
४. निविदा, जाहिरात त्यासंबंधी झालेली टिपणीची प्रत
५. निविदा स्वीकृतीसाठी तयार केलेली टिपणी पत्र
६. निविदा उघडतेवेळी असलेल्या कागदपत्राचा तक्ता, पात्र/अपात्र लिस्ट
७. सर्व निविदाधारकांच्या कागदपत्राच्या Scanned copies

सदरील कागदपत्रे मला खुलाशासाठी आवश्यक असल्याने संबंधीतांना ती कागदपत्रे माझेसाठी उपलब्ध करून देणेविषयी आदेश होणेस विनंती आहे. जेणेकरून मला मुदतीच्या आंत खुलासा करता येईल." असे म्हटलेले आहे.

सदरचा लेखी खुलासा श्री.झिरपे यांनी संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत सादर केलेला असुन, त्यावर त्यांनी कुठलाही शेरा नोंदविलेला नाही.

सदर लेखी खुलाशावर मा.कार्यकारी अधिकारी सो.यांनी कागदपत्र देण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

श्री.झिरपे यांनी मागणी केलेली कागदपत्रे देणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३३७०/२०१५ दि.०५-१२-२०१५ रोजी पत्रासोबत त्यांचा लेखी खुलाशाची छायांकीत प्रत पाठविणेत आली व सदरचे पत्र उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना देण्यात आले. श्री.झिरपे यांनी बांधकाम विभागाशी संपर्क साधुन मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती घेण्यात येवुन तात्काळ लेखी खुलासा सादर करावा असे कळविणेत आलेले आहे.

तरी श्री.झिरपे यांनी अद्यापपर्यंत लेखी खुलासा सादर केलेला नाही.

जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३६८/२०१५ दि.०५-०२-२०१६ अन्वये श्री.झिरपे यांना कागदपत्रे देणेत आलेली असुन देखील त्यांनी अद्यापपर्यंत लेखी खुलासा सादर केलेला नाही.

जा.नं.बांधकाम/३६८/२०१५ दि.०५-०२-२०१६ अन्वये श्री.झिरपे यांना कागदपत्रे देण्यात आलेली असुन देखील त्यांनी अद्यापपर्यंत लेखी खुलासा सादर केलेला नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वेतन) विनियम, २०१३ प्रकरण १ सर्वसाधारण कलम २ अन्वये लागु होण्याची व्याप्तीः-जर या विनियमाखाली किंवा इतर प्रकारे वेगळे काही नमुद केले नसेल तर सदर विनियम संस्थानाच्या सेवेत नियुक्त केलेल्या सर्व व्यक्तींना आणि संस्थानच्या विश्वस्तव्यवस्थेच्या कारभाराशी निगडीत सर्व पदांना होतील. मात्र ते राज्य शासनाने प्रतिनियुक्तीवर नियुक्त केलेल्या अधिका-यांना सदर विनियम लागु होणार नाही असे नमुद आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** सबब, श्री.दिलीप रघुनाथ झिरपे, मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांना उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत कोणती एक शिक्षा करावयाची किंवा कसे? याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वेतन) विनियम, २०१३ प्रकरण १ सर्वसाधारण कलम २ अन्वये लागु होण्याची व्याप्तीन्वये शासनाचे संस्थानकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांना शिक्षा करणेची तरतुद नाही. तथापि, श्री.दिलीप रघुनाथ झिरपे हे संस्थानकडे प्रतिनियुक्तीवर असल्यामुळे सदर प्रकरण महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त आणि अपील) नियम १९७९ नुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे पाठविता येईल. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णयास्तव सविनय सादर

**निर्णय क्र.२२५** **सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं. २५** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता छापील स्टेशनरी छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास

चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक**– श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व व्यवसायातील प्रथम वर्ष / व्दितीय वर्ष यामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना थिअरी लिहीणे, जॉब ड्रॉईंग काढणे, प्रात्यक्षिकाचे टिपण लिहीणे, दिवसभरात केलेले दैनंदिन कामे लिहीणेकामी व इतर कामाकरीता आवश्यक असलेली खालील स्टेशनरी छपाई करुन घ्यावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशिल | नग /पॅड | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही ५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ११.७ कि.ग्रॅम ३४ x २१ से.मि., (नमुन्या प्रमाणे) | १२५ नग | ६०/- | ७,५००.०० |
| ०२ | जॉबशिट वही १५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ११.७ कि.ग्रॅम ३४ x २१ से.मि., (नमुन्या प्रमाणे) | १३० नग | १००/- | १३,०००.०० |
| ०३ | २ क्वायर रजिष्टर ३४ x २१ से.मि मॅपलिथो कागद, ८० जीएसएम, ११.७ कि.ग्रॅम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग (नमुन्या प्रमाणे) | १००० नग | ५०/- | ५०,०००.०० |
| ०४ | ड्रॉईंग इंपेरीयल रजिष्टर २५ शिटाचे एक रजिष्टर सन शाईन कागद ५६ x ३६ से.मी. (नमुन्या प्रमाणे) | ४५० नग | ५०/- | २२,५००.०० |
| ०५ | दैनंदिन छापील ७० पेजेस (नमुन्या प्रमाणे) जे.के.बॉण्ड पेपर | ४५० नग | ८० /- | ३६,०००.०० |
| ०६ | डॉईंग शिट हाफ इंपेरीयल साईज २५ नगाचा एक सेट सन शाईन कागद १४० जी.एस.एम. (नमुन्या प्रमाणे) | ६० सेट | ८०/- | ४,८००.०० |
| | | | | १,३३,८००.०० |

सामान्य प्रशासन शाखा आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९६६/ २०१६ , दि.१९ जानेवारी २०१६ अन्वये मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि.१० नोव्हेंबर २०१५ निर्णय क्र. ५१४ नुसार नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत आली आहे.

खरेदी समिती रचना

१. कार्यकारी अधिकारी — अध्यक्ष
२. उपकार्यकारी अधिकारी — सदस्य
३. मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी — सदस्य
४. संबधीत विभाग प्रमुख (अधिक्षक / प्र.अधिक्षक) — सदस्य सचिव

**मागणी**– प्रशिक्षणार्थ्यांची छापील स्टेशनरी छपाई करणेस अंदाजे रक्कम रु. १,३३,८००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील प्रशिक्षणार्थी स्टेशनरी छपाईचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवून मान्यता प्राप्त झालेनंतर समितीमार्फत पुढील कार्यवाही करता येईल.

**अनुमान** – वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– वरीलप्रमाणे छापील स्टेशनरी छपाई करणेस अंदाजे खर्च रक्कम रु. १,३३,८००/- (रुपये एक लाख तेहेतीस हजार आठशे मात्र), ही छपाई खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने छपाईदारांकडून निविदा मागवुन न्यूनतम दरानुसार छपाई करणेस, येणा-या खर्चास व कार्यवाहीस निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती समोर सादर.

निर्णय क्र.२२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता छापील स्टेशनरी छपाई करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,३३,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

विषय नं. २६ **श्री साईबाबा औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने सेफ्टी शुज खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम**- सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगस्ट २०१५ या सत्रामध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच व्दितीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | व्यवसायांचे नांव | युनीट | प्रथम वर्ष व्यवसाय | व्दितीय वर्ष व्यवसाय | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टुल अँण्ड डायमेकर (जिग्ज अँण्ड फिक्चर) | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०२ | इलेक्ट्रशियन (वीजतंत्री) | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०३ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०४ | फिटर (जोडारी) | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०५ | मेकॅनिक रेफ्रीजरेशन अँण्ड एसी | ०२ | २६ | २१ | ४२ |
| ०६ | मशिनिष्ट ग्राईण्डर (यांत्रिकी घर्षक) | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०७ | टर्नर (कातारी) | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०८ | इन्फॉमेंशन अँण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटेनन्स | ०२ | १८ | २१ | ३९ |
| ०९ | कॉम्प्युटर ऑपरेटर अँण्ड प्रोग्रामिग असिस्टंट (कोपा) | ०२ | २० | -- | २० |
| १० | वेल्डर | ०२ | ४२ | -- | ४२ |
| ११ | मेकॅनिक ट्रॅक्टर | ०२ | ४२ | -- | ४२ |
| | | | २६४ | १५८ | ४१७ |

मागील वर्षी पर्यंत प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने नियमीत गणवेष , शुज व केंद्र शासनाच्या चेन्नई येथील नॅशनल इन्स्ट्रक्शन मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) पुस्तकांसाठी तसेच दोन नियमीत गणवेष यासाठी प्रवेशाचे वेळी अनामत रक्कम घेऊन ती लेखाशाखेत अनामत खाती ठेऊन एकत्रित खरेदी प्रक्रीया करुन पुरविण्यात येत असत व त्यांची उर्वरीत रक्कम परत देणे किंवा अधिकची रक्कम लागल्यास त्यांचेकडून जमा घेणेस अशी पध्दती सन २००८ पासून अवलंबलेली जात आहे. सत्र ऑगष्ट २०१५ मध्ये नविन प्रवेशित प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांकडून याकामी रु. ३०००/- जमा घेतलेली आहे. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कार्यक्रमानुसार दररोज पाच तास प्रात्यक्षिक प्रशिक्षणामध्ये असतात, यात कार्यशाळेतील सुरक्षेसाठी चांगला दर्जा असलेले सुरक्षा बुट (सेप्टी शुज) असणे अत्यावश्यक ठरते. गेली 07 वर्षापासून टाटा इंटरनॅशनल या आग्रा स्थित शुज उत्पादक कंपीकडून सेप्टी शुज खरेदी करण्यात आले आहेत. आता ही कंपनी बाची शुज , चेन्नई यांचेव्दारे विक्री व्यवहार करते असे कळविले आहे.

सामान्य प्रशासन शाखा आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९६६/२०१६, दि.१९ जाने.२०१६ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१० नोव्हेंबर २०१५ निर्णय क्र. ५१४ नुसार नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यासाठी खालील प्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत आली आहे.

खरेदी समिती रचना

| | |
|---|---|
| १. कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २. उपकार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३. मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ४. संबधीत विभाग प्रमुख (अधिक्षक / प्र.अधिक्षक) | सदस्य सचिव |

**मागणी**- प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने प्रशिक्षणार्थ्यांना सेप्टी शुज खरेदी करणेस आवश्यक आहे. याबाबत अंदाजे खर्च व तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | तपशिल | संख्या (संच) | आवश्यक संच | अंदाजे दर रु. | अंदाजे एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Safety Shoe<br>Upper Leather :-Buff Saltic Leather<br>Lining :- Cabrilla Lining<br>Eyelets :- Aluminium<br>Collar :- Padded<br>Toe :-ISI Steel Toe<br>Sole :- PU by DIP | २६७ पेअर | २६७ पेअर | ७००/- | १,८६,९००.०० |
| | | | | | १,८६,९००.०० |

वरील नमूद केलेप्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने खरेदी करावयाचे सेप्टी शुज खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. १,८६,९००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवुन मान्यता प्राप्त झालेनंतर समितीमार्फत पुढील कार्यवाही करता येईल.

**अनुमान** – वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत** – वरीलप्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने सेप्टी शुज खरेदी करणेस येणारा खर्च अंदाजे रक्कम रु. १,८६,९००/- व सदर खरेदी ही निविधारकांकडून दरपत्रके मागवुन प्रचलित पध्दतीने न्यूनतम दरानुसार खरेदी करणेस , येणा-या खर्चास व कार्यवाहीस निर्णयासाठी मा. त्रिसदस्य समिती समोर सादर .

---

**विषय नं. २७** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांचे प्रात्यक्षिकासाठी कंझ्युमेबल मटेरीयल (रॉ मटेरीयल) खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील वेल्डर, फिटर, वीजतंत्री, टर्नर, मशिनिष्ट ग्राईण्डर , टुल अॅण्ड डायमेकर या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना दैनंदिन प्रात्यक्षिकासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट ''अ'' अन्वये आवश्यक असलेला कच्चा माल (M.S.Flat, Round Bar, Grinding Material etc.) खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. २,९७,८५०/- (रुपये दोन लाख सत्याण्णव हजार आठशे पन्नास मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

सामान्य प्रशासन शाखा आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९६६/ २०१६ , दि.१९ जानेवारी २०१६ अन्वये मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि.१० नोव्हेंबर २०१५ निर्णय क्र. ५१४ नुसार नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत आली आहे.

<u>खरेदी समिति रचना</u>

| | |
|---|---|
| १. कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २. उपकार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३. मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ४. संबधीत विभाग प्रमुख (अधिक्षक / प्र.अधिक्षक) | सदस्य सचिव |

**मागणी–** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना दैनंदिन प्रात्यक्षिकासाठी आवश्यक असलेले कंझुमेबल मटेरीयल (रॉ मटेरीयल) खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. २,९७,८५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील कंझुमेबल मटेरीयल खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवून मान्यता प्राप्त झालेनंतर समितीमार्फत पुढील कार्यवाही करता येईल. सोबत साहित्याची यादी जोडली आहे.

**अनुमान** – वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सोबत जोडलेल्या परिशिष्ट ''अ'' प्रमाणे कंझुमेबल मटेरीयल (रॉ मटेरीयल) खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. २,९७,८५०/- (रुपये दोन लाख सत्याण्णव हजार आठशे पन्नास मात्र ), ही खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने निविदाधारकांकडून निविदा मागवुन न्यूनतम दरानुसार खरेदी करणेस,खर्चास व कार्यवाहीस निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती समोर सादर.

**निर्णय क्र.२२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त विषय नं. २६ व २७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने सेप्टी शुज व प्रात्यक्षिकासाठी कंझ्युमेबल मटेरीयल (रॉ मटेरीयल) खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. तसेच यासाठी येणा-या एकत्रित रु.४,८४,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं. २८** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता कार्यशाळा गणवेष व स्टाफ नियमीत गणवेष खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत असलेल्या सर्व व्यवसायांचे ऑगस्ट २०१६ चे सत्रात प्रवेश दिल्या जाणा-या प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्येकी एक कार्यशाळा गणवेष, प्राचार्य व निदेशकीय कर्मचारी यांना प्रत्येकी दोन गणवेष खरेदी करणे आवश्यक आहे. कर्मचा-यांना यापुर्वीचे गणवेष २०१३ मध्ये खरेदी करुन वितरीत केले आहेत. त्याचा पुरेसा वापर झाला असल्याने नवीन गणवेष द्यावे लागतील. त्यादृष्टीने खरेदी करावयाच्या गणवेषचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | प्रशिक्षणार्थी/ कर्मचारी संख्या | आवश्यक नग / संच | अंदाजे दर | एकूण खर्च (अंदाजे) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष (डांगरी)<br>**For Boys-**<br>Workshop Overall Set Containig – **Pant** with spendle belt with particular stiching as per sample by using S, Kumar 999,Deluxe clolth of Black Color .<br>**Shirt** half sleeve as per sample by S, Kumar 999-58, colour Code No, 147 Gray, Polyster 67 % Viscose 33 % Three Pocket with embroidery logo, Five thread Machine stiching | २४६ | २४६ संच | ६५०/- | १,५९,९००.०० |
| ०२ | COPA प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष<br>**White Appron** – Cloth S, Kumar 999, Three Pocket with embroldery logo, Five thread Machine stiching | २१ | २१ नग | ३००/- | ६,३००.०० |
| ०३ | **For Staff:-**<br>Full/ Half Shirt -Mafatlal Sky Blue "Executive Class" with Tie.<br>Full Pant- Mafatlal Blue "Powerking" | ३० | ६० संच | ८००/- | ४८०००.०० |
| | | | | | २,१४,२००.०० |

टिप – फक्त एक महिला निदेशिका असल्याने त्यांचे नियमीत गणवेषाची स्वतंत्र टिपणी सादर करता येईल.

सामान्य प्रशासन शाखा आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९६६/ २०१६ , दि.१९ जानेवारी २०१६ अन्वये मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि.१० नोव्हेंबर २०१५ निर्णय क्र. ५१४ नुसार नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत आली आहे.

खरेदी समिति रचना

१. कार्यकारी अधिकारी — अध्यक्ष
२. उपकार्यकारी अधिकारी — सदस्य
३. मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी — सदस्य
४. संबधीत विभाग प्रमुख (अधिक्षक / प्र.अधिक्षक) — सदस्य सचिव

**मागणी–** प्रात्यक्षिकासाठी परिधान करावयाचा कार्यशाळा गणवेष व स्टाफ नियमीत गणवेष खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. २,१४,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील कार्यशाळा गणवेष यांचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवुन मान्यता प्राप्त झाले नंतर समितीमार्फत पुढील कार्यवाही करता येईल.

**अनुमान** – वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्टमत-** तरी वरीलप्रमाणे प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष व स्टाफ नियमीत गणवेश खरेदी करणेस येणारा अंदाजे खर्च रक्कम रु.२,१४,२००/- व सदर खरेदी विभागामार्फत निविदाधारकांकडून दरपत्रके मागवून प्रचलित पध्दतीने न्युनतम दरानुसार खरेदी करणेस, येणा-या खर्चास व कार्यवाहीस निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती समोर सादर.

---

**विषय नं. २९** — **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** — **अधिनियम-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगस्ट २०१५ या सत्रामध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | व्यवसायांचे नांव | युनीट | प्रथम वर्ष व्यवसाय |
|---|---|---|---|
| ०१ | टुल ॲण्ड डायमेकर (जिग्ज ॲण्ड फिक्चर) | ०२ | २१ |
| ०२ | इलेक्ट्रशियन (वीजतंत्री) | ०२ | २१ |
| ०३ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ०२ | २१ |
| ०४ | फिटर (जोडारी) | ०२ | २१ |
| ०५ | मेकॅनिक रेफ्रीजरेशन ॲण्ड एसी | ०२ | २६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | मशिनिष्ट ग्राईण्डर (यांत्रिकी घर्षक) | ०२ | १६ |
| ०७ | टर्नर (तारीका) | ०२ | १६ |
| ०८ | इन्फॉर्मेशन अॅण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटेनन्स | ०२ | १८ |
| ०९ | कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा) | ०२ | २० |
| १० | वेल्डर | ०२ | ४२ |
| ११ | मेकॅनिक ट्रॅक्टर | ०२ | ४२ |
| | | | २६४ |

गेल्या सात वर्षापासून प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने नियमीत गणेवष, शुज व केंद्र शासनाच्या नॅशनल इन्स्ट्रक्शन मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडील NIMI पुस्तकांसाठी प्रवेशाचे वेळी अनामत रक्कम घेऊन ती लेखाशाखेत अनामत खाती ठेऊन एकत्रित खरेदी प्रक्रीया करुन पुरविण्यात येत असत व त्यांची उर्वरीत रक्कम परत देणे किंवा अधिकची रक्कम लागल्यास त्यांचेकडून जमा घेणेस अशी पध्दती मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने अवलंबलेली आहे. तदनुसार ऑगष्ट २०१५ मध्ये नविन प्रवेशित प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांकडून रु. ३०००/- जमा घेतलेली आहे. सदर रक्कम लेखाशाखेत कपडे , पुस्तके व शुज अनामत खाती ठेवण्यात आलेली आहे.

सद्या स्थितीत दरवर्षीप्रमाणे प्रवेशीत प्रशिक्षणार्थी संख्येवर आधारीत प्रत्येकी ०२ नग गणवेष प्रमाणे कपडयांच्या स्टॅंर्डड मापानुसार जसे की, २८'', ३०'', ३२'', ३४'', ३६'', ३८'', ४० '', ४२'', ४४'', ४६'', ४८'' या साईजमध्ये प्रशिक्षणार्थ्यांच्या संख्येप्रमाणे ५२० नग त्यामध्ये १०% वाढीव गणवेष संख्या ठेऊन पुर्णांकींत ५८० गणवेष साईजनुसार प्रमाणात शिऊन घेता येतील. जास्तीचे गणवेष पुढील सत्रातील प्रशिक्षणाचा अर्धा कालावधी संपून गेलेला असल्याने व खरेदी प्रक्रीया करणेसाठी अंदाजे २ महिन्याचा कालावधी लागणार असल्याने प्रत्यक्ष स्थितीनुसार खालीलप्रमाणे दोन पर्यायानुसार गणवेष वितरणाची कार्यवाही करता येईल.

पर्याय क्र १– चालू सत्रात प्रशिक्षणार्थ्यांकरीता नियमीत गणवेष खरेदी करणेस अंदाजे ०२ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. याकरीता एक वर्ष कालावधीचे असलेले व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना ०१ जोडी नियमीत गणवेष व दोन वर्षे कालावधी असलेले प्रशिक्षणार्थ्यांना ०२ जोडी नियमीत गणवेष देता येतील. ही संख्या याप्रमाणे साधारणतः ४१० गणवेष वितरीत होऊन ११० गणवेष भांडार विभागात शिल्लक राहतील , ते पुढील सत्रासाठी वापरता येतील.

पर्याय क्र.२– येणा-या गणवेषामधुन सदरच्या दोन वर्षे कालावधीच्या प्रथम वर्षात असणा-या प्रशिक्षणार्थ्यांना तुर्त प्रत्येकी ०१ गणवेष वितरीत करता येईल. एक वर्ष कालावधीच्या प्रशिक्षणार्थ्यांना संस्थेत गणवेष वापरासाठी कालावधी अल्पसा मिळणार असल्याने त्यांना गणवेष वितरीत न करता त्यांची गणवेषासाठीची अनामत रक्कम परत करता येईल. याप्रमाणे ५२० पैकी १६० गणवेष वितरीत होतील व ३६० गणेवष भांडार विभागात शिल्लक राहतील. खरेदी होणारे गणेवष ०१ ऑगष्ट २०१६ मध्ये सुरु होणा-या सत्रातील ०१ वर्ष कालावधीच्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्येकी ०२ व दोन वर्षे कालावधीच्या पहिल्या वर्षात असणा-या (ऑगस्ट २०१६ मध्ये येणा-या) प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्येकी ०१ गणवेष देता येईल.

याप्रमाणे ऑगष्ट २०१७ मध्येही गणेवष खरेदी व वितरण प्रक्रीया करता येईल.

सामान्य प्रशासन शाखा आदेश जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९६६/ २०१६ , दि.१९ जानेवारी २०१६ अन्वये मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि.१० नोव्हेंबर २०१५ निर्णय क्र. ५१४ नुसार नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत आली आहे.

खरेदी समिती रचना

| | |
|---|---|
| १. कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २. उपकार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३. मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ४. संबधीत विभाग प्रमुख (अधिक्षक / प्र.अधिक्षक) | सदस्य सचिव |

**मागणी-** प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने नियमीत गणवेष खरेदी प्रक्रीया करणे आवश्यक आहे. याबाबत अंदाजे खर्च व तपशिल खालील प्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | संख्या (संच) | आवश्यक संच | अंदाजे दर रु. | अंदाजे एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवष (प्रत्येकी दोन गणेवष) दोन वर्ष कालावधीचे ट्रेड<br>Regular Uniform for Boys-<br>a) Half Shirt – Cloth- S Kumar 2.60 x 2.60 Plain white (Shirting Cloth) with embroidery Logo & with Tie 1350 cm. long .<br>b) Full Pant – S.Kumar<br>999, Deluxe Navy Blue Colour, 2 Side, 1 Back & Watch Pocket by using same cloth of pant. | ५८० सेट | ५८० सेट | ६००/- | ३,४८,०००/- |
| | | | | | ३,४८,०००/- |

वरील नमूद केलेप्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने खरेदी करावयाचे प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष हे खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. ३,४८,०००/- इतका खर्च अपक्षित आहे. सदरील प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवुन मान्यता प्राप्त झालेनंतर समितीमार्फत पुढील कार्यवाही करता येईल.

**अनुमान** – वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– वरीलप्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने खरेदी करावयाचे प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. ३,४८,०००/- व सदर खरेदी ही निविधारकांकडून दरपत्रके मागवुन प्रचलित पध्दतीने न्यूनतम दरानुसार खरेदी करणेस , येणा-या खर्चास व कार्यवाहीस निर्णयासाठी मा. त्रिसदस्य समिती समोर सादर.

**निर्णय क्र.२२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त विषय नं. २८ व २९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता कार्यशाळा गणवेष, व स्टाफ नियमीत गणवेष व प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.५,६२,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं. ३०** **मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे दि.०५/०३/२०१६ रोजी दुकानांसाठी पर्यायी योग्य जागेची पाहणी करणेकामी उपस्थीत राहणेकामी स्थानिक वर्तमान पत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करणेबाबतचे खर्चास कार्योत्तर मंजूरीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली, यांचे कोर्टात, शिर्डी, येथील स.नं. १ मधील दुकानदारांनी एस.एल.पी.नं.२७९८८/२०१०, २८३५८/२०१०, २९६८३-८५/२०१० व त्यामध्ये सिव्हील अपील नं.१४०१६/२०१५, १४०१७/२०१५, ३१५४/२०११, ३१५५ -३१५७ /२०११, ३१५८/२०११ दाखल केले होते, त्यामध्ये, दि.२२/०२/२०१६, रोजी, मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश करुन प्रकरण निकाली काढले आहे.

प्रस्तुत आदेशामध्ये, दुकानदारांना, दुकानांसाठी पर्यायी योग्य जागा / नुकसान भरपाई रक्कम उपलब्ध करुन देणेबाबत, शासनास, संस्थान व इतर संबंधीत विभागांनी, तसेच, अपिलदारांनी सुध्दा सहकार्य करणेचा आणि सदर प्रक्रीयेस विलंब न करणेचा आदेश केलेला आहे, सदरचे आदेशा प्रमाणे जागा उपलब्ध करणेकामी जागेची पहाणी करणे आहे, सदरची पहाणी दि.०५/०३/२०१६, रोजी, करावयाची असल्याने संबंधीत दुकानदारांना नोटीसा देण्यात येत आहेत, परंतू, सदर दुकानदारांपैकी, ज्या कोणास, सदर नोटीस मिळाली नसेल, असे संबंधीत दुकानदार / वारसदार यांचे माहितीसाठी खालील जाहिरात मसुदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याचे मान्यतेसाठी दि. ०१/०३/२०१६ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती, त्यास मान्यता मिळालेली आहे.

<u>जाहिर नोटीस</u>

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली, यांचे कोर्टात शिर्डी येथील स.नं. १ मधील दुकानदारांनी एस.एल.पी.नं. २७९८८/२०१०, २८३५८/२०१०, २९६८३-८५/२०१० व त्यामध्ये सिव्हील अपील नं.१४०१६/२०१५, १४०१७/२०१५, ३१५४/२०११, ३१५५ -३१५७ /२०११, ३१५८/२०११ दाखल केले होते. त्यामध्ये दि.२२/०२/२०१६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश करुन प्रकरण निकाली काढले आहे.

प्रस्तुत आदेशामध्ये, दुकानदारांना, दुकानांसाठी पर्यायी योग्य जागा /नुकसान भरपाई रक्कम उपलब्ध करुन देणेबाबत, शासनास, संस्थान व इतर संबंधीत विभागांनी, तसेच, अपिलदारांनी सुध्दा सहकार्य करणेचा आणि सदर प्रक्रीयेस विलंब न करता कार्यवाही आदेशाच्या तारखेपासून ६ आठवड्यात पुर्ण करण्याचा आदेश केलेला आहे, सदरचे आदेशा प्रमाणे उपलब्ध जागेची पहाणी करणे आहे, सदरची पहाणी दि.०५/०३/२०१६, रोजी, सकाळी १०.०० वा. करावयाची आहे, करीता आपण स्वतः/ समक्ष जागा पहाणी करणेकामी नगरपंचायत, शिर्डी, यांचे सभागृहात उपस्थीत रहावे, हि विनंती.

| | |
|---|---|
| (बाजीराव शिंदे) | (कुंदन सोनवणे) |
| कार्यकारी अधिकारी, | उपविभागीय अधिकारी, |
| श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी. | उपविभागीय कार्यालय शिर्डी, भाग शिर्डी. |

सदरची जाहिरात प्रसिध्द करणेसाठी जनसंपर्क कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. त्यांनी सदरची जाहिर नोटीस दि. ०४/०३/२०१६ रोजीचे दै. सार्वमत किंवा दै. पुढारी अहमदनगर वृत्तपत्रात प्रसिध्द होईल असे सांगीतले आहे. तसेच सदर जाहिर नोटीसचे बील अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक असल्याचे सांगीतले आहे. प्रस्तुतची जाहिर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेस व येणारे बील अदा करणेस कार्यात्तर मंजूरीसाठी सादर.

**निर्णय क्र.२२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं. ३१** **साठा संपत आलेल्या संस्थान निर्मीत सीडी व डीव्हीडीचे पुननिर्मीती विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय क्र. ७१ नुसार निर्णय क्र.७१ सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि. मुंबई यांचेकडील सी.डी/व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती/अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णयानुसार सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरिंग इंडिया लि. प्रा.लि., मुंबई यांचेकडून दरपत्रकाची मागणी करुन त्यांचे दरपत्रक मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करण्यात येऊन सी.डींची निर्मिती करण्यात आली आहे.

संस्थानमार्फत ई निविदा पध्दत सुरु करण्यात आली आसल्याने संस्थानला अनेक प्रकारचे नवीन निर्मिती धारक सोनी कंपनीपेक्षा कमी दरात सीडींची निर्मिती चांगल्या प्रकारे देवू शकतात त्यामुळे सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि. मुंबई यांचेकडून सीडीची निर्मिती करुन घेण्यापेक्षा ई निविदा मागवाव्यात असे वाटते.

**ठराव – नवीन**

सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची निर्मिती केली जाते. जाहिरात प्रसिध्द करणे, ई – निविदा मागविणे, प्राप्त ई – निविदा उघडणे याबाबतची कार्यवाही मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार करण्यात येते.

पुनरनिर्मिती करावयाच्या सीडी/ डीव्हीडीचा प्रस्तावित तपशिल खालील प्रमाणे..

| अं.नं. | तपशिल | सध्याचा शिल्लक साठा | नवीन निर्मिती संख्या | मागिल मंजूर दर सर्व करांसह | अंदाजे निर्मिती दर सर्व करांसह | एकूण रक्कम | संस्थान विक्री किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुपाठाचे अभंग ऑडीओ सी.डी. (दोन सी.डी.चा संच) | ० | ३००० | ३८.०५ | ४०.०० | १२००००.०० | ५०.०० |
| ०२ | श्री साई सतचरित तेलगू एमपी-३ (२ सी.डी.चा संच) | १००० | ५१०० | ६२.७० | ६५.०० | ३३१५००.०० | ८०.०० |
| ०३ | श्री साई मंदिरातील आरती एमपी३ (१ सीडी) | ० | ५००० | १९.३२ | २५.०० | १२५०००.०० | ३०.०० |
| ०४ | श्री साईबाबांची आरती डीव्हीडी (१ सीडी) | ३००० | ४५०० | ४८.०८ | ५५.०० | २२००००.०० | १००.०० |
| ०५ | श्री साई चरित्र तामिळ ऑडीओ एमपीथ्री (एक नगाची सीडी) | ० | ४००० | ३८.०५ | ४५.०० | २०२५००.०० | ५०.०० |
| | एकूण संख्या | | २१६०० | | एकूण रु. | ९९९०००.०० | |

प्रस्तावित छपाईकामी विहित पध्दतीने वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निम्नतम दराने निर्मितीचा कार्यादेश देणेत येईल. याकामी अंदाजे रु. ९,९९,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर, विहीत पध्दतीने ई- निविदा मागवून निर्मितीची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१५-१६ चे अंदाजपत्राकात सीडी निर्मितीसाठी शिल्लक असलेल्या रु. १४,८१,७९१/- (अक्षरी रुपये.चौदा लाख, एक्याऐंशी हजार, सातशे एक्यान्नव) चे अंदाज पत्रकातील तरतुदीमधून उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल. सदर सीडीची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई विक्रीतून होत असते.

सबब प्रस्तावित सीडी निर्मितीकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु. ९,९९,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्यान्नव हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

३) विहीत पध्दतीने ई – निविदा मागवून सीडी निर्मितीची कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थान निर्मीत सर्व सीडी व डीव्हीडी यांची वार्षिक पुननिर्मीती करणेत यावी. त्यासाठी येणा-या अपेक्षीत खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं. ३२** **दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी /दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार– प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावना**:- श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी तसेच श्री साई दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

प्रस्ताविक:- सन २०१६ चे श्री साई दिनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी मा. त्रिसदस्यीय समिती व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेनुसार वृत्तपत्रात जाहिरात देवून ई निविदा मागवून, पात्र निविदाधारकांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून न्युनतम दरधारकांकडून छपाई करुन घेणेबाबत ठरल्यानुसार छपाई करण्यात आली होती. दि.१२.०३.२१६ अखेर शिल्लक साठयाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मंजूर दर | विक्री दर | आदेशीत संख्या | जमा संख्या | ३१ डिसेंबर २०१५ ते मार्च अखेर पर्यंत विक्री संख्या | शिल्लक साठा दि.१२.०३.२०१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१६ | ६६.१५ | ७५/- | १,१०,००० | १,१०,००० | १,०२,५६३ | ७४३७ |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१५ चे ०१ पानी मोठे (१९"x२९") | १५.९० | २०/- | १,७०,००० | १,७०,००० | १,५४,७६९ | १५२३१ |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"x३५" | २३४.०० | २५०/- | १२५०० | १२५०० | ११९०० | ६०० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"x२७.२५" | २९३.०० | ३००/- | ५५०० | ५५०० | ५४६८ | ३२ |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"x२७" | २७३.७० | ३००/- | १५०० | १५०० | १४८५ | १५ |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"x०७" | २३८.०५ | २५०/- | ५५०० | ५५०० | ५४६२ | ३८ |

उपरोक्त तक्त्यातील दैनंदिनी व दिनदर्शिक व डिलक्स दिनदर्शिकांचा छपाई कामाचा कार्यादेश माहे २० डिसेंबर २०१५ रोजी देण्यात आला होता व दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका दि. ३१ डिसेंबर २०१५ पासून विक्रीसाठी उपलब्ध झाल्या. भक्तांचा जानेवारी व फेब्रुवारी माहिन्यात विक्रीचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद लक्षात घेता, सन २०१७ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल (सन २०१७) | प्रस्तावति छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | आदेशीत संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी | ३,००,००० | ७०/- | २१०००,०००.०० |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१५ चे ०१ पानी मोठे (१९"x२९") | ५,००,००० | २५/- | १२५०००००.०० |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"x३५" | २५,००० | ३००/- | ७५०००००.०० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"x२७.२५" | १०,००० | ३००/- | ३००००००.०० |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"x२७" | ३,००० | ३००/- | ९०००००.०० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"x०७" | १५,००० | २५०/- | ३७५००००.०० |
| | | | एकूण रुपये. | ४,८६,५०,०००.०० |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट**:- उपरोक्त तक्त्यातील प्रस्तावित श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिक सन २०१७ ह्या सप्टेंबर-ऑक्टोंबर माहिन्यात छपाई होऊनउपलब्ध झाल्यास सदरचा स्टॉक हा जानेवारी अखेर विक्री होईल परंतु छपाईकामी उशीरा मान्यता मिळाल्यास उपरोक्त तक्त्यातील संख्या काही प्रमाणात कमी करुन छपाई आदेश देण्यात येईल. श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सन २०१७ पासून चालू होत आहे. त्यामुळे दैनंदिनी व दिनदर्शिकेत महासमाधी शताब्दीचे महोत्सवचे नियोजीत कार्यक्रमांचा उल्लेख करता येईल व दैनंदिनी/ दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका माहे ऑक्टोबर २०१६ पासून उपलब्ध झालेस त्याचा खप जास्त प्रमाणात होऊन श्री साईबाबा महासमाधी शताब्दीचा प्रचार प्रसार होणेस मदत होईल.

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाधारकांना निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेत येतील. याकामी अंदाजे रु. ४,८६,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर, मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु. ८,००,००,०००/- चे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल. सदर दैनंदिनी व दिनदर्शिकांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब प्रस्तावित दैनंदिनी / दिनदर्शिकांची २०१७ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु. ४,८६,५०,०००/- खर्चास मान्यता असावी.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.
३) जनसंपर्क कार्यालयव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.
४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१७ ची श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.४,८६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु त्यापुर्वी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं. ३३** **लाडू प्रसादाकरीता आयडिया सेल्युलर लि. यांचेकडून देणगी दाखल प्राप्त प्रिंटेड प्लॅस्टीक पिशव्या नष्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संदर्भीय निर्णयानुसार आयडिया सेल्युलर कंपनीचे प्रस्तावामध्ये मागणी केलेल्या ८ मागण्या मान्य न करता फक्त मोतीचूर लाडू पॅकींग प्लॅस्टीक पिशवी व कॅरी बॅगवर आयडीया कंपनीचा लोगो प्रिंट करुन प्लॅस्टीक पिशवी व कॅरी बॅग पुरविणेस तयार असल्यास त्यांचेकडून एक वर्षाकरीता लागणारी लाडू पॅकींग पिशवी व कॅरी बॅग विनामुल्य घेणेत यावी, असे ठरले होते.

त्यानुसार प्रसादालय विभागाचे पत्र जा.नं.एसएसएस/वशी-प्रसाद/५७५६/२००९ दि.०१.०५.२००९ अन्वये वरिष्ठ व्यवस्थापक, आयडीया सेल्युलर लि.तिसरा माळा,शारदा सेंटर, एरंडवना,पुणे-४११ ००४, यांना प्लॅस्टीक पिशवी, कॅरीबॅग मोफत पुरवठा करणेबाबत पत्र देण्यात आले होते. सदर पत्रानुसार आयडीया सेल्युलर लि. पुणे यांचेतर्फे असित सिंग यांनी दि.२६.०६.२०१० रोजी ई-मेल व्दारे देणगी प्रसाद लाडू पिशव्यांचा पहिला टप्पा १५,००,००० नग पिशव्या ऑगस्ट महिन्याचे तिस-या आठवडयात पाठवित असलेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे आयडीया सेल्युलर लि. चा लोगो असलेल्या श्री साईबाबा संस्थान प्रसाद लाडू, या नावाच्या ३,००,००० नग पिशव्या १५ गोण्यांमधून चलन नं.६२२ अन्वये दि.२४.०८.२०१० रोजी प्राप्त झाल्या.

दि.२४.०८.२०१० रोजी तत्कालीन अध्यक्ष महोदय यांनी आयडीया सेल्युलर लि. यांना संस्थानने नमुन्या दाखल दिलेल्या व प्रत्यक्ष प्रिंट होवून आलेल्या पिशव्यांची समक्ष पहाणी केली असता, प्राप्त पिशव्या व नमुना यांत तफावत आढळून आल्यामुळे त्या वापरण्यास अडचणीचे असल्याने पुरवठादार कंपनीस सध्या पुढील पिशव्या प्रिंट करु नये असे कळविणेस सांगून यापुर्वी आयडीया कंपनीकडून देणगी आलेल्या ३ लाख नग लाडू प्रसाद पिशव्यांचा अन्यत्र वापरन करणेचे निर्देश देवून त्या कंपनीस परत करणेचे सांगितले.

त्यानंतर आयडीया सेल्युलर लि. अहमदनगर, यांनी दि.२४.०५.२०१२ चे पत्रानुसार ऑगस्ट -२०१० मध्ये लाडू प्रसाद पिशव्या आपणांस वापरण्यासाठी दिलेल्या आहेत. आपण काही कारणास्तव त्या बॅग वापरलेल्या नाहीत. तरी त्या बॅग आमचे प्रतिनिधी श्री अरिफ सययद, अहमदनगर,यांना देण्यात याव्यात,सदर पिशव्यांचा इतर कोणत्याही ठिकाणी वापर केला जाणार नाही,असे लेखी कळविले आहे.

दि.२४.०५.२०१२ रोजीचे आयडीया सेल्युलर कंपनीचे पत्रानुसार त्यांचे अहमदनगर येथील मार्केटींग को-ऑर्डीनेटर श्री अरिफ सययद यांचेशी त्यांचे मो.नं.८८०५०५९९९५ वर अनेकवेळा संस्थान दुरध्वनीवरुन संपर्क केला होता. त्यावेळी त्यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही.

सदरच्या १५ गोण्यातील ३,००,००० नग पिशव्या आयडीया कंपनीने परत न नेल्याने भांडार विभागात साठा रजिस्टरला न नोंदविता तशाच पडून आहेत. लेखापरिक्षणाच्या वेळी याबाबत विचारणा होवून त्या येथून अन्यत्र हलविणेबाबत अथवा नष्ट करणेबाबत सुचना दिलेली आहे.

याबाबत दि.०६.११.२०१५ व दि.२७.११.२०१५ रोजी टिपणी सादर करुन आयडीया कंपनीस कळविणेत आले होते. सदर प्रकरणाची दखल घेत त्यांनी सदरील पिशव्या सुमारे ५ ते ६ वर्षांपासून पडून असल्याने त्या वापरण्या योग्य राहिल्या नसाव्यात म्हणून या पिशव्या पर्यावरणाला बाधा न होईल अशा पध्दतीने संस्थान नष्ट करु शकते, असे कळविलेले आहे.

आयडीया सेल्युलर लि. यांचे संदर्भीय पत्राप्रमाणे त्यांचे कंपनीचा लोगो असलेल्या श्री साईबाबा संस्थान प्रसाद लाडू, या नावाच्या ३,००,००० नग पिशव्या या विभागातुन नाहीशा करणेसाठी अभिलेख कक्षामार्फत संस्थान नियमानुसार प्लॅस्टीक खरेदी करणारे मंजुर उच्चतम दरधारक यांचेशी संपर्क केला असता सदर दरधारक या पिशव्या मंजुर उच्चतम दराने विकत घेणेस तयार असल्याचे अभिलेख कक्ष प्रमुख यांनी सांगितले आहे.

तरी इकडील साठा रजिस्टरला नोंद नसलेल्या उपरोक्त पिशव्या फाडुन त्यांचा इतरत्र वापर न करण्याचे अटीवर अभिलेख कक्षामार्फत संस्थानचे मंजुर उच्चतम दरधारक यांना विक्री करुन प्राप्त रक्कम लेखाशाखेत जमा करता येईल. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे त्रिसदस्य समिती पुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसादाकरीता आयडिया सेल्युलर लि. यांचेकडून देणगी दाखल प्राप्त प्रिंटेड प्लॅस्टीक पिशव्या मशिनद्वारे श्रेडींग करुन अभिलेख कक्षामार्फत संस्थानचे मंजुर उच्चतम दरधारक यांना विक्री करण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं. ३४** **सन २०१३-२०१४ चा भांडार विभागाकडील लेखापरिक्षण अहवाल व त्यातील गायब माल अनुत्तरीत.**

**प्रस्ताव-** श्री संजय भास्करराव काळे यांचे संदर्भीय पत्रामधील मजकुर/मुद्दे पुढीलप्रमाणे.

**सदरचे पत्रातील मुददे खालीलप्रमाणे**

अ) श्री साईबाबा संस्थानचे मुख्य लेखाधिकारी यांनी भांडार विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षण सन २०१३-१४ हया वर्षासाठी केले. त्यांनी दि.३०.०३.२०१४ रोजी भांडार विभागातील माल तपासला त्यात किराणा मालात बरीच तफावत आढळली त्यातील काही तफावत खालीलप्रमाणे-

| मालाचे नांव | प्रत्यक्ष माल (किलो) | रजिस्टर (किलो) | तफावत (किलो) |
|---|---|---|---|
| रवा | १६८२ | ६९५० | ५२६८ |
| मोहरी | ५१७ | ४६० | ५७ |
| चिंच | ५० | ०० | ५० |
| आमसुल | ३३० | ३६० | ३० |
| लवंग | ८२५ | ८७५ | ५० |
| गावरान तुप | ७०७४५ | ८२४४० | ११६९५ |

वरीलप्रमाणे महागडया मालाची मोठया प्रमाणात तफावत दिसत आहे. सदरचा आपला अहवाल सादर केला त्यात त्यांनी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले.

१) मालाची आवक ४९.८०० किलो किंवा ४९.६०० इ.प्रमाणे आलेली असते. प्रसादालयात माल देतेवेळी भांडार विभागातुन ५० किलो प्रमाणानुसार देण्यात येतो व शेवटी शिल्लक मालाचे वजन घेवून तो प्रसादालयात देण्यात येतो. त्यामुळे प्रत्यक्ष मालाची शिल्लक व रजिस्टरला असलेल्या मालाची शिल्लक यामध्ये तफावत दिसुन येते.

प्रसादालयात देखील देणगी माल स्विकारला जातो. स्विकारलेल्या मालाची देणगी पावती भांडार विभागातुन देण्यात येती व त्या मालाची नोंद प्रसादालय मागणी पत्रकात घेतलेली असते. व त्या मागणीपत्रकानुसार भांडार विभागाकडे माल खर्ची पडतो. भांडार विभागाकडील रजिस्टरला देणगी मालाची वजावट त्याच तारखेस होती परंतु भांडार विभागात प्रत्यक्ष स्वरुपात असलेला माल हे त्याच स्वरुपात असतो त्यामुळे रजिस्टर मधील शिल्लक व प्रत्यक्ष माल हयामध्ये फरक दिसुन येतो. महिना अखेर एकूण देणगी मालाची भांडार विभागाकडून लेखाशाखेमध्ये देणगी पावती करण्यात येते. देणगी माल भांडार विभागाच्या

**संदर्भीय पत्रांतील मुददयांबाबत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे**

अ) संस्थानचे नेमलेले अंतर्गत लेखापरिक्षक मे. सुरेश डी.डौले ॲन्ड कंपनी, राहुरी, यांनी दि.०१.१०.२०१३ ते ३१.०३.२०१४ या कालावधीत केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षणाचा अहवाल संस्थानला दि.१७.०४.२०१४ रोजी सादर केला आहे. या अहवालामध्ये मुख्यत्वे बहुतेक विभागांचा दि.३१.०३.२०१४ चा शिल्लक प्रत्यक्ष माल व त्यावेळी साठा रजिस्टर मध्ये नोंदविलेला माल यांची पाहणी केली असता त्यांनी काही मालामध्ये तफावती आढळून आल्याचे नमुद केले आहे.

प्रत्यक्षात दि.३१.०३.२०१४ ही वर्षाअखेरीची तारीख असल्याने या काळात ब-याचशा नोंदी साठा रजिस्टरमध्ये घेण्यासाठी वेळ लागणार होता तसेच भांडार विभागाचे प्रत्यक्ष माल साठयाची दोन ठिकाणे असल्याने व या दोन्ही ठिकाणचा माल एकत्र मोजुन त्याची तपासणी मुख्य साठा रजिस्टरला पाहुन त्याची खात्री करुन नंतरच तफावतीचा रिपोर्ट मा.अंतर्गत लेखापरिक्षकांनी सादर करणे अपेक्षित होते परंतु अंतर्गत लेखापरिक्षकांनी सदर तपासणी करता पाठविणेत आलेले कर्मचारी यांनी याबाबत कोणतीही शहानिशा न करता भांडार विभागातील वर्ग-०४ कर्मचा-यांना सोबत घेवून मालाची प्रत्यक्ष मोजणी व नोंदी न तपासता तसेच तफावत आढळून आली असेल तर त्याच वेळेस उर्वरीत साठा कोणत्या गोडावूनमध्ये आहे याची विचारणा न करता किंवा प्रत्यक्ष मोजणी अहवालावर भांडार विभागाच्या कर्मचा-यांच्या समक्ष मालाची मोजणी केल्याबाबत स्वाक्ष-या न घेता अथवा मालाचा साठा व रजिस्टर नोंद ही बरोबर आहे किंवा नाही याबाबत खात्री करुन न घेता परस्पर अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सादर करण्यात आल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वास्तवात रजिस्टरची शिल्लक व ऑडिट रिपोर्ट यांमध्ये तफावत असल्याचे दिसते.

वास्तविक पहाता अंतर्गत लेखापरिक्षकांनी दि.३१.०३.२०१४ रोजीचे अंतर्गत लेखापरिक्षण अहवालात असे नमुद केले आहे की, साठा रजिस्टरमध्ये सन २०१३-१४ मध्ये आलेला माल नोंदविला नाही व मागणीपत्रकाप्रमाणे खर्चीही टाकले नसल्याने स्टॉक व प्रत्यक्ष मोजणीत फरक दिसतो, याचाच अर्थ असा की, मा.लेखापरिक्षक यांनी दि.३१.०३.२०१४रोजी केलेल्या मालाच्या प्रत्यक्ष तपासणीच्या वेळेस रजिस्टरवरील आकडयाच्या नोंदी अपुर्ण होत्या त्यामुळे लेखापरिक्षकांनी नमुद केलेल्या मालाच्या तफावती आढळून आलेल्या आहेत. थोडक्यात नोंदी अपुर्ण होत्या हे त्यांनी मान्य केलेले आहे.

भांडार विभागाच्या अधिक्षकांनी त्यांच्या कर्मचा-यांसोबत सर्व मालाची आज अखेर मोजणी केली असता कोणत्याही मालामध्ये तफावत आढळून आलेली नाही. खरेदी करण्यात

| | |
|---|---|
| आवक रजिस्टरला घेवून स्टॉक रजिस्टरला त्याची नोंद प्रत्येक महिन्याचे ३० तारखेला घेण्यात येते तदनंतर स्टॉक पुर्ण होतो.<br><br>मार्च २०१४ हया महिन्यात तुपाची देणगी प्राप्त नाही तसेच तुप हे डब्यात येते १५ कि. प्रमाणे त्यामुळे ते सुटटे दिले जात नाही. लेखा विभागाने वरील मालाच्या जादा असलेल्या तफावतीच्या संदर्भात कुठलेही स्पष्टीकरण दिलेले नाही.<br><br>वरीलप्रमाणे लेखाधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे साठयात मोठी तफावत असतांना, उत्तरात पुर्तता अहवालात त्यानी वरील प्रमाणे हा मोठा साठा कुठे होता हे दाखवण्यास असमर्थ ठरले असतांना अंतर्गत लेखापरिक्षकाने आपली कुठलीही कारवाई केलेली नाही.<br><br>संस्थानचे भांडारात ५२६८ कि. म्हणजे पाच टन रवा गायब, ११६९५ कि. गावरान तुप गायब, ५० कि. लवंग गायब, ५७ कि. मोहरी, ३० कि.आमसुल म्हणजे सर्व महागडे मालाचे प्रकारातच साठयात तफावत.<br><br>सदरच्या मालाची किंमत तीस ते चाळीस लाखाची आहे परंतु आपले प्रशासन सदरच्या प्रकरणात हलगर्जी करीत आहे, केलेली आहे सदर प्रकरणात चौकशी कारवाई झालेली नाही. | आलेल्या अथवा देणगी घेतलेल्या सर्व मालाच्या साठा नोंद रजिस्टरला काटेकोरपणे नोंदी घेतल्याचे व त्याप्रमाणे प्रत्यक्ष माल असल्याची खात्री झालेली आहे. याचाच अर्थ सदर पत्रामध्ये वर्णन केलेल्या तफावती हया अंतर्गत लेखापरिक्षकांनी आपल्या अंतर्गत बाबींसाठी दिलेल्या अहवालातील चुकीच्या नोंदीमुळे व अपुर्ण अहवाल सादर झाल्याने हा गैरसमज झाल्याचे दिसुन येत आहे. अंतर्गत लेखापरिक्षकांनी त्यांचा प्रथम दर्शनि दिलेला अहवाल हा साठा रजिस्टरमधील नोंदी पुर्ण झाल्यानंतर पुनर्तपासणी करुन अंतीम अहवाल सादर करणे आवश्यक होते तो अंतीम त्रुटी पुर्तता अहवाल संस्थानला वेळेत सादर न झाल्याने हा गैरसमज झालेला आहे.<br>संस्थानचे अंतीम लेखापरिक्षण हे शासनाने नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकामार्फत केले जाते, त्यांचा अहवाल हा महाराष्ट्र शासनामार्फत विधान सभेमध्ये सादर केला जातो. वैधानिक लेखापरिक्षकांनी संस्थानचे सन २०१३-१४ चे लेखापरिक्षण सप्टेंबर २०१४ मध्ये पुर्ण करुन त्यांचा अहवाल शासनास पाठविला आहे. त्यांच्या अहवालात अशा तफावती बाबतचा कोणताही उल्लेख नाही. वैधानिक लेखापरिक्षकांनीही त्यावेळी माल साठयाची प्रत्यक्ष मोजणी केलेली आहे. त्यांना त्यात अक्षेपार्ह त्रुटी आढळलेल्या नाहीत. तसेच या चुकीच्या आकडेवारीची शहानिशा तत्कालीन लिपीक यांनी पाहून खात्री करणे गरजेचे होते, ते केले गेलेचे आढळून येत नाही.<br>यापुर्वी सदरची टिपणी मान्यतेस्तव सादर केली असता, त्यावर मा. उप कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे शेरे मारले आहेत.<br>अंतर्गत लेखापरिक्षण विभाग यांनी केलेले लेखापरिक्षण व अहवालात नमुद किराणा मालाची साठा रजिस्टरमधील आकडेवारी व प्रत्यक्ष साठा रजिस्टरमधील आकडेवारी यामध्ये तफावत दिसुन येते. याबाबत संबंधीत लेखाशाखेचा खुलासा मागवुन पुढील उचित कार्यवाही करता येईल. सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेस मान्यता असावी. |
| **आ)** सन २०१० मध्ये संस्थानने संपूर्ण संगणकीकरणासाठी २२ कोटी रुपयांचा खर्च केल्यानंतर देखील २०१३, २०१४, २०१५ मध्ये भांडार विभाग संगणकी करणाचे रजिस्टर ठेवत नाहीत, त्यामुळे सदरच्या प्रकरणात असलेल्या अफरातफरीची, भ्रष्टाचाराची, गायब साठयाची त्वरीत चौकशी व्हावी. | आ) ERP सिस्टीम पूर्णपणे कार्यान्वित नसल्याने भांडार विभागातील सर्व स्टॉकच्या दि.०१.०४.२०१३ ते दि.३१.०३.२०१४ या आर्थिक वर्षातील संपूर्ण रेकॉर्ड फॉक्सप्रो प्रणालीत संगणकात पुर्णपणे फिड केलेले असुन त्यातील प्रत्येक वस्तु/ मालाची आकडेवारी व रजिस्टरमधील आकडेवारी जुळलेली आहे. तथापि, अर्जदाराने ठराविक मालाच्या वर्षभराच्या नोंदी मागितल्यामुळे भांडार विभागाकडील संपुर्ण साठयाचा संगणकीय डाटा एकत्र असल्याने फक्त त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या मालाच्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती त्यांना देण्यात आलेल्या आहेत.<br>**अभिप्राय-** याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागास पत्र देवून तातडीने प्रणाली पुर्णपणे कार्यान्वित करणेबाबत कळविता येईल. |
| **इ)** मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकिय अधिकारी व अधिक्षक भांडार विभाग यांनी दि.०६.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये ४,७७० किलो रवा व २,००० किलो आटा खराब झाल्याने श्री साईशाम गोशाळा ट्रस्ट शिर्डी-साकुरी शिव, शिर्डी यांना विनामुल्य दिला.<br>सदरचा साठा देण्यापुर्वी खाण्यासाठी योग्य नाही असा अहवाल अन्न व औषध प्रशासनाकडून न मिळवता, त्रिसदस्य समितीची परवानगी न घेता परस्पर विल्हेवाट लावली. वरील हिशोब पहाता, | **इ)** बॅबिनो अग्रो इंडस्ट्रिज लि., गुरगाव (हरियाणा) यांनी सालाबादप्रमाणे या वर्षीही शेवई, आटा, रवा व मैदा देणगी दाखल ट्रकव्दारे दि.१६.०३.२०१५ रोजी संस्थानचे भांडार विभागामध्ये पाठविली होती. त्यावेळी देणगी घ्यावी अथवा बंद करावी या बाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय ठेवणेत आला होता व काही दिवस देणगी वस्तू (खाद्य स्वरुपातील) घेणे बंद केले होते.<br>उपरोक्त बाबींवर सभेपुढे देणगी वस्तु घेणेबाबत चर्चा होऊन दि.१२.०३.२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे |

| | |
|---|---|
| लेखापरिक्षकाचा अहवाल पहाता, पुर्तता अहवाल पहाता सदरचा हरवलेला, गायब झालेला रवा जिरवण्यासाठी प्रशासनाने गोशाळेला दिल्याचे नाटक दाखवले.<br><br>वरील तफावतीच्या प्रकरणासोबतच बेकायदा संस्थान मालाची विल्हेवाट लावण्याची चौकशी व्हावी, संबंधीतांकडून त्याचा वसुल व्हावा, फोजदारी गुन्हा दाखल व्हावा, सदरची कारवाई युध्द पातळीवर व्हावी. | सभेतील निर्णय क्र.९२ नुसार देणगी स्विकारणे सुरु झाले आहे. या निर्णयाप्रमाणे दि.१६.०३.२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पावती नंबर ७२४ दि.०४.०४.२०१५ रोजी शेवई, मैदा, गहू आटा व रवा इत्यादीची रु. ५,१९,९८०/- (अक्षरी रु. पाच लाख एकोणावीस हजार नऊशे ऐंशी मात्र) ची देणगी पावती बनवुन माल ताब्यात घेण्यात आला.<br>उपरोक्त माल स्विकृतीस रितसर मान्यता येईपर्यंत तो भांडार विभागात तसाच पडून राहिला. यापैकी शेवई व रवा या दोन मालासाठी लागणारे तुप, साखर व तेल हे प्रसादालय बजेटपेक्षा अधिक लागणार असल्याचे तोंडी सांगुन तत्कालीन प्रसादालय अधिक्षक यांनी उपरोक्त मालासाठी भांडार विभागाने स्वतंत्र मंजुरी घेवून (साखर, तेल, तुप) पुरवठा केल्यानंतर उपरोक्त माल वापरण्यासाठी घेतला जाईल, असे तोंडी सांगून तो माल घेणेचे टाळले. तसेच नेलेला रवा व आटा पुन्हा (गेट पास नं ७०७, दि.१५.०४.२०१५ व गेट पास नं.७३९ दि.१९.४.२०१५ अन्वये) खराब असल्याचे तोंडी कारण सांगुन परत पाठविणेत आला.<br>दि.२८.०४.२०१५ रोजी श्रमपरीहार भोजनाचे वेळी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी तत्कालीन अधिक्षक, प्रसादालय यांना सदर देणगी माल लवकर वापरणेबाबत सांगितले असता त्यांनी, एक-दोन दिवस मोकळया हवेत ठेवून मग पाठवा असे सांगितले होते. त्याप्रमाणे उपरोक्त रवा व आटा गोण्या भांडार विभागात खाली ओतुन पंख्याचे हवेने सुकविण्यात आल्या, त्यातील एक-एक गोणी रवा, आटा दि.३०.०४.२०१५ रोजी प्रसादालयात नेवून न वापरताच परत पाठविल्या. त्यानंतर काही दिवसांनी त्याचा रंग काळा पडू लागल्याने तो माल तत्कालीन कार्यकारी अधिकारी व प्रशासकिय अधिकारी (भांडार विभाग) यांना समक्ष दाखविला.<br>प्रसादालय अधिक्षक यांनी साखर, तेल व तुप स्वतंत्रपणे खरेदी करुन देणेची मागणी केल्याची घटना तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास इकडील दि.०२.०५.२०१५ रोजीचे टिपणीव्दारे आणून दिली. सदरचे टिपणीवर मा. महोदयांनी देणगीदाराचे सहमतीने कार्यवाही करणेबाबतचे निर्देश दिले. मा. महोदयांचे निर्देशाप्रमाणे देणगीदार कंपनीशी दि. १३.०५.२०१५ रोजी संपर्क केला असता, कंपनीचे क्वालिटी कंट्रोल मॅनेजर श्री सारस्वत साहेब यांनी यावर्षी पाऊस बेमोसमी व कमी झाल्याने माल अशाप्रकारे खराब होऊ शकतो असे सांगून, सदर माल हरयाणात परत नेणे खर्चिक व बिना उपयोगी आहे, असे सांगीतले उलट त्यामुळे इतर मालास बाधा पोहचू नये याकरीता जवळचे कोणत्याही गोशाळेस उपरोक्त खराब माल दान करणेचे फॅक्स द्वारे संस्थानला कळविले होते.<br><br>त्यानंतर दि.२०.०५.२०१५ रोजी विधी विभागाचा लेखी अभिप्राय घेवुन रवा ४,७७० किलो (रक्कम रु. १,००,०२६.९०) व गहू आटा २,००० किलो (रक्कम रु. ४०,२८०.००) अशी एकूण रु. १,४०,३०६.९० या रक्कमेचा हा खराब माल येथील जवळच असलेल्या ११० देशी गायींचे साईशाम गोशाळेस त्यांचे दि. ०५.०६.२०१५ रोजीचे विनंती पत्रानुसार दिला आहे. त्याची पोहोचही त्यांनी संस्थानला दिलेली आहे. तसेच दि.०६.०६.२०१५ चे मंजूर टिप्पणीने सदर माल स्टॉक रजिष्टरमधून कमी केला आहे.<br><br>याबाबत टिपणी मान्यतेस्तव सादर केली असता, त्यावर मा. उप कार्यकारी अधिकारी श्री आप्पासाहेब शिंदे यांनी खालीलप्रमाणे शेरे मारले आहेत. |

| | |
|---|---|
| | १. सदरचा माल गोशाळेला देणेपुर्वी व्यवस्थापन समितीचा ठराव/मान्यता घेणे गरजेचे होते.<br>२. माल खराब नसताना स्वीकारला नाही म्हणून लेखी पत्रव्यवहार करुन प्रसादालयात देणे अपेक्षीत होते.<br>३. माल खराब असलेबाबत प्रयोगशाळेचा अहवाल दिसुन येत नाही.<br>४. प्रसादालय प्रमुख व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात माल खराब असे ठरविलेले दिसुन येते.<br>५. वास्तविक प्रयोगशाळेत माल पाठवुन तपासणी अहवाल व्यवस्थापन समितीचे पुढे ठेवून पुढील कार्यवाही करणे अपेक्षीत होते, परंतु तसे केलेले दिसुन येत नाही.<br>६. सदर मालाची किंमत संबंधीत अधिकारी यांचेकडुन वसुल होणेस मान्यता असावी.<br><br>दि. 10.11.2015 रोजीचे सभेत उपरोक्त बाबीवर चर्चा होवून निर्णय क्रं. 501 नुसार असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेला देणगी रवा व आटा खराब झालेला असलेबाबत कोणत्याही प्रयोगशाळेचा अहवाल दिसून येत नाही तसेच ही बाब मा. त्रिसदस्यीय समितीच्या निदर्शनास आणून दिलेली नाही व समितीच्या पूर्व-परवानगीशिवायच या मालाची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. यावरून तत्कालीन कार्यकारी अधिकारी व प्रसादालय प्रमुख यांनी त्यांचे अधिकारात सदरहू माल खराब असल्याचे परस्पर ठरविले, असे निदर्शनास येते. याकरीता प्रस्तावित देणगी मालाच्या रकमेची तत्कालीन कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांचेकडून वसुली का करणेत येवू नये,याबाबत त्यांचे लेखी खुलासे मागविणेत यावेत असा निर्णय झालेला आहे, त्यावर कामगार विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे. |

**पत्रातील उपरोक्त अ,आ व इ या मुदयांबाबत विभागाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे-**

अ- तत्कालीन अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या लेखापरिक्षणातील आकडेवारी व रजि.मधील आकडेवारी यात तफावत असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानंतर लेखाशाखेमार्फत तत्कालीन अंतर्गत लेखापरिक्षकांचा त्याबाबतचा लेखी खुलासा व सदर आकडेवारी अहवालात देणेपुर्वी मा. मुख्य लेखा अधिकारी यांनी ती पाहुन, खात्री करुन न दिल्याने त्यांचाही लेखी खुलासा मागविता येईल.

आ- ERP सिस्टीम पुर्णपणे कार्यान्वित नसल्याने ती लवकर पुर्णपणे कार्यान्वित करणेबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागास लेखी पत्र देता येईल.

इ- निर्णय क्रं. 501 नुसार कामगार विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

उपरोक्त बाबीवर चर्चा होवून निर्णय होणेस्तव सविनय सादर .

**निर्णय क्र.२३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही चालू असल्यामुळे सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं. ३५** **साईटेक प्रकल्पात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व migration Audit करणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद :** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत करारनाम्यांनुसार कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणाली, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत करुन संबधीत विभागात कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. साईटेक प्रकल्पाअंतर्गत अकाऊंट विभागामध्ये ERP ही कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदरच्या कार्यप्रणालीमध्ये अकाऊंट विभागाबरोबरच खरेदी तसेच भांडार व इतर विभागाच्या कार्यप्रणालींचाही समावेश आहे. सदरची कार्यप्रणाली ही आवश्यक तेथे इतर कार्यप्रणालीशी संलग्न करण्यात आलेली आहे.

अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP या कार्यप्रणालीचा वापर प्रायोगीक/समांतर पद्धतीने दि. ०५/११/२०११ पासून सुरु करण्यात आलेला आहे. दि. ०१/०४/२०१५ पासून अकाऊंट विभागात वापरात असलेली पुर्वीची Tally हि कार्यप्रणाली पुर्णपणे बंद करुन, ERP या कार्यप्रणालीचा उपयोग सुरु करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत अकाऊंट विभागात चालणारे सर्व कामकाज ERP या कार्यप्रणालीमध्ये करण्यात येत आहे.

कार्यप्रणाली वापरत असतांना संबधीतांना येणा-या अडचणी वेळोवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सोडविण्यात येत आहेत. तसेच खरेदी व भांडार विभागातही कार्यप्रणालीचा वापर चालू करण्यात आलेला आहे.

दि.१९/११/२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे उपस्थितीत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षकांनी ऑडीट रिपोर्टमध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्याबाबत आढावा घेणेसाठी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदरच्या बैठकीमध्ये अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP विषयी झालेल्या सविस्तर चर्चेअंती वैधानीक लेखापरिक्षकांनी ERP कार्यप्रणाली प्रभावीपणे कार्यान्वीत होणेच्या दृष्टीने व त्यात येणा-या अडी-अडचणींचे निरसण होण्याच्या दृष्टीने ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणे आवश्यक असल्याचे सुचित केलेल आहे. ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit केलेनंतर कार्यप्रणाली सुरळीत चालून, पुढील वर्षाचे ऑडीटचे वेळी त्याची मदत होईल, असेही यावेळी वैधानिक लेखापरिक्षकांनी म्हटलेले आहे. मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदरची कार्यवाही माहीती तंत्रज्ञान विभागाचे मदतीने तात्काळ करणेसंदर्भात अकाऊंट विभागास निर्देश दिलेले आहेत. तसेच उपरोक्त दि. २४/१२/२०१५ रोजीचे आदेशान्वये प्राप्त झालेल्या वैधानिक लेखापरिक्षकांचे त्रुटी अहवालामध्येही ERP कार्यप्रणालीचे System & Migration Audit करणेसंदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार विषयांकित प्रकरणी दि. ३०/११/२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात श्री रितेश तावडे, CISA (Certified Information System Auditor) यांचे उपस्थितीत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. श्री रितेश तावडे यांचा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव पाहता, ERP कार्यप्रणालीचे System & Migration Audit निविदेचा मसुदा श्री रितेश तावडे यांचे मार्गदर्शनाखाली तयार करावा, असे निर्देश देण्यात आले आहे.

त्यानुसार श्री रितेश तावडे यांचेकडून विषयांकित प्रकरणाच्या ई-निविदेचा मसुदा दि. २०/१२/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे इकडील विभागास प्राप्त झालेला होता. सदरचा निविदा मसुदा दि. २१/१२/२०१५ रोजीचे इकडील विभागाचे दि. २१/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये अकाऊंट विभागाकडे तपासणेसाठी पाठविण्यात आलेला होता, त्यावर अकाऊंट विभागाचा पुढीलप्रमाणे अभिप्राय इकडील विभागास दि. २३/०१/२०१६ रोजी प्राप्त झालेला आहे. "System Audit of ERP is technical work not related to Finance and Accounts not related to Accounts". श्री रितेश तावडे यांनी वैधानीक लेखापरिक्षकांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सुधारीत ई-निविदा मसुदा, दि. २३/०१/२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे इकडील विभागास पाठविलेला आहे. श्री रितेश तावडे CISA (Certified Information System Auditor) यांनी सदरकामी अंदाजे रक्कम रुपये ५-६ लाख मात्र खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. साईटेक प्रकल्प करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल माहे एप्रिल २०१७ अखेर संपुष्टात येत आहे. सबब, वैधानिक लेखापरिक्षकांनी सुचित केलेप्रमाणे ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit ची कार्यवाही लवकरात-लवकर होणे गरजेचे आहे, असे नम्र मत आहे.

**मागणी:** वैधानिक लेखापरिक्षकांचे त्रुटी अहवालामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेसाठी येणा-या अंदाजे खर्चाचा विचार करता, सदरकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल, असे नम्र मत आहे.

सबब, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व अकाऊंट विभागात कार्यान्वीत केलेल्या ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून, न्युनतम दरधारकास कार्यादेश देण्याच्या व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्र खर्चाच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान :** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींचे System Audit व ERP कार्यप्रणालीचे Migration & System Audit करणेकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून, न्युनतम दरधारकास कार्यादेश देण्याच्या व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्र खर्चाच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व migration Audit करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- आय. टी विभागप्रमुख )

---

**विषय नं. ३६** **संस्थानचे विविध विभागाचे मागणीनुसार दैनंदिन कामकाजासाठी २५ नग संगणक संच ई-निविदा प्रक्रियाव्दारे खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 458. 2) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 08/09/2015रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 292. 3) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 16/02/2016 रोजीचे रोजीचे सभेतील निर्णय

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता 25 नग संगणक संच खरेदीकामी दि. 08/09/2015 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले 25 नग संगणक संच शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणेत यावे. दर करारावर उपलब्ध नसल्यास सदरहु संगणक संच खरेदीकामी ई-निविदांची मागणी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि. 12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 458 नुसार संगणके खरेदीसाठी संगणकाची एकच कंपनी व मॉडेल निश्चित करणेत येऊन, त्यासाठीच दर मागविण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने Lenovo कंपन्याचे निविदाधारक/पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन प्राप्त झालेल्या Commercial ई -निविदा मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे दि. 04/02/2016 रोजीचे सभेत उघडणेकामी प्रस्ताव सभेपुढे सादर करण्यात आला होता.

परंतु, सदर सभेत संगणक संच खरेदीकामी महाराष्ट्र शासनाने प्रारीत केलेल्या दि. 30/10/2015 रोजीच्या अध्यादेशानुसार व दि. 05/02/2015 रोजीचे परिपत्रकानुसार खरेदी प्रक्रियेची कार्यवाही करण्यात यावी तसेच संगणक संच खरेदीकरीता Dell/Lenovo/HP या तीन कंपन्याकडुन दर मागविणेकामी सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यात यावा, असे ठरले. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालील तपशीलातील

| Sr. No. | | Detail/ Specification | Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Computer set | Dell/HP/Lenovo desktop/ All In One Intel Core i3 किंवा i5-Processor, 3rd generation or above, onboard Integrated Graphics, 10/1000 LAN, onboard USB, 8 GB DDR3 RAM, 1 TB Hard Drive, No Optical Drive ,18.5" Monitor with LED Back Light, USB Optical Mouse and Keyboard Windows 8 professional 64 bit 3 Yr Next business day onsite service. | 25 Nos. |

नमुद केलेले 25 नग संगणक संच खरेदीकामी विविध पुरवठा धारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्रातील प्रमुख शहरामधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करणेस व सदर कामी येणाऱ्या रक्कम रुपये 9,95,000/- मात्रचे खर्चास तसेच उपरोक्त तपशीलातील नमुद specification चे संगणक संच देणगी स्वरुपात स्विकारणेकामी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरसादर करता येईल.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेले 25 नग संगणक संच खरेदीकामी विविध पुरवठा धारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्रातील प्रमुख शहरामधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करणेस व सदर कामी येणाऱ्या रक्कम रुपये 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरसादर करता येईल तसेच उपरोक्त तपशीलातील नमुद specification चे संगणक संच देणगी स्वरुपात स्विकारणेकामी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करता येईल ,असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** शासन निर्देश व तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे 25 नग संगणक संच खरेदीकामी विविध पुरवठा धारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्रातील प्रमुख शहरामधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करणेस व सदर कामी येणाऱ्या रक्कम रुपये 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच उपरोक्त तपशीलातील नमुद specification चे संगणक संच देणगी स्वरुपात स्विकारणेकामी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर सविनय सादर.

**निर्णय क्र.२३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानच्या सर्व विभागांकडून संगणकांची मागणी घेण्यात यावी व त्यानुसार येणा-या अपेक्षीत खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व ई-टेंडरींग करुन मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

**विषय नं. ३७** **डॉट मॅट्रीक्स Epson LQ 300+प्रिंटरसाठी रिबन काट्रेज खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दि. 27/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 415.

**प्रस्ताविक :** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 27/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 415 नुसार संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी प्रिंटर्स विहित पध्दतीने ई-निविदा मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,02,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार प्रिंटर्स खरेदीकामी दि. 16/12/2015 रोजीची मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे विहित पध्दतीने संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेची कार्यवाही विभागामार्फत चालु आहे.

त्यानुसार सदरचे प्रिंटर्स खरेदी झाल्यावर दुरुस्ती देखभालीकरीता त्यासंबधीत 600 नग रिबन काट्रेजची तातडीची गरज म्हणुन विभागात तयार ठेवणे गरजेचे आहे.

| अ.न. | साहित्याचे नाव | तपशिल | नग | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर Epson LQ 310 | रिबन काट्रेज | 600 | 250 | 1,50,000/- |
| | | | | **एकुण** | **1,50,000/- + टॅक्स** |

उपरोक्त नमुद 600 नग रिबन काट्रेज विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी :** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे प्रिंटर्स संबधीत रिबन काट्रेज खरेदीकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे प्रिंटर्स संबधीत रिबन काट्रेज खरेदीकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ६०० नग डॉट मॅट्रीक्स प्रिंटर Epson LQ 300 + प्रिंटरसाठी रिबन काट्रेज खरेदीकामी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं. ३८** **श्री.संजय भास्करराव काळे, कोपरगाव यांचे दि.२८/०९/२०१५ रोजीचे मा.अध्यक्ष सो. यांना अग्रेषित केलेल्या पत्राबाबत. (आवक क्र.१८६४२ दि.१८/१२/२०१५)**

**प्रस्ताव-** श्री संजय भास्करराव काळे, कोपरगाव यांचेकडून प्राप्त झालेल्या वरील विषयांकित पत्रांबाबत इकडील विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीद्वारे मंदिर परिसराजवळील मौजे शिर्डी सर्व्हे नं.०१ पैकी मधील जागेत असणारी जिल्हा परिषदेची शाळा, सर्व्हे नं.०६ (आरक्षण क्र.८) मध्ये स्थलांतरीत करुन जिल्हा परिषदेच्या मूळ शाळेच्या जागी बेसमेंट, तळमजला व पहिला मजला असे दुकान केंद्र बांधण्याबाबत व दुसरा मजला संस्थान उपयोगासाठी वापराबाबत निर्णय झाला. सदर निर्णयास तत्कालीन धर्मादाय सह आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली.

त्यानुसार तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने व त्यानंतरचे व्यवस्थापन समितीनेही जिल्हा परिषदेची शाळा स्थलांतरीत करुन जिल्हा परिषदेसाठी सर्व्हे नं.६ ( आरक्षण क्र. ८) मध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी नविन इमारत बांधून देण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली होती.

त्यास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या शिर्डी येथील शाळेकरीता सर्व सोयी– सुविधायुक्त असे अद्ययावत व सुसज्ज इमारतीचे बांधकाम करुन देण्यात आलेले आहे. सदर नवीन शाळा इमारतीचे जागेसह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यास महाराष्ट्र शासनाचे, विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सांसवि२००६/६०८/(८८) का. सोळा, मंत्रालय, दि.१५/०५/२००८ अन्वये मान्यता देण्यात आली.

जिल्हा परिषद शाळेच्या जागेचे संस्थानकडे हस्तांतर करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार दि.२४/०९/२००९ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमध्ये सर्व्हे नं.१ पै व गावठाण पैकी क्षेत्र २४ आर ३२ चौ. मी. ( जि.प., अहमदनगर व शिर्डी नगरपंचायत) व सर्व्हे नं.६ पैकी ५९ आर १५ चौ. मी. ( श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी) या मालमत्तांचे अदला बदलीचा लेख नोंदणीकृत झाला.

जिल्हा परिषद, अहमदनगर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेत झालेल्या अदलाबदलीचे लेखानुसार मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद, अहमदनगर यांची सिटी सर्व्हे क्र.०६६,७५७,७५८

क्षेत्र ६८९.८० चौ. मीटर ही मालमत्ता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस हस्तांतरीत झालेली असल्याने सिटी सर्व्हे क्रमांकावर असलेले प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद हे नाव वगळून त्याऐवजी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असे नांव दाखल करणेत यावे अशा नावाची नोंद करणेत यावी तसेच या अदलाबदलीचे लेखाद्वारे मालकी हक्काने मिळालेल्या एकूण २४ आर ३२६ चौ. मी. जमिनीची अति तातडीने मोजणी करण्यासाठी किती मोजणी शुल्क भरावे लागेल याकरीता इकडील विभागामार्फत मा. उप अधिक्षक, भूमिअभिलेख, राहाता यांना तसेच या कार्यालयाव्दारे परिक्षण भूमापक सिटी सर्व्हे कार्यालय शिर्डी यांचेकडे इकडील कार्यालयाव्दारे खालीलप्रमाणे पत्रव्यवहार केलेला आहे.

१) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/९५४८/२०१०, दि.२३/०९/२०१०
२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५६०/२०१२, दि.०८/०९/२०१२
३) जा. नं. एसएसएसटी/बांधकाम/३११२/२०१२, दि.१२/१०/२०१२
४) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/४३१२/२०१२, दि.१९/१२/२०१२
५) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/५४८४/२०१३, दि.०२/०३/२०१३
६) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१४२/२०१३, दि.०८/०४/२०१३
७) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/४२१/२०१३, दि.२५/०४/२०१३
८) दिनांक ०६/०७/२०१३ रोजीचे पत्र.
९) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२११४/२०१३, दि.०५/०८/२०१३
१०) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/३५५२/२०१३, दि.०६/११/२०१३
११) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/५०९८/२०१४, दि.१०/०३/२०१४
१२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/९४८/२०१४, दि.१४/०५/२०१४

तसेच फेरफार नकला व सि.टी. सर्व्हे मोजणी नकाशाच्या नकला मिळणेबाबत इकडील विभागामार्फत खालीलप्रमाणे पत्रव्यवहार केलेला आहे.

१) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२९६१/२०१२, दि.०४/१०/२०१२
२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/४५६९/२०१२, दि.०३/०१/२०१३
३) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/५४८३/२०१३, दि.०२/०३/२०१३
४) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१४३/२०१३, दि.०४/०४/२०१३
५) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१४४/२०१३, दि.०८/०४/२०१३
६) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१४५/२०१३ दि.०८/०४/२०१३

याबाबत जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर यांनी संस्थानने मागणी केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत उपअधिक्षक, भूमिअभिलेख, राहाता यांना जा.क्र.९४३७/२०१२ दि.०८/१०/२०१२ व जा. क्र. ४३४०/२०१३, दि.३१/०५/२०१३ रोजीचे पत्राद्वारे विचारणा केली असता उपअधिक्षक, भूमिअभिलेख यांनी दि.१३/०५/२०१४ रोजीचे पत्राद्वारे प्रत्येक सिटी सर्व्हे नं. साठी रु.३०००/-या प्रमाणे मोजणी फी भरणेबाबत कळविले.

त्यानुसार मा. उप अधिक्षक, भूमिअभिलेख, राहाता यांचेकडे दि.१२/०६/२०१४ रोजी रक्कम रु.६०००/- भरणा करणेत आला होता. तदनंतर दि.१९/०८/२०१४ व दि. २०/०८/२०१४ रोजी परिरक्षण भूमापक, शिर्डी यांनी सर्व्हे नं.१/६ व १/१७ मधील संस्थान मालकीचे जागेचे हद्द कायम मोजणीचे काम पूर्ण केले परंतु जागेवर हद्दीच्या खुणा दाखविलेल्या नाहीत.

त्यानंतर सदर कामाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

- उप अधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता यांनी हद्द कायम मोजणी कामी दि.१९/०८/२०१४ व दि.२०/०८/२०१५ रोजी करणेत येणार असल्याची नोटीस दिली.
- त्यानुसार मा. उपकार्यकारी अभियंता यांनी दि.१६/०८/२०१४ रोजीचे पत्राद्वारे मधुकर गव्हाणे, कनिष्ठ अभियंता व गिरिष चोळके, मुकादम यांना मोजणीचे ठिकाणी हजर राहणेसाठी कळविले.
- दि.१९/०८/२०१४ व दि.२०/०८/२०१४ रोजी हद्द कायम मोजणीचे काम पूर्ण, तथापी जागेवर हद्दीच्या खुणा दाखविलेल्या नाहीत.
- दि.२०/०८/२०१४ मोजणीबाबत परिक्षण भूमापक शिर्डी यांचेकडे जबाबा बाबत अहवाल.
- इकडील दि.०५/०२/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये अतीतातडीचे हद्द कायम मोजणीचे नकाशावरुन सिटी सर्व्हे नं. ७५७ व ७५८ चे क्षेत्रावर शिर्डी नगरपंचायत यांनी साई कॉम्प्लेक्स इमारतीचे बांधकाम केले असलेबाबत तसा अभिप्राय व कागदपत्रे मागविणेबाबत नगरपंचायत यांना पत्र देणेस मान्यता घेतली.
- इकडील जा.नं.५६२३/२०१५ दि.१२/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना साई कॉम्प्लेक्स इमारती खालील जागेचा मोजणी नकाशा मंजूर लेआऊट व इतर कागदपत्रे मिळणेकामी कळविले.
- दि.२७/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी माहिती दिली.
- इकडील दि.०८/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये सर्व्हे नं. १/६ व १/१७ मधील क्षेत्राच्या हद्दी मोजणी नकाशात दर्शविल्या नाहीत व मोजणीदार यांनी अद्याप हद्दी खुणा दाखविलेल्या नसल्याने याबाबत अधिक्षक, भूमि अभिलेख, अहमदनगर यांचेकडे पाठपुरावा करणेबाबत मालमत्ता विभागास कळविले.
- उप अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी दि.१२/१०/२०१५ रोजीचे पत्राद्वारे १/६ व १/१७ या मिळकतीचे गाव कामगार तलाठी शिर्डी यांचेकडील ७/१२ च्या अभिलेखात हिस्से पडलेले आहेत. सदरच्या ७/१२ प्रमाणे

नगर भुमापनाचे अभिलेख तयार झालेले नाहीत. भूमापनाकडे ही सदरचे हिस्से पोट हिस्से मोजणी होऊन ७/१२ तयार झालेले नसल्याने इकडील कार्यालयाकडे अभिलेख उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.

**अर्जदार यांचे पत्रातील मुद्दे निहाय अहवाल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.नं. | अर्जदार यांचे पत्रातील मुद्दा | माहीती/ अहवाल |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा संस्थानने अदला बदलीच्या लेखाद्वारे जिल्हा परिषद अहमदनगर यांचे शाळेची २४.३२६ आर जमीन घेतली. सदर जमीनीचा व्यवहार २०१० मध्ये झाला. सदरचे क्षेत्राचा ताबा घेतांना क्षेत्र मोजुन घेण्याची जबाबदारी संस्थानचे बांधकाम विभागाची होती. | श्री साईबाबा साईबाबा संस्थान यांचेकडेस हस्तांतरीत झालेली सि.स.नं. ०६६, ७५७, ७५८ या मालमत्तेवर असलेले प्राथमिक शाळा जिल्हा परिषद हे नांव वगळून त्याऐवजी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावाची नोंद झाल्यावरच सदरहू क्षेत्राची मोजणीसाठी अर्ज करता येणार असल्याने सदरहू क्षेत्राची सि टी सर्व्हे नंबरला नोंद होणेकामी इकडील विभागामार्फत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता द्वारा परिरक्षण भूमापक सिटी सर्व्हे कार्यालय यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला. तसेच मा. उप अधिक्षक, भुमिअभिलेख यांचेकडे मोजणी करण्यासाठी किती मोजणी शुल्क भरावे लागेल याकरीता सुमारे १० ते १२ वेळेस पत्रव्यवहार करण्यात आला.<br>परंतू सदर कार्यालयाने मोजणी शुल्क कळविणेसाठी मोठा कालावधी घेऊन उपअधिक्षक, भूमिअभिलेख यांनी दि.१३/०५/२०१४ रोजीचे पत्राद्वारे प्रत्येक सिटी सर्व्हे नंबरसाठी रु.३०००/-या प्रमाणे मोजणी फी भरणेबाबत कळविले.<br>संस्थानने दि. १२/०६/२०१४ रोजी मोजणी फि भरली व दि. १९/०८/२०१४ व दि. २०/०८/२०१४ रोजी वहीवाटीनुसार हद्द कायम मोजणी केली. परंतु १/६ व १/७ या क्षेत्राच्या हद्दी खुणा दाखविल्या नाहीत.<br>तदनंतर सदरचे प्रकरणी पुढील पाठपुरावा मालमत्ता विभागामार्फत होणेसंबधी इकडील विभागाचे दि.०८/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये मालमत्ता विभागास कळविणेत आले. त्यानुसार मालमत्ता विभागाने जा.नं.३३२५/२०१५ दि.११/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये उपअधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता यांचेकडे पाठपुरावा केला, असता त्यांनी दि. १२/१०/२०१५ रोजीचे पत्राव्दारे १/६ व १/१७ या मिळकतीचे गाव कामगार तलाठी शिर्डी यांचेकडील ७/१२ च्या अभिलेखात हिस्से पडलेले असल्याने सदरच्या ७/१२ प्रमाणे नगर भुमापनाचे अभिलेख तयार झालेले नाहीत. भूमापनाकडे ही सदरचे हिस्से पोट हिस्से मोजणी होऊन ७/१२ तयार झालेले नसल्याने भूमिअभिलेख विभागाने आजतागायत सदर क्षेत्राच्या हद्दी खुणा दाखविलेल्या नाहीत. असे कळविले.<br>मालमत्ता विभागाचे दि.२०/११/२०१५ रोजीचे पत्राव्दारे मा. तहसिलदार, राहाता यांना सर्व्हे नं.१/६, १/१७ व ५,६,७,८ गावठाणचे अंमल दिलेले दुरुस्त ७/१२ उतारे मिळणेबाबत विंनती केली असता त्यांनी याबाबत सर्वांगींण माहिती दिली नाही.<br>यानंतर दि. १९/०१/२०१६ रोजी अधिक्षक व सल्लागार, मालमत्ता विभाग तसेच बांधकाम विभाग प्रतिनिधी यांनी भूमि अभिलेख कार्यालय, राहाता येथे जाऊन समक्ष चर्चा केली असता कार्यालय उपअधिक्षक यांनी संगणकीय ७/१२ होण्यापूर्वीचे व संगणकीकरण झाल्यानंतरचे सर्व्हे नं. ०१ चे सर्व पोटहिस्यांचे ७/१२ उतारे व शिर्डी नगरपंचायत यांचे सर्व्हे नं. १ मधील (साई कॉम्प्लेक्स)असलेल्या मालकीचे ७/१२ उतारे, बांधकाम रेखांकन आराखडे घेऊन शिर्डी नगरपंचायत यांचे प्रतिनिधीसह भूमि अभिलेख कार्यालय राहाता येथे उपस्थित राहणेस सांगितले. त्यानुसार कामगार तलाठी शिर्डी , मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी व तहसिलदार राहाता यांचेकडे सर्व्हे नं. ०१ चे सर्व पोट हिस्यांचे ७/१२ उतारे मिळणेकामी दि. २७/०१/२०१६ व दि. २८/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे. तथापी अद्याप उतारे प्राप्त झाले नाही. |
| ०२ | दि.२०/०८/२०१४ ते १९/०८/२०१५ रोजी तालुका भुमापन विभागाने सदर क्षेत्राची तातडीची हद्द कायम मोजणी केली. संस्थानने मोरनं.१७५६ दि.३१/०७/२०१४ प्रमाणे मोजणी शुल्क भरला होता. | सदरची बाब सत्य असून इकडील कार्यालयाचे जा. नं. २१४५/२०१४ दि.०४/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये मोजणी करणेकामी मोजणी तारीख कळविणेबाबत विनंती केली व दि.१२/०६/२०१४ रोजी रु. ६०००/- मात्र मोजणी फी भरणा केली. उपअधिक्षक भूमि अभिलेख राहाता यांनी मो.रं.नं.१७५६, १७५७/ दि.३१/०७/२०१४ रोजीचे नोटीस अन्वये हद्द कायम मोजणीच्या दि.१९- २०/०८/२०१४ या तारखा कळविल्या. |
| ०३ | उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, श्री. र.भा. आहेर यांनी १६/०८/२०१४ चे पत्रान्वये सदर मोजणी साठी हजर राहून अहवाल सादर करण्याचे आदेश कनिष्ठ अभियंता श्री. मधुकर गव्हाणे व मुकादम श्री. गिरीश चोळके यांना दिले. | श्री.र.भा. आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी दि. १६/०८/२०१४ चे पत्रान्वये कनिष्ठ अभियंता श्री. मधुकर गव्हाणे व मुकादम श्री. गिरीश चोळके यांना सदर मोजणी साठी हजर राहून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. |

| | | |
|---|---|---|
| ०४ | श्री मधुकर गव्हाणे यांनी २०/०८/२०१४ रोजी सदरच्या स.नं.१/६ व १/१७ च्या मोजणीचा अहवाल उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना सादर केला. त्यात त्यांनी स्पष्ट म्हटले की स.नं.१/६ व १/१७ मधील संस्थान मालकीचे जागेच्या हद्द कायम मोजणीचे काम १९/०८/२०१४ व २०/०८/२०१४ रोजी पूर्ण करण्यात आले आहे. परंतू सदर जागेच्या हद्दी खुणा दाखविण्यात आलेल्या नाही. | दि.१९/०८/२०१४ व दि.२०/०८/२०१४ रोजी परिरक्षण भूमापक, शिर्डी यांनी सर्व्हे नं.१/६ व १/१७ मधील जागेच्या मोजणीचे काम पूर्ण केले. परंतू सदर जागेच्या हद्दी खुणा दाखविणेत आलेल्या नाहीत. |
| ०५ | हद्द कायम मोजणी म्हणजे सदरच्या मोजणी अधिका-याने प्रत्यक्ष ठिकाणावर कागदाप्रमाणे असलेल्या क्षेत्रावर खुणा करुन दाखविणे. संस्थानने गेल्या अनेक वर्षात अनेक जमीनी घेतल्या, त्याची मोजणी देखील केली असणार. श्री.आहेर यांना तसा दांडगा अनुभव देखील आहे. | हद्द कायम मोजणीचे कार्यवाहीसाठी संबधीत मोजणी अधिका-याने रेकॉर्डवरील नकाशाप्रमाणे जागेवर मोजणी करुन हद्दी खुणा दाखविणे आवश्यक आहे. मोजणी नुसार खुणा दाखविणेची जबाबदारी संबंधीत मोजणी अधिकारी यांची असते. तथापी याप्रमाणे हद्दीखुणा जागेवर दर्शविलेल्या नाहीत त्यामुळे श्री. आहेर यांचेबाबत केलेले विधान हे उपरोधिक स्वरुपाचे आहे. |
| ०६ | जर संस्थानच्या अधिका-यांना, भूमापनच्या अधिका-यांनी संस्थानच्या क्षेत्रावर प्रत्यक्षात खुना करुन दिल्या नाही तर सदरची मोजणी पूर्ण होत नाही. हया संदर्भात उप कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या सहका-यांचे अहवालावरुन तालुका भूमापनला पत्र देणे जरुरी होते हि बाब कार्यकारी अधिकारी व त्रिसदस्य समितीच्या निदर्शनास आणुन देणे जरुरी होते. तसे त्यांनी केलेले नाही. | उप अधिक्षक, भूमिअभिलेख यांना संस्थानचे मालमत्ता विभागामार्फत दि.११/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये हद्दी खुना दाखविणेबाबत कळविण्यात आलेले आहे.<br>उप अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी *"दि.१२/१०/२०१५ रोजीचे पत्राद्वारे १/६ व १/१७ या मिळकतीचे गाव कामगार तलाठी शिर्डी यांचेकडील ७/१२ च्या अभिलेखात हिस्से पडलेले आहेत. सदरच्या ७/१२ प्रमाणे नगर भुमापनाचे अभिलेख तयार झालेले नाहीत. भूमापनाकडे ही सदरचे हिस्से पोट हिस्से मोजणी होऊन ७/१२ तयार झालेले नसल्याने इकडील कार्यालयाकडे अभिलेख उपलब्ध नसल्याने हद्दी खुणा दाखविता येत नसल्याचे कळविले आहे."* |
| ०७ | मागे हया मोजणी प्रमाणे संस्थान मालकीच्या स.नं.१/६ व १/१७ मधील सि.स.नं. ७५७, ७५८, व ६६ वर शिर्डी नगरपंचायतने अतिक्रमण केल्याचे हया मोजणी अहवालात स्पष्ट दिसते असा तक्रार अर्ज आपणाकडे केला. आपण तो अर्ज बांधकाम विभागाकडे पाठवला व त्यांनी दप्तरी दाखल करुन ठेवला. | श्री संजय भास्कर काळे, यांचे पत्राबाबत इकडील विभागाचे दि.०५/०२/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना संस्थान मालकीचे जागेवर साई कॉम्प्लेक्स इमारतीचे बांधकाम केलेबाबत तसेच आवश्यक कागदपत्राची मागणी बाबत पत्र देण्यात आले होते. |
| ०८ | सदरच्या संस्थानच्या क्षेत्रावर साई कॉम्प्लेक्सचे मोठे अतिक्रमण झाले आहे. साई कॉम्प्लेक्सचे BOT ठेकेदार व आपले बांधकाम विभागाचे अनैतिक सख्य असल्याने, भ्रष्ट आचारामुळे सदरचे प्रकरण दडपले जात असल्याचा माझा प्राथमिक अंदाज आहे. | हद्द कायम मोजणीची कार्यवाही पूर्ण होऊन जागेवर हद्दी खुणा दर्शविल्यानंतर अतिक्रमणाबाबत निष्कर्श काढता येईल.<br>साई कॉम्प्लेक्स इमारतीचे BOT ठेकेदार यांची नियुक्ती व याबाबतचे सर्व कामकाज शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत झालेले आहे. संस्थानचे बांधकाम विभागाचा याचेशी कुठलाही संबंध नाही.<br>त्यामुळे भ्रष्ट आचारामुळे प्रकरण दडपले जात असल्याचा अंदाज व्यक्त करणे पूर्णपणे चुकीचे असून श्री संजय काळे यांनी श्री आर. बी. आहेर उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेवर केलेले आरोप तथ्यहिन आहेत. |

तरी वरीलप्रमाणे अहवाल मा . समितीचे निणयार्थ तथा माहितीसाठी सादरत्रीसदस्य .

**निर्णय क्र.२३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, या संबंधीत सर्व शासकीय व संस्थान अधिका-यांना नकाशासह बोलावून कार्यकारी अधिकारी यांनी संयुक्त मोजणी DILR/ TILR यांचेमार्फत करुन घ्यावी व अहवाल समितीसमोर सादर करावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ३९** **मंदिर परिसरातील कौलारु छत असलेल्या इमारतीवरील कौलाचे रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** परिसरातील श्री व्दारकामाई मंदिर दिक्षितवाडा, चावडीचे समोरील पडवी, समाधी मंदिर बाहेर पडण्याचे गेटवर, म्युझियम हॉलचे छत व समोरील पडवी, साईचे समकालीन साईभक्तांचे समाधीवरील छत, अभिषक हॉल, सभाकुंड येथील स्लोपींग, स्लॅब,क्वारीडोअर वरील डोम व स्लोपींग पडदीवरील भागात शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीचे स्लोपींग छज्जाचे वर मारुती मंदिर स्लोपींग छज्जा या भागात कैलाचे छत आहे. दि.२३.०२.२०१६ रोजी. मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी मंदिर परिसराची पाहणी दरम्यान मंदिर परिसरातील कौलारु छतास बाहेरील बाजुने कौलास साजेसा रंग देणेबाबत सुचना केली. मंदिर परिसरातील कौलारु छत असलेल्या एकुण २६५२७ चौ.फुट भागास टेरेकोटा कलर देता येईल. सदरचे रंगकाम करणेकामी खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.न. | मटेरीयलकामाचा / तपशिल | परिणाम | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंदिर परिसरातील कौलारु छतास बाहेरील बाजुने टेराकोटामध्ये रंगकाम करणे. | ७०० | लिटर | २७५/- | १,९२,५००/- |
| २ | मजुरी दराने रंगकाम करणे. | २६,५२७ | चौ.फुट | २.५० प्रति चौफुट. | ६६,३१७.५० |

| | |
|---|---|
| एकुण | २,५८,८१७.५० |
| अधिक ५% कन्टेनजन्सीज | १२,९४०.८७ |
| एकुण | २,७१,७५८.०० |
| **पुर्णांकित रुपये** | २,७२,०००.०० |

तरी उपरोक्त प्रमाणे मंदिर परिसरातील कौलारु छताचे रंगकाम करणेकामी रक्कम रु. २,७२,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम मुंबई येथील एक्स्टेरीअर पेंटचे उत्पादक श्री. दमानी यांचेकडुन देणगी दाखल करणेकामी त्यांचेशी दूरध्वनीव्दारे चर्चा केली असता त्यांनी सदरचे काम देणगीदाखल करणेसाठी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचे काम श्री. दमानी, मुंबई यांचेकडून देणगी दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील कौलारु छत असलेल्या इमारतीवरील कौलाचे रंगकाम मुंबई येथील एक्स्टेरीअर पेंटचे उत्पादक श्री.दमाणी यांचेकडून विनाअट देणगी दाखल करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ४०** **सन २०१६-२०१७ साठी फलेक्स बोर्ड व बॅनर्सचे कोटेशन मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानच्या वतीने साजरे करण्यात येणारे तीनही उत्सव, शिर्डी महोत्सव, विविध कार्यक्रम व मंदिर परिसरात भक्तांच्या मार्गदर्शनासाठी लावण्यात आलेल्या बोर्ड पैकी खराब झालेले बोर्ड वेळोवेळी तयार करुन घेण्याची जबाबदारी प्रत्येक उत्सवापुर्वी जनसंपर्क विभागाकडे सोपविण्यात येते.

तथापि, सन २०१६-१७ साठी संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात येणारे तीनही उत्सव, शिर्डी महोत्सव व इतर कार्यक्रमांचे फ्लेक्स बोर्डस व बॅनर्स तयार करुन घेणेकामी सुमारे ५०,०००/- रुपये खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च प्रशासन शाखा वशी-०५ चे उत्सवाकरीता मंजूर करण्यात येणा-या अंदाजपत्रकातून करण्यात येतो. फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स बनविण्याचे काम नेहमीच तातडीचे व आयत्यावेळी करावे लागते बहूतेक कामे करण्यासाठी वेळ अत्यंत कमी असतो. तसेच लहान आकाराचा एखादा बोर्ड बनविण्यासाठी बाहेरील पुरवठादार वेळेवर येत नाहीत. त्यामुळे सदर कामासाठी फक्त शिर्डी व परिसरातील पुरवठा धारकांकडून कोटेशन मागविण्यात येतात.

याबाबत मागील वर्षी मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दिनांक ३०.०१.२०१५ चे सभेत "सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात संस्थानकरीता फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स बनवून घेणेकामी शिर्डी आणि शिर्डी परिसरातील पुरवठादारांकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रुपये ५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी." असा निर्णय झालेला होता त्यानुसार सन २०१५-२०१६ साठी फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स तयार करुन घेणेबाबतची कार्यवाही करण्यात आली होती.

तरी सन २०१६-१७ साठी संस्थानचे फ्लेक्स बार्डस् व बॅनर्स तयार करुन घेणेकामी शिर्डी व शिर्डी परिसरातील सदरचे काम करणा-या पुवरठादारांकडून कोटेशन मागविणेस मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.२३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ साठी संस्थानचे फ्लेक्स बार्डस् व बॅनर्स, शिर्डी व शिर्डी परिसरातील सदरचे काम करणा-या पुरवठादारांकडून कोटेशन मागवून करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं. ४१** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने,चांदी वस्तु कस लावुन तपासणी कामी सराफांची** (Gold Valuer) **नेमणूकीस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील असे नमुद केलेले आहे.

व्यवस्थापन समितीच्या ठराव :- निर्णय क्र.९२३ दि.०९ ऑक्टोबर,२०१४.

प्रस्ताविक: संस्थानला दक्षिणापेटीमध्ये व लेखाशाखेत समक्ष देणगी स्वरुपात येणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तुअलंकाराची कस लावून तपासणी करून बाजारभावाने किंमत लावणे याकामी, मा.व्य.स. निर्णय क्र.९२३/ दि.०९.१०.२०१४ अन्वये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देवून सराफांची (Gold Valuer) दि.०१.०३.२०१५ ते दि.२८.०२.२०१६ अखेर एक वर्ष कालावधी करीता खालील प्रमाणे नेमणूक करण्यात आली होती.

| अ.नं. | सराफाचे नाव व ठिकाण | मानधन | पुढील कालावधी करीता |
|---|---|---|---|
| ०१ | श्री ज्वेलर्स संगमनेर | रू.१५१/- प्रतिमाह | संम्मती पत्र आले आहे. |
| ०२ | श्री लक्ष्मी अलंकार, शिर्डी | रू.१५१/- प्रतिमाह | संम्मती पत्र आले आहे. |
| ०३ | श्री.गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी | रू.३,०००/-प्रतिमाह | संम्मती पत्र आले आहे. |
| ०४ | श्री.खरोटे ज्वेलर्स, मनमाड | रू.३,०००/-प्रतिमाह | करण्यास असमर्थ |

सदर मुदत दि.२८.०२.२०१६ संपुष्टात येत आहे. यापैकी अ.नं.०४ व्यतिरिक्त इतर तीनही सराफ पुढील कालावधी करीता सोने चांदी कस लावून तपासणीसाठी तयार आहेत.

१. उपरोक्त सराफांची नेमणूक वर्तमान पत्रांनमध्ये विहित पध्दतीने जाहिरात देवून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरून झालेली आहे.

२. मागील आर्थिक वर्षात सर्व सराफांचे वार्षिक मानधन रू.७३,९६३/- इतके होते.

३. पुढील आर्थिक वर्षासाठी अ.नं.०४ वगळता ३७,९६३/- इतका नियोजीत खर्च आहे.

**मागणी**- देणगी स्वरुपात येणा-या सोने-चांदीच्या वस्तुअलंकाराची कस लावून तपासणी करुन बाजारभावाने किंमत लावणेकामी मागील वर्षी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून एक वर्ष कालावधीकरीता नेमणूक करण्यात आलेल्या सराफांचे मागील वर्षाचे कामकाज समाधानकारक आहे. पैकी अ.नं.०४ वगळता उर्वरीत श्री.गणेश नागरे, शिर्डी व श्री.बाळासाहेब नागरे, शिर्डी या सराफांची पुर्वीच्याच मानधन व अटी/ शर्तीवर दि.०१.०३.२०१६ ते दि.३१.०३.२०१७ या कालावधीकरीता मुदतवाढ देणेस व त्याकरीता येणा-या वार्षिक रु.३७,९६३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीच्या सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने, चांदीच्या वस्तुंची कस लावुन तपासणी करणेकामी श्री.गणेश नागरे, शिर्डी, श्री.बाळासाहेब नागरे, शिडी व श्री.सुधीर वडनेरे, संगमनेर या सराफांना (Gold Valuer) पुर्वीच्याच मानधन व अटी शर्तीवर दि.०१.०३.२०१६ ते दि.३१.०३.२०१७ या कालावधी करीता मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या वार्षिक रु.३७,९६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

विषय नं. ४२ **संस्थान वाहनाचे टायर्स विहीत पध्दतीने रिमोल्डींग करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम-२००४ मधील तरतुद**:- १७ (२) (झ) मध्ये सर्व साधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

**प्रस्ताविक**:- वाहन विभागाकडील टाटा व अशोक लेलॅण्ड कंपनीच्या स्कुल बसेसचा वापर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम सुकुलचे विद्यार्थी शाळेत ने-आण करणे कामी होत आहे. आयशर कंपनीच्या प्रवासी बसेसचा वापर श्रीसाई आश्रम व श्री साई बाबा भक्तनिवास स्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदिर परिसर व श्री साई प्रसादलय येथे ने-आण करणे कामी होत आहे. दोन टाटा-४०७ कंपनीच्या टेम्पो मालवाहतुक वाहनांचा वापर आरोग्य विभागाकरीता संस्थान परिसरातील कचरावाहतुकी करीता व विविध विभागांचे मागणीनुसार मालवाहतुकी करीता होत आहे. तसेच ट्रॅक्टर वाहनांचा वापर विविध विभागांचे मागणीनुसार मालवाहतुकी करीता करण्यात येतो. सदर वाहनांची सततच्या वापराने टायर्सची झिज झालेली आहे. प्रस्तुतचे काही टायर्स वाहना सोबतचे आहेत काही सन-२०१३-१४ मध्ये खरेदी केलेले आहेत. तर काही टायर्स एक वेळा सन-२०१४ मध्ये रिमोल्डींग केलेले आहे. वाहनास नवीन टायर्स बसविलेनंतर सर्व साधारणपणे अंदाजे ५५ ते ६० हजार कि.मी. प्रवास होऊ शकतो. टायर रिमोल्डींग केलेनंतर २५ ते ३० हजार कि.मी.प्रवास होवु शकतो. यामध्ये टायर मधील हवेचा दाब, रस्त्याची स्थिती, ड्रायव्हर कौशल्य इ. गोष्टीमुळे रिमोल्डींग टायर्सचे लाईफ कमी अथवा अधिक होवु शकते. वाहनाचा जुने खराब झालेले टायर्स सर्व साधारणपणे दोन वेळेस रिमोल्डींग करुन वापरण्यात येतात. त्यानुसार, रिमोल्डींग करुन घ्यावयाच्या टायर्सचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | वाहन प्रकार | टायर साईज | संख्या |
|---|---|---|---|
| 01 | टाटा कंपनीच्या स्कुल व प्रवासी बसेस | 09:00:20 | 28 |
| 02 | टाटा कंपनीच्या स्कुल व प्रवासी बसेस | 10:00:20 | 12 |
| 03 | आयशर व अशोक लेलॅंड कंपनीच्या बसेस | 07:50:16 | 27 |
| 04 | टाटा-४०७ मालवाहतुक वाहने | 08:25:16 | 04 |
| 05 | स्वराज ट्रॅक्टर | 14:09:28 | 02 |
| | | **एकुण संख्या** | **73** |

उपरोक्त प्रमाणे वाहनाचे एकुण ७३ टायर्स खराब झाल्याने रिमोल्डींग करुन घेणे आवश्यक आहे. सदर टायर्स रिमोल्डींगचे काम परिसरातील टायर रिमोल्डींग वर्क्स यांचेकडून दरपत्रके बोलावुन टायर्स रिमोल्डींग करुन घेता येईल. या कामी अंदाजे रु.२,९५,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख पंच्यान्नव हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**मागणी**:- तरी वरील प्रमाणे ७३ टायर्सचे रिमोल्डींग काम संस्थानच्या विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व या कामी येणा-या रु.२,९५,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख पंच्यान्नव हजार) पर्यंत खर्चास मान्यता मिळणेस विनंती

निर्णय क्र.२४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनाचे टायर्स रिमोल्डींग करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं. ४३ **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन कार्डियाक रुग्णवाहीका खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम-२००४ मधील तरतुदः- १७ (०२) (झ)

**प्रस्ताविक:-** वाहन विभागाकडे सध्या श्री साईनाथ हॉस्पीटल व श्री साईबाबा हॉस्पीटल चे रुग्णसेवेसाठी एक कार्डीयाक रुग्णवाहीका कार्यरत आहेत.

संदर्भ क्र.१ चे पत्रानुसार वैदयकीय संचालक यांनी त्यांचे पत्रात नमूद केले प्रमाणे पेशंट घेऊन दूस-या हॉस्पीटलमध्ये गेल्यास किंवा मशिन दूरुस्ती करावयाची असल्यास तातडीच्या वेळी अत्यवस्थ रुग्णांना अन्यत्र स्थलांतरीत करावयाची आवश्यकता असूनही, कार्डीयाक ॲम्बुलन्स् उपलब्ध होत नाही. तरी रुग्णांची गैरसोय विचारता घेता, आणखी एका कार्डीयाक रुग्णवाहीकाची मागणी केलेली आहे.

सध्या वापरात असलेली कार्डीयाक रुग्णवाहीका दि.२३.०९.२०१० रोजी खरेदी करण्यात आलेली आहे. त्यावेळेस रक्कम रु.१३,६८,८२०/- मात्र खर्च झालेला होता. आता सर्व वैद्यकीय अत्याधुनिक जीवन रक्षक उपकरणांसह A/C कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणे कामी अत्याधुनिक उपकरणे, त्यांचे पुरवठादार व लागणा-या अंदाजे खर्चाबाबत माहिती मिळणे कामी इकडील विभागाने संदर्भीय अ.न.२ अन्वये वैदकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांना पत्र दिले होते.

संदर्भीय अ.न ३ अन्वये त्यांनी कार्डीयाक रुग्णवाहीका बाबत माहिती दिलेली आहे. त्यानुसार नवीन कार्डीयाक खरेदी कामी अंदाजे रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. तीस लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे कडून A/C कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणे करीता रितसर विधी विभागामार्फत परवानगी साठी सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** सध्या काही वाहन उत्पादीत कंपन्या इनबिल्ट सर्व वैद्यकीय उपकरणांसह रुग्णवाहीका बॉडी बांधणी करुन देत आहोत. त्यांचे मार्फत कार्डीयाक रुग्णवाहीका घेणे संस्थान हिताचे राहील. असे नम्र मत आहे.

**आर्थिक बजेट तरतुद:-** वाहन विभागाकरीता सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षाचे वित्त विभागाकडील अंदाजपत्राका मध्ये नवीन रुग्णवाहीका वाहन खरेदी कामी रक्कम रु.७०,००,०००/- मात्र खर्चाची तरतुद असुन, सदरचा खर्च नवीन रुग्णवाहीका वाहन खरेदी खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**विभागाची मागणी:-** तरी वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये यांचे संदर्भिय मागणी पत्रानुसार वाहन उत्पादीत कंपनीने बॉडी बांधनी तसेच अंतर्गत सर्व कार्डीयाक उपकरणासह एक A/C कार्डीयाक रुग्णवाहीका ई-निविदेव्दारे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम ३०,००,०००/- रुपये (अक्षरी रक्कम रु. तिस लाख रु. मात्र ) चे खर्चास मा.व्यवस्थापन ( त्रिसदस्य ) समिती सभेसमोर विषयाची टिपणी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता उत्पादीत कंपनीने बॉडी बांधनी तसेच अंतर्गत सर्व कार्डीयाक उपकरणांसह एक A/C कार्डियाक रुग्णवाहीका देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारण्यात यावी. याकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं. ४४ **श्री साई प्रसादालय स्टीम बॉयलरकरीता स्पेअरपार्ट खरेदीकरणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14 (भाग 4)** : महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील 14(2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व 21(1-घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक** : सन 1999 पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीचा RXG-4 स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी 2009 पासून नविन प्रसादालय सुरु करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD-850 स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. सन 1999 पासून RXG-4 स्टीम बॉयलरकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट थरमॅक्स कंपनीने झोनप्रमाणे ठरवून दिलेला अधिकृत फ्रॅंचीसला दयावे लागत असल्याने सन 2009 पासून स्टीम बॉयलरची वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेला आहे.

श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन वेळेत देणेकामी दोन्ही स्टीम बॉयलर कार्यान्वित राहणेसाठी आवश्यक स्पेअरपार्ट स्टॉक मध्ये असणे आवश्यक आहे. स्पेअरपार्ट खराब झालेस स्पेअरपार्ट अभावी स्टीम बॉयलर बंद ठेवावे लागतात. तसेच स्पेअरपार्ट ची ऑर्डर दिले नंतर पुरवठादार यांना मटेरियल पाठविणेस बराच कालावधी जातो. त्यामुळे दोन्ही स्टीम बॉयलर करीता आवश्यक स्पेअरपार्ट खरेदीकामी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर यांचेकडून दरपत्रक मागविणेत आलेले असून खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | स्पेअरपार्टचा तपशिल | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | PGRX711400 VALVE, SAFETY | १ | ६४०९.०० | ६४०९.०० |
| २ | TAPE NON ASBESTOSE | १० मी. | ४६४.०० | ४६४०.०० |
| ३ | TEMPERATURE INDICAT | १ | २९६६.०० | २९६६.०० |
| ४ | RTD ASSEMBLY, 5 MT LON | २ | ११०२.०० | ११०२.०० |
| ५ | PGRX711940 ELECTRODE G | २ | १८४९०० | १८४९०० |
| ६ | WATER FILTER TRANSPARENT | १ | ५९३८.०० | ५९३८.०० |
| ७ | PGBR704020 VALVE, BALL RP 3/4 | १ | ४३६४.०० | ४३६४.०० |
| ८ | LIMIT SWITCH 10 A | १ | १२०४.०० | १२०४.०० |
| ९ | SEQUENCE CONTROLLER LFL | १ | ४९१९१.०० | ४९१९१.०० |
| | VAT 12.5 % | | | १००७६.७५ |
| | Packing & Forwarding 4% | | | ३२२४.५६ |
| | एकुण रक्कम | | | ९३९१५.३१ |
| | एकुण पुर्णांकित रक्कम | | | ९३,९१५.०० |
| | अक्षरी रुपये त्र्याण्णव हजार नऊशे पंधरा + वाहतुक खर्च मात्र | | | |

**मागणी**: दोन स्टीम बॉयलर सुस्थितीत ठेवून कार्यान्वित राहणेसाठी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून उपरोक्त प्रमाणे आवश्यक स्पेअरपार्ट खरेदी करणे आवश्यक आहे. अ. नं. ९ मधील स्पेअरपार्ट हे प्रसादालयातील दोन स्टीम बॉयलर व्यतिरिक्त भक्तनिवासस्थान कडे लॉड्री युनिट करीता असलेल्या बॉयलर करीताही उपयोगी पडेल. सदरचे स्पेअरपार्ट थरमॅक्स कंपनीचे डिलर व्यतिरिक्त मार्केटमध्ये इतरत्र मिळत नसल्याने मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करावे लागणार असून त्याकामी रक्कम रु. ९३९१५/- + वाहतुक खर्च येणार आहे. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत** : तरी स्टीम बॉयलरकरीता उपरोक्त तपशिलाप्रमाणे स्पेअरपार्ट मे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. ९३९१५/- + वाहतुक चे खर्चास मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय स्टीम बॉयलरकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु.९३,९१५/- + वाहतुक मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं. ४५ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लॉन्ड्रीचे स्टीम बॉयलरचे सन २०१६-२०१७ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान कडे लॉन्ड्रीतील कॅलेंडर व ड्रायर मशिनला लागणारी स्टीम तयार करणेसाठी 200 किलो क्षमतेचा थरमॅक्स कंपनीचा RXA-2 स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे.

दिनांक 20/05/2007 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 386 अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरीचे (उदा. साई प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअर कंडीशनर, वायुवीजन यंत्रणा वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त् निर्णयानुसार सदर बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात येत आहे. मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट मुदत दि. ३१.०३.२०१६ रोजी पर्यंत आहे.

सन २०१५-१६ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट रु. ३०,५००/-+ सर्व्हिस टॅक्स या प्रमाणे निश्चित करण्यात आलेले होते. आता सन २०१६-१७ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्यामध्ये त्यांनी मागील वर्षाचेच दर रु. ३०,५००/-+ सर्व्हिस टॅक्स या प्रमाणे कळविलेले आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद समोर C.A. No. 9216 of 2014 in PIL No. 18 of 2011 दिनांक 26/09/2014 अन्वये झालेल्या सुनावणीत "वार्षिक मेन्टेनंन्स सर्व्हीस कॉन्टॅक्ट तसेच रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्टॅक्ट हे त्या-त्या मशीनरीचे उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीचे उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांचे अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे " असा आदेश दिलेला आहे.

**मागणी:**- मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे उपरोक्त निर्देशानुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉन्ड्री स्टीम बॉयलरचे दिनांक १.४.२०१६ ते ३१.३.२०१७ या कालावधी साठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देणेकामी रु. ३०,५००/- + सर्व्हिस टॅक्स खर्च येणार आहे. सदरचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय** : तरी दिनांक १.४.२०१६ ते दिनांक ३१.३.२०१७ या कालावधीकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लॉण्ड्री मशिनचे RXA-2 स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट थरमॅक्स कंपनीचे अहमदनगर जिल्हाचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. ३०,५००/-+ सर्व्हिस टॅक्स खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लॉन्ड्रीच्या स्टीम बॉयलरचे दि.०१.०४.२०१६ ते दि.३१.०३.२०१७ या कालावधीकरीता अधिकृत सर्व्हिस डिलर मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करुन घेणेस व त्याकामी येणा-या रु.३०,५००/- + सर्व्हिस टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं. ४६ **श्री साईप्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद- (1) कलम)(2)14 घ – (भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) 21(1)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग संगणकीकृत करुन साईटेक प्रोजेक्ट् तयार करण्यात येऊन या प्रोजेक्टचे डाटा सेंटर हे श्री साई प्रसादालयातील पहिला माळा या ठिकाणी तयार करण्यात आलेले आहे. या ठिकाणी अत्याधुनिक व संवेदनशील मशीनरी (Main Server, Data Storage, Racks, Tape Library, Power Edge Server व आणखी) बसविण्यात आलेले असल्याने येथील मशीनरी विशिष्ठ व स्थिर तापमानाला थंड ठेवाव्या लागतात. या मशीनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवण्याकरीता स्पेशल टाईपचे प्रेसिजन टाईप डाटा सेंटरकरीता व युपीएससाठी एकूण 4 नग डक्टेबल सेंट्रल ए.सी. प्लँट यंत्रणा मे. ब्लु स्टार कंपनीकडून बसविण्यात आलेली आहे.

चालू वर्षी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक 01/06/2015 ते 31/05/2016 या कालावधीकरीता रक्कम रुपये 3,42,215/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/05/2016 रोजी संपत आहे. त्यापुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.

आता, श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी. प्लान्ट् यंत्रणेचे पुढील एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणे आवश्यक असून, या करीता येणाऱ्या अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| Sr. No. | Description | 2015-2016 Amount Rs. | 2016-2017 Appro. Amount Rs. |
|---|---|---|---|
| 01 | Annual Compressive Maintenance Contract of air conditioning/ other equipments at Shri Sai Prasadalaya & Sai Ashram (As per list attached) | 3,42,215/- | 4,00,000/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी. प्लान्ट् यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये 4,00,000/- (अक्षरी रुपये चार लाख) मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**मान्यता** : प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

**विभागाचे स्पष्ट मत** : श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी. प्लान्ट् यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकरीता येणाऱ्या 4,00,000/- मात्रचे खर्चास, कामांस व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा नोटीस अपलोड करुन, ई-निविदा मागविणेस मा. त्रिसदस्यीय समितीची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी. प्लान्ट् यंत्रणेचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकरीता येणाऱ्या 4,00,000/- मात्रचे खर्चास व उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथील साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी. प्लॅंट यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं. ४७ **एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास व उच्च न्यायालयाचे निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल,श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा याठिकाणीच्या इमारतींना वीजपुरवठयाकरीता स्वतंत्र आठ ठिकाणी सबस्टेशन उभारुन विद्युतपुरवठा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या तातडीच्या वीजपुरवठयासाठी प्रत्येक ठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरचे जनरेटर सेट ऑपरेटींग करणेकरीता स्वतंत्र ए.एम.एफ.पॅनेल बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा व जनरेटरचा वीजपुरवठा वरील इमारतींना पुरविणेकरिता मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहेत. संस्थानमध्ये आजपर्यंत विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमध्ये ८०० ॲम्पीअर ते २००० ॲम्पीअर कॅपॅसिटीचे एल.अँड.टी. कंपनीचे व सिमेन्स कंपनीचे प्रत्येकी रु. १,३०,०००/- ते रु. ४,५०,०००/- किंमतीचे एकुण ९२ नग एअर सर्कीट ब्रेकर बसविण्यात आलेले आहेत.

जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमधील एअर सर्कीट ब्रेकर हे वीजपुरवठा चालू बंद होण्याच्या वेळेस म्हणजेच जनरेटर सेट चालू बंद होण्याच्या वेळेस कंट्रोल सर्किटव्दारे ऑटोमॅटीक ON/ OFF होतात. त्याचप्रमाणे मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमधील एअर सर्किट ब्रेकर हे Manually ON/ OFF करावे लागतात. सततच्या ON/ OFF होण्याच्या क्रियेमुळे एअर सर्कीट ब्रेकर मधील कॉन्टॅक्ट ब्रेकरचे स्क्रू, नट, बोल्ट, कनेक्टर स्प्रिंग हे लूज होत असतात. तसेच ब्रेकर ज्याठिकाणी सप्लायला जोडला जातो त्याठिकाणी स्पार्किंग होऊन कॉन्टॅक्ट झिजतात व कॉन्टॅक्टवर कार्बन जमा होत असतो. त्यामुळे कधी कधी ब्रेकर चालू/ बंद होण्यास व सप्लाय त्यामधून पुढे जाण्यास अडथळा येऊ शकतो. त्याचप्रमाणे एखादया मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल अथवा ए.एम.एफ.पॅनेल मधील एअर सर्किट ब्रेकर पासून पुढे जोडलेला एखादा मेनस्वीच अथवा विद्युत उपकरण अथवा मेनस्वीच भूसंपर्कित झाल्यास एअर सर्कीट ब्रेकर मधून क्षमतेपेक्षा जास्त वीज प्रवाह वाहतो त्याकरीता पुढील हानी व धोका टळण्यासाठी एअर सर्कीट ब्रेकरमधील Over current & Earth fault सेंन्सर कार्यान्वित होऊन वीजपुरवठा आपोआप खंडीत होतो. त्यामुळे पुढील हानी अथवा धोका टळत असतो. संस्थानमधील काही ठिकाणचे एअर सर्किट ब्रेकर हे २२ वर्षापुर्वी बसविलेले आहेत. वरील सर्व कारणांमुळे एअर सर्किट ब्रेकरमार्फत वीजपुरवठा करण्यास काही अडथळा येऊन नये. याकरीता सदरच्या एअर सर्किट ब्रेकरची नियमित सर्व्हिसिंग करावी लागते. सर्व्हिसिंगचे वेळेस खराब झालेले कॉन्टॅक्ट व ब्रेकरच्या आतील मेकॅनिझमचे सदोष पार्ट बदलून एअर सर्किट ब्रेकरची सर्व्हिसिंग करण्यात येते.

यापुर्वी सन २०१४-२०१५ या वर्षाकरीता एअर सर्किट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी विद्युत विभागामार्फत रक्कम रु. १३,८०,०००/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. याकामी संस्थानमार्फत मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दर असलेले मे.केलव्होल्ट (इं) प्रा.लि., मुंबई यांना संस्थानचे ९२ नग एअर सर्किट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी रु. १०,००,०००/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. मे.केलव्होल्ट (इं) प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेल्या एअर सर्किट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची मुदत दि.३० सप्टेंबर, २०१५ रोजी संपलेली असून वर्षभरात त्यांनी संस्थानला उत्तमरित्या सर्व्हीस दिलेली होती.

वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट द्यावयाच्या एअर सर्किट ब्रेकरचा तपशील खालीलप्रमाणे.

**०१). L & T कंपनीचे Air Circuit Breaker**

| Sr. No. | Description | Nos. |
|---|---|---|
| **Regular preventive maintence of following Low Voltage Air Circuit Breaker** | | |
| 1 | L & T make 800 A 3 Pole Air Circuit Breaker | 44 Nos. |
| 2 | L & T make 1000 A 3 Pole Air Circuit Breaker | 10 Nos. |
| 3 | L & T make 1000 A 4 Pole Air Circuit Breaker | 04 Nos. |
| 4 | L & T make 1600 A 3 Pole Air Circuit Breaker | 10 Nos. |
| | **Total :-** | **68 Nos.** |

**०२). Siemens कंपनीचे Air Circuit Breaker**

| Sr. No. | Description | Nos. |
|---|---|---|
| **Regular preventive maintence of following Low Voltage Air Circuit Breaker** | | |
| 1 | Siemens make 800 A 4 Pole Air Circuit Breaker | 10 Nos. |
| 2 | Siemens make 1000 A 4 Pole Air Circuit Breaker | 04 Nos. |
| 3 | Siemens make 1600 A 4 Pole Air Circuit Breaker | 08 Nos. |
| 4 | Siemens make 2000 A 4 Pole Air Circuit Breaker | 02 Nos. |
| | **Total :-** | **24 Nos.** |

उपरोक्तप्रमाणे एल.अँड टी.कंपनी व सिमेन्स कंपनी असे दोन्ही कंपन्यांचे एकुण ९२ नग ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-११-२०१५ चे सभेतील विषय क्र.४९ निर्णय क्र.५६७ नुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १३,८०,००००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. तसेच तत्पुर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे मंजूर झालेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-११-२०१५ रोजीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०१ निर्णय क्र.५८४ नुसार मशिनरींच्या AMC / CMC संदर्भात पुढीप्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

(१). पी.आय.एल.१८/२०११, सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१९ / २०१४ वर मा.औरंगाबाद खंडपीठाने दि.२६-०९-२०१४ रोजी पुरवठाधारक कंपन्यांबरोबर त्याच अटी/ शर्तीवर AMC/ CMC कराराचे नुतनीकरण करावयाचे असल्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. याबाबत खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

d. In case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/ sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions.

यापुढे कोणत्याही मशिनरी/ साहित्याची AMC/ CMC करतेवेळी मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यवाही करणेत यावी. त्याअनुषंगाने AMC / CMC बाबत पूर्वी झालेले निर्णय रद्द करणेसाठी समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावेत. असा निर्णय झाला आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-११-२०१५ चे सभेतील विषय क्र.४९ निर्णय क्र.५६७ चा निर्णय रद्द होऊन आता उपरोक्त मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार

०१). अ.क्र.०१ मधील एल.अँड टी.कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर्सचे AMC देणेकामी एल.अँड टी.कंपनीला पत्र पाठवुन त्यांचेकडुन दरपत्रक मागविणेस मान्यता मिळणेस,

तसेच

०२). अ.क्र.०२ मधील सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर्सचे AMC देणेकामी सिमेन्स कंपनीला पत्र पाठवुन त्यांचेकडुन दरपत्रक मागविणेस मान्यता मिळणेकरीता मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.०१ व ०२ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं. ४८** **पाणी पुरवठा विभागाकरीता भाडोत्री जनरेटरसेट लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

सध्या पाणी टंचाई परिस्थिती असल्याने पाणीपुरवठा विभागास संस्थानला टँकरव्दारे पाणीपुरवठा करावा लागणार असल्याने टँकर भरावयाच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युत पुरवठा नसल्यास सदर ठिकाणी मोटास पंपसेटला वीजपुरवठा करणेकरीता विद्युत विभागामार्फत २० केव्हीए जनरेटरसेट उपलब्ध करून देणेविषयी मागणी केलेली आहे. संस्थानकडे २० केव्हीए जनरेटरसेट उपलब्ध नसल्याने याकामी जनरेटर पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवून मोटार पंपसेटचे पर्यायी वीजपुरवठयाकरीता भाडोत्री जनरेटर लावावा लागणार आहे.

**अ).** भाडे तत्त्वावर लावाव्या लागणा-या जनरेटरसेटचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | दर (प्रति दिन) | एकुण दिवस | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ ) | ट्रॉली माऊंटेड २० केव्हीए जनरेटरसेट प्रति दिन भाडेतत्त्वावर पुरविणे. (डिझेल संस्थानमार्फत पुरविले जाईल) | रु. १,२००/- | ४० दिवस | रु. ४८,०००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४८,०००/-** |

**(ब).** सदरच्या जनरेटरसेटकरीता संस्थानमार्फत डिझेल पुरविण्यात येणार आहे. २० केव्हीए जनरेटरकरीता तासाला अंदाजे ३ लिटर डिझेलची आवश्यकता असते. सदरचा जनरेटर हा एका दिवसामध्ये साधारणत: १२ तास चालल्यास एका दिवसाकरीता १२ तास x ३ लिटर प्रति तास याप्रमाणे ३६ लिटर डिझेलची आवश्यकता आहे. पाणीपुरवठा विभागाच्या मागणीनुसार सदरचा जनरेटर हा ४० दिवसांकरीता वापरण्यात येणार असल्याने एका दिवसाकरीता ३६ लिटर डिझेल याप्रमाणे ४० दिवसांकरीता एकुण १४४०लिटर डिझेलची आवश्यकता आहे. सदरच्या डिझेलच्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. (जनसेट प्रत्यक्ष वापरानुसार हे प्रमाण कमी जास्त होऊ शकते.)

| अ.क्र. | तपशील | एकुण डिझेल | डिझेलचा दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ ) | डिझेल (सदरचे डिझेल संस्थानमार्फत पुरविण्यात येणार आहे.) | १४४० लिटर | रु. ५१/- | रु. ७३,४४०/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | रु. ७३,४४०/- |

उपरोक्त (अ) प्रमाणे पाणीपुरवठा विभागाकरीता भाडे तत्त्वावर २० केव्हीए जनरेटरसेट लावणेकरीता जनरेटर पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागविणेकामी अंदाजे रक्कम रु. ४८,०००/- तसेच (ब) प्रमाणे सदरच्या जनरेटरकरीता संस्थानमार्फत पुरविण्यात येणा-या डिझेलकरीता अंदाजे रक्कम रु. ७३,४४०/- याप्रमाणे दोन्ही खर्च मिळून एकत्रित रक्कम रु.१,२१,४४०/- इतका खर्च येणार आहे. सदरील कामास व खर्चास व खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.२४७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा विभागाकरीता भाडे तत्त्वावर २० केव्हीए जनरेटरसेट लावणेकरीता जनरेटर पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागविणेकामी अंदाजे रक्कम रु.४८,०००/- तसेच सदरच्या जनरेटरकरीता संस्थानमार्फत पुरविण्यात येणा-या डिझेलकरीता अंदाजे रक्कम रु.७३,४४०/- याप्रमाणे दोन्ही खर्च मिळून एकत्रित रक्कम रु.१,२१,४४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणेत आली.**

आयत्या वेळेचा

विषय नं०१. **श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे व श्री.आण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचे विरुध्द मा.कोर्टात मनाई हुकूमाचा दावा दाखल करणेबाबत.**

प्रस्ताव- मौजे कनकुरी येथील गट नं. १२१/ब/१ पैकी क्षेत्र ०० हे. ७६ आर व गट नंबर १२१/अ/२ क्षेत्र ०० हे ७४ आर एकुण १ हेक्टर ५० आर क्षेत्र श्री बाबासाहेब रामभाऊ डांगे यांचेकडून संस्थानने दि.१३/०३/२००८ रोजी खरेदी केले आहे. तसेच गट नं. १२१/अ/३ पैकी क्षेत्र ०० हे. ७९ क्षेत्र श्री आण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचेकडून खरेदी केले आहे.

श्री आनंद जी. महिंद्रा, चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा यांनी मौजे कनकुरी येथील गट नं. १२१ पैकी मधील संस्थानचे २ हे. २९ आर जागेत नविन ३६ एम.एल. क्षमतेच्या साठवण तलावाची निर्मीती करुन देणेची तयारी दर्शविलेली असून त्याकामी मा. व्यवस्थापन समितीचे सर्क्यलेशन अजेंडा ने मान्यता घेतलेली आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालय, कनकुरी यांनी दि.२६/०१/२०१६ रोजीचे सभेतील ठराव नं. १६ अन्वये नाहरकत ठराव दिला आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालय, कनकुरी यांनी दि.०२/०३/२०१६ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. नाशिक यांना दिलेल्या पत्राने गट नं. १२१ पैकी या जागेत तलाव बांधण्यासाठी त्यांची सहमती असल्याचे व कुठलीही हरकत नसल्याचे तसेच आवश्यक ते सहकार्य व कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यास कटीबध्द असल्याचे पत्र दिले आहे. त्यानुसार दि. २१/०३/२०१६ रोजी सदर कामाचे भूमी पुजन होवून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे. तथापी श्री बाबासाहेब रामभाऊ डांगे व श्री आण्णासाहेब रामभाऊ डांगे हे दि.२१/०३/२०१६ पासून वेळोवेळी कामकाजात काहीन काही आडथळा आणत आहेत.

आज दि.०१/०४/२०१६ रोजी संध्याकाळी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसह तलावाच्या कामकाजाची पहाणी करणेकामी गेलो असता श्री बाबासाहेब रामभाऊ डांगे व श्री आण्णासाहेब रामभाऊ डांगे हे हजर होते. यापुर्वी दि.२१/०३/२०१६ पासून ते वेळोवेळी कामकाजात काहीन-काही आडथळा आणत आहेत. त्यांच्या वारंवार होणा-या अडथळयामुळे तलावाचे कामकाजात व कामाच्या प्रगतीत अडथळा निर्माण होत असल्याने श्री बाबासाहेब रामभाऊ डांगे व श्री आण्णासाहेब रामभाऊ डांगे विरुध्द मा. कोर्टात मनाई हुकूम दावा दाखल करणेकामी व याकामी येणारे सर्व समावेशक खर्चाचे मान्यतेसाठी व निर्णयासाठी सादर.

निर्णय क्र.२४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे व श्री.आण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचेविरुध्द राहाता व कोपरगाव येथील मा.कोर्टात कॅव्हेट दाखल करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **साईसहवास क्र.०१ व ०२ इमारतीमधील अधिकारी व डॉक्टर्स यांची वाहने पार्किंगसाठी शेड उभारणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम २००४ मधिल कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक :** संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७, १०८ व १०९ पैकी मधील जागेत संस्थान नियुक्तीवर असणारे अधिकारी यांचे निवासासाठी तळमजला अधिक दोन मजले अशा दोन इमारतींचे बांधकाम (साईसहवास क्र. ०१ व ०२) सन २००९ मध्ये करणेत आले असून, सदर इमारतीमध्ये उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी, तहसिलदार, राहाता, मुख्यलेखाधिकारी व श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टर यांचे निवासस्थानासाठी सदरहू इमारतीमधील सदनिका देणेत आलेल्या आहेत. सदर इमारतीमध्ये राहणा-यांकरीता पार्किंगची व्यवस्था नसलेने त्यांची वाहने तेथील रस्त्यावर पार्किंग केली जातात.

**मागणी :** साईसहवास क्र. ०१ व ०२ मध्ये राहणारे अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २४/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये १२ चार चाकीसाठी पार्किंग शेडची व्यवस्था करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

**विभागाचा अभिप्राय :** साईसहवास इमारत क्र. ०१ व ०२ मधिल अधिकारी व डॉक्टर यांचे वाहने पार्किंग करणेसाठी इमारतीमध्ये व्यवस्था नसलेने त्यांची वाहने अंतर्गत रस्त्यावर व इतरत्र उभी असतात. उपरोक्त मागणीनुसार दि.०५/०२/२०१६ रोजी पाहणी केली असता, सध्याचे गोवरी शेडचे लगतचे जागेवर १२ चारचाकी वाहनांसाठी २३०.३२ चौ. मी. क्षेत्रफळ असलेले पार्किंग शेडची उभारणी करता येईल. त्यासाठी इकडील विभागामार्फत सन २०१५-१६ चे जिल्हादरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.८,६९,९६५/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

विषयांकीत कामासाठी येणारा खर्च हा रु.१० लक्ष पेक्षा कमी असलेने त्यास मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीची आवश्यकता नाही. तसेच सदरचे काम हे संस्थान परिसरात करावयाचे असलेने त्यास शासनाचे मान्यतेची आवश्यकता नाही.

तरी याकामी येणारे अंदाजे रु.८,६९,९६५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईसहवास क्र.०१ व ०२ इमारतीमधील अधिकारी व डॉक्टर्स यांची वाहने पार्किंगसाठी शेड उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.८,६९,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **राज्य अतिथी यांचे राजशिष्टाचाराबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद** - महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक** – मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७.

**प्रस्ताविक** – श्री.कुंदन सोनवणे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे दिनांक २१.०३.२०१६ चे पत्रात, "उपरोक्त विषयान्वये भारत सरकार व राज्य सरकार यांचे मंत्री महोदय, व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी हे राज्य अतिथी म्हणुन श्री साईबाबा यांचे समाधीस्थळाचे दर्शनास येत असतात. सदर राज्य अतिथी यांची मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे आदेशानुसार राजशिष्टाचार अंतर्गत दर्शन, आरती, पुजाची व्यवस्था ही संस्थान मार्फत करावयाचे असतात परंतु सदर व्यवस्था आपल्याकडून होत नाही. सदर मान्यवर हे राज्य अतिथी असल्याने त्यांना दर्शन, आरती, पुजा करीता पास काढण्याचे शुल्कासाठी स्वतंत्र असा निधी शासनाकडून उपलब्ध होत नसल्याने सदर मान्यवरांची व्यवस्था ही नेमुण दिलेले संपर्क अधिकारी यांना स्वखर्चातून करावी लागते. त्यामुळे आपणास मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी आदेशीत करुनही पासेसची व्यवस्था संपर्क अधिकारी यांना स्वखर्चातून करावी लागते आहे. त्यामुळे शासकीय दौ-यात असलेले सर्व राज्य अतिथी यांना उक्त सोई-सुविधा विनामुल्य उपलब्ध होणे आवश्यक असल्यामुळे श्री साईबाबा संस्थान यांचे त्रिसदस्यीय समिती पुढे ठरावासाठी प्रस्तावित करणेस विनंती आहे." असे कळविलेले आहे.

याबाबत इंटरनेटवरुन माहिती घेतली असता श्री.एस.राजशेखर, एम.एस.सी. एम.एड., वरिष्ठ संचालक (प्रशिक्षण समन्वय) यांचे शिष्टाचार या पुस्तकात शिष्टाचाराबाबत खालील प्रमाणे माहिती प्राप्त झालेली आहे.

भारत सरकार, इतर राज्य सरकारांचे आणि जे पाहुणे म्हणुन मानले जातात अशा मान्यवरांचा समावेश पुढीलप्रमाणे राहील.

खालील मान्यवरांना त्यांच्या कार्यालयीन अथवा बिगर कार्यालयीन भेटी दरम्यान राज्याचे मान्यवर पाहुणे म्हणुन वागणुक देण्यात यावी.

१. भारताचे राष्ट्रपती
२. भारताचे उपराष्ट्रपती
३. भारताचे पंतप्रधान
४. भारताचे मुख्य न्यायाधिश
५. केंद्र शासित सह इतर सर्व राज्यांचे राज्यपाल
६. भारताचे माजी राष्ट्रपती
७. भारताचे माजी उपराष्ट्रपती
८. भारताचे माजी पंतप्रधान
९. भारताच्या सर्व सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधिश
१० लोकसभेचे सभापती, उपसभापती आणि राज्य सभेचे उपाध्यक्ष
११. क्रेंद्रातील मंत्री, राज्यांचे मंत्री आणि क्रेंद्रातील कॅबिनेट दर्जाच्या खात्यांचे उपमंत्री
१२. उपाध्यक्ष आणि नियोजन आयोगाचे सर्व सदस्य
१३. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री आणि इतर उपमुख्यमंत्री
१४. भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि भारताचे पंतप्रधान यांच्या समवेत असलेले वैयक्तिक व्यक्ती
१५. इतर राज्यांच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधिश
१६. इतर राज्यांच्या विधान सभांचे सभापती
१७.निवडणूक आयोगाचे प्रमुख

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ मध्ये मोफत दर्शन/आरती व्यवस्था कोणत्या व्यक्तींची करावयाची आहे याबाबत निर्णय झालेला असून यामध्ये, "भारतीय गणराज्याचे मा.राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.उप राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मा.उप पंतप्रधान, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, भारतीय गणराज्याचे भूतपुर्व मा.राष्ट्रपती व मा.उप राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे भूतपूर्व पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधीश, लोकसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, सर्व राज्यांचे राज्यपाल, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधीश, महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य विधान सभा अध्यक्ष व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे सर्व न्यायाधीश आदि अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था निशुल्क राहील." असे नमुद आहे. त्यानुसार जनसंपर्क विभागाकडून कार्यवाही करण्यात येते. मात्र मा.जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांचे आदेशानुसार राजशिष्टाचार अंतर्गत दर्शन, आरती, पुजाची व्यवस्था ही संस्थान मार्फत विनामुल्य करणेबाबत सदर ठरावामध्ये नमुद नाही.

**मागणी** – महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या सर्व राज्य अतिथींना दर्शन/आरती व्यवस्था संस्थानकडून विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत.

**अनुमान** - मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ मध्ये मागणी केलेल्या व्यक्तींपैकी काही व्यक्तींचा समावेश असल्याने सदर विषयास शासनाची अथवा उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**– मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ मध्ये निशुल्क दर्शन/आरती व्यवस्था कोणत्या व्यक्तींची करावयाची आहे याबाबत निर्णय झालेला आहे. मात्र शिष्टाचारामध्ये सामावेश असलेल्या मान्यवर व्यक्तींपैकी ज्या मान्यवरांचा सामावेश मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ मध्ये नाही अशा व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ मध्ये नमुद सर्व मान्यवरांची (३+१=४) फक्त चार व्यक्तींची दर्शन/आरतीची निशुल्क व्यवस्था करणेस व महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या सर्व राज्य अतिथींना दर्शन/आरती व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

निर्णय क्र.२५० **या समितीने विस्तृत चर्चा करुन व सखोल विचारांती दि.१४.११.२०१३ रोजी निर्णय क्र.९०७ घेतलेला आहे. त्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता समितीस वाटत नाही. सबब दि.१४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०७ प्रमाणेच पुढे कार्यवाही चालू ठेवणे उचित होईल, असे समितीला वाटते व त्याप्रमाणे समितीने निर्णय घेतला.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.०४** **चवळी, हरभरा, काळेमिरे, गहू, तांदूळ, व हरभराडाळ या किराणा मालाची मागणी पूर्ण झाल्याने वार्षिक मागणीच्या २५% मालाची तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून मंजुर दराने किराणामाल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानने सन २०१५-१६ सालासाठी जून-ते मार्च २०१५-२०१६ या कालावधीत किराणा माल खरेदीकामी मालाचे पुरवठा आदेश दिले होते. त्यातील चवळी, हरभरा, काळेमिरे, गहू, तांदूळ, व हरभराडाळ या मालाची वार्षिक मागणी पूर्ण झालेली आहे. तसेच संस्थानने सन २०१५-१६ सालासाठी जुन-२०१५ ते मार्च-२०१६ या कालावधीसाठी दिलेल्या किराणामालाच्या पुरवठा आदेशाचा कालावधी मार्च २०१६ अखेर संपत आहे.

संस्थानने पुरवठा आदेश दिलेल्या किराणा मालाची वार्षिक मागणी विहित वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास, संस्थानने संबंधित पुरवठाधारकांशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक ८ मध्ये "प्रसंगी निविदा कालावधीत व तदनंतरही नमुद केलेल्या मालापेक्षा २५% इतका जादा माल मंजुर दरानेच पुरविणे बंधनकारक राहील." अशी तरतूद आहे.

मार्च-२०१६ महिन्यासाठी किराणामाल मागविणेत आलेला आहे. तथापि पुढील वर्षाची किराणामाल खरेदी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी किराणामाल आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणे गरजेचे आहे. खालील सहा (६) Items ची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. त्यामुळे तूर्त वार्षिक मागणीच्या २५ टक्के हा माल खरेदी करता येईल.

सदर मालाची वार्षिक मागणी, २५ टक्के मागणी, येणारा खर्च याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मालाचा तपशिल | वार्षिक मागणी क्विं. | २५% जादा मागणी क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल | २५% जादा खरेदीकामी येणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | चवळी | १०० | २५ | ५,३४६.०० | १,३३,६५०.०० |
| २ | हरभरा | ७०० | १७५ | ४,६८८.०० | ८,२०,४००.०० |
| ३ | काळेमिरे | १.२० | ०.३० | ६३,९००.०० | १९,१७०.०० |
| ४ | गहू | ५,००० | १,२५० | २,१२१.०० | २६,५१,२५०.०० |
| ५ | तांदूळ | ७,२५० | १,८१२.५० | २,९७५.०० | ५३,९२,१८७.५० |
| ६ | हरभराडाळ | ९,६०० | २,४०० | ५,५१७.०० | १,३२,४०,८००.०० |
| | | | | एकुण खर्च रु. | २,२२,५७,४५७.५० |
| | | | | पुर्णांकित रक्कम रु. | २,२२,५७,४५८.०० |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे वार्षिक मागणीपेक्षा २५% इतका जादा किराणा माल खरेदीकामी एकुण रक्कम रु.२,२२,५७,४५८/- (अक्षरी रुपये दोन कोटी बावीस लाख सत्तावन्न हजार चारशे अठ्ठावन्न मात्र) एवढा खर्च येईल.

प्रसादालयाकडून या मालाची मार्च २०१६ पर्यंत अंदाज करुन वार्षिक मागणी कळविण्यात आली होती. त्याप्रमाणे माल खरेदी केलेला आहे. तथापि साईभक्तांना दयावयाच्या प्रसादभोजनासाठी पुढील कालावधीसाठी या मालाची गरज भासेल म्हणून २५% माल मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. तथापि यापैकी प्रसादालयाकडून प्रत्यक्षात मागणी नोंदविलेप्रमाणेच आवश्यक माल खरेदी करण्यात येईल.

संस्थानला सन २०१५-१६ करीता वार्षिक किराणा माल व भाजीपाला खरेदीकामी C.A. क्रमांक ३४९६ अन्वये (गावरान तुप वगळता) अंदाजे रक्कम रु.४९,२२,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास कोटी बावीस लाख मात्र) चे खर्चाला दिनांक १३.०३.२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. यातून जुन-२०१५ ते फेब्रुवारी-२०१६ अखेर किराणामालासाठी रु.२५,८९,०९,७४९/- + एप्रिल-२०१५ ते २१.०२.२०१६ अखेर भाजीपाला खरेदीकामी रु.८५,३५,६४६/- असा एकुण रक्कम रु.२६,७४,४५,३९५/- (अक्षरी रुपये सव्वीस कोटी चौ-याहत्तर लाख पंचेचाळीस हजार तीनशे पंचाण्णव मात्र) खर्च झालेला आहे.

तसेच यामध्ये मार्च-२०१६ या महिन्यासाठी किराणामाल व भाजीपाला खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.६,९०,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी नव्वद लाख मात्र) पर्यंत खर्च येईल. अशी सर्व मिळून खर्चाची एकूण रक्कम रु.३३,६४,४५,३९५/- (अक्षरी रुपये तेहतीस कोटी चौसष्ट लाख पंचेचाळीस हजार तीनशे पंचाण्णव मात्र) इतकी होत आहे. तरीही मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेले रकमेतून उर्वरित रक्कम रु.१५,५७,५४,६०५/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी सत्तावन्न लाख चोपन्न हजार सहाशे पाच मात्र) शिल्लक आहेत.

सध्या सन २०१६-१७ सालाचे किराणा माल व गावरान तूप खरेदीचे खर्चास मान्यता घेणेसाठी सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागाकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून सदर नवीन खरेदीबाबतची कार्यवाही पुर्ण होणेसाठी अंदाजे एप्रिल-२०१६ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मागील पुरवठाधारकांकडूनच मंजुर दराने नवीन ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत किराणामाल घ्यावा लागेल. याकामी अंदाजे रु.७,००,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी) मात्र खर्च येईल. सदरचा खर्च मा.उच्च न्यायालयाने सन २०१५-१६ करीता मान्यता दिलेल्या रक्कम रु.४९,२२,००,०००/- मधील शिल्लक रक्कम रु.१५,५७,५४,६०५/- या रकमेतून करता येईल.

१. चवळी, हरभरा, काळेमिरे, गहू, तांदूळ व हरभराडाळ या मालाच्या एकूण वार्षिक मागणीच्या २५% इतका जादा माल खरेदी करणेस,

२. नवीन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागणीप्रमाणे किराणा माल मागील पुरवठाधारकांकडूनच मंजुर दराने खरेदी करणेस,

वरील अ.नं.१ व २ प्रमाणे मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.२५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. परंतु खरेदी विभागाने नवीन ई-निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५** **सन २०१६-१७ साठी वार्षिक किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी वगैरे साहित्यांचे खरेदीकामी कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१६-१७ चे खरेदीचे वेळी किराणामालाचे नमुने सन २०१४-१५ पर्यंतच्या पद्धतीप्रमाणे कापडी पिशवीमध्ये बोलवायचे, की सन २०१५-१६ चे पद्धतीप्रमाणे बरणीमध्ये बोलवायचे? तसेच Financial Bid अगोदर उघडायचे की नमुने अगोदर निवडून त्याप्रमाणे Financial Bid उघडायचे, याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे दिनांक १९.०३.२०१६ चे टिपणीअन्वये सादर केला होता. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी "चर्चा करा" असे निर्देश दिले होते.

सदर निर्देशास अनुसरुन दि.२९.०३.२०१६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी चर्चा झाली, त्यावेळी मा.प्रशासकीय अधिकारी-खरेदी विभाग, मा.प्रशासकीय अधिकारी-प्रसादालय विभाग व मा.मुख्यलेखाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी मा.मुख्यलेखाधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.११.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक १००१ नुसार "कुठल्याही मालाचे नमुने मागविता येणार नाहीत." प्रत्येक मालाचा एक नमुना आपण निविदाधारकांसाठी निश्चित करुन ठेवावा व त्या नमुन्यासाठी निविदाधारकांकडून दर मागवावेत, अशी सुचना त्यांनी केली होती. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी CVC Guidelines, मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.१००१ व शासनाचा नवीन खरेदी धोरणाचा शासन निर्णय यावर चर्चा होऊन, चर्चेअंती याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे निर्देश दिलेले आहेत.

वरील मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे निर्देशास अनुसरुन किराणामाल खरेदी पद्धतीबाबतची कार्यपद्धती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

संस्थानचे खरेदी विभागामार्फत किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी वगैरे साहित्याची वार्षिक खरेदी केली जाते. याकामी खर्चाला मा.उच्च न्यायालयात मान्यता घेतली जाते. मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ०५.०४.२०१३ चे

निर्देशाप्रमाणे ही खरेदी ई-निविदा पद्धतीने केली जाते. किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी वगैरे सर्व साहित्यांचे नमुनेही दरवर्षी बोलाविले जातात. सन २०१२-१३ पूर्वी आलेल्या नमुन्यांमधून संस्थानचे मा.विश्वस्त नमुने निवड करीत होते. मात्र सन २०१२-१३ पासून राहुरी कृषी विदयापीठातील तज्ञ, संस्थानचे आचारी यांचेमार्फत नमुने निवड केले जातात.

सन २०१४-१५ पर्यंत व सन २०१५-१६ या वर्षासाठी वार्षिक खरेदीचे वेळी किराणा मालाच्या नमुन्याबाबत खालील पद्धतीप्रमाणे कामकाज करण्यात आले होते. त्याचा तपशील खाली "अ" व "ब" मध्ये नमूद केला आहे.

**अ.** सन २०१४-१५ सालापर्यंत सिलबंद कापडी पिशवीत नमुने बोलाविण्यात येऊन प्रथम राहुरी कृषी विद्यापिठातील तज्ञांमार्फत एका वस्तुसाठी साधारण ४-५ नमुने निवड करुन घेण्यात येत होते. नमुने निवडलेनंतर Financial Bid उघडून निवडलेल्या नमुन्यांचे दरांचा तक्ता तयार केला जात होता व पुन्हा सदर दरांबाबत निविदाधारकांशी वाटाघाटी करुन अंतिम दर घेण्यात येत होते. त्यानंतर या अंतिम दरांचा तुलनात्मक विचार करुन न्युनतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येत होते व निवडलेला नमुना पुर्ण निविदा कालावधीकरीता जतन करुन खरेदी केलेल्या मालाची निवड केलेल्या नमुन्याशी पडताळणी केल्यानंतर त्याप्रमाणे माल स्विकारण्यात येत होता.

सदर पध्दतीमध्ये मालाचे नमुने निवडतांना नमुना कुठल्या निविदाधारकाचा आहे, हे राहुरी कृषी विद्यापीठातील तज्ञांना माहित होत नव्हते.

**ब.** सन २०१५-१६ या वर्षासाठी किराणामालाचे नमुने प्लॅस्टिक बरणीमध्ये मागविणेत आले होते. मात्र

यावेळी प्रथम Financial Bid उघडण्यात येऊन राहुरी कृषी विद्यापिठातील तज्ञांमार्फत L1, L2, L3 असे तीन दरांचे Sample मध्ये जो चांगला नमुना आहे, तो निवडण्यात आला होता. तर काही Items च्या बाबतीत L4, L5, L6 हे नमुने सुद्धा निवडण्यात आले होते व निवडलेल्या नमुन्यांचे दरानुसार मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर पुरवठा आदेश देण्यात आले होते. तज्ञांनी निवडलेल्या सर्व मालाचे नमुने जतन करुन त्या नमुन्याशी पडताळणी दक्षता पथकामार्फत करुन आलेला माल सध्या स्विकारण्यात येत आहे.

या पध्दतीमध्ये नमुन्याच्या बरणीवर दर लिहिण्यात आले होते. तसेच बरणीचे सिल थेट कृषी तज्ञांसमोर उघडले होते, बरणीवर निविदाधारकांचे नांव होते, त्यामुळे नमुना कोणत्या निविदाधारकाचा आहे व दर हे दोन्हीही तज्ञांना अवगत होत होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/६/२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ५२६ (१) नुसार दरासाठी चर्चा/वाटाघाटी न करण्याचा निर्णय झाला आहे. त्या अनुषंगाने जा.क्रं.एसएसएस /वशी /आस्था /१८८०/२०१४ दि.४/८/२०१४ अन्वये आदेशही पारीत झालेले आहेत. त्यामुळे ऑक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५ या सहामाही निविदेमध्ये व सन २०१५-१६ या वर्षी किराणामाल वार्षिक खरेदीकामी निविदाधारकांबरोबर चर्चा/ वाटाघाटी झाल्या नाहीत.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.११.२०१४ रोजीचे सभेत, संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध माल, सेवा व इतर अनुषंगीक कामे यासाठी शासनाची नियमावली व निर्णयानुसार निविदा नियमावली लागू करणेबाबत प्रस्ताव लेखाशाखेकडून सादर करण्यात आला होता. यामध्ये अ.नं.२ नमुना निवड पद्धतीबाबत या शिर्षकाखाली आवश्यक मालाचे निविदेमध्ये तपशिलवार Specification न देता निविदा प्रक्रिया सुरु असताना निविदाधारकांकडून नमुने मागविणे व आलेल्या नमुन्यामधून समितीद्वारे पसंत असलेल्या नमुन्यांची निवड करते. सदरील पद्धतीस शासकीय नियमांचा आधार नाही., त्यामुळे तक्रारदारास तक्रारीस वाव राहतो.

यामध्ये केंद्रिय दक्षता आयोगाच्या परिपत्रक No-2EE-1 CTE-3 Govt Of India दिनांक १५.१०.२००३ मध्ये स्पष्ट केलेले आहे की, नमुना निवड पद्धत अवलंबवु नये, त्या ऐवजी निविदेमध्येच मालाचे तपशिलवार Specifications द्यावे व तद्नंतर गरज भासल्यास यशस्वी निविदाधारकाकडुन माल पुरवठ्याच्या वेळी नमुने मागवुन निविदेमध्ये नमुना केलेल्या Specifications शी पडताळून घेऊनच मालाचे आदेश द्यावेत.

वरील बाबींचा विचार करुन "निविदेच्या वेळी निविदाधारकांकडून नमुना मागविण्याची पद्धत बंद करुन केंद्रिय दक्षता आयोगाच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही होऊन निविदेमध्येच मालाचे तपशिलवार Specifications व वर्णन द्यावे. त्यानंतर यशस्वी निविदाधारकांकडुनच माल स्विकारताना Specifications शी पडताळणी करावी व त्याप्रमाणे असल्यास मालाचे आदेश द्यावेत, असे प्रस्तावित करण्यात आले होते." यावर निर्णय क्रमांक १००१ खालीलप्रमाणे झालेला आहे.

निर्णय क्रमांक १००१- उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध माल, सेवा व इतर अनुषंगीक कामे यासाठी शासनाची नियमावली व निर्णयानुसार निविदा नियमावली लागू करणेस मान्यता देण्यात आली.

तथापि सदर प्रस्तावात नमूद केलेले No-2EE-1 CTE-3 Govt Of India दिनांक १५/१०/२००३ चे या कार्यालय निवेदनाचे अवलोकन केले असता "शासनाच्या काही संस्थांना कपडे व इतर टेक्सटाईल आयटेम्सचे खरेदी करतांना आलेल्या तक्रारींवर फक्त कपडयांचे व टेक्सटाईल् आयटेम्सचे नमुने मागवू नयेत यासाठी लागू केलेले आहे." असे दिसते.

महाराष्ट्र शासनाने नवीन खरेदी धोरणासाठी शासन निर्णय क्र. भा.ख.स.२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दिनांक. ३०.१०.२०१५ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची नियमपुस्तिका तयार केलेली आहे. यातील अ.क्रं.५ विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था किंवा राज्य शासनाच्या

मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था, यांना ही नियमपुस्तिका लागू केलेली आहे. म्हणजेच संस्थानलाही ही नियमपुस्तिका या निर्णयान्वये लागू झालेली आहे. सदर शासननिर्णयान्वये उदयोग उर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत असून वरील नियमपुस्तिकेला मान्यता देऊन सर्व खरेदीदार विभागांनी त्यांना लागणा-या वस्तूंची खरेदी या नियमपुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार करावी. असे निर्देश आहेत.

तथापि लेखाशाखेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०.११.२०१५ चे सभेत सदर नियमपुस्तिका लागू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय क्र.५१२ झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे शासनाच्या नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आली व त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत येऊन, संस्थानसाठी विविध खरेदीचे अधिकार या समितीस प्रदान करणेत आले.

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३. | मुख्य लेखा अधिकारी, प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ४. | संबंधित विभागप्रमुख अधीक्षक/प्र.अधीक्षक | सदस्य सचिव" |

सदरचे निर्णयाचे अनुषंगाने जा.क्र.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/३९६६/२०१६ दिनांक १९.०१.२०१६ अन्वये खरेदी समिती स्थापित करुन ही नियमपुस्तिका लागू करण्याचे आदेशही पारीत झालेले आहेत.

संस्थानकडून वरील शासन निर्णयाप्रमाणेच ई-निविदा कार्यपद्धती अवलंबून खरेदी करण्यात येत आहे. तथापि किराणामालाचे अगर इतर कुठल्या मालाचे नमुन्याबाबत यामध्ये मार्गदर्शक तत्वे नाहीत. त्यामुळे संस्थानने CVC Guideline पाळावयाच्या की, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कामकाज करावे, याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. संस्थान सध्या वापरत असलेल्या किराणा मालाच्या नमुना निवड पद्धतीबाबत संस्थानकडे निविदाधारकांकडुन कुणीही लेखी स्वरुपात तक्रारी केलेल्या नाहीत.

मध्यंतरीच्या काळात मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी तिरुमला तिरुपती देवस्थान, तिरुपती येथे किराणामालाचे खरेदीसाठी काय पद्धत वापरली जाते, याबाबतची माहिती घेणेची सुचना दिली होती. त्याप्रमाणे दिनांक २९.०३.२०१६ रोजी श्री.कोदंड रामाराव, महाव्यवस्थापक (खरेदी) यांचेशी दुरध्वनीवरुन खरेदीचे पद्धतीबाबत चौकशी केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

१. मालाच्या उत्पादकांकडून Specifications देऊन ई-निविदा पद्धतीने खरेदी केली जाते.
२. मालाचे Samples मागविले जातात.
३. Lab Test करुन निर्णय घेतला जातो.

**विभागाचा अभिप्राय** - वरील बाबींचा विचार करता, सन २०१६-१७ या वर्षाचे किराणामाल व त्या अनुषंगिक इतर साहित्य खरेदीसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती वापरावी असे वाटते.

१. ई – निविदा प्रक्रिया राबविणे.
२. ई – निविदा प्रक्रियेची मुदत संपल्यानंतर पुढील तीन दिवसांमध्ये नमुने बोलविणे.
३. तांत्रीक निविदा उघडणे, त्यातील पात्र निविदाधारकांना नमुने निवडीच्या वेळी बोलाविणे.
४. किराणा मालाचे नमुने सिलबंद कापडी पिशवीत मागविणे.
५. राहुरी येथील कृषी तज्ञांसमोर नमुना निवडतांना आलेल्या नमुना पिशवीला संस्थानच्या कापडी पिशवीचे कव्हर घालून निविदाधारकांचे पिशवितून नमुना काढून ताटामध्ये तज्ञांसमोर ठेवणे. या प्रक्रियेचे वेळी पारदर्शकता राहण्यासाठी संबंधीत निविदाधारकांना बोलाविणे.
६. तज्ञांनी निवडलेले नमुने संस्थानच्या पिशवीमध्ये बंद करुन बॉक्स मध्ये सिलबंद करणे.
७. Commercial Bid उघडण्याचे दिवशीच वरील नमुन्यांचा सिलबंद केलेला बॉक्स उघडणे, त्यावेळीही निविदाधारकांना बोलाविणे.
८. निवडलेल्या नमुन्यांचा व Commercial Bid मधुन प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणे, त्यावर खरेदी समिती सदस्य व मा.अध्यक्षांच्या स्वाक्ष-या घेणे.
९. अंतीम मंजूर नमुन्यांच्या दोन सिलबंद बरण्या तयार करून एक बरणी संस्थानकडे ठेऊन व एक बरणी निविदाधारकांकडे देणे.
१०. तयार झालेला तुलनात्मक तक्ता अंतिम मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे.

**मागणी** - वरील प्रक्रियेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ साठी वार्षिक किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी वगैरे साहित्यांचे खरेदीकामी संबंधीत विभागाने उपरोक्त प्रस्तावामध्ये अभिप्राय दिल्याप्रमाणे कार्यपध्दती वापरण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव-** अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज सध्या मा.त्रिसदस्य समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ अन्वये समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

" (समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तंकडे पाठवील "

वरील तरतुदीवये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यातील जमा- खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

जमेचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१५-१६ | अंदाजपत्रक २०१६-१७ | | वाढ/घट टक्के |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकुणशी टक्केवारी | |
| १ | प्रारंभीची शिल्लक | १०,०५,००,००० | ११,०५,२०,००० | ०.९४ | ९.९७ |
| २ | देणगीद्वारे मिळणारी अपेक्षित जमा | ४६१,८४,२२,००० | ४६९,९७,६०,००० | ३९.८१ | १.७६ |
| ३ | अपेक्षित महसुली जमा | २२३,७५,२५,००० | २३५,३९,४०,००० | १९.९४ | ५.२० |
| ४ | **एकूण जमा (२+३):-** | **६८५,५९,४७,०००** | **७०५,३७,००,०००** | | |
| ५ | अपेक्षित निर्गतवणूक | २६८,६०,५२,००० | ४६४,०९,४२,००० | ३९.३१ | ७२.७८ |
| | **एकूण अपेक्षित जमा (१+४+५):** | **९६४,२४,९९,०००** | **११८०,५१,६२,१००** | **१००** | **१५** |

खर्चाचे अंदाजपत्रक (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१५-१६ | अंदाजपत्रक २०१६-१७ | | वाढ/घट टक्के |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकुणशी टक्केवारी | |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ४९१,५६,२०,००० | ६५०,१३,५१,००० | ५५.०७ | ३२.२६ |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | ९१,२४,०८,००० | ८३,२८,०३,००० | ७.०५ | -८.७२ |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १,६९,३१,००० | १,६१,३६,००० | ०.१४ | -४.७० |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ३०५,८६,०४,००० | ३६५,४५,१५,१०० | ३०.९६ | १९.४८ |
| ५ | व्यवस्थापन निधीतीलअपेक्षित खर्च | ६३,८४,३६,००० | ६८,९८,३७,००० | ५.८४ | ८.०५ |
| ६ | **एकूण खर्च (१ ते ५) :-** | **९५४,१९,९९,०००** | **११६९,४६,४२,१००** | **१००** | |
| ७ | अंतिम शिल्लक | १०,०५,००,००० | ११,०५,२०,००० | | ९.९७ |
| | **एकूण अपेक्षित खर्च (६ ते ७) :-** | **९६४,२४,९९,०००** | **११८०,५१,६२,१००** | | **२२.४३** |

ब) अधिनियम २००४ चे कलम २२(२) मधील तरतुदींनुसर,"व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासननाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्थापन निधितून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधित जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल"

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधितून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१६-१७ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधितून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहून करता येईल.

सन २००४-०५ ते २००९-१० या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधिमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले होते. त्यास शासन निर्णय क्र. सनसंवि-२००९/५४७/(५७/०९)-का.सोळा दिनांक- २१ऑगस्ट,२०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधिमध्ये वर्ग करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात प्रायोजीत बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार झालेला खर्च हा तरतुदीपेक्षा कमी आहे. सन २०१५-१६ व २०१६-१७ या आथिर्क वर्षासाठी व्यवस्थापन निधितून अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

क) संस्थानच्या विविध विभागांमार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

ड) मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न रु.९४४ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील तीन वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भंडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

तथापि चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५% खर्च व अखर्चित उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रमप्राप्त होईल,अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट "अ" व "छ" म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक यास रुग्णालय विभागासह मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२५३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रकास, मा.अध्यक्ष महोदय व समिति सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती. त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **रुग्णालये विभागाचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज मा. त्रिसदस्य समितीकडे आहे. अधिनियमातील, कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे. "(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील".

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. रुग्णालये विभाग - श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यातील जमा-खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:-

रुग्णालये विभागाचे जमेचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१५-१६ | अंदाजपत्रक २०१६-१७ | | मागील तुलनेत वाढ/घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकुणशी टक्केवारी | रक्कम | वाढ टक्के |
| १ | प्रारंभीची शिल्लक | २२,00,000 | २२,00,000 | - | - | - |
| २ | अपेक्षित भांडवली जमा | निरंक | निरंक | - | निरंक | |
| ३ | अपेक्षित महसुली जमा | ९६,५५,00,000 | १,0२,२२,00,000 | ५0% | ५,६७,00,000 | ६% |
| ४ | संस्थानकडून वर्ग (तुट) | ९२,३५,७0,000 | १,0१,३३,१७,000 | ५0% | ८,९७,४७,000 | १0% |
| | **एकुण अपेक्षित जमा:-** | **१,८९,१२,७0,000** | **२,0३,७७,१७,000** | **१00 %** | **१४,६४,४७,000** | |

रुग्णालये विभागाचे खर्चाचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१५-१६ | अंदाजपत्रक २०१६-१७ | | मागील तुलनेत वाढ /घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकुणशी टक्केवारी | रक्कम | वाढ टक्के |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | २२,६६,00,000 | ३0,५५,00,000 | १५% | ७,८९,00,000 | ३५% |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | ८२,८४,२७,000 | ८४,१६,६७,000 | ४१% | १,३२,४0,000 | २% |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १३,५0,000 | १३,५0,000 | 0.0६% | --- | --- |
| ४ | न्यासाच्या उद्दिष्टांवरील अपेक्षित खर्च | ८३,६0,00,000 | ८८,७0,00,000 | ४४% | ५,१0,00,000 | ६% |
| | **अपेक्षित खर्च** | **१,८९,२३,७७,000** | **२,0३,५५,१७,000** | **१00%** | **१४,३१,४0,000** | |
| | अंतिम शिल्लक | २२,00,000 | २२,00,000 | | --- | |
| | **एकुण अपेक्षित खर्च :-** | **१,८९,४५,७७,000** | **२,0३,७७,१७,000** | | **१४,३१,४0,000** | |

ब) सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करताना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत वेळोवेळी झालेल्या निर्णयांचा विचार करण्यात आला आहे. इतर बाबींसाठी कोणत्याही विभागाने निश्चित तरतूद दर्शविलेली नाही. त्यामुळे उपरोक्त बाबींसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद येईल.

तरी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता असावी, ही विनंती.

निर्णय क्र.२५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालय विभागाच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रकास, मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती. त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचे निलंबन भत्ता अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहित्याचा वापर करणेकरता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रूग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे, अशा व इतर अनेक तक्रारी आल्याने मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. ०३-०८-२०१४ रोजीचे असे ठरले की, डॉ. आर. व्ही. प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांची याप्रकरणी प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांनी चौकशीकरुन अहवाल एक महिन्याचे आत मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर करावा, असे ठरले.

मा. व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना दि. २०-०८-२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. प्राथमिक चौकशीत सकृतदर्शनी डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचेवरील आरोपात तथ्य असल्याचे आढळून आल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६-११-२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९८३ नुसार संदर्भ क्र. ०३ अन्वये डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व संदर्भ क्र. ०४ अन्वये डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर दि. ०६-११-२०१४ रोजी रीतसर आरोपपत्र बजावलेले आहे. तथापि खाते चौकशीत साक्षीदारांवर दबाव आणू नये तसेच कागदपत्रांमध्ये फेरफार, बदल, नष्ट करू नये यासाठी आरोपीत संदर्भ क्र. ०१ अन्वये डॉ. बजाज व संदर्भ क्र. ०२ अन्वये डॉ. वर्मा यांना दि. ०८-११-२०१४ पासून तात्पुरते संस्थान सेवेतुन सेवा निलंबित करण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ०५ अन्वये खाते चौकशी कामी श्री. जे. एल. देशपांडे सा◌ो., पुणे, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक तर संदर्भ क्र. ०६ अन्वये अॅड. श्री. सी. जे. बोरूडे, अहमदनगर यांची संस्थानतर्फे सादरकर्ते अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा हे निलंबन कालावधीत संस्थानचे कार्यालयात उपस्थिती नोंदवीत नाहीत. तसेच निलंबन कालावधीत वरिष्ठांचे पूर्व परवानगीशिवाय विनाकारण मुख्यालय सोडून बाहेर जातात. याबाबत त्यांना दि. २०-०१-२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे की, निलंबन कालावधीत येथूनपुढे नियमितपणे संस्थानचे कार्यालयात उपस्थिती नोंदवावी. तसेच निलंबन कालावधीत खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस किंवा सेवा करत नसलेबाबतचा लेखी अहवाल दरमहा श्री साईबाबा हॉस्पिटलचे एच. आर. विभागात सादर करावा. असे कळवूनही कार्यवाही करत नसल्याचे आढळून आल्याने माहे एप्रिल २०१५ पासून डॉ.बजाज व डॉ. वर्मा यांचा निलंबन भत्ता बंद करण्यात आला आहे.

संस्थान सादरकर्ते अधिकारी यांनी दि. १०-०१-२०१६ रोजी १. डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना माहे एप्रिल २०१५ पासून निलंबन भत्ता देण्यात आलेला नाही. सदरचा भत्ता कायद्याप्रमाणे त्यांना देय्य होतो परंतू याबाबत कामगार न्यायालय व उच्च न्यायालय येथील संस्थान अॅडव्होकेट यांचे लेखी अभिप्राय घ्यावेत. २. श्री साईबाबा संस्थानने दि. ०१.०१.२०१५ पासून सेवाविनीयम लागू केलेले आहेत. याव्यतिरिक्त डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांचे खाते चौकशीकामी दुसरे कोणते नियम लागू होतात काय? याबाबत संस्थान अॅडव्होकेट यांचे लेखी अभिप्राय घ्यावेत. कायदेशिर अभिप्राय मागवून पुढील चौकशी तारीख म्हणजेच दि. ३१-०१-२०१६ रोजी पूर्वी निलंबन भत्ता देणेबाबत तत्काळ कार्यवाही करावी असे सांगितले आहे.

त्याप्रमाणे इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७ए/५९०८/२०१६ दि. २५-०१-२०१६ व एसएसएस/वशी ७ए/५९०९/२०१६ दि. २५-०१-२०१६ अन्वये पत्र पाठवून अनुक्रमे अॅड. अशोकराव पाटील, अहमदनगर व अॅड. आर. एन. धोर्डे, औरंगाबाद यांचे कायदेशिर मत मागविले होते. अॅड. धोर्डे यांनी कायदेशिर मत देणेस नकार दिला तर अॅड. अशोकराव पाटील यांनी संदर्भ क्र. ०७ अन्वये पुढील प्रमाणे कायदेशिर मत दिले आहे.

I have been told that the sansthan has implemented service regulations with effect from 01 Jan 2015. I have seen Shree Saibaba Sansthan Trust (Shirdi) Services (Joining Time and Payments during Suspension, Dismissal and Removal) Regulations, 2013 Chapter 4, Rule no 17 and 18.

It clearly provides for payment of subsistence allowance during disciplinary proceedings against delinquents employee. It also provides that the delinquent employee should give undertaking/ certificate that he is not engaged in any trade, business or employment during

the period of suspension. According it, both delinquent employees are bound to submit a certificate as referred in regulations 18 (3).

It appears on record that both the delinquents are not respecting the said condition precedent therefore it is advisable to communicate this provision and ask them to furnish the certificate as set out in this regulation.

Till then it is not advisable to pay the subsistence allowance to the concerned employee.

Till then it is not advisable to pay the subsistence allowance to the concerned employee.

सादरकर्ते अधिकारी ॲड. सी. जे. बोरुडे यांनी तोंडी सांगितले आहे की, डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना देण्यात येणारा निलंबन भत्ता खाते चौकशी चालू असतांना बंद करणे नैसर्गिक न्याय तत्वानुसार योग्य नाही. चौकशीचे वेळी निलंबन भत्ता अदा न केलेस सदरची चौकशी बेकायदेशिर केल्यासारखे होईल. त्यामुळे डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांचा माहे एप्रिल २०१५ पासून बंद करणेत आलेला निलंबन भत्ता त्यांना तत्काळ अदा करणेत यावा. सदरचा निलंबन भत्ता देतांना त्यांना पत्रासोबत धनादेशाव्दारे देवून त्याची पोहोच घ्यावी. डॉ. बजाज व डॉ. वर्मा हे निलंबन कालावधीत नियमितपणे संस्थानचे कार्यालयात उपस्थिती नोंदवावी. तसेच निलंबन कालावधीत खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस किंवा सेवा करत नसलेबाबतचा लेखी अहवाल दरमहा श्री साईबाबा हॉस्पिटलचे एच. आर. विभागात सादर करत नसलेबाबत त्यांचेवर अतिरिक्त दोषारोप ठेवावेत, असे सांगितले आहे.

डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांचा माहे एप्रिल २०१५ पासून बंद करणेत आलेला निलंबन भत्ता श्री साईबाबा हॉस्पिटल, वित्त विभाग यांचे मार्फत संबंधित कर्मचाऱ्यांना पत्र व सोबत धनादेश देवून त्यांची पोहोच घेवून अदा करता येईल, असे मत आहे. अशी टिपणी दि. ०१-०२-२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचेकडे सादर करण्यात आली होती. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे.त्याप्रमाणे वित्त व्यवस्थापक यांनी डॉ. हरिष हुकुमचंद बजाज यांचे नावे रु. ५,४४,०४२/- तर डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचे नावे रु. ५,४१,०६९/- रकमेचे कापरेशन बॅंकेचे धनादेश इकडील कार्यालयास दिला आहे.

दरम्यानच्या काळात दि. २९-०३-२०१६ रोजी संस्थानचे वतीने शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी येथे डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर एफ. आय. आर. दाखल करणेत आला असून भारतीय दंड विधान कलम ४०८ अन्वये त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांनी निलंबन कालावधीत नियमितपणे संस्थानचे कार्यालयात उपस्थिती नोंदविणे. तसेच निलंबन कालावधीत खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस किंवा सेवा करत नसलेबाबतचा लेखी अहवाल दरमहा सादर आवश्यक आहे. तसे त्यांना वेळोवेळी कळवुनही त्यांनी कार्यालयात उपस्थिती नोंदविलेली नसुन, खाजगी वैद्यकिय प्रॅक्टीस किंवा सेवा करत नसलेबाबतचा लेखी अहवालही दिलेला नसल्याने, त्यांना निलंबन कालावधीतील निलंबन भत्ता देणेत येऊ नये असे मत आहे.

तरी डॉ.हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांना निलंबन भत्ता दयावा किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचेकडून खाजगी प्रॅक्टीस किंवा सेवा करत नसलेबाबत प्रत्येक महिना पूर्ण झालेनंतर अंडरटेकींग/ अर्ज लिहून देण्याचे अटीवर त्यांना निलंबन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी/ वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **शिर्डी विमानतळासाठी कर्मचारी प्रशिक्षणाबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.लि.यांचे दि.२५.०२.२०१६ रोजीचे पत्र दि.२७.०२.२०१६ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे. शिर्डी एअरपोर्टवर पुरविणेत येणारे संस्थान फोम टेंडर वरील ०७ कर्मचारी यांना विमानाचे आगीचे स्पेशल ट्रेनिंग देणेबाबत फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत जा.नं./२०९५/२०१५ दि.१३.०७.२०१५ नुसार कर्मचारी ट्रेनिंग बाबत मा.व्य.संचालक M.A.D.C.यांना पत्र पाठविले होते त्यानुसार दि.२५.०२.२०१६ रोजी M.A.D.C.यांचा मेल इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदर प्रशिक्षणासाठी येणा-या खर्चाबाबत दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.४१ व निर्णय क्र.६५९ नुसार शिर्डी एअरपोर्टवर संस्थानचे अग्निशमन वाहनावरील ०७ कर्मचारी यांना M.A.D.C.कं.मार्फत ट्रेनिंगसाठी पाठविणे झालेस कर्मचा-यांसाठी लागणारा खर्च संस्थानने करावा याकामी येणा-या एकूण खर्चाच्या तपशिलाची सविस्तर माहीती M.A.D.C. यांचे कडुन प्राप्त करुन घेण्यात यावी असे ठरले आहे.

सदर प्रशिक्षणासाठी पाठवावयाचे कर्मचा-यांची नांवे मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचेशी चर्चा करुन कळविता येतील.

शिर्डी विमानतळावर अग्निशमन वाहनासोबत पाठविणेत येणारे संस्थानचे कर्मचारी यांना विमानाचे स्पेशल ट्रेनिंगचे आयोजन दि.१४.०३.२०१६ ते दि.१२.०७.२०१६ या कालावधीत दिल्ली येथे महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.यांचे यांचे शिफारशीने करणेत येणार आहे. AAI (भारतीय विमानपत्तन प्राधिकरण) यांचे कडील प्रशिक्षणासाठी फायर विभागाकडील ०७ कायम ( महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण ३ महीने पाठयक्रम पुर्ण केलेले) कर्मचा-यांची यांचे

करीता रु.७,६१,८६६/- (अक्षरी रुपये- सात सातलाख एकसष्ठ हजार आठशे सहासष्ट मात्र.) खर्च येणार असलेबाबत कळविलेले आहे. सदर खर्चाचे रकमेत प्रशिक्षण फी, भोजन खर्च , गणवेश खर्च व निवास व्यवस्था इ.खर्चाचा समावेश आहे. तसेच संस्थानचे कर्मचारी यांना दिल्ली येथे जाणे व येणे करीता प्रवास खर्च संस्थानला याव्यतिरीक्त करावा लागेल.

दि.२५.०२.२०१६ रोजीचे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI) यांचे ई-मेल नुसार सदर प्रशिक्षणासाठी खर्चाचा सविस्तर तपशिल खालिल प्रमाणे आहे.

**PRORORMA INVOICE FOR BASIC TRAINING COURCE**

| **Course Detail** | **Course fee Structure** | **Total fee per candidate ( in india rules )** |
|---|---|---|
| Basic Training at FTC Nev Delhi period w.e.f 14/03/2016to 2.07.2016 | Tution fee | 60,000.00 |
| | Service Tax 14.5%of Tution Fee | 8,700.00 |
| | Total Amount ( A) | 68,700.00 |
| [121+1days) Reporting one day iv in advance] | Accomodation charges for 122 days @ Rs:100 Per day | 12,200.00 |
| | Canteen Charges For 122 days @ Rs:229 Per day per head | 27,938.00 |
| | Total Amount (B) | 40,138.00 |
| Perhead Amount | ( A+B) | 1,08,838.00 Per **Candidate** |
| | | X 7 prrson |
| **Total Amount** | **7 Candidate** | **7,61,866.00** |

सदर प्रशिक्षण कालावधी ०४ महीणे असून संस्थानचे ०७ कर्मचारी यांचे करीता येणारा रु. ७,६१,८६६/- तसेच दिल्ली येथे रेल्वेव्दारे जाणे व येणे १ कर्मचारी प्रवास खर्च स्लिपर कोच रु.५७५ X २ = रु.१,१५०/- असा एकूण ७ कर्मचा-यांसाठी रु.८,०५०/- खर्च अपेक्षित आहे. सदर प्रशिक्षणासाठी प्रवासासह अंदाजे रु.७,६९,९१६/- (अक्षरी रुपये सात लाख एकोनसत्तर हजार नऊशे सोळा मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सदर खर्चापैकी रु. ७,६१,८६६/- रकमेचा डी.डि.लेखाशाखा विभागामार्फत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचे नांवे तसेच ७ कर्मचारी यांना रेल्वे जाणे व येणे प्रवासासाठी रु.८०५०/- रक्कम संस्थानचे फायर विभागाचे नांवे ॲडव्हान्स मिळणे आवश्यक आहे.

शिर्डी विमानतळासाठी कर्मचारी प्रशिक्षणासाठी कर्मचारी पाठविणे बाबत खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती.

**अ.** संस्थानचे फायर विभागाकडील ७ कायम कर्मचारी यांना संस्थान खर्चाने ऑन-ड्युटी (AAI) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचे कडील विमानाचे आगीचे स्पेशल ट्रेनिंग साठी पाठविणेस मान्यता असावी.

**ब.** संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI) यांचे नांवे डिमांडड्राफ्ट व्दारे रु.७,६१,८६६.०० (अक्षरी रुपये- सात सातलाख एकसष्ठ हजार आठशे सहासष्ट मात्र) पाठविणेस व फायर विभागाचे नांवे रु. ८०५०/- रकमेचा ॲडव्हान्स मिळणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त **'अ'** व **'ब'** बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विमानतळासाठी कर्मचारी पाठविणेकामी समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात घेऊन प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **महिंद्रा & महिंद्रा लिनाशिक. यांचेमार्फत संस्थानकरीता देणगी स्वरुपात नव्याने साठवण तलावाची निर्मीती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईंचे दर्शनासाठी दिवसेंदिवस साईभक्तांचे संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे सोयी-सुविधेसाठी निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था माफक दरात करण्यात येत आहे. साईभक्तांचे पिण्याचे व निवासव्यवस्थेकरीता बांधण्यात आलेल्या इमारतींकरीता पाणी पुरवठा करणेकामी शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजना सन १९९५ पासून कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर योजनेतंर्गत मौजे कनकुरी ता.राहाता या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे. सदरचे साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन (रोटेशन) देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

मागील दोन ते तीन वर्षापासून पर्जन्यमान कमी होत असल्याने धरणे पुर्ण क्षमतेने भरली जात नाहीत. यामुळे जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन उपलब्ध पाणी साठयाचे नियोजन करण्यात आलेले आहेत. जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाणी आवर्तन (रोटेशन) कालावधीत वाढ करण्यात आलेली आहे. संस्थानची पाणी साठवण क्षमता कमी पडत असल्याने साईभक्तांसाठी पाणी उपलब्ध करुन देणेत मोठया प्रमाणावर अडचणी येत आहेत.

संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साईप्रसादालय इमारत, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, व्दारावती भक्तनिवास, मंदिर परिसर, कर्मचारी स्टाफ-क्वॉर्टर या ठिकाणी दररोज साधारणत: कमीत-कमी अंदाजे ३५ ते ४० लाख लिटर्स पाणी वापर होत आहे. गर्दीचे/उत्सवाचे कालावधीत सदर पाणी वापरात वाढ होवून पाणी वापर हा अंदाजे ४० ते ४५ लाख लिटर्स प्रतीदिन इतका होतो. त्यामुळे साईभक्तांना पाणी पुरविणेस फार अडचण निर्माण होते.

**प्रस्ताव:-** श्री आनंद जी.महिंद्रा, चेअरमन & मॅनेजिंग डायरेक्टर, महिंद्रा & महिंद्रा लि. यांनी दि.१२ डिसेंबर, २०१५ रोजी श्री साईंचे दर्शनासाठी शिर्डी येथे भेट दिली असता, त्यांचे समवेत संस्थानमधील पाणी टंचाई बाबत चर्चा केली असता त्यांनी देणगी स्वरुपात संस्थान मालकीचे जागेत पुर्वीचे साठवण तलावालगत कनकुरी गावाचे माध्यमातून मौजे कनकुरी गट नं. १२१ मध्ये नविन ३६ एम.एल. क्षमतेच्या साठवण तलावाची निर्मिती करुन देणेची तयारी दर्शविलेली आहे. महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांचेकडुन याबाबत पाहणी करण्यात आलेली असून त्यांना याकरीता त्यांना आवश्यक असलेले टोटल स्टेशन सर्व्हे करुन नकाशे, लेव्हल इ. पुरविण्यात आलेले आहेत.

महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांनी कनकुरी गावाचे माध्यमातून संस्थान जागेत साठवण तलावाची निर्मिती करणेची तयारी दर्शविलेली आहे. याकरीता ग्रामपंचायत कनकुरी यांचे ग्रामसभेत खालीलप्रमाणे ठराव संमत करणेत आलेला आहे.

***विषय नं.१६**-कनकुरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये नव्याने साठवण तलावाची निर्मिती करणेबाबत.*

***ठराव नं.१६**- महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक हे पाणी टंचाई समस्येवर मात करणेसाठी मदत करणेस तयार आहेत.*

*श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडुन पाण्याचे उपलब्धतेनुसार आपले कनकुरी गावांस पाणी पुरवठा होत असतो. सध्या भीषण पाणी टंचाई असल्याने तसेच कनकुरी गावात शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना असल्याने संस्थान मालकीचे जागेत गट नं.१२१ मध्ये संस्थानकरीता पाण्याचा साठवण तलाव करणेस आमची सहमती असून, आमची कुठलीही हरकत नाही.*

सदरहू साठवण तलावाचे काम महिंद्रा & महिंद्रा लि., नाशिक हे त्यांचे सी एस आर योजनेतून करणार आहेत. महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक त्यांचेकडुन ०९ मार्च, २०१६ रोजीचा ई-मेल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी संस्थानकरीता नव्याने साठवण तलावाची निर्मिती करणेसाठी खालीलप्रमाणे पुर्तता संस्थानमार्फत करुन मिळणेसाठी मागणी केलेली आहे.

१. सदर ठिकाणी महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांचेकडुन नियुक्त करणेत आलेल्या ठेकेदारास संस्थानमार्फत विद्युत व पाणीपुरवठा मोफत उपलब्ध करुन देणेबाबत.
२. साईटवरील विद्युत पोल व स्टॅक केलेली माती व इतर मटेरियल स्थलांतरीत करणेबाबत.
३. सध्याचे साठवण तलावातुन पाईपलाईन टाकणेस व लगतचा रस्ता क्रॉसिंग करणेस परवानगी मिळणेबाबत.
४. संस्थानचे पुर्वीचे साठवण तलावातुन नव्याने करणेत येणा-या साठवण तलावापर्यंत टाकावयाच्या पाईपलाईनकरीता करावयाचे जादा कामांस परवानगी मिळणेबाबत.
५. महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांचेमार्फत नियुक्त होणारे ठेकेदारास सदर कामासाठीचे आवश्यक साहित्य/मशिनरी करीता कामाचे ठिकाणालगत जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

**विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय:-** महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांचेकडुन साठवण तलावाची निर्मिती करणेचे काम देणगी स्वरुपात करुन देणेत येत आहे. सदर साठवण तलावाचे काम संस्थान जागेत करणेत येत असून,

त्यातील पाण्याचा उपयोग संस्थानकरीता होणार आहे. त्यामुळे संस्थानची वाढती पाण्याची गरज मोठया प्रमाणात भागविली जाणार असल्याने त्यांनी वरीलप्रमाणे मागणी केलेली कामांची पुर्तता संस्थानमार्फत करुन देता येईल. याकरीता महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक आवश्यक असलेले टोटल स्टेशन सर्व्हे नकाशे, लेव्हल इ. पुरविण्यात आलेले आहेत.

तरी महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांचेकडुन संस्थानचे मौजे कनकुरी येथील गट नं.१२१ मध्ये ३६ एम.एल.क्षमतेचा नविन साठवण तलाव देणगी स्वरुपात करुन घेणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेसाठी चक्रीय पध्दतीने सादर करणेस मंजुरी मिळावी ही विनंती.

निर्णय क्र.२५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, महिंद्रा & महिंद्रा लि., नाशिक यांचेमार्फत संस्थानकरीता देणगी स्वरुपात नवीन साठवण तलावाची निर्मीती करणेकामी समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **ई-निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यन्त दरम्यानचे पाणीटंचाई कालावधीत पूर्वीचे मान्य दराने भाडोत्री टॅंकरधारकांकडून पाणीपुरवठा उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**प्रस्तावना:-** माहे डिसेंबर-२०१५ मध्ये पाटबंधारे विभागाकडुन पाण्याचे आवर्तन (रोटेशन) न आल्याने संस्थानचे साठवण तलावातुन संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या. साईभक्तांना पाणी उपलब्ध करुन देणेसाठी पाणी वितरण व्यवस्थेवर मोठया प्रमाणावर ताण पडला.

साईभक्तांसाठी तातडीने पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने पाणी पुरवठा विभागाकडुन भाडोत्री टॅंकर लावणेस, त्यासाठी येणारे अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी व भाडोत्री टॅंकरधारकांचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली होती.

कोपरगांव येथील श्री वाल्मिकराव कातकडे यांनी संस्थानकरीता पाणी वाहतुक करणेसाठी २ ट्रक टॅंकर व श्री.राजेंद्र जगताप, शिर्डी यांचेकडुन १ ट्रॅक्टर टॅंकर विनामुल्य उपलब्ध झालेले होते. सदर टॅंकरकरीता डिझेलची व्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडुन उपलब्ध करणेत येवून त्याव्दारे पाणी वाहतुक सुरु करण्यात आली. सदरची व्यवस्था अपुरी पडल्याने भाडोत्री टॅंकरव्दारे तातडीने पाणी उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याने मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे निर्णयास अनुसरुन तसेच दि. २९/१२/२०१५ रोजीचे टिपणीवरील सुरुवातीस ३ लाख रुपये खर्च करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी रक्कम मंजुर करुन कोटेशन मागविणेचे कार्यवाहीस दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संस्थान परिसरास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी तातडीने कार्यवाही करुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. याकामी रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे निम्नतर दर प्राप्त झालेने भाडोत्री टॅंकरधारकांकडुन रु.०.१३ प्रती लिटर या दराने संस्थानकरीता पाणी उपलब्ध करुन घेणेत आले.

जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाण्याचे आवर्तन (रोटेशन) उशिरा आल्याने व संस्थान साठवण तलावास कागद टाकणेचे काम सुरु असल्याने संस्थानकरीता दि.२९/१२/२०१५ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत मोफत उपलब्ध झालेल्या टॅंकरव्दारे १२,४३,४०० लिटर व भाडोत्री टॅंकरव्दारे २,४२,६४,००० लिटर पाणी उपलब्ध करुन घेणेत आले. भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी उपलब्ध करुन घेणेसाठी एकुण रु.३१,५४,३२०/- मात्र खर्च आला.

**प्रस्ताव:-** तहसिल कार्यालय राहाता यांचे क्रमांक कावि टंचाई/४५/२०१६, राहाता, दि.१९/०१/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात येत्या उन्हाळयात पाणी टंचाई कालावधीत संस्थानकरीता पाटबंधारे विभागाकडुन आवर्तन (रोटेशन) कालावधीत नियमीत पाणी पुरवठा होईलच याची शाश्वती नाही. पुन्हा पुढील परिस्थितीमध्ये रोटेशन निश्चित नाही. जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन संस्थानचे साठवण तलावात दि.२४/०१/२०१६ रोजी पाणी देण्यात आलेले आहे. यानंतरचे आवर्तन (रोटेशन) हे साधारणत: ९० दिवसांनी येणार आहे. त्यामुळे याबाबतची काळजी घेणेबाबत सांगितले आहे

सद्यस्थितीत साठवण तलावातील पाणीसाठा हा अंदाजे ४० ते ४५ दिवस (अंदाजे १५ ते २० मार्च, २०१६) पर्यंत पुरेल. त्यानंतर माहे एप्रिल, २०१६ मध्ये जलसंपदा विभागाकडुन आवर्तन (रोटेशन) येणार असल्याने आपणास एक ते सव्वा महिना भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घ्यावा लागेल.

संस्थान साठवण तलावातील सध्याचा पाणीसाठा हा अंदाजे २० मार्च, २०१६ पर्यंत पुरेल. जलसंपदा विभागाकडुन पुढील आवर्तन (रोटेशन) हे माहे १५ एप्रिल,२०१६ पर्यंत गृहीत धरल्यास दरम्यानचे कालावधील २० दिवस ते २५ दिवस भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी उपलब्ध करुन घ्यावे लागेल. पाणी टंचाई कालावधीत साईभक्तांसाठी पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने याकामी जाहिरातीचे खर्चास, ई-निविदा मागवून भाडोत्री टॅंकर लावणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१ कोटी ९० लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस चक्रीय पध्दतीने सादर करण्यात आलेला आहे. याकामी जाहिरात देणे, ई-निविदा मागवून भाडोत्री टॅंकर लावणे व येणारे खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. सदरचे कार्यवाहीस वेळ जाईल.

सन २०१६ करीता अहमदनगर जिल्हयातील टंचाईग्रस्त गाव/वाडयांना खाजगी टॅंकरव्दारे पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणेकामी जिल्हाधिकारी कार्यालयाकडील ई-निविदा सुचना क्रं.टंचाई/कार्या१९अ/२४४२/१५, दि.२०/११/२०१५ व सुचना क्रं.टंचाई/कार्या१९अ/ २७१०/१५, दि.१८/१२/२०१५ अन्वये ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. ई-निविदा सन २०१६ करीता अंतिम दर वाटाघाटीबाबत दि.१९/०१/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे दर निश्चित करणेत आलेले आहेत.

| उपविभाग | संस्थचे नांव व प्रतिनिधीचे नांव | वाटाघाटीमध्ये दिलेले दर (पाणी स्त्रोत शासनाने उपलब्ध करुन देणे) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | वाहनाचा १ मे.टन वाहतुकीचे दराबाबतचा तपशिल | | | |
| | | ३००० ते ५००० लि. क्षमता | | ७५०० ते १२००० लि. क्षमता | |
| शिर्डी | जामखेड तालुका विट उत्पादकांची मो.वाह.सह.संस्था.मर्या.जामखेड श्री शहाजी राऊत. | प्रतिदिन भाडे (रुपये) | प्रति कि.मी.(रुपये) | प्रतिदिन भाडे (रुपये) | प्रति कि.मी.(रुपये) |
| | | १३४ | १.७३ | १३४ | १.७३ |

आपणास टंचाई कालावधीत शिर्डी परिसरातुन पाणी पुरवठा उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याने मागीलप्रमाणे बाभळेश्वर, लोणी, श्रीरामपुर (पाणी वाहतुक अंदाजे ६० कि.मी. जाणे-येणे) या परिसरातुन पाणी उपलब्ध करुन घेण्याची वेळ आल्यास खालीलप्रमाणे दर/खर्च अपेक्षित आहे.

| उपविभाग | संस्थचे नांव व प्रतिनिधीचे नांव | वाटाघाटीमध्ये दिलेले दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | वाहनाचा १ मे.टन वाहतुकीचे दराबाबतचा तपशिल | | | |
| | | **५००० लि. क्षमता ६० कि.मी. वाहतुक** | | **१२००० लि. क्षमता ६० कि.मी. वाहतुक** | |
| शिर्डी | जामखेड तालुका विट उत्पादकांची मो.वाह.सह. संस्था. मर्या.जामखेड श्री शहाजी राऊत. | प्रतिदिन भाडे (रुपये)/ प्रति टन | प्रति कि.मी. (रुपये)/ प्रति टन | प्रतिदिन भाडे (रुपये)/ प्रति टन | प्रति कि.मी. (रुपये)/ प्रति टन |
| | | १३४ | १.७३ | १३४ | १.७३ |
| | | ६७० | ५१९ | १६०८ | १२४६ |

वरील तपशिलानुसार पाणी पुरवठा करुन घ्यावयाचा झाल्यास, ०१ टॅंकरव्दारे १२ तासात ०२ ट्रीप (२४,००० लि.) पाणी पुरवठा (१२० कि.मी. जाणे-येणे) करु शकेल. २४,००० लि.पाणी वाहतुकीसाठी प्रतिदिन रु.४१००/- खर्च अपेक्षित आहे. तसेच पाणी भरण्याचे स्त्रोत संस्थानला शोधुन त्याकरीता पुन्हा अतिरिक्त रु.अंदाजे रु.४५०/- प्रती ट्रीप खर्च खर्च येईल. याप्रमाणे पाणी पुरवठा करुन घेतल्यास आपणास रु.०.१९ प्रती लिटर याप्रमाणे दराने पाणी वाहतुक करुन घ्यावी लागेल.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** दरम्यानचे कालावधीत साठवण तलावातील पाणी पातळी कमी झाल्यास तसेच आगामी श्रीरामनवमी उत्सवात साईभक्तांसाठी तातडीने पाणी पुरवठा सुरुळीत ठेवणे गरजेचे असल्याने वरील नमुद कार्यवाही पुर्ण होईपर्यंत दरम्यानचे कालावधीत याकामी पुर्वीचे मान्य रु.०.१३ प्रती लिटर या दराने संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास, शैक्षणिक संकुल, श्रीसाईप्रसादालय, साईप्रसाद निवासस्थान, मंदिर

परिसर, साईनाथ व साईबाबा रुग्णालय, व्दारावती भक्तनिवास, साई धर्मशाळा, कर्मचारी स्टाफ क्वॉर्टर याकरीता पाणी उपलब्ध करुन घेता येईल.

तरी ई-निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत दरम्यानचे पाणी टंचाई कालावधीत संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास, शैक्षणिक संकुल इ. करीता रु.०.१३ प्रती लि. या दराने पाणी पुरवठा करुन घेणेस व त्यासाठी होणारे दैनंदिन अंदाजे रु. ३,००,०००/- मात्रचे खर्चास व श्रीसाईप्रसादालय, साईप्रसाद निवासस्थान, मंदिर परिसर, साईनाथ व साईबाबा रुग्णालय, व्दारावती भक्तनिवास, साई धर्मशाळा, कर्मचारी स्टाफ क्वॉर्टर इ. करीता रु.०.१३ प्रती लि. या दराने पाणी पुरवठा करुन घेणेस व त्यासाठी होणारे दैनंदिन अंदाजे रु. ३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.२५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यन्तचे पाणीटंचाई कालावधीत पूर्वीचे मान्य दराने भाडोत्री टॅंकरधारकांकडून पाणीपुरवठा उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेकामी समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली**

(कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **पाणी टंचाई कालावधीत संस्थान परिसरास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करुन घेणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईंचे दर्शनासाठी दिवसेंदिवस साईभक्तांचे संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे सोयी-सुविधेसाठी निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था माफक दरात करण्यात येत आहे. साईभक्तांचे पिण्याचे व निवासव्यवस्थेकरीता बांधण्यात आलेल्या इमारतींकरीता पाणी पुरवठा करणेकामी शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजना सन १९९५ पासून कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर योजनेतंर्गत मौजे कनकुरी ता.राहाता या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे. सदरचे साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन (रोटेशन) देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

मागील दोन ते तीन वर्षापासून पर्जन्यमान कमी होत असल्याने धरणे पुर्ण क्षमतेने भरली जात नाहीत. यामुळे जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन उपलब्ध पाणी साठयाचे नियोजन करण्यात आलेले आहेत. जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाणी आवर्तन (रोटेशन) कालावधीत वाढ करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे कनकुरी येथील ३३२ एम.एल. क्षमतेच्या साठवण तलावास ५०० मायक्रॉन जाडीचे HDPE Geomembrane Sheet टाकणेचे कामास माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१५ मध्ये सुरुवात करणेत आलेली होती. त्यातच नाताळ उत्सव कालावधीत श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईंचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविकांची गर्दी झाली. दरम्यानचे कालावधीत पाटबंधारे विभागाकडुन पाण्याचे आवर्तन (रोटेशन) न

आल्याने संस्थानचे साठवण तलावातुन संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या. साईभक्तांना पाणी उपलब्ध करुन देणेसाठी पाणी वितरण व्यवस्थेवर मोठया प्रमाणावर ताण पडला.

साईभक्तांसाठी तातडीने पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने पाणी पुरवठा विभागाकडुन भाडोत्री टॅंकर लावणेस, त्यासाठी येणारे अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी व भाडोत्री टॅंकरधारकांचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली होती.

कोपरगांव येथील श्री वाल्मिकराव कातकडे यांनी संस्थानकरीता पाणी वाहतुक करणेसाठी २ ट्रक टॅंकर व श्री.राजेंद्र जगताप, शिर्डी यांचेकडुन १ ट्रॅक्टर टॅंकर विनामुल्य उपलब्ध झालेले होते. सदर टॅंकरकरीता डिझेलची व्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडुन उपलब्ध करणेत येवून त्याव्दारे पाणी वाहतुक सुरु करण्यात आली. सदरची व्यवस्था अपुरी पडल्याने भाडोत्री टॅंकरव्दारे तातडीने पाणी उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याने मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे निर्णयास अनुसरुन तसेच दि. २९/१२/२०१५ रोजीचे टिपणीवरील सुरुवातीस ३ लाख रुपये खर्च करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी रक्कम मंजुर करुन कोटेशन मागविणेचे कार्यवाहीस दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संस्थान परिसरास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी तातडीने कार्यवाही करुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. याकामी रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे निम्नतर दर प्राप्त झालेने भाडोत्री टॅंकरधारकांकडुन रु.०.१३ प्रती लिटर या दराने संस्थानकरीता पाणी उपलब्ध करुन घेणेत आले.

जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाण्याचे आवर्तन (रोटेशन) उशिरा सुरु झाल्याने व संस्थान साठवण तलावास कागद टाकणेचे काम सुरु असल्याने दि.२९/१२/२०१५ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घ्यावा लागला. उपरोक्त कालावधीत या कालावधीत मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व साईनगर स्टाफ क्वॉर्टर इ. करीता मोफत उपलब्ध झालेल्या टॅंकरव्दारे १२,४३,४०० लिटर व भाडोत्री टॅंकरव्दारे २,४२,६४,००० लिटर पाणी उपलब्ध करुन घेणेत आले. भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी उपलब्ध करुन घेणेसाठी एकुण रु.३१,५४,३२०/- मात्र खर्च आला. पैकी संस्थानचे व्दारावती इमारतीकरीता देणगीदारांकडुन पाणी पुरवठा उपलब्ध झाल्याने सदरचे इमारतीसाठी भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी उपलब्ध करुन देणेत आले नाही.

**प्रस्ताव:-** तहसिल कार्यालय राहाता यांचे क्रमांक कावि टंचाई/४५/२०१६, राहाता, दि.१९/०१/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात येत्या उन्हाळयात पाणी टंचाई कालावधीत संस्थानकरीता पाटबंधारे विभागाकडुन आवर्तन (रोटेशन) कालावधीत नियमीत पाणी पुरवठा होईलच याची शाश्वती नाही. पुन्हा पुढील परिस्थितीमध्ये रोटेशन निश्चित नाही. जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन संस्थानचे साठवण तलावात दि.२४/०१/२०१६ रोजी पाणी देण्यात आलेले आहे. यानंतरचे आवर्तन (रोटेशन) हे साधारणत: ९० दिवसांनी येणार आहे. त्यामुळे याबाबतची काळजी घेणेबाबत सांगितले आहे

यापुर्वी जलसंपदा विभागाकडुन ०१ नोव्हेंबर,२०१५ रोजी संस्थानचे साठवण तलावात पाणी सोडण्यात आलेले होते. त्यानंतर दि.२७/१२/२०१५ रोजी संस्थान साठवण तलावातील पाणी वापर होवून संपले. तीनही साठवण तलावातील पाणी ५७ दिवस पुरले. यावेळी संस्थानचे तीनही साठवण तलाव हा दि.३०/०१/२०१६ रोजी भरुन घेण्यात आलेले आहेत. पुढील आवर्तनाची (रोटेशन) तारीख निश्चि□त नसलेने व पुढील आवर्तन (रोटेशन) ९० दिवसांनी येणार असल्यामुळे संस्थान प्रशासनाचे सुचनेवरुन साठवण तलावास कागद टाकणेचे काम तात्पुरते स्थगित करणेत येवून तीनही साठवण तलावात पाणी भरुन घेण्यात आलेले आहे. संस्थानचे साठवण तलावातील सध्याची पाणी परिस्थती विचारात घेता, कागद टाकणेचे काम सुरु करणेत आलेल्या साठवण तलावातील माती उकरणेत आलेने साठवण तलावातील पाणी पातळी दैनंदिन १ फुट कमी होत आहेत. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, सद्यस्थितीत साठवण तलावातील पाणीसाठा हा अंदाजे ४० ते ४५ दिवस (अंदाजे ०५ ते १० मार्च, २०१६) पर्यंत पुरेल. त्यानंतर माहे एप्रिल, २०१६ मध्ये जलसंपदा विभागाकडुन आवर्तन (रोटेशन) येणार असल्याने आपणास एक ते सव्वा महिना भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घ्यावा लागेल.

संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साईप्रसादालय इमारत, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास भाग ०१ व भाग ०२, व्दारावती भक्तनिवास, मंदिर परिसर, कर्मचारी स्टाफ-क्वॉर्टर या ठिकाणी दररोज साधारणत: कमीत-कमी अंदाजे ३० ते ३५ लाख लिटर्स पाणी वापर होत आहे. गर्दीचे/उत्सवाचे कालावधीत यात वाढ होवून पाणी वापर हा अंदाजे ३५ ते ४० लाख लिटर्स प्रतीदिन होतो. त्यानुसार पाण्याचे योग्य नियोजन व काटकसर करुन आपणास प्रतिदिन १५,००० ते २८,००० लिटर्स क्षमतेच्या ट्रक टॅंकरव्दारे अंदाजे १३० ते १५० खेपा पाणी उपलब्ध करुन घ्यावे लागेल. त्यातच पुढील कालावधी हा सुट्टीचा/गर्दीचा असल्याने या आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार सरासरी प्रति दिन अंदाजे रु.४.५ लाख ते रु.५ लाख खर्च अपेक्षित आहे.

संस्थान साठवण तलावातील सध्याचा पाणीसाठा हा अंदाजे १० मार्च, २०१६ पर्यंत पुरेल. जलसंपदा विभागाकडुन पुढील आवर्तन (रोटेशन) हे माहे १५ एप्रिल,२०१६ पर्यंत गृहीत धरल्यास दरम्यानचे कालावधील ३० दिवस ते ४० दिवस भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी उपलब्ध करुन घ्यावयाचे झाल्यास अंदाजे रुपये १ कोटी ९० लाख मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** पुढील कालावधीत गोदावरी उजव्या तट कालव्यातून पिण्याचे पाण्यासाठी कधी आवर्तन मिळेल याबाबत निश्चिती नाही. तसेच याकामी अंदाजे रु.१ कोटी ९० लाख मात्र खर्च अपेक्षित असल्याने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागेल.

यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठी विधी विभागामार्फत सिव्हील अर्ज दाखल करता येईल. मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर भाडोत्री पाणी टॅंकर सुरु करणेस विलंब होवू नये, लगेचच भाडोत्री टॅंकरव्दारे पाणी वाहतुक करणेस सुरुवात करता यावी, याकरीता दरम्यानचे कालावधीत सदरहू कामी मा.खंडपीठाचे मान्यतेस अधिन राहून वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविता येतील व मा. खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतरच संबंधीताना कार्यादेश देता येईल असे मत आहे.

तरी पाणी टंचाई कालावधीत साईभक्तांसाठी पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने याकामी जाहिरातीचे खर्चास, ई-निविदा मागवून भाडोत्री टॅंकर लावणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१ कोटी ९० लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरच्या विषयास मा. त्रिसदस्यीय समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी टंचाई कालावधीत संस्थान परिसरास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करुन घेणेस व त्यासाठी येणारे खर्चास समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात येणा-या ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी मुदतवाढी बाबत.**

प्रस्ताव- " श्री साईबाबांचे पदस्पर्शाने पावन झालेले शिर्डी शहर हे जगप्रसिध्द झाले आहे. त्यामुळे शिर्डीला दरारोज सुमारे १ लक्ष भाविक साईदर्शनासाठी भेट देत आहेत. तसेच महत्वाचे वार्षिक सण व उत्सवाच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे २ ते ३ लक्ष एवढी प्रचंड प्रमाणात वाढत असते. साईदर्शनासाठी शहरात येणारे भाविक दर्शन झालेनंतर शिर्डी शहरातील महत्वाचे रस्ते, सावर्जनिक मोकळया जागा, सावर्जनिक इमारती व मंदिर भोवतीच्या परिसरामध्ये दिवसभर वावर करीत असतात त्यामुळे शिर्डी शहरामध्ये घनकचरा मोठया प्रमाणावर वाढत जातो.

शिर्डी नगर पंचायत ही क वर्ग नगरपंचायत असून शहराची लोकसंख्या सुमारे ३६००४ एवढी आहे. तसेच श्री साईभक्तांना व नागरीकांना नागरी सुविधा देणे आवश्यक आहे.शिर्डी शहराची दैनदिन साफ सफाई करणे गरजेचे आहे. त्यामध्ये भाविकांची वर्दळ ज्या भागामध्ये मोठया प्रमाणावरअसते त्या भागाची दैनंदिन साफ सफाई दिवसातून दोन वेळेस करणे आवश्यक आहे.

त्यामध्ये नगर मनमाड रोड लक्ष्मीनगर ते साईआश्रम एक पर्यंत दोन्ही बाजू आणि पिंपळवाडी रोड (मनोजकुमार पथ) नगर मनमाड रोड ते साईनाथ मंगल कार्यालय पर्यंत साफ सफाई करीता दैनंदिन सुमारे ४० ते ५० सफाई कर्मचारी आवश्यक असतात. त्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी कडून सदर ठिकाणी साफ सफाई करणे करीता दररोज ४० कामगार देणेत येत आहे.

सदर मुदत दि. ३१/०३/२०१६ रोजी संपत आहे. तरी पुढील अर्थिक वर्ष २०१६-२०१७ या वर्षा करीता नगर मनमाड रोड लक्ष्मीनगर ते साईआश्रम एक पर्यंत दोन्ही बाजू आणि पिंपळवाडी रोड (मनोज कुमार पथ ) नगर मनमाड रोड ते साईनाथ मंगल कार्यालय पर्यंत साफ सफाई आपले कडील आरोग्य विभागाकडून चालू ठेवणे आवश्यक आहे." अशी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संदर्भिय पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

शिर्डी नगरपंचायत यांचे प्रत्येक वर्षीचे मागणीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडून नगर – मनमाड रोड, मनोजकुमार पथ या रस्त्यांचे साफसफाईसाठी सन २००६ पासून ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी देण्यात येत आहे.

यापुर्वी मा. त्रिसदस्य समितीचे दि. १२/०३/२०१५ रोजीचे सभेपुढील विषय नं. १४ निर्णय क्र. ८६ ने ०१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी साफसफाईकरिता आरोग्य विभागामार्फत दैनंदिन ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमूण नगर-मनमाड रोड व मनोजकुमार पथ येथील साफसफाई करण्यात येत आहे. त्याची मुदत दि. ३१/०३/२०१६ रोजी संपत आहे.

नगर पंचायतीचे दि. २४/०२/२०१६ रोजीचे विनंतीपत्रानुसार दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ अखेर उपरोक्त कामी संस्थान लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत पुढील एक वर्षासाठी प्रतिदिनी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमुन नगर-मनमाड रोड व मनोजकुमार पथ येथील साफसफाई करता येईल. सन २०१६-२०१७ चे वार्षिक अंदाजपत्रकात कंत्राटी कर्मचारी मंजूरीसाठी तरतूद करण्यात आली आहे.

निर्णय क्र.२६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात येत असलेल्या ४० अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावास समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ करीता ज्युनियर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रीया राबवितांना शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे वाढती विद्यार्थी संख्या व अपु-या वर्ग खोल्यामुळे शाळा दोन सत्रात भरविण्यात येत आहे. सकाळचे सत्रात ज्यु. केजी, सिनीयर केजी व इयत्ता ६ वी ते १० वी असे एकूण २३ वर्ग व दुपारचे सत्रात इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी चे एकूण २५ वर्ग चालविले जातात. ज्यु. केजी करीता प्रवेश देतांना मागील वर्षाप्रमाणे ५ तुकडया करुन अंदाजे २०० प्रवेश निश्चित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी किमान २०० प्रवेश द्यावे लागतील. शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा ) अन्वये 25 % प्रवेश देणे असल्याने मर्यादीत प्रवेश संख्या ठेवण्यात यावी. ही प्रवेश प्रक्रीया राबवितांना मागील वर्षाचे प्रवेश प्रक्रीया प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**मागणी** – शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमाबाबतची शालेय प्रवेश प्रक्रीया खालीलप्रमाणे राबविण्यात यावी.

**सन २०१६-१७ ज्यु .के.जी. प्रवेश प्रक्रिया तपशिलवार तक्ता**

| अ.न. | प्रक्रिया सन २०१५-१६ | तपशिल | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दि.१ एप्रिल २०१६ ते १० एप्रिल २०१६ अखेर | प्रवेश अर्ज वाटप व अर्ज स्विकृती | वाटपाची वेळ स.१०.३० ते १.०० प्रवेश अर्ज स्विकृती दु. ३.०० ते ५.०० |
| २ | दि. ११ एप्रिल ते २० एप्रिल २०१६ अखेर | प्राप्त अर्जाची छाननी, पात्र अपात्र ठरविणे | ----- |
| ३ | दि. २१ एप्रिल २०१६ | यादी जाहिर | स.१०.३० ते संध्या. ५.३० |
| ४ | दि.२२ एप्रिल २०१६ ते दि.२७ एप्रिल२०१६ अखेर | पालकांनी शालेय शुल्क व स्कुलबस शुल्क भरुन पाल्यांचा प्रवेश निश्चित करणे. | स.१०.३० ते १.०० |

**उपरोक्त प्रवेश प्रक्रीया राबवितांना खालील बाबींची विचार व्हावा.**

१) ज्यु. के.जी. व सिनियर के.जी. वर्ग सकाळचे सत्रात म्हणजे सकाळ ०८.०० ते ११.३० यावेळेत भरविण्यात यावे जेणे करुन स्कुलबसचे नियोजन करण्यास सोयीस्कर होईल.

२) सन २०१६- २०१७ शैक्षणिक वर्षात २०० प्रवेश देवून फक्त ५ तुकडया करण्यात याव्यात. ज्यु. के.जी. साठी दि.०१ एप्रिल २०१६ ते १० एप्रिल २०१६ पर्यत फॉर्मची विक्री करण्यात येईल. व्यवस्थापनात अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन दिलेल्या मुदतीत प्रवेश फॉर्मची विक्री करता येईल.

३) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार दि.३१ जुलै २०१६ अखेर पाल्यांचे वय ३.८ ते ४.४ या वयोगटापर्यत असावे, म्हणजे जन्मतारीख (नोव्हेंबर २०१२ ते मार्च २०१२) या कालावधीतील असेल.

४) ज्या पालकांचे पाल्यांचे वय ३.८ ते ४.४ वयोगटात बसत असेल अशाच पाल्यांना प्रवेश देता येईल. इतरांना प्रवेश अर्ज विक्री करता येणार नाहीत. जेणेकरुन प्रशासनावर पालकांचा रोष राहणार नाही.

५) ज्यु. के.जी. साठी प्रवेश देतांना अनुक्रमे प्राधान्य संस्थान कायम कर्मचारी पाल्य, कंत्राटी कर्मचारी पाल्य व त्या नंतर शिरडी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी (शाळेपासून ३ कि.मी. अंतरावर असलेले रहिवाशी) यांनाच प्रवेश देता येईल.

६) प्रवेश अर्ज देतेवेळी विदयार्थ्यांचा मूळ जन्म दाखला (ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका) यांनी प्रमाणित केलेला, तसेच शिरडी गावातील आधारकार्ड, मतदान कार्ड/ रहिवासी दाखला/ रेशनकार्ड/ लाईटबील तपासून अशाच पालकांचा पाल्यांना प्रवेशासाठी प्रवेश अर्ज देता येईल.

७) प्रवेश निश्चित करतांना विदयार्थ्यांचे शैक्षणिक व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात येईल. जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

८) स्कुलबस सुविधा उपलब्धतेनुसार पुरविण्यात येईल. पुरेशा प्रमाणात सिट उपलब्ध नसतील तर पालकांना स्वतः पाल्यांची शाळेत ने-आण करण्याची सोय करावी लागेल.

९) प्रवेश यादी संस्थान कायम कर्मचारी, संस्थान कंत्राटी कर्मचारी व शिरडी गाव (३ कि.मी.) या क्रमांनुसार यादी जाहिर करण्यात येईल असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमाबाबतची शालेय प्रवेश प्रक्रिया जाहीर झालेली असून त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे अन्यथा शासनाच्या स्कुल मान्यतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** – ज्यु. के.जी. साठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना मर्यादीत २०० प्रवेश दिले तर आजमितीस तूर्त तरी वर्ग खोल्या अपु-या पडणार नाहीत,तसेच उपरोक्त नियमावलीतील आवश्यक माहीती पालकांना माहीत व्हावी यासाठी शाळेच्या प्रवेशव्दारावर प्रवेश प्रक्रिया वेळापत्रकाचा डिजिटल बोर्ड तयार करुन लावता येईल. तरी निर्णयार्थ सादर,

निर्णय क्र.२६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१६- १७ करीता ज्युनियर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रीया राबवितांना शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेकामी समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्य, इ.मि.स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **संस्थानच्या वाहनांच्या विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणे बाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम-२००४ मधील तरतुद:- १७ (२) (झ)** .

**प्रस्ताविका**:-दि.०२.०२.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार वाहन विभागाकडील ८८वाहनांचा विमा दि.३१.०३.२०१६ पुर्वी नुतनीकरण करणेस व याकामी अंदाजे रक्कम रु.१६,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. सोळा लाख ) मात्र खर्चास मान्यता देण्यात आली होती.

यापुर्वी दि. ०१.०४.२०१५ ते दि.३१.०३.२०१६ या कालावधीकरीता एकुण ७८ वाहनांचा विमा रक्कम रु.१४,७८,३३७/-(अक्षरी रक्कम रु.चौदा लाख अठयाहत्तर हजार तिनशे सदवतीस ) मात्र दि. न्यु. इंडिया अॅश्यूरन्स् कंपनी., श्रीरामपूर यांचेकडुन घेण्यात आलेला होता.

दि.०१.०४.२०१६ ते दि.३१.०३.२०१७ या कालावधी करीता वाहन विभागातील ८८ वाहनांचा विमा पॉलिसी नुतणीकरण करणे कामी ई-निविदा सुचना जनंसपर्क कार्यालयामार्फत दि.२९/०२/२०१६ रोजीचे सार्वमत वृत्तपत्रात तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.२६/०२/२०१६ ते दि.०४/०३/२०१६ अखेरसंस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तदनंतर EDP विभागामार्फत ई-निविदाडाऊनलोंडींग दि.२६/०२/२०१६ ते दि.०४/०३/२०१६ अखेर विहित वेळेत ई-निविदाडाऊन लोडींग सेवा उपलब्ध करण्यात आली होती.

सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.०५.०३.२०१६ रोजीचे आवक नं.२३९०१ प्रमाणे दि. न्यु.इंडीया अॅश्युरन्स् कंपनी लि. श्रीरामपूर, यांचेकडील पत्रानुसार आपले कडील वाहने विमा ई-निविदा सुचना नुसार निविदा किमंत व बयाणा रक्कम भरु शकत नाही., तसेच आमची विमा कंपनी ही. आय.आर.डी.ए. च्या नियमानुसार नियत्रीत असलेने त्यानुसार कामकाज करते. तरी याबाबत योग्य तो विचार व्हावा अशी विनंती केलेली आहे. त्याच प्रमाणे ओरिएंटल, नॅशनल व युनायटेड इंडिया अॅश्यूरन्स् कंपनीचे प्रतिनीधींनी आय.आर.डी.ए. च्या नियमानुसार आम्ही बयाणा रक्कम भरु शकत नाही., असे लेखीकळविले आहे. बयाणा रक्कम रु.५०,०००/- विमा कंपन्या भरण्यास तयार नसल्याने मुदतीमध्ये एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

वाहन विभागातील सर्व वाहनांचा वाहन निहाय विमा नुतणीकरण करणे कामी दुस-यांदा फेर ई-निविदा दि.१०-०३-२०१६ते दि.१५-०३-२०१६रोजीचे दरम्यान माहिति तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात सुचना प्रसिद्ध करुन तदनंतर EDP विभागामार्फत ई-निविदाडाऊनलोंडींगदि.१०-०३-२०१६ते दि. १५-०३-२०१६ या अखेर कालावधीत दुस-यांदा फेर ई-निविदाप्रक्रिया राबविणे बाबत कार्यवाही करण्यात आलेली होती. तथापि दि.१६-०३-२०१६ अखेर युनायटेड इंडिया अॅश्यूरन्स् कंपनी,लि. शाखा शिर्डी सदर कंपनीची इकडील विभागाकडे आवक नं. २४७३३ नुसार एकच तांत्रीक निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.१७/०३/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार,तिस-यांदा फेर ई-निविदा माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात सुचना प्रसिद्ध करुन तदनंतर EDP विभागामार्फत दि.१८-०३-२०१६ते दि.२३-०३-२०१६ या कालावधीत तिस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणे बाबत कार्यवाही करण्यात आलेली होती.

तथापि तिस-यांदा फेर ई-निविदाचेमुदती अखेर एकही निविदा प्राप्त न झाल्याने दि.२४/०३/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, दि.२४/०३/२०१६ ते दि.२५/०३/२०१६ अखेर दोन दिवस ई-निविदा भरणेस मुदत वाढ देण्यात आली होती. मुदती अखेर दि.२५/०३/२०१६ अखेर एकच निविदा प्राप्त झाल्याने दि.२६/०३/२०१६ रोजी खरेदी समितीचे सदस्य मा.प्रशासकिय अधिकारी व मा.मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष ऑनलाईन प्राप्त तांत्रिक ई-निविदा उघडणेत आले आहे. त्यानुसार युनाईटेड इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा-शिर्डी यांची तांत्रिक निविदा पात्र ठरलेली आहे.

**<u>मागणी-</u>** तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे वाहन विभागातील सर्व वाहनांचा वाहन निहाय विमा पॉलिसी नुतनीकरण करणे कामी तांत्रिक बीड मध्ये पात्र ठरलेल्या युनाईटेड इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा-शिर्डी यांची कमर्शिअल ऑनलाईन बीड दि.२९.०३.२०१६ चे मा. उपसमितीचे सभेत उघडण्यात आली आहे. ई-निविदेत ८८ वाहनांचा एकुण प्रिमियम विमा रक्कम रु.१६,९०,८००/- इतका आहे.कमर्शीयल बिडवर मा.मुख्य लेखाधिकारी यांच्या शेरा " मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी सर्वसाधारणपणे विमा हप्त्यामध्ये २० ते २५ टक्के वाढ होत आहे. असे दिसते. घसारा विचारात घेऊन मागील वर्षाचे दर व यावर्षाचा दर यापैकी जो दर कमी असेल त्या दरात पॉलिसी देणे विषयी संबंधीत कंपनीस विचारणा करुन दर स्विकृत करणेस हरकत नाही " युनाईटेड इंडीया इंन्शुरन्स कंपनी लि.,शाखा-शिर्डी यांचे शाखाधिकारी श्री.विजय थोरात यांना सुधारीत दरपत्रक सादर करण्याबाबत मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार त्यांनी दरपत्रक फेर सादर करुन ८८ वाहनांचे विमा नुतनीकरण करणेकामी सर्व करांसहीत

विमा प्रिमियम रक्कम रु.१६,५८,११२/- इतकी कळविलेली आहे. वाहन विभागाकडील वाहनांचा मागील वर्षाचा विमा कालावधी दि.३१.०३.२०१६ रोजी संपणार असल्याने दि.०१.०४.२०१६ पासून वाहनांचा विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

सन २०१६-२०१७ या आर्थीक वर्षात वाहन विभागाकडील वाहनांचा विमा नुतनीकरण करणे कामी अंदाजपत्रकात रक्कम रु.२०,००,०००/- मात्रचे तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी युनाईटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लि.,शाखा-शिर्डी यांनी ८८ वाहनांकरीता सर्व करांसहीत सुधारीत दिलेल्या विमा प्रिमियमची रक्कम रु.१६,५८,११२/- (अक्षरी रक्कम रु. सोळा लाख अठ्ठावन्न हजार एकशे बारा रु. मात्र) अदा करुन वाहनांचा विमा नुतनीकरण करणेस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव मा. व्य.समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांच्या विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणेकामी समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच संस्थान वाहनांच्या विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणे ही तातडीची बाब असताना त्यासाठी विलंब का झाला याची कार्यकारी अधिकारी यांनी संबंधीतांकडून चौकशी करुन, त्याचा अहवाल सभेसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व्हे नं.१ मधील संस्थानला मिळणा-या जागेसाठी कंपाऊंड करणेकामी एम.एस.ॲंगल खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतूद** : अधिनियम कलम 17(2) (छ) – विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची, वेळोवेळी तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील, आणि अशा मालमत्तांवर कोणतेही अतिक्रमण झाले असल्यास, ते दुर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करील. (झ) सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

**प्रस्तावना –** विधी विभागाकडील दिनांक 07/03/2016 रोजीची टिपणीन्वये सर्व्हे नं. 1 मधील 101 दुकानदारांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार दिनांक 04/04/2016 रोजीच्या पुर्वी पर्यायी जागा किंवा नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येईल. त्यानंतर शासन व नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सदर दुकाने काढून टाकण्याची कार्यवाही करणे येईल. रिकाम्या होणा-या जागेवर पुन्हा अतिक्रमणे होऊ नये यासाठी संस्थानचे विविध विभागांनी करावयाच्या कार्यवाहीमध्ये मेकॅनिकल विभागाने सेवाधामसमोर पालखी रोडच्या कडेला, गेट नं. 4 पर्यत कालॅस्पिबल रेलीग्ज बसविण्यात याव्यात, जेणेकरुन पालखी रथ मिरवणूक, उत्सव व गर्दीच्या कालावधीत कोलॅस्पिबल रेलीग्ज तात्पुरते काढता येऊ शकतील, असे निर्देशित केलेले आहेत.

उपरोक्त निर्देशाप्रमाणे व करावयाच्या तातडीचे कार्यवाहीकरीता आवश्यक रेलीग्ज इकडील विभागाकडे उपलब्ध नसलेने तसेच राहीलेला कालावधीचा विचार करता यामध्ये रेलीग्ज तयार करुन घणे शक्य नसलेने सर्व्हे नं. 1 मध्ये दुकाने काढणेत आल्यानंतर पुन्हा अतिक्रमण होऊ नये याकरीता मेकॅनिकल विभागाचे दिनांक 10/03/2016 राजीचे मंजूर टिपणीन्वये तुर्त तातडीने चैनलिंक जाळीचे कंपाऊंड करणेकामी मेकॅनिकल विभागामार्फत लोखंडी ॲंगल तयार करुन देणेस व त्यावर बांधकाम विभागामार्फत चैनलिंक जाळीची खरेदी करुन बसविणेची कार्यवाहीस मान्यता मिळालेली आहे.

**मागणी –** उपरोक्तप्रमाणे चैनलिंक जाळी लावणेसाठी एम.एस. ॲंगल पोल तयार करुन देणेसाठी आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे शिल्लक नसलेने ते परिसरातील पुरवठाधारक यांचेकडून तातडीने खरेदी करावे लागणार आहे. यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | दर रुपये | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | एम ॲंगल .एस.<br>साईज 50 – x 50 x 5 एम.एम. | २००० किलो | ४६/- | ९२,०००/- |

वरीलप्रमाणे सर्व्हे नं. 1 मधील दुकाने काढलेनंतर त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे होऊ नये याकरीता चैनलिंक जाळी लावणेकरीता एम.एस. ॲंगलचे पोल उभे करणेसाठी आवश्यक ॲंगल परिसरातील पुरवठाधारक यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येतील. याकामी येणा-या अंदाजे रुपये 92,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**शासनाची / मा. उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता** : नाही

**विभागाचा स्पष्ट अहवाल–** तरी चैनलिंक जाळी लावणेकरीता एम.एस. ॲंगल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 92,000/- (अक्षरी रुपये ब्यानों हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व्हे नं.१ मधील संस्थानला मिळणा-या जागेवर पुन्हा अतिक्रमणे होऊ नये, यासाठी कंपाऊंड करणेकामी एम.एस.अँगल खरेदी करणेसाठी समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्यांची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-मॅकेनिकल विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१७ **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयातील, त्यांचे अधिनस्त असलेल्या भू-संपादन कक्षास व या कक्षात कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- (अ) तत्कालीन मा.व्यवथापन समितीचे दिनांक १५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संबंधित भूसंपादनाची कामे करणेकरीता पुर्वीच्या मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर (महसुल) यांचे पर्यवेक्षणाखाली त्यांचे श्रीरामपूर येथील कार्यालयात स्वंतत्र भसंपादन कक्ष स्थापन करणेत आलेला होता.

त्यानंतर, मा.जिल्हाधिकारी, अहमनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन /कार्या/१६-क/१०८५/२०१३, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशाने मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे अधिनस्त असणारा उपरोक्त भूसंपादन कक्ष तेथे कार्यरत असलेल्या कर्मचारी वृंदासह मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे अधिनस्त देणेत आलेला आहे.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ ते १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, विषयांकित भूसंपादन कक्षाकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मा.त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७७ नुसार दि.०१/०५/२०१५ ते दि.३०/०४/२०१६ अखेर खालीलप्रमाणे कर्मचा-यांना त्यांचे नावासमोरील मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली असून, सदर मुदतवाढदि.३०/०४/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे.

| अ.नं. | तपशील | मंजूर पद संख्या | सध्या प्रति महिना देणेत येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकुन | ०१ | ७,०००/- (एकत्रित) |
| ०२ | लिपीक टंकलेखक संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०२ | किमान वेतन दराप्रमाणे कुशल कर्मचारी वेतन |
| ०३ | शिपाई संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०१ | किमान वेतन दराप्रमाणे अकुशल कर्मचारी वेतन |

**(ब)** आता, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक १४ मार्च, २०१६ चे विनंती पत्राव्दारे, त्यांचेकडे एकूण १३ भूसंपादन प्रस्तावावर कार्यवाही सुरु असल्याने, तसेच श्री साईबाबांची जन्मशताब्दी वर्षाकरीता भूसंपादनाची नवीन प्रकरणे या वर्षी दाखल होण्याची शक्यता आहे. सध्या मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे अधिनस्त असलेल्या भूसंपादन कक्षाकडे खालील प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

| अं.क्र | भूसंपादक संस्थेचे नाव | कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ०३ |
| ०२ | मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी (अंतर्गत रस्ते प्राधान्य गट क्रमांक २) | ०८ |
| ०३ | मा.अधिक्षक डाकघर शिर्डी पोस्ट ऑफीससाठी भूसंपादन | ०१ |
| ०४ | राहाता कोर्ट निवासस्थानाकरीता भूसंपादन | ०१ |
| | **एकूण** | **१३** |

या सर्व बाबीं विचारात घेऊन, या सर्व प्रकरणंचा जलदगतीने निपटारा करणेसाठी या भूसंपादन कक्षास दिनांक ०१/०५/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेर एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस तसेच सध्या या कार्यालयात कार्यरत असलेले श्री.रामचंद्र भानुदास नागरे (सल्लागार) अव्वल कारकून यांना सध्या देण्यात येत असलेल्या एकूण मानधन रु.७,०००/- ऐवजी रु.१२, ०००/- मानधन वाढवून देणेबाबत विनंती केलेली आहे.

**(क)** उपरोक्त <u>परिच्छेद ब</u> मध्ये नमूद केलेले मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दिनांक १४ मार्च, २०१६ चे पत्र प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग यांचेकडेस अभिप्रायासाठी पाठविणेत आले होते. त्यांनी दिनांक २३ मार्च, २०१६ रोजीचे पत्राने खालील अभिप्राय दिलेला आहे.

" सध्या सदर भूसंपादन कक्षास दि.०१/०५/२०१५ ते दि.३०/०४/२०१६ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर भूसंपादन कक्षास दि.०१/०५/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेर एक वर्षासाठी मुदतवाढ मिळणेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दि.१४/०३/२०१६ रोजीचे पत्राचे अवलोकन केले असता सदर भूसंपादन कक्षास व कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांना दि.०१/०५/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ या एक वर्षासाठी मुदतवाढ देणे उचित होईल तसेच अव्वल कारकुन श्री.रा.भा.नागरे यांचेकडील कामाचा व्याप व स्वरुप पहाता त्यांना त्यांचे मानधन काही प्रमाणात वाढवून देण्यास हरकत नाही. " असे कळविलेले आहे.

(ड) संदर्भ क्र.०३ Land Acquisition, Rehabilitation and resettlement Act, 2013 मध्ये महसुल व वन विभागाने दि.१९ मार्च २०१४ रोजी प्रकाशित केलेल्या नोटीफिकेशन मध्ये "Such an amount equal to 3 per cent. of the amount of compensation towards establishment charges to be deposited to the State Government." असे नमूद केलेले आहे. याचाच अर्थ भूसंपादनासाठी येणा-या एकूण खर्चापैकी ३ % रक्कम भूसंपादनाचे आस्थापना खर्चापोटी शासनाकडे जमा करावी. या अटीनुसार संस्थान व्यवस्थापनाने वेळोवेळी भूसंपादनापोटी, भूसंपादन खर्चाच्या ३ % रक्कम मा.शासनास आदा केलेली आहे / करत आहे.

तसेच, महसुल व वन विभागाने दि.१९ मार्च २०१४ रोजी प्रकाशित केलेल्या नोटीफिकेशन मध्ये परिच्छेद क्र.३ मध्ये, 'Such an amount towards honorarium of the private of retired Governmental employees including one retired Tahsildar, two retired Avalkarkuns, one retired Circle officer, retired Surveyors, retired Engineers, retired Horticulturists and retired Forest officer for valuation of structures and trees in the land to be acquired, two private Computer Operators and two private persons as peons and whatever human assistance required by the officer acquiring land, and an amount towards retaining of the vehicle with driver needed during the process of the acquisition of the land and Rehabilitation and Resettlement of the affected families, be deposited in the Personal Ledger Account (PLA) of the Concerned land Acquisition Officer or Sub-Divisional Officer or, as the case may be, the Administrator, appointed in the behalf (along with the proposal); and' असे नमूद केलेले आहे. याचाच अर्थ, शासनास जमा करावयाच्या ३ % आस्थापना खर्चाच्या व्यतिरिक्त वरीलप्रमाणे (कंत्राटी) मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे, असे अभिप्रेत आहे. सन २०१५ मध्ये उपरोक्त तरतुदीनुसार सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त परिच्छेदातील वस्तुस्थिती विचारात घेतां, मा.उपविभागायी अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक १४ मार्च, २०१६ रोजीचे पत्राने केलेल्या विनंतीस अनुसरुन, मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांचे अधिनस्त असलेल्या भूसंपादन कक्षास व सदर कक्षाकडे कार्यरत असलेल्या कुशल ०२ व अकुशल ०१ कर्मचा-यांस किमान वेतन दराप्रमाणे तसेच अव्वल कारकुन श्री.रामचंद्र भानुदास नागरे यांना एकूण मानधनावर दि.०१/०५/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेर एक वर्षासाठी मुदतवाढ तसेच संबधीत अव्वल कारकुन यांना सध्या देण्यात येत असलेल्या एकूण मानधन रु.७,०००/- मध्ये उचित वाढ करणे बाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांचे अधिनस्त असलेल्या भूसंपादन कक्षास व सदर कक्षाकडे कार्यरत असलेल्या कुशल ०२ व अकुशल ०१ कर्मचा-यास किमान वेतन दराप्रमाणे तसेच अव्वल कारकुन श्री.रामचंद्र भानुदास नागरे यांना एकूण मानधनावर दि.०१/०५/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेर एक वर्षासाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**सध्या श्री.रामचंद्र भानुदास नागरे (सल्लागार) अव्वल कारकुन यांना एकूण मानधन रु.७०००/- मात्र देण्यात येत आहे. वाढती महागाई व त्यांच्या कामाचे स्वरुप या गोष्टींचा विचार करता, त्यांच्या मानधनामध्ये दरमहा रु.३०००/- मात्र वाढ करणे आवश्यक व उचित होईल, असे समितीस वाटते. सबब, समिती श्री.रामचंद्र भानुदास नागरे, (सल्लागार) अव्वल कारकुन यांना दि.०१ मे २०१६ पासून रु.१०,०००/- मात्र एकत्रित मानधन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र.२०२ ते २६४ सर्वानुमते घेण्यात आले.
सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (कुंदन सोनवणे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**